# सत्तावनचे स्वातंत्र्ययुद्ध आणि त्याचे निंदक

डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे

लाखे प्रकाशन
नागपूर

साहित्य प्रसार केंद्र
पटवर्धन हायस्कूल समोर, सीताबर्डी,
नागपूर-४४००१२ फोन:२५२३७०२

**सत्तावनचे स्वातंत्र्ययुद्ध आणि त्याचे निंदक**

**© डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे**

• • •

**प्रकाशक / मुद्रक**

लाखे प्रकाशन

सौ. संध्या चंद्रकांत लाखे

मुकुंदराज पथ, महाल, नागपूर-०२

दूरध्वनी : २७६८८१४

• • •

**प्रथम आवृत्ती : २८ मे १९९७**

**द्वितीय आवृत्ती : १६ मे २०१०**

• • •

**अक्षर रचना**

ऋतुजा ग्राफीक्स

मोबाईल : ९७६५२५०९०३

• • •

**मुखपृष्ठ**

मंगेश कल्याणकर, नागपूर

मोबाईल : ९०४९९७०६६३

• • •

**मूल्य**

**२००/- रुपये**

**अर्घ्यम्**

**छन्दो उद्भवः**

|१|
भारतभूविजयपताका । दोलयांबभूव सहेलम् ॥
हिन्दुश्च मुस्लिमश्चापि । उज्जगार दास्योच्छेदम् ॥
वीररत्नमङ्लपाण्डे।
आजुहाव सैनिकबन्धून् ॥
असिलताः करे धार्यन्ताम् । रिपुमुण्डानि च निपतन्ताम्॥

|२|
वेश्या अपि सैनिकवृन्दम् । अब्रुवन् षण्ढता केयम् ?
फैरङ्गं सेवथ पापम् । निर्घृणं देशहन्तारम् ।।
त्वेषेण सैनिकाः शीघ्रम् ।
आक्रामन्सहसा दिल्लीम् ।
उदघोषयदांग्लोच्छेदम् । देशस्य कोणकोणोऽपि ॥

|३|
प्राप्नुवन्नशीतिं तरुणः। जगदीशपुरं भूषयिता ॥
नाम्ना स कुमारः सिंहः। संचचार रणसम्मर्दे॥
फैरङ्गाः प्रबला सेनाः।
मर्दिता नित्यशस्तेन ॥
अजितःस सदा सङ्ग्रामे । नश्वरं त्यक्तवान्देहम् ॥

|४|
विकराला आंग्लशतघ्न्यः। उदवमन्नग्निकल्लोलान् ।
पार्श्वतः फिरङ्गाः सेनाः। सन्नद्धा अभिघाताय ॥
प्रत्ययोधयत्तानबला।
उज्जगर्ज समरे चपला ॥
भगवद्ध्वज एव दिदीपे । गिरिदुर्गे ग्वाल्हेरस्य ॥

|५|
लिपिकोऽभूत्तात्या टोपे । वरसेनानीर्विण्ड्हॅमः॥
रणभूमिः कानपुरस्य । डिण्डिमायिता रणघोषैः॥
निष्प्रभोऽभवत्सेनानीः।
लिपिकस्तु जयश्रीदयितः॥
कानपुरं भगवत्केतुः भूषयांचकार सहर्षम्॥

|६|
रिपुसेनास्तात्याटोपिम्। मृगयन्ते गङ्गातीरे ॥
चारास्तु तदा कथयन्ति । प्राप्तोऽसौ भीमातीरम् ॥
निर्मिता नवनवाः सेनाः॥
योधिताः शतैः सङ्ग्रामा ॥
उड्डीय च गरुडोड्डाणान् । जर्जरीकृताः फैरङ्गाः॥

|७|
आसेतुहिमान्तं देशः। उत्थितो दास्यनाशाय ॥
अयमेव निर्झरः स्फूर्तेः। आझादहिन्दनिर्माता॥
नीरवः

अर्घ्य

छन्द उद्धव

|१| विजयध्वज भारतभूचा । डौलांत फडकला होता॥
हिन्दू वा मुस्लिम सारा। गर्जला "फिरंगी मारा"॥
वीररत्न मङ्गल पाण्डे।
सैनिकास आवाहन दे॥
वीरहो धरा समशेर। शत्रूचे वाहो रुधिर॥

|२| वेश्याहि सैनिका वदल्या। "हे कसे षण्ढ हो झाला?
तुमच्याच देशबन्धूंना । शत्रुने चढविले फासा"॥
त्वेषाने सैनिक उठले।
दिल्लीस जाउनी भिडले॥
देशात बोल दुमदुमले । "स्वातन्त्र्य आज अवतरले"॥

|३| ऐंशी वर्षाचा तरुण । जगदीशपुरी अवतरला॥
तो कुमारसिंह म्हणूनी। रणभूमीवर संचरला॥
उद्दाम इंग्रजी सैन्ये।
मारुनी काढिली त्याने॥
समरात अजिंक्य ठरूनी। इहलोक सोडुनी गेला।

|४| विकराल इंग्रजी तोफा। ओकती अग्निकल्लोल॥
सज्ज त्या इंग्रजी सेना। मागुती कराया चाल॥
झुंजली तयाशी अबला।
संगरी कडाडे चपला॥
झळकला पुनः जरिपटका। किल्ल्यावर ग्वाल्हेरीला॥

|५| कारकून तात्या टोपे। विण्डहॅम सिद्ध सेनानी॥
रणभूमी कानपुराची। दुमदुमली रणघोषांनी॥
सेनानी निष्प्रभ ठरला।
कारकून विजयी झाला॥
कानपुरी फडके भगवा। स्वातन्त्र्यदेविचा ठेवा॥

|६| तात्यास इंग्रजी सेना। शोधतात गंगथडीला॥
हेरांनी तोच वदावे। भिडला तो भीमथडीला॥
जमविल्या नवनव्या सेना।
लढविल्या अमाप लढाया॥
मारोनी गरुडभराऱ्या । हैराण फिरङ्गी केला॥

|७| वीराव्रत धरूनी देश । आसेतुहिमाचल उठला ॥
स्फूर्तीच्या याच झऱ्याने । आझाद हिन्द निर्मियला॥
नीरव



# प्रस्तावना

या पुस्तकाची पहिली आवृत्ती २८/५/१९९७ ला प्रकाशित झाली होती. २००७ साली भारत सरकारने सत्तावनचे दीडशेवे वर्ष साजरे करण्याचा निर्णय घेतला तेव्हा या ग्रंथाची दुसरी आवृत्ती काढावी असा विचार होता. पण प्रकाशकाजवळ व अन्य कुठेही या पुस्तकाची एखादी प्रत देखील सापडेना. प्रत शोधता शोधता ते वर्ष निघून गेले. सुदैवाने एका वाचकाजवळ प्रत सापडली. मग असा विचार केला की, या पुस्तकाचे केवळ पुनर्मुद्रण न करता समारंभवर्षी झालेल्या नव्या लिखाणात काही नवे मुद्दे असले तर त्यांचा परामर्श घेऊन नवीन आवृत्ती काढावी. ज्यावर पुनः चर्चा करणे जरूर आहे असे दोन मुद्दे सापडले. ते म्हणजे १७५७ मध्ये ब्रिटिश राज्य स्थापन झाल्यापासूनच त्याच्या विरुद्ध जनता सतत उठाव करीत होती. परसत्तेविरुद्ध अखिल जनतेत इतका द्वेष या पूर्वीच्या इतिहासात आढळत नाही. त्यामुळे या विषयी जी माहिती मिळेल ती गोळा करून दुसऱ्या आवृत्तीचे पहिले प्रकरण म्हणून तिचा समावेश केला.

वरील मजकूर लिहून झाल्यावर माझे मित्र श्री. के. चितळे यांनी शोधून काढलेली काही नवीन तथ्ये प्राप्त झाली. या तथ्याकडे इतिहासकारांनी पूर्ण दुर्लक्ष केले आहे. कारण सत्तावनबद्दल भारतीय कागदपत्रे फारशी उपलब्ध नाहीत. विशेषतः जी राज्ये इंग्रजांनी खालसा केली त्यांची दप्तरे शोधून काढणे सोपे नाही. नागपूरची हीच स्थिती आहे. पण महाल भागात काही कुटुंबांत त्या काळच्या कथा उपलब्ध आहेत. परंपरा हे इतिहासाचे एक प्रमाण असल्यामुळे त्यात मिळणाऱ्या माहितीची उपेक्षा करता येत नाही. ही माहिती अशी

१८१८ साली आप्पासाहेब भोसले यांचा पराभव होऊन त्यांच्या राज्यातील नर्मदेकडील भाग त्यांना इंग्रजास द्यावा लागला. पण राजाने तह करून तो भाग इंग्रजांना अर्पण केला असला, तरी त्या भागावर आप्पासाहेबांचे जे अधिकारी तैनात होते त्यांनी आपल्या ताब्यातील प्रदेश इंग्रजास देण्यास नकार दिला. जेथे इंग्रजांचे राज्य स्थापन झाले तेथे ते स्थापन झाल्याबरोबर वा स्थापन होते असे पाहताच कोणत्याही राजाच्या नेतृत्वाची वाट न पाहता जनताच आपला प्रतिकार सुरू करी. तसेच येथेही झाले. जबलपूर ब्रिटिश अधिकाऱ्यांना दाद देईना तेव्हा हार्डिन त्यावर चालून गेला. पण त्याने तो केव्हा व कसा काबीज केला याचा तपशील सापडत नाही. इंग्रजाविरुद्ध लढणाऱ्यात सदूबाबा, माधवराव यांची नावे आढळतात. बल्हारी, सोलापूर मण्डला, वैरागड या सर्व ठिकाणी कडवा प्रतिकार झाला. शिवनीच्या लढाईत खण्डोपन्तांचे नाव झळकते. नागपूरच्या आग्नेयेस असलेल्या घिसडमध्ये गणपतरावाने भीमपराक्रम केला. हा प्रतिकार किती दिवस टिकला वगैरे तपशील उपलब्ध नाही.

आप्पासाहेबांचे राज्य सहज हस्तगत होत नाही या कारणास्तव आप्पासाहेबांना अटक करण्यात

आली, पण ते तेथून निसटले. त्यांनी आपल्या अन्थरुणावर उशा व तक्क्यावर पांघरूण घालून आपण निजलो असल्याचा देखावा दाखविला व पसार झाले. सातपुड्यात गोण्ड भिल्लादिकांना जमवून इंग्रजांशी गनिमी युद्ध सुरू केले. यात यश येणे कठीण आहे असे पाहून त्यांनी जोधपूरच्या राज्यात आश्रय घेतला. आप्पासाहेब रणजितसिंगाला भेटल्याचाही उल्लेख सापडतो. त्यांचा मृत्यू जोधपूरमध्ये १८४० साली झाला. जोधपुरमध्ये जाऊन इंग्रजांनी त्यांना पकडले कसे नाही याचे उत्तर असे दिले जाते की जोधपूरच्या राजाने ते शरणागत म्हणून त्यांना त्यांच्या शत्रूच्या स्वाधीन करण्यास नकार दिला. आप्पासाहेबांच्या पराक्रमाची गाथा याप्रमाणे विस्कळीत आहे. तीवर अधिक संशोधन झाले तर इंग्रजी राज्य स्थापन झाल्यादिवसापासूनच त्याच्या विरुद्ध उठाव कसे सुरू झाले, यावर अधिक प्रकाश पडेल.

या बरोबरच प्रसिद्ध लेखक श्री. शेषराव मोरे यांनी सत्तावनचा उठाव हा मुसलमानांचा जिहाद होता व हिन्दू हे केवळ हस्तक म्हणून त्यात वापरले गेले असा पूर्वी कोठेही न ऐकलेला सिद्धांत माण्डला. त्याचा परामर्श घेणे जरूर होते म्हणून मोरे यांच्या ग्रंथावर एक विस्तृत प्रकरण लिहिले. ही भर टाकल्यावर दीडशेव्या जयन्तीच्या वर्षात दुसरी आवृत्ती काढली नाही हे बरेच झाले असे वाटू लागले.

सत्तावनचे निन्दक हे स्वातंत्र्ययुद्ध नव्हते असे म्हणत असले, तरी त्यांचा खरा रोख हे युद्ध सफल झाल्यास जे स्वातंत्र्य स्थापित झाले असते त्यापेक्षा ब्रिटिश पारतन्त्र्य अधिक हितावह होते असे म्हणण्याचा असतो. पण स्वातन्त्र्यापेक्षा पारतन्त्र्य चांगले असू शकते असा सिद्धांत स्पष्टपणे मांडण्याचे त्यांना धैर्य होत नाही. सत्तावनच्या राशीस लागण्याऐवजी त्यांनी असे धैर्य करावे व जगातील देशांच्या स्वातन्त्र्य/पारतन्त्र्याच्या काळाची तुलना करून या सिद्धान्ताचे मूल्य ठरवावे. असे केल्याने इतिहासाला सत्यशोधनाच्या दृष्टीने एक नवीन मूल्यशाली आयाम प्राप्त होईल.

ब्रिटिशपूर्व स्वातन्त्र्य व ब्रिटिशप्रणीत पारतन्त्र्य यांची तुलना करून मी हा सिद्धान्त खोटा ठरविला आहे. पण तो खरा ठरविणारी काही उदाहरणे इतिहासात मिळू शकली, तर आपल्या मूल्यकल्पना बदलाव्या लागतील व सत्यनिष्ठ विचारांच्या उद्दिष्टाच्या दृष्टीने हे फारच महत्त्वाचे पाऊल ठरेल.

पहिल्या आवृत्तीपेक्षाही या आवृत्तीचे जास्त स्वागत होईल, अशी आशा करतो.

दूरध्वनी : ६५४०१९०
भ्रमणध्वनी : ९३७१७७९८०४

नी. र. वऱ्हाडपाण्डे
३४, हिन्दुस्तान कॉलनी,
अमरावती मार्ग, नागपूर

■ ■ ■



# प्रास्ताविक पहिल्या आवृत्तीचे

१९५७ साली भारत सरकारने सत्तावनच्या स्वातंत्र्ययुद्धाचा स्मृतिदिन साजरा करण्याचे ठरविले. त्याच सुमारास प्रसिद्ध इतिहासकार रमेशचंद्र मजुमदार यांनी हे स्वातन्त्र्ययुद्ध नव्हते असे प्रतिपादन हिस्ट्री काँग्रेसच्या अध्यक्षपदावरुन केले. हे प्रतिपादन मी टाइम्स ऑफ इण्डियामध्ये वाचले. तो सारांश होता त्यामुळे त्यात मजुमदारांचे पुरावे काय आहेत हे माण्डले गेले नाही असे मला वाटले. लहानपणापासून राणी लक्ष्मीबाई व तात्या टोपे यांचे पोवाडे ऐकत आलो. १९४८ साली सावरकरांच्या बन्दिस्त पुस्तकाचे इंग्रजी भाषान्तर प्रकाशित झाले. ते वाचले. सावरकरांचा उद्देश इतिहाससंशोधन करण्याचा नसून इंग्रजाविरुद्ध उठावासाठी जनतेला प्रेरणा देण्याचा होता. शिवाय सावरकरांची शैली काव्यमय व भावनोत्कट. त्यामुळे सावरकरांच्या पुस्तकात सत्याचा अपलाप झाला असण्याचा मला संभव वाटला. त्यापूर्वी ना. के. बेहेरे यांचे १८५७ हे पुस्तक वाचले होते. हे पुस्तक इंग्रजांच्या नोकरीत असताना लिहलेले आहे. त्यामुळे सत्यकथनाच्या बाबतीत लेखकावर फारच मोठी मर्यादा पडली आहे हे पदोपदी जाणवते. पण स्वराज्य झाल्यावर रमेशचन्द्र मजुमदार सारख्या प्रथितयश इतिहासकाराला मुक्तपणे सत्यकथन करणे शक्य होते. त्यामुळे मजुमदारांच्या मूळ व्याख्यानात सत्तावन बद्दलचे सत्य प्रतीत होईल अशी मलाआशा होती. पण व्यवसायाचा विषय इतिहास हा नसल्यामुळे मुद्दाम मजूमदारांचे पुस्तक आणवून वाचण्यास सवड नव्हती.

पुढे एकदा अनायासे ते पुस्तक हाती पडले. ते उत्सुकतेने वाचले तेव्हा घोर निराशा पदरी आली. मजुमदारांनी इंग्रजी राज्य उलथून पाडून एतद्देशीयांचे राजय स्थापण्याचा सत्तावन साली प्रयत्नच झाला नाही असे दाखविणारी प्रमाण दिली असतील असे मला वाटले होते. पण मजुमदारांनी असले कोणतेही प्रमाण दिले नाही. तेव्हा नाव मोठे व दर्शन खोटे या म्हणीचा मला मजुमदारांच्या बाबतीत प्रत्यय आला.

पुढे याच विषयावरील डॉ. सुरेन्द्र नाथ सेन याचे भारत सरकारने प्रसिद्ध केलेले पुस्तक वाचले. या पुस्तकात हे स्वातन्त्र्ययुद्ध होते असे विधान आहे पण स्वातन्त्र्ययुद्ध म्हटल्यावर जे चित्र मनश्चक्षू समोर उभे राहते त्याचा अल्पांशही सेनांचे पुस्तक वाचून प्रतीत होत नाही.

सेन/ मजुमदार यांचे लिखाण वाचून माझ्या ज्या प्रतिक्रिया झाल्या त्या मी एका

लेखमालेद्वारा वाईच्या नवभारत मासिकात व्यक्त केल्या. पुढे याच विषयावर आणखी वाचन झाले. त्यावर प्रतिक्रिया ऑर्गनायझर व तरुण भारत या वृत्तपत्रामध्ये काही लेखाद्वारा प्रकाशित केल्या. प्रस्तुत पुस्तक हा मुख्यतः याच लेखांचा संग्रह आहे.

मराठीत न. र. फाटक यांनी या विषयावर जे लिखाण केले आहे तो मजूमदारांच्या मुद्यांचाच फाटकी भाषेत पुनरुच्चार आहे. त्यामुळे त्यावर वेगळे काही लिहिण्याची जरुर नाही.

अधिकृतरीत्या सांगण्यात येणारा भारताचा इतिहास किती खोटा असतो याचा प्रत्यय निदान सत्तावनच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या संबंधात हे पुस्तक वाचून वाचकांना येईल अशी आशा आहे.

■ ■ ■





# अनुक्रमणिका

१. मूलभूत शब्दांचे अर्थ / ११
२. सत्तावन हा कळस, पाया नव्हे / १७
३. युद्धाची पूर्वयोजना / २९
४. भूतो न भविष्यति असा जनतेचा उठाव / ४६
५. स्वधर्म आणि स्वदेश / ५८
६. एक चिरन्तन स्फूर्तिस्थान / ६७
७. मानवी गरूड व ऐंशीतला तरणाबाण्ड / ८१
८. जिहादाचे धर्मयुद्धात रूपान्तर करणारा महान् संग्राम / ८९
९. जगातील इतर क्रान्तियुद्धाशी तुलना / १२३
१०. दूध वाघिणीचे की पूतनेचे / १३३
११. पुनरूज्जीवन की बुद्धिभ्रंश / १५३
१२. कार्ल मार्क्स आणि सत्तावनचे स्वातंत्र्ययुद्ध / १६३
१३. आंग्लाई हैदोस /१७२
१४. ब्रिटिश लष्करी ताबा व भारतीय राष्ट्रीयत्व / १८५

■■■

या ग्रंथाच्या इंग्रजी आवृत्तीला डी. लिट् ही पदवी व राष्ट्रपती शंकरदयाल शर्मा यांच्या हस्ते पारितोषिक प्राप्त झाले आहे



कपोलकल्पित आर्य आणि त्यांच्या स्वाऱ्या

डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे

मूल्य २१५ रुपये



नेहरू व नेहरूवाद

(एक चिकित्सक मूल्याकन)

डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे

मूल्य २९० रुपये

भारतावर राज्य करणारा मी शेवटचा इंग्रज आहे, असे ते गॅल्ब्रेथला म्हणाले. या एका वाक्याने नेहरूंच्या सर्व धोरणांचा उलगडा होतो. भारताची हिंदू ही ओळख नष्ट करून त्याला इंग्रज बनविणे हे नेहरूंच्या पंतप्रधानी अवताराचे उद्दिष्ट होते. ख्रिस्ती धर्मांबद्दल खुद्द इंग्रजांनाच फारसा उत्साह नसल्यामुळे भारताचे इंग्रजीकरण म्हणजे ख्रिस्तीकरण हे जे समीकरण १९ व्या शतकात होते ते नेहरूंचे नव्हते. भारतीय राष्ट्रीयत्व असे काही नाही ते मी आता घडविणार आहे म्हणजे माझ्या कल्पनेतला नवीन भारत इंग्रजीभाषी व डेलीवर्कर या ब्रिटनमधील कम्युनिस्ट मुखपत्राच्या दृष्टिकोनातले कम्युनिस्ट राष्ट्र राहील, हे उद्दिष्ट त्यांनी डोळ्यासमोर ठेवले होते. असे करण्यास हिंदुत्व हा सगळ्यात मोठा अडथळा आहे म्हणून नेहरूंनी हिंदुत्वावर डूख धरला. हिंदूंच्या चालीरीती व मुख्यत: भाषा नष्ट केल्या पाहिजेत, हे त्यांनी उद्दिष्ट ठेवले. भाषा नष्ट न करता आल्या तरी त्यांना निष्प्रभ करता येईल व सुशिक्षितांची व सत्ताधीशांची एकमात्र भाषा म्हणून इंग्रजीचे महत्त्व वाढविले की भारत हा इंग्रजी देश होऊ शकेल.



# प्रकरण एक | मूलभूत शब्दांचे अर्थ

यहाँ निहित है स्वतन्त्रताकें आशाकी चिनगारी।

**–सुभद्राकुमारी चौहान**

१० मे १८५७ रोजी सुरू झालेल्या उठावाला इंग्रज इतिहासकार 'शिपायांचे बंड' व सर्वसाधारणपणे भारतीय लेखक स्वातंत्र्ययुद्ध म्हणून संबोधीत. पण, स्वराज्यानंतर भारतीय लेखकांतदेखील या उठावाला 'शिपायांचे बंड' म्हणण्याची प्रवृत्ती अधिक प्रमाणात दिसू लागली आहे. या लेखकात मजुमदारसारख्या प्रसिद्ध इतिहासकारापासून तो कृपलानीसारख्या राष्ट्रीय चळवळीत भाग घेणाऱ्या राजकारणी पुरुषाचा देखील समावेश होतो. स्वराज्यानंतर अनेक पारतंत्र्यपूजक मते 'पुरोगामी' म्हणून समजली जात आहेत. त्यातलेच हेही एक आहे. त्यामुळे या मताच्या यथार्थतेची चर्चा करणे आवश्यक आहे.

## मूलभूत शब्दांच्या व्याख्या

अशी चर्चा करण्यासाठी 'शिपायांचे बंड' व 'स्वातंत्र्य युद्ध' या मुद्याच्या शब्दांची व्याख्या करणे आवश्यक आहे.

ज्या बंडात शिपायाखेरीज इतर कोणी भाग घेतला नाही ते शिपायांचे बंड समजावे असे म्हणता येईल. पण ही व्याख्या बरोबर नाही. कारण, त्या अनुसार ज्या युद्धात शिपायाशिवाय कोणी भाग घेतला नाही त्या युद्धाला शिपायांचे युद्ध म्हणावे लागेल. ७१ साली पाकिस्तानशी झालेल्या युद्धात शिपायाशिवाय कोणीही भाग घेतला नाही म्हणून हे भारताचे पाकिस्तानशी झालेले युद्ध नसून भारतीय शिपायांचे पाकिस्तानी शिपायांशी झालेले युद्ध होते, असे कुणी म्हटले, तर त्याचे हसे होईल. तेव्हा युद्धात कुणी भाग घेतला याबरोबरच युद्धाची उद्दिष्टे काय होती हाही महत्त्वाचा प्रश्न ठरतो. शिपायांनी स्वतःचा पगार वाढावा, अधिक सुट्ट्या मिळाव्या, घर वगैरे सुखसोयी मिळाव्या, म्हणून बंड केले असेल, तर ते केवळ शिपायांचे बंड ठरेल. कारण, शिपाई पेशाच्या लोकांच्या राहणीमानात सुधारणा एवढेच त्याचे उद्दिष्ट असते. शिपाई पेशा न करणाऱ्या लोकांना त्यात साक्षात् स्वारस्य असत नाही. तेव्हा सत्तावनचे युद्ध हे शिपायांचे बंड होते, असे म्हणणाऱ्यावर त्याचे उद्दिष्ट फक्त शिपाई पेशाच्या लोकांची सोय वाढवण्यापुरते मर्यादित होते, असे सिद्ध करण्याची जबाबदारी येऊन पडते.

पण बंड शिपायांचे की आणखी कोणाचे हे पाहण्याच्या आधी मुळात बंड म्हणजे काय हे पाहिले पाहिजे. न्याय्य सत्तेविरुद्ध केलेल्या उठावाला बंड म्हणतात. आक्रमकाशी केलेल्या युद्धाला बंड म्हणत नाहीत. "भारताने १९६२ साली चीनविरुद्ध व १९७१ साली पाकिस्तानविरुद्ध बंड केले," असे कुणी म्हणत नाही. तेव्हा इंग्रजांना भारतावर राज्य करण्याचा नैतिक हक्क होता असे मानल्याशिवाय त्यांच्यविरुद्ध झालेल्या उठावाला बंड म्हणता येणार नाही. वस्तुतः परकीयांनी बलात्काराने देश व्यापला तर त्या कृत्याला लष्करी कबजा म्हणतात व लष्करी कबजा उठवण्यासाठी केलेल्या प्रत्याघाताला कोणीही बंड म्हणत नाही. यवनांनी देश व्यापला याचे वर्णन करताना समर्थांनी "माजले बंड यवनांचे" असे उद्‌गार काढले, बंड हे आक्रमकांचे संरक्षकांचे नव्हे.

दुसरा मुद्याचा शब्द स्वातंत्र्ययुद्ध हा आहे. परकी सरकार उलथून पाडून स्वकीय सरकारची स्थापना करण्यासाठी जे युद्ध केले जाते, त्याला स्वातंत्र्ययुद्ध म्हणतात. अर्थात् सत्तावनचे युद्ध हे स्वातंत्र्ययुद्ध नव्हते असे म्हणणाऱ्यांनी खालील गोष्टी सिद्ध केल्या पाहिजेत : (१) ईस्ट इण्डिया कंपनीचे सरकार हे परकीय सरकार नव्हते, किंवा (२) ते सरकार उलथून पाडण्याचा शिपायांचा उद्देश नव्हता, किंवा (३) ते सरकार पडले तरी त्या जागी दुसरे भारतीय सरकार स्थापित करण्याचा त्यांचा इरादा नव्हता, सरकार उलथून पाडून केवळ लूटमार करणे एवढाच इरादा होता.



सुरवातीलाच हे सांगणे आवश्यक आहे की मजुमदारापासून कृपलानीपर्यंत कोणत्याही लेखकाने वरीलपैकी एकही विधान सिद्ध करायचा प्रयत्न देखील केलेला नाही व ही विधाने सिद्ध करण्याची आपल्यावर जबाबदारी आहे, याची त्यांना यत्किंचित् देखील जाणीव नाही.

सत्तावनच्या निन्दकांचे आक्षेप थोडक्यात खालीलप्रमाणे मांडता येतील : (१) ब्रिटिश राज्य हे परकीय नव्हते असे म्हणण्याची सोय नसली, तरी पेशवाई व तिच्या अंकित असलेली मोगलाई अशा ज्या ब्रिटिशपूर्व राज्ययंत्रणेचे पुनरुज्जीवन करण्याचा या उठावाने प्रयत्न केला तिच्यापेक्षा ब्रिटिश राज्य अधिक प्रगतिकारक होते. मार्क्सवाद्यांच्या परिभाषेत सांगायचे म्हणजे भारताची ब्रिटिशपूर्व राज्ययंत्रणा ही सरंजामशाही होती व ब्रिटिश सत्ता ही भांडवलशाही होती. सरंजामशाहीपेक्षा भांडवलशाही अधिक प्रगत असते. मजुमदारांच्या भाषेत सांगायचे म्हणजे ब्रिटिश राज्याने भारताचे बौद्धिक पुनरुज्जीवन घडवून आणले. सत्तावनचा उठाव यशस्वी झाला असता, तर या पुनरुज्जीवनाचा मार्ग बंद झाला असता. (२) मजुमदारांचा दुसरा मुद्दा असा की सत्तावनच्या उठावाच्या मागे निश्चित योजना नव्हती. यदृच्छेने पडलेल्या ठिणगीमुळे वणवा पेटावा तसे या उठावाचे स्वरूप होते. राणी लक्ष्मीबाई व नानासाहेब पेशवे यांनी या वणव्यावर आपली पोळी भाजून घेण्याचा संधिसाधूपणा करून पाहिला. आपले राज्य परत मिळावे एवढेच त्यांचे वैयक्तिक ध्येय होते, भारताचे स्वराज्य हे त्यांचे ध्येय होते असे म्हणता येत नाही. (३) सत्तावनच्या उठावाला जनतेची सहानुभूती नव्हती. म्हणून ते जनतेचे युद्ध नसून राजेरजवाड्यांचे व शिपायांचे युद्ध होते.

## आक्षेपांची असंबद्धता

सत्तावनचे युद्ध हे स्वातंत्र्ययुद्ध होते की नाही या प्रश्नाचे उत्तर देण्याच्या दृष्टीने वरील सर्व आक्षेप अप्रस्तुत व असंबद्ध आहेत हे कुणाही वाचकाला कळून येण्यासारखे आहे. ब्रिटिश राज्याने पुनरुज्जीवन घडवून आणले, "सरंजामशाही" पेक्षा ब्रिटिशांची "भांडवलशाही" अधिक प्रगतिकारक होती वगैरे सिद्धान्त खरे मानले, तर त्यावरून स्वातंत्र्यापेक्षा पारतंत्र्य अधिक चांगले असू शकते, एवढेच सिद्ध होईल. सत्तावनचे युद्ध हे स्वातंत्र्ययुद्ध नव्हते असे सिद्ध होणार नाही. त्या युद्धामागे पूर्वयोजना नसेल तर ते पूर्वयोजनेशिवाय झालेले स्वातंत्र्ययुद्ध होते, एवढेच म्हणता येईल आणि यात काही

वदतोव्याघात नाही. अग्नी यदृच्छेने पेटला काय की मुद्दाम मंत्रपूर्वक अरणी घासून पेटवला काय, अग्नी तो अग्नी! तसेच अकस्मात् उडालेला युद्धाचा भडका पारतंत्र्याचा होम करून स्वतंत्र्याची स्थापना करू शकत असेल, तर तो अकस्मात् उडाला म्हणूनच केवळ स्वातंत्र्याचा उद्रेक नव्हता असे म्हणता येणार नाही. उलट ज्या देशात स्वातंत्र्याची ऊर्मीच नाही अशा देशात केवळ यदृच्छेने परराज्य उलथून टाकून स्वराज्य स्थापू शकणारा भडका उडूच शकत नाही. एखाद्या लहानशा कंपूने निश्चित योजना आखून एखादा उठाव घडवून आणला तर तो कृत्रिम व सामान्य जनतेच्या भावभावनांचा द्योतक नसलेला असू शकेल. म्हणून मजुमदार म्हणतात त्याप्रमाणे सत्तावनचा उठाव योजनापूर्वक नसेल, तर स्वातंत्र्ययुद्ध हे विशेषण त्याला अधिकच यथार्थतेने लागू होते.

तसेच कंपनी सरकारने नानासाहेब पेशव्यांचे पेन्शन बंद केले नसते व राणी लक्ष्मीबाईंचा दत्तक मान्य केला असता, तर या व्यक्तींनी सत्तावनच्या उठावात भाग घेतला नसता हा मजुमदारांचा आरोप खरा मानला, तरी तो उठाव स्वातंत्र्ययुद्धाच्या स्वरूपाचा होता की नाही, हे ठरविण्यास तो अगदीच अप्रस्तुत आहे. भारताचे स्वातंत्र्य हे नानासाहेब व लक्ष्मीबाई यांच्या वैयक्तिक हिताचे होते एवढेच त्यावरून सिद्ध होईल. शिवाय नानासाहेब व लक्ष्मीबाई यांचे राज्य म्हणजेच स्वराज्य अशी सत्तावनच्या उठावात भाग घेणाऱ्यांची भावना असेल, तर आपले राज्य परत मिळविण्याचा नानासाहेब व लक्ष्मीबाई यांचा प्रयत्न हा स्वराज्यस्थापनेचा प्रयत्न ठरतो. सत्तावनच्या उठावाला जनतेची सहानुभूती नव्हती हा आक्षेपही असाच अप्रस्तुत आहे. तो खरा मानला तर भारतीय जनतेला स्वातंत्र्याबद्दल आस्था नव्हती एवढेच सिद्ध होईल. झालेला उठाव स्वातंत्र्यासाठी नव्हता, असे सिद्ध होणार नाही.

## पेंढारी युद्ध

मजुमदार म्हणतात "There are not a few who seem to think that any fight by any group of indians against the British must be regarded as a struggle for independence" प्रतिपक्षाचे विचार चुकीच्या स्वरूपात मांडून त्यांचे खंडन करून दाखवणे ही अप्रामाणिक लेखकांची नेहमीची पद्धत या वाक्यात दिसून येते. ब्रिटिशाशी झालेली "any fight" "कोणतीही झटापट" हे स्वातंत्र्ययुद्ध होय, असे कुणीच म्हटलेले नाही. युद्धाचा उद्देश ब्रिटिश राज्य उलथून पाडण्याचा व त्या जागी



स्वकीय सरकार स्थापन करण्याचा असला पाहिजे. प्रतिपक्षाचे म्हणणे चुकीचे मांडून मग मजुमदार भाबडेपणाचा आव आणून विचारतात" "पेंढाऱ्यांनी इंग्रजांविरुद्ध जो लढा दिला त्याला स्वातंत्र्युद्ध म्हणता येईल काय?" उत्तरादाखल मजुमदारांना पुढील प्रतिप्रश्न विचारता येतील "पेंढाऱ्यांनी ब्रिटिश राज्य उलथून पाडण्याचा प्रयत्न केला काय? ते राज्य उलथून पाडण्यासाठी ब्रिटिश फौजांचा पराभव करणे आवश्यक होते. पेंढाऱ्यांनी कधी ब्रिटिश फौजांवर हल्ला केला काय? ब्रिटिश फौजांनी हल्ला केल्यावर आत्मरक्षणार्थ लढणे वेगळे व ब्रिटिश फौजांचा पराभव करण्यासाठी स्वतः पुढाकार घेणे वेगळे. तात्या टोपेने काल्पीवरून कूच करून झाशी वेढणाऱ्या सर ह्यू रोजच्या फौजेवर हल्ला केला. पुढे तात्या टोपे व राणी लक्ष्मीबाई यांनी ग्वाल्हेरवर हल्ला करून ते काबीज केले. या प्रकारे पेण्ढाऱ्यांनी ब्रिटिश सत्तेखालचा एखादा प्रदेश काबीज केला काय? सत्तावनच्या योद्ध्यांनी पेशव्यांच्या नावाने द्वाही फिरवली होती तशी पेण्ढाऱ्यांनी एखाद्या स्वकीय राजसत्तेच्या नावाने द्वाही फिरवली होती काय?" मजुमदार या सर्व प्रश्नांची उत्तरे होकारार्थी देऊ शकतील तर, पेण्ढाऱ्यांचे युद्ध हे स्वातंत्र्ययुद्ध होते असे म्हणण्यास हरकत उरणार नाही. दुसऱ्या बाजीरावाने ब्रिटिशांना शह देण्यासाठी पेण्ढाऱ्यांचा उपयोग केला. या उपयोगाला स्वातंत्र्ययुद्धाचे एक अंग म्हणता येईल. कारण वसईच्या तहाने गेलेले स्वातंत्र्य पुनः स्थापित करण्याच्या प्रयत्नाचा तो एक भाग होता.

## शीख भारताबाहेरून आले!!

मजुमदारांच्या दुराग्रहाचा कळस पेंढाऱ्यांच्या उदाहरणापेक्षाही त्यांनी दिलेल्या वहाबींच्या उदाहरणात दिसून येतो. ते म्हणतात "if we regard the fight against the English as a war of independence. by no logic can we withehold this nomenclature from the fight of the Wahabis against the sikhs." आहे की नाही तर्कशास्त्र! वहाबी हे मुसलमान होते व मुसलमानाशिवाय कोणाचेही राज्य त्यांना स्वराज्य वाटत नव्हते. म्हणून ते शीख राज्याविरुद्ध लढले. स्वराज्य म्हणजे मुस्लिम राज्य ही व्याख्या मजुमदरांना मान्य असेल तर वहाबींचा शीखविरुद्ध संग्राम हा स्वातंत्र्यसंग्राम होता हे त्यांना मान्य करावे लागेल. शिवाय "इंग्रजाविरुद्ध केलेला लढा हे स्वातंत्र्युद्ध, मग शिखांविरुद्ध केलेला लढा हे स्वातंत्र्ययुद्ध का नव्हे?" असे विचारताना शीख हेही इंग्रजाप्रमाणेच परकीय राज्यकर्ते होते असे मजूमदारांना सुचवायचे आहे काय?

आर्य भारताबाहेरून आले या मिशनरी थापेप्रमाणेच शीख हे भारताबाहेरून आलेले आक्रमक होते असा एखादा जाडा शोध मजुमदारांनी लावला असणे त्यांच्या इतिहासबुद्धीकडे पाहिल्यास अशक्य वाटत नाही.

सारांश, सत्तावनच्या उठावावरील आक्षेप सुबुद्ध माणसाने विचारात घेण्यासारखे नाहीत. शब्दांचे योग्य अर्थ समजणे व त्यापासून योग्य अनुमाने काढणे या प्राथमिक दर्जाच्या क्षमतेचा देखील त्यात प्रत्यय येत नाही.

■■■





# प्रकरण दोन | सत्तावन हा कळस, पाया नव्हे

"There were Frequent sporadic outbursts often leading to serious armed resistance against British authority throughout India." [right since 1918] "These culminated in the great upsurge of 1857 which shook the British empire to its very foundation."

**रमेशचन्द्र मजुमदार**

सत्तावनचा संग्राम हा योगायोगाने अचानक उडालेला भडका नसून त्याच्या पूर्वी अनेक वेळा स्वतन्त्रतेसाठी झालेल्या उद्रेकाच्या मालिकेतील शेवटचा उद्रेक होता हे दाखवून देण्यासाठी १७५७ मध्ये बंगालमध्ये ब्रिटिश सत्ता स्थापन झाल्यापासूनचा इतिहास पाहणे आवश्यक आहे. सत्तावनचे प्रमुख निन्दक रमेश मजुमदार यांनी या उद्रेकाचा वृत्तान्त सांगताना या उद्रेकामागचे उद्देश उदात्त नव्हते असे उद्गार काढले आहेत. भारतरतील शहरांच्या बायकामुलासह उभ्या कत्तली करणाऱ्या व ब्रिटिशांना "विकलेल्या" भारतीय मालाची किंमत भारतीय लोकांपासूनच वसूल केली पाहिजे अशी कायद्याने तरतूद करून जे बिचाऱ्या महम्मद

गझनवीला कधी साधले नाही तेवढ्या प्रमाणवर भारताची लूट करणाऱ्या ब्रिटिशांचे उद्देश आपण उदात्त समजतो की नाही याचा विचार करण्याइतकी त्यांची विचारशक्ती सुसंगत नाही. पण जो जिंकतो तो उदात्त व जो हरतो तो चोरध्यलुटारू अशी त्याची छुपी विचारसरणी आहे. ही छुपी असल्यामुळे इतिहासकथन करताना आपल्या प्रतिपादनाच्या पूर्णपणे विरोधी अशी तथ्ये आपण सविस्तर सांगतो आहोत याचे त्यांना भान नसते. त्यामुळे सत्य इतिहास लिहिण्यास उपयुक्त अशी पुष्कळशी माहिती त्यांच्या लिखाणांत आयती मिळते.

१७६० च्या आसपास संन्यासी ब्रिटिशांविरुद्ध बण्ड करून उठले. इंग्रजी सैन्यामुळे दुष्काळ पडतात. म्हणून ते धान्यागारे लुटून गरिबांना वाटत. १८१८ ते १८२० च्या दरम्यान म्हणजे पेशवाईच्या अस्ताबरोबरच कच्छचा राजा व भिल्ल यांचा उठाव झाला. भिल्लांचें वास्तव्य प्राधान्याने खानदेशात होते. हे बण्ड रावबाजीचा सहायक त्रिम्बकजी डेगळे यांने घडवून आणले. या बण्डात ८००० भिल्ल सामिल होते. या पेक्षाही मोठा उठाव १८१९ मध्ये झाला. यात भिल्लांनी अनेक ठाणी काबीज केली. त्यांचा बन्दोबस्त करण्यासाठी अनेक सैनिक पथके पाठवावी लागली. पण त्यामुळे भिल्लांचा बीमोड झाला नाही. सेवाराम नावाच्या एका लोहाराने साताऱ्याच्या छत्रपतींची म्हणून काही पत्रे आणली. मोठ्या प्रमाणावर सामर्थ्य वापरून देखील छत्रपतीच्या नावे उभारलेल्या या बण्डाचा बीमोड झाला नाही. खेड्यापाड्यातील पाटिल मण्डळी देखील यात सामिल होती. उछेत सिंगाने १८३१ मध्ये पुनः भिल्लाचा उठाव घडवून आणला. कच्छमध्ये पुनः तसाच उठाव झाला.

रावबाजीच्या प्रयत्नामुळे कच्छ व काठेवाड येथे देखील उठाव झाले. बाघांच्या टोळ्यांनीही पूर्व कच्छमध्ये ब्रिटिशांना सतावण्यास सुरवात केली. वाघार आणि खोसा हेही उठले. त्यांनी कच्छ मध्ये खण्डण्या गोळा करण्यास सुरवात केली. सिन्धच्या फौजेतील काही लोक त्यांना मिळाले.

ब्रिटिशांनी याच सुमारास ब्रह्मदेशावर आक्रमण केले. तेथे त्यांचा पराभव होत आहे अशा खऱ्या वा खोट्या बातम्या पसरल्या तेव्हा कच्छमध्ये भडकाच उडाला. ब्रिटिशांच्या पराभवाच्या बातम्या लोकांना गोड वाटत व ते तेवढ्यावरच समाधान न मानता उठाव करीत ही गोष्ट ब्रिटिशांविरुद्धच्या सर्व उठावांना जनाधार होता, हे सिद्ध करते. याच उठावाने राव भारमल यांच्या सत्तेची पुनःस्थापना करण्याचा प्रयत्न केला. २००० मिन्नी



आणि सिन्धी लोकांची टोळी जमा झाली. त्यांनी रेसिडेण्टला पत्र लिहून भारमलची पुनःस्थापना करण्याची मागणी केली. अंजरजवळील बलारीचा किल्ला त्यांनी काबीज केला. बलारी काबीज करण्यासाठी पाठविलेल्या सैन्याचा त्यांनी पराभव केला. पराभव झाल्यानन्तरही त्यांचे उठाव चालूच होते.

अशा उठावांचे कारण मुख्यतः ब्रिटिशांची जीवघेणी सारापद्धती हे होते असे मजुमदारांचे म्हणणे आहे. पण ब्रिटिशांनी पूर्वीच्या सर्वच परम्परा धुडकावून लावल्या होत्या व हे जनतेस पसन्त नव्हते. ब्रिटिशांनी "सर्व बाबतीत" पूर्वीच्या पद्धती चालू ठेवण्याचे वचन दिले यावरून हे उठाव पूर्णपणे अयशस्वी नव्हते, असे म्हणता येते.

पूर्वीच्या परचक्रात व ब्रिटिश परचक्रात हा फरक होता की पूर्वीचे परचक्र विजयी झाले तरी देशाच्या व्यवस्थेत काही उलथापालथ होत नसे. पूर्वीच्या परकीयांविरुद्ध येथले राजे लढले. पण कोणाहीविरुद्ध मग तो औरंगजेब का असेना. राजहीन जनता साधारणपणे उठली नाही.

१८२० मध्ये मेरवाडाच्या मराठ्याकडून ब्रिटिशांनी जिंकलेल्या भागात उठाव झाला. शेजारच्या ब्रिटिशाधीन राज्यातून सैन्य आणून तो मोडण्यात आला.

१८२४ च्या सुमारास ब्रह्मदेशाशी युद्ध करण्यासाठी ब्रिटिश फौजा जाऊ लागल्या. हे पाहून ब्रिटिशाच्या सामर्थ्यावर बराच ताण पडत आहे, असे जनतेला वाटले व ती ब्रिटिशांविरुद्ध उठली. ब्रिटिशांचे पराभव दसपट करून सांगण्याची बातमीदारांची पद्धतच होती. कारण अशा वार्ता ऐकून जनतेला आनन्द होत असे. शोर नावाचा एक तत्कालीन वार्ताहर सांगतो की उत्तरेतील प्रान्तात जेथे सक्रिय असन्तोष नाही, असा भाग सापडणे विरळा होते.

१८२४ मध्ये सहाराणपुराजवळ गुजर लोक शस्त्र घेऊन उठले. हा प्रदेश पूर्वी शिन्द्यांच्या ताब्यात होता. येथील लोक शिन्द्यांना स्वकीय समजत होते, हे स्पष्ट आहे. कुंजाच्या तालुकदाराने बण्ड उभारले. त्याला कलवा नावाच्या एका बण्डखोराने मदत केली. बिजोसिंगाने कुंजाचा किल्ला काबीज केला व स्वतःला राजा म्हणून घोषित केले. इंग्रजांच्या खजिन्याची त्याने लूट केली. ही वार्ता कळताच दूरच्या प्रदेशातून त्याला येऊन मिळण्यास काही बण्डखोर निघाले पण त्या आधीच कुंजाचा किल्ला पडल्यामुळे त्यांना परतावे लागले.

याच्या थोडेसे आधी पतियाळातील एका साधूने बण्ड उभारले "मी कालीचा

अवतार आहे व इंग्रजांना पळवून लावणार आहे'' असे तो म्हणे. त्याला पकडण्यात आले तेव्हा अकाली शिखांचा एक मोठा समूह त्याला सोडविण्यास धावला. सत्तावनच्या उठावाशी शिखांची सहानुभूती नव्हती हे विधान ज्यांची राज्ये खालसा झाली नव्हती अशा शीख संस्थानिकापुरते खरे आहे. शीख जनतेच्या भावना इतर भारतीयांपेक्षा वेगळ्या नव्हत्या.

शिखांप्रमाणेच पूर्वी मराठ्यांचे प्रजाजन असलेल्या जाटांनी देखील उठाव केला. त्यांना मेवाती मुसलमान व भट्टी यांनी देखील साथ दिली. त्यांनी दारुगोळा जमविला. दिल्लीला जाणारे मार्ग रोखले, सरकारी मालमत्ता लुटली व ''ब्रिटिश सत्ता आता नाहीशी झाली आहे,'' अशी द्वाही फिरविली.

हिसारमध्ये सुरजमल नावाच्या एका क्रान्तिकारकाने चारशे बन्दूकधारी व घोडेस्वार याच्या साहाय्याने बेहुतचा किल्ला जिंकला. रेवारी जिल्ह्यातही अशाच घटना घडल्या.

ही आग बुन्देलखण्डातही पसरली. तेथे नाना पण्डित नावाच्या एका जहागीरदाराने काल्पी लुटली. शेख दल्ला नावाच्या पेण्ढाऱ्याने तापीच्या खोऱ्यात धुमाकूळ माजविला. शेख दल्लाबद्दल खालील ओळी गायिल्या जातात.

नीचे धरती ऊपर अल्ला
बीच बिराजे शेख दल्ला॥

शेख दल्लाला ''मी पहिल्या बाजीरावाचा भाऊ चिमाजी अप्पा आहे'' असे सांगणाऱ्या एका इसमाने व पेण्ढाऱ्यांनी साथ दिली. या दोघांचा नागपूरच्या आप्पासाहेब भोसल्यांशी सम्पर्क असावा.

गुजराथमध्ये कच्छच्या सीमेपासून सह्याद्रीपर्यन्त पसरलेल्या कोळ्यांनी दंगा केला. हे कोळी स्वराज्यात किल्ल्यावर काम करीत. इंग्रजांनी एतद्देशीय किल्ले नष्ट केले तेव्हा ते बेकार झाले. पण हा उठाव केवळ नोकऱ्या मिळविण्यासाठी नव्हता. त्याचे पुढारीपण तीन ब्राह्मणांनी केले होते व त्यांनी पेशव्यांच्या नावाने द्वाही फिरविली होती.

बडोदा या राजधानीच्या ठिकाणापर्यन्त या कोळ्यांचा प्रभाव जाणवत होता. त्यांनी दुधामा या खेड्यात आपला तळ ठोकला. हा तळ रुईच्या रोपांनी घेरला होता. त्याच्या मध्यभागी मातीच्या भिन्तीचा कोट होता. रुईचे वन फार दाट व पुरेसे मोठे असेल तर त्याने शत्रुसैन्याच्या हालचालींना अडथळा होऊ शकतो. मुंबईची ब्रिटिश फौज त्यांच्यावर चालून गेली तेव्हा या मातीच्या किल्ल्यातून तिच्यावर गोळीबार झाला व तिला परतावे



लागले. याहून मोठी फौज पाठविण्यात आली तेव्हा त्यांनी कच्छच्या रणात तात्पुरती माघार घेतली व ते लवकरच परत आले. १८२५ मध्ये त्यांच्याविरुद्ध अधिक मोठी फौज पाठविण्यात आली तेव्हा ते काही काळ शमले. १८३९ मध्ये कोळ्यांनी पुनः उठाव केला. तो फसल्यावर पुनः १८४४ मध्ये ते उठले. पुण्याच्या उत्तरेपासून तो नासिक, अहमदनगर व सातारा येथपर्यन्त त्यांनी धुमाकूळ घातला.

१८२४ चा उठाव फक्त उत्तर भारतापुरता मर्यादित नव्हता. दिवाकर दीक्षित नावाच्या ब्राह्मणाने विजापूरच्या पूर्वेला बण्डांचे निशाण उभारले. त्याने आपले सरकार जाहीर केले होते. जवळच्या ओमरिजमध्ये या उठावाचे पडसाद उठले. इथल्या एका पुढाऱ्याने एका किल्ल्याचा आश्रय घेतला व त्याने इंग्रजांचा कर घेण्याचा अधिकार अमान्य केला. १८२५ मध्ये त्याच्याविरुद्ध पाठविलेल्या फौजेचा त्याने पराभव केला. पुढे हार झाल्यावरही जंगलांच्या आश्रयाने या गटाच्या हालचाली सुरूच राहिल्या.

धारवाडमधील कित्तूर या जिल्ह्यात याहून मोठे उठाव झाले. कित्तूरचा देसाई आपल्या प्रदेशात राजाचे अधिकार बाळगून होता. तो १८२४ मध्ये वारला. त्याचा दत्तक ब्रिटिशांनी अमान्य केला व धारवाडच्या कलेक्टराने देसायाचे सर्व अधिकार धारण केले.

या विरुद्ध बण्ड झाले, ५००० बण्डखोरांनी किल्ल्याची दारे बन्द केली. कमिश्नरने किल्ल्यात शिरण्याचा प्रयतन केला तेव्हा त्याच्यावर बण्डखोरांनी हल्ला केला. कमिश्नर मारला गेला व काही सरकारी सैनिकांना कैद करून किल्ल्यात नेण्यात आले.

या घटनेचा दूरवर परिणाम होऊन मलप्रभा व कित्तूर येथे बण्डाचे वातावरण निर्माण झाले.

१८२९ मध्ये रायप्पाच्या आधिपत्याखाली तेथे उठाव झाला. हा रायप्पा पूर्वी सागलीमध्ये एक साधा पहारेकरी होता व त्याने पूर्वीच्या उठावात भाग घेतला होता. त्याने इंग्रजांनी अमान्य केलेल्या दत्तकाचा पक्ष घेऊन पुनः उठाव केला, बरेच अनुयायी गोळा केले व शेजारच्या प्रदेशात धुमाकूळ माजविला. कित्तूरच्या सैन्याने त्यांच्याविरूद्ध लढण्यास नकार दिला. ब्रिटिश फौजाशी गनिमी पद्धतीने लढा देत रायप्पा बराच काळ लढला. इंग्रजांनी देसायाच्या विधवेला धारवाड येथे नेले व तेथे विषप्रयोगाने तिचा अन्त झाला. त्यावेळी बराच लोकक्षोभ झाला.

अलवर व भरतपूर येथेही या वेळी उठाव झाले. आसाम खालसा झाल्यामुळे आसामाच्या काही मागासवर्गीय टोळ्यांनी उठाव केले हे लक्षात घेतले की एतद्देशीय राजे

"सरतामशाही" असले तरी मागासवर्गीयांना देखील आपले वाटत होते, हे स्पष्ट होते. लखनपूरचा जमीनदार बलभद्रदेव याच्या बाजूने गोण्डांनी बण्ड केले.

ब्रिटिशांनी ब्रह्मदेश काबीज केल्यावर तेथेही बण्डाळी माजली. ब्रिटिशांच्या पूर्वी आलेल्या कोणत्याही परकीय आक्रमकाच्या विरुद्ध या प्रकारचे उठाव झाले नव्हते. १८५७ मध्ये भारतात सार्वत्रिक उठाव झाला तेव्हा ब्रह्मदेशातही लोकांनी मोठ्या प्रमाणावर बण्ड केले. त्याचा वृत्तान्त या पुस्तकाच्या कक्षेत येत नाही. पण ब्रिटिश पारतन्त्र्यपूर्वीच्या सगळ्या पारतन्त्र्यापेक्षा सर्वांनाच अधिक जाचक होते, हा मुद्दा महत्त्वाचा आहे.

१८४० च्या आसपास साताऱ्याचे प्रतापसिंग महाराज यांच्या नावावर बण्ड झाले. याचे प्रमुख नेतृत्व कराडचे पोवार यांनी केले. नरसिंह दत्तात्रेय पेटकर यांने यापेक्षाही मोठा उठाव केला. पेटकर एका डोळ्याने आन्धळा होता पण त्याने पुष्कळ भ्रमन्ती करून अरब व रोहिले यांच्या फौजा गोळा केल्या. १८४१ मध्ये त्यांने बदामी काबीज केली व सातारच्या महाराजांच्या नावाने द्वाही फिरविली. ब्रिटिश फौजांशी लढताना दारुगोळा संपला म्हणूनच त्याचा पराभव झाला.

कॅप्टन डफने १८३२ मधल्या स्थितीचे खालील वर्णन केले आहे-

पूर्वीच्या पेशवाई मुलखामध्ये अंतर्गत उठावाचा धोका वाढत आहे. मराठेशाहीचे सारे सैन्य बेकार झाले आहे. हे सर्व सैनिक स्वराज्याच्या पुनःस्थापनेच्याच नव्हे, तर ते साधेनासे झाल्यास अराजकाच्या स्वागतास देखील तयार आहेत. हे रामोशांच्या बण्डाने स्पष्ट होते. मराठेशाहीत रामोशी पोलिसाचे काम करीत होते. चितूरसिंगाने जेव्हा साताऱ्यास १८२२ साली उठाव केला तेव्हा पुष्कळ रामोशी त्याच्या झेण्ड्याखाली जमा झाले. पुण्यामध्येही याच कारणास्तव रामोशी उठले. त्यांना उमाजी नाइकासारखा समर्थ नेता लाभला. त्यांनी तीन वर्षे धुमाकूळ घातला. इंग्रजांनी त्यांना जमिनी व पहांडी प्रदेशात पोलिसी करण्याचे काम देऊन शान्त केले. यावरून या उठावामागे स्वातंत्र्याची प्रेरणा नव्हती असे मजुमदार आणि कम्पनी म्हणणार. पारतंत्र्यपूर्व काळात आपल्याला असलेले अधिकार मिळविण्यासाठी संघर्ष करणे व पारतंत्र्य नष्ट करण्यात सफलता मिळत नाही असे पाहून तडजोड करणे एवढ्याने एखादा उठाव स्वातंत्र्यासाठी नव्हता असे सिद्ध होत असेल, तर जगातील कोणत्या स्वातंत्र्ययुद्धात शक्याशक्यतेचा विचार केला गेला नाही, हे या कम्पनीने दाखवावे. जगातल्या कोणत्याही स्वातंत्र्ययोद्ध्याला खडकावर डोके आपटून घ्यायचे नव्हते. विवेक हा शौर्याचा सर्वात महत्त्वाचा भाग आहे, अशी इंग्रजीत एक म्हण आहे.



ज्या राजांची राज्ये खालसा झाली नव्हती त्यांच्याही राज्यात उठाव झाले. सावन्तवाडी व कोल्हापूर येथील उठाव ही याची उदाहरणे आहेत. या उठावांना या संस्थानिकांची सहानुभूती असली तरी त्यांनी त्यात भाग घेतला नव्हता. खालसा न झालेल्या संस्थानात देखील संस्थानचा दिवाण आपल्या संमतीनेच नेमला जावा व तो राजाला जबाबदार न राहता ब्रिटिशांनाच जबाबदार असावा, असा आग्रह ब्रिटिशांनी धरला. तसेच संस्थानाने बन्दरे आपल्या स्वाधीन करावी, शस्त्रे धारण करणाऱ्या लोकांवर कडक निर्बन्ध लादावे व ब्रिटिशांना खास व्यापारी सवलती द्याव्या, असा आग्रह धरला. या संस्थानात एक गडकऱ्यांचा वर्ग होता. त्यांना पूर्वीच्या राज्यकर्त्यांकडून काही जमिनी मिळालेल्या होत्या. या जमिनी ते करीत असलेल्या गडांच्या रक्षणाबद्दल मोबदला म्हणून मिळालेल्या होत्या व त्यावरील करवसुलीसारखे सरकारी अधिकार इतर जमिनीपेक्षा कमी असत. ब्रिटिशांनी आता "गडकऱ्यांना पूर्वीचे काम नाही म्हणून या कामाबद्दल पूर्वी मिळालेल्या जमिनीवर त्यांचा पूर्वीसारखा अधिकार नाही" असे म्हणायला सुरूवात केली. त्यांच्याजवळची फणसाची झाडे व घरे यावर कर लावायला सुरूवात केली. या वेळी जनतेची सहानुभूति या गडकऱ्यांना होती यावरून गडकऱ्यांना असलेल्या सवलतींचा जाच जनतेला होत नव्हता, तर त्यांच्या सवलती आपल्यास मिळाव्या अशी इच्छा करणाऱ्या इंग्रजांच्या डोळ्यात त्या सलत होत्या हे स्पष्ट आहे. इंग्रजांनी या संस्थानात "ब्रिटिश व्यापाराला घातक असलेले सर्व प्रघात बन्द करावे" अशी मागणी केली.

या सगळ्यामुळे चिडून जाऊन गडकऱ्यांनी १८४४ मध्ये उठाव केला. भद्रगड व सामनगड या किल्ल्यात येण्याची इंग्रजांना मनाई केली. सामनगड घेण्यास पाठविलेल्या सैन्याला किल्ल्यावरील लोकांनी परत पिटाळले तेव्हा कोल्हापूर शहरातच बण्ड सुरू झाले. ४ आक्टोबर १८४४ मध्ये पटुक व शिबन्दी नावाच्या शिपायांनी बण्ड केले. काही ब्रिटिशधार्जिण्या अधिकाऱ्यांना कैदेत टाकले व नवीन अधिकारी नेमून राज्यव्यवस्था आपल्या ताब्यात घेतली. हा उठाव गडकऱ्यांच्या उठावाचाच भाग बनून त्याला जनतेच्या उठावाचे स्वरूप आले. साऱ्याच किल्ल्यांनी ब्रिटिशांची सत्ता नाकारली व आपल्या वर्चस्वाखालील प्रदेशावर सत्तेचा दावा माण्डला. हे बण्ड मोडण्यास एक वर्ष लागले.

सातार रेसिडेन्सी रेकॉर्डस्मध्ये खालील नोन्दी आहेत-

आक्टोबर १८४४ मध्ये बण्डखोरांनी कोल्हापुरच्या कारभाऱ्याला अटक केली व शहराचा ताबा घेतला. बेळगावशी असलेले टपालाचे संबंध तोडले. सुभान निकम ५००

बण्डखोरासह सामनगडला पोहोचला. त्याने पंचगंगेच्या दक्षिणेकडचे सारे दळणवळण तोडले. पन्हाळा व पावनगड हे किल्ले घेतले. रावजी वाकनीस व दिनकरराव गायकवाड यांनी देखील बण्डाचा झेण्डा उभारला. कोल्हापूरच्या भोवताल पहारे बसविले व सारे दळणवळण आपल्या ताब्यात आणले. बण्डाला चांगलाच जोर चढला व त्यांना मिळणाऱ्या लोकांची संख्या वाढू लागली.

विशाळगडच्या गडकऱ्याने देखील बण्डाला साथ दिली. बण्डखोरांनी चावडीचा खजिना लुटला. साऱ्या कैद्यांना मुक्त केले व सरकारी कागदपत्रे जाळली. सारे सरकारी अधिकारी पळाले

१३ आक्टोबरला बण्डखोरांनी सामनगडचा किल्ला जिंकला क. ओपहॅन्स कोल्हापूरला जाण्यास निघाला तेव्हा त्याला वाटेत बण्डखोरांनी कैद करून पन्हाळ्याच्या किल्ल्यावर ठेवले. त्याची सुटका तीन महिन्यांनी झाली.

याचे पडसाद सावन्तवाडीत उमटले. १८३८ मध्ये ब्रिटिशांनी सावन्तवाडीच्या राजाला पदच्युत केले व संस्थानच्या कारभारासाठी एका इंग्रजाची नेमणूक केली. त्याच्या दिमतीला ब्रिटिश फौज होती. सावन्तवाडीतील असन्तुष्ट सरदार गोव्याला फरार झाले व तेथून त्यांनी ब्रिटिशाविरुद्ध उठावाच्या योजना आखायला सुरवात केली. १८३९ मध्ये वाडीचा किल्ला काबीज करण्यापर्यन्त मजल मारली वाडी आणि मनाहर येथील किल्ल्यावर देखील बण्ड झाले. १८४४ पर्यन्त साऱ्या साताऱ्यात बण्डाचा वणवा पसरला . याला साऱ्या जनतेची सहानुभूती होती व गोव्यातून मदत पोहोचविली जात होती. मे. बेंनबोच्या आधिपत्याखाली चालून आलेल्या ब्रिटिश सैन्याच्या एका तुकडीला त्यांनी निष्क्रिय केले. पण अखेरीच्या खिण्डीत दुसऱ्या एका ब्रिटिश फौजेने त्यांचा पराभव केला.

फोण्डा सावन्त व त्याची आठ मुले यावेळी क्रान्तिकारकांच्या मदतीस आली व त्यांचे बळ पुनः वाढले. दहाव्या रेजिमण्टमधील सैनिकांशी या क्रान्तिकारकांनी संबंध स्थापित केला व त्यांना आपल्यास येऊन मिळविण्याचा प्रयत्न केला. या उठावांचा बीमोड करण्यास एक वर्ष लागले.

विजगापट्टममध्ये याच तऱ्हेचे उठाव झाले. तेथे वीरभद्र नावाचा एक जमीनदार होता. इंग्रजांनी त्याची जमीनदारी ताब्यात घेतली व त्याला शंभर रुपये महिन्याची निवृत्ती देऊ केली. हा सौदा त्याला पटला नाही व त्याचा उठाव मोडून काढण्यास एक वर्ष लागले. सुत्तीवरण येथे अशाच कारणासाठी असाच उठाव झाला व तो दाबून टाकण्यास दोन वर्षे लागली.



पालकोण्डामध्येही वर्षभर असेच बण्ड झाले. अशा जमीनदारांच्या बण्डामध्ये गंजम जिल्ह्यातील धनंजय भंज याचा उठाव अधिक गंभीर होता. त्याने कोलण्डाच्या किल्ल्यात ठाण माण्डले. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी पाठविण्यात आलेल्या ब्रिटिश तुकड्यांना बराच प्रतिकार झाला. याबद्दल तेथील कलेक्टरने म्हटले आहे की सरकारचा अमल फक्त जेथे त्याची फौज आहे तेथेच चालतो. शेजारचे जमीनदार पहाडी टोळ्यांचे प्रमुख, इतर सरदार, सामान्य नागरिक व सरकारी नोकर देखील बण्डखोरांच्या पक्षाचेच आहेत. सैन्याला लागणारी रसद आम्हाला दुरून आणावी लागते. जे आमच्या पक्षाचे आहेत असा संशय येतो त्यांच्यावर अत्याचार होतात. पूर्वीच्या राजाला परत आणल्याशिवाय येथे शान्ती नान्देल असे मला वाटत नाही.

हा उठाव मोडण्यासाठी रसेल नावाचा कमिश्नर नेमण्यात आला व त्याला त्यासाठी पूर्ण अधिकार देण्यात आले. तो गुन्तूरमध्ये आला तेव्हा त्याच्या सैन्यात दोन कर्नल होते. या वरून या सैन्यात निदान दोन रेजिमेण्ट होते असा अन्दाज होतो. रेजिमेंट हा सैन्यात नेहमी असलेला एक मोठा विभाग आहे. यावेळी बण्डखोरांना गोण्ड लोकही येऊन मिळाले. त्यांनी ब्रिटिश सैन्यावर हल्ला केला व सैन्याला मार्ग दाखविणारे "एस्कॉर्ट" सैन्यापासून तोडले व मार्गावर तोडलेली झाडे पसरून ब्रिटिश सैन्याचा मार्ग अडविला.

पालखीमेडीची जमीनदारी जप्त झाली तेव्हाही उठाव झाला. जमीनदाराने आपले घरगुती नोकर व काही पहाडी टोळ्या जमवून बण्ड उभारले. हे बण्ड सुरू झाल्याबरोबर सामान्य नागरिकही उठले. जंगले व किल्ले याच्या आश्रयाने बण्डखोरांनी पुष्कळच तग धरला. हे बण्ड चार वर्षे सुरू होते. १८४२ मध्ये बुन्देलखण्डात सागर येथे मधुकर शहा व जवाहरसिंग यांनी उठाव केला. त्यांच्याबरोबर त्यांच्याशी संबंध नसलेली इतर जनताही उठली. नरसिंगपूरचा गोण्ड मुखिया दलेन शहाही उठला व त्याने देवरी व त्याभोवतालच्या मुलखात धुमाकूळ माजविला. हे उठाव शान्त करण्यास एक वर्ष लागले.

१८४६ / ४७ मध्ये कुर्लूलच्या पाळेगाराने पेन्शन बन्द झाल्यामुळे बण्ड केले. त्याने चार ते पाच हजार लोक गोळा केले व तीन महिनेपर्यन्त धामधूम केली.

ब्रिटिशांची सारा पद्धती अतिशय जीवघेणी होती. त्यामुळे १८२९ मध्ये एक बण्ड झाले त्यांच्या विरुद्ध पाठविलेल्या कॅ. गॉर्डनच्या सैन्याचा पराभव झाला. हे बण्ड वर्षभर चालले.

दऱ्या डोंगरात राहणाऱ्या टोळ्या ब्रिटिश राज्याने फार दुखावल्या होत्या. अशा

टोळ्यांपैकी आसामच्या टोळ्यांनी एक मोठा उठाव केला. यात खासी टोळीचा अन्तर्भाव प्रामुख्याने होतो. इंग्रजी राज्यांचे जंगलविषयक धोरण वनवासी लोकाचे जीवन उद्ध्वस्त करणारे होते. रस्ते बान्धण्यासाठी त्यांच्यातून काही मजूर जबरदस्तीने आणले जात. वनवासी लोक एकन्दरीतच ब्रिटिश राज्यावर नाराज होते.

१८२९ मध्ये खासींच्या एका टोळीने काही युरोपीय व बंगाली यांची कत्तल केली. हे बंगाली इंग्रजांचे नोकर असले पाहिजेत. कारण इंग्रजी शिकून इंग्रजाची नोकरी करणारे बंगाली हे बण्डखोरांच्या रोषाचे लक्ष्य असे. तिरुतसिंगाने भेट व सिंगफो वगैरे टोळ्यांचेही जमाव जमविले व ब्रिटिशांना हाकलून द्या म्हणून आसामच्या पदच्युत राजालाही आवाहन केले. ब्रिटिशांनी या टोळ्यांची खेडी जाळून त्यांच्यावर दहशत बसविण्याचा प्रयत्न केला. तिरुतसिंगाची फौज यावेळी १००० ची होती व ती गोहत्ती या राजधानीच्या ठिकाणापर्यन्त जाऊन हल्ले करीत असे. एकदा तर तिरुतसिंगाच्या भीतीने पळून जाण्यासाठी ब्रिटिशांनी काही नावा सज्ज ठेवल्या होत्या.

खासी टोळ्याशी हे युद्ध चार वर्षे चालले होते. खासीकडून स्फूर्ती घेऊन १८३९ मध्ये सिंगफो टोळ्यादेखील उठल्या. त्यांच्या उदाहरणाने आसामात ज्यांनी ब्रिटिशापूर्वी सत्ता होती तेही आपली सत्ता पुनः मिळविण्यास उठले. गदाधर नावाच्या एका वीराच्या हालाचाली सुरू होत्याच. हरनाथ या प्रमुखाने खासी व सिंगफो या टोळ्यांना साथ दिली. त्यांनी कुमार रूपचन्द आपला राजा आहे असे जाहीर केले व आसामातील सर्व टोळ्यांना व राजकीय पुढाऱ्यांना ब्रिटिशाविरुद्ध उठण्यास आवाहन केले. या सर्वांनी रंगपूर येथील ब्रिटिश लष्करी ठाण्यावर हल्ला केला.

सिंगफो बण्ड या पेक्षाही तीव्र होते. तीन हजारच्या वर बण्डखोर तोड्याच्या बन्दुका, भाले व तरवारी घेऊन सादियावर चालून आले. पराभव झाल्यावरही १८३० मध्ये ते पुनः उठले. पुनः पराभव झाल्यावर १८३९ मध्ये पुनः उठले. या उठावात ब्रिटिश पोलिटिकल एजण्ट मारला गेला.

१८३५ मध्ये कस्पतोर आकाशच्या त्यागी राजाने पहाडी लोकांना ब्रिटिशाविरुद्ध उठविले. त्याने बालीपाराच्या पोलिस ठाण्यावर हल्ला केला. त्याचा धुमाकूळ १८४२ पर्यन्त सुरू होता.

१८४९ मध्ये सर्वपरिचित नागा लोक उठले. त्यांनी दीमापूरच्या प्रदेशात हल्ला केला. त्यांना शान्त करावयास १०५१ साल उजाडावे लागले.



यानंतर लुशाई, मणिपूर आणि तिप्पेरा येथील खासी उठले व त्यांनी सिल्हट व कच्चरवर हल्ला केला. १८२६, १८४४ व १८४९ मध्ये ते पुनःपुनः उठल्याचे उल्लेख आहेत. या कुकीचा बन्दोबस्त करण्यासाठी निरुन्द खिण्डी पार कराव्या लागत व ते या खिण्डींच्या रक्षणार्थ ७००० पर्यन्त सैनिक वापरीत.

१८२७ ते १८३७ असे दहा वर्षे चाललेले कोलारी टोळ्यांचे बण्ड उल्लेखनीय आहे. या टोळ्या पूर्वीच्या राज्यात स्वायत्त होत्या. त्यांच्या जीवनात हस्तक्षेप करण्याचा व त्यांना जिंकायचा कोणत्याही पूर्वीच्या सत्तेने प्रयत्न केला. नव्हता. हे लोक कुऱ्हाडी घेऊन देखील लढत राची, हजारीबाग, पेलमाडू वगैरे विस्तीर्ण प्रदेशावर यांचा संचार सुरू होता.

पूर्वीच्या कोणत्याही सत्तेविरुद्ध तळागाळातील लोकांचा एवढा क्षोभ कधी उसळला नाही. कोलारी टोळ्यासारख्या टोळ्या स्वतःच्या जीवनात संतुष्ट होत्या. त्या इतर लोकांच्या जीवनात हस्तक्षेप करीत नव्हत्या. ब्रिटिश सत्ता ही पूर्वीच्या कोणत्याही सत्तेपेक्षा स्वातन्त्र्याचा पूर्णपणे अपहार करणारी होती. येथे स्वातन्त्र्य याचा अर्थ नागरिक स्वातंत्र्य असा नसून एखाद्या समाजाला आपली विशिष्ट व्यवस्था कायम ठेवण्याचे स्वातन्त्र्य असा आहे.

कोल बण्डाच्या पाठोपाठ मालभूमधल्या भूमिजांनी बण्ड केले. त्यांचा पुढारी गंगनारायण हा बाराभूमचा जमीनदार होता. घटवाल नावाच्या खिण्डींच्या रखवालदारांचे त्याने सैन्य बनविले. त्यांना जीवघेण्या सारापद्धतीमुळे गांजलेले शेतकरीही येऊन मिळाले. या सर्वांनी बाराबझार वर हल्ला केला व तेथील सरकारी इमारतींची नासधूस केली. या नंतर त्यांनी फौजेवरही हल्ला केला. फौजेने बारभूमहून माघार घेतली. गंगनारायणने राजा ही पदवी धारण केली. बाराभूमच्या पूर्वेकडील सर्व प्रदेशावर तो अधिकार गाजवू लागला. त्याला भूमिज कोलही येऊन मिळाले. १८३२ पर्यन्त हा उठाव शमला नव्हता.

ब्रिटिश आपल्या जमिनी लुबाडतील व आपल्याला वेठीस धरतील व जीवघेणे कर लादतील या भीतीने १८४६ मध्ये खोण्ड नावाची जमात उठली. ब्रिटिशांचे म्हणणे असे की आम्ही या लोकात असलेली नरबळी व अर्भकसंहाराची प्रथा थांबविण्यासाठी प्रयत्न केला म्हणून ते उठले. त्यांनी कॅ. मॅकफर्सनच्या छावणी वर हल्ला केला व त्याला १७० कैदी मोकळे करण्यास भाग पाडले. हे १७० बळी देण्यासाठी खोण्डांनी जमविले असा आरोप आहे. पण इंग्रजापासून या प्रकारे हिसकून घेतल्यावर ते बळी दिले गेले की नाहीत याचा उल्लेख मजुमदार करीत नाहीत.

१८४६ मध्ये या खोण्डांचा पराभव झाला पण या वर्षाच्या शेवटी त्यांनी पुनः उठाव केला. गुमयुर व शेजारच्या भागातील खोण्ड यात सामील झाले. हे बण्ड तीन वर्षे चालले. इंग्रजांनी खेडीच्या खेडी जाळली व दुर्गम स्थाने काबीज केली. पण खोण्ड आपल्या पहाडी स्थळांच्या आश्रयाने लढतच राहिले. शेवटी इंग्रजांनी खोण्डांच्या निर्वासित मुखियाला परत आणले व त्याची नेतृत्वपदी स्थापना केली तेव्हा खोण्ड शान्त झाले.

पण ही शान्तता १८५५ पर्यंतच टिकली. यावेळी खोण्डांनी जाहीर केले की ते नरबळीची चाल चालू ठेवण्यासाठी लढत नसून त्याचे अधिकार वाचवण्यासाठी लढत आहेत.

१८५५-५६ मध्ये झालेले सन्थाल बण्ड प्रसिद्ध आहे. ब्रिटिश राज्याचा द्वेष किती सार्वत्रिक व तीव्र होता हे त्यावरून दिसून येते. बंगालमधून आलेले सुधारलेले लोक आपल्यास त्रास देतात अशी संन्थालांची तक्रार होती. हे सुधारलेले लोक म्हणजे इंग्रज नव्हेत कारण इंग्रजांचा उल्लेख फिरंगी म्हणून होई. हे लोक इंग्रजी शिकून इंग्रजाची नोकरी करणारे भारतीय असावे. हे लोक आपल्या अज्ञानाचा फायदा घेऊन आपल्याला नाडतात अशी तक्रार सन्थालांनी सरकारकडे केली तेव्हा सरकार आपल्या तक्रारींना न्याय देण्याऐवजी या सुधारलेल्या लोकांचे हितसंबंध जोपासण्यासच जास्त उत्सुक आहे असे सन्थालांना दिसून आल्यावर ते सरकारच्या विरोधात उठले. सिंधू व कान्हू सन्थालांचया दोन पुढाऱ्यांना ईश्वरी प्रेरणा मिळाली होती असा संथालांचा विश्वास होता. त्यांच्या नेतृत्वाखाली १०००० सन्थाल १८५५ साली गोळा झाले व त्यांनी इंग्रजाचा नाश करून सारा भारतच ताब्यात घेण्याचा संकल्प केला. त्यांना लवकरच त्यांच्यासारखे दुसरे १०००० मिळाले व दळणवळणाची साधने तोडून त्यांनी सरकार चालविणे कठिण केले. भागलपूर व राजमल मधील प्रदेशात त्यांनी आपला अंमलच बसविला. आता ईस्ट इण्डिया कम्पनीचे राज्य संपले असे जाहीर केले.

■■■





# प्रकरण तीन | युद्धाची पूर्व योजना

निन्दकांचे आक्षेप सत्तावनचे युद्ध हे स्वातंत्र्ययुद्ध होते की नाही हे ठरविण्यास अप्रस्तुत असले, तरी इतिहासदृष्ट्या साधार आहेत अशी काही वाचकांची समजूत असण्याचा संभव आहे. आजकाल सत्य इतिहास म्हणजे देशनिन्दक इतिहास, इंग्रज इतिहासकारांची पोपटपंची असे समीकरण लोकप्रिय होत आहे. सावरकरांनी सत्तावनचे स्वातंत्र्यसमर लिहिले तो केवळ भावनेचा विलास आहे. मजुमदारांचे लिखाण मात्र वस्तुनिष्ठ, समतोल व साधार आहे असा एक ग्रह प्रचलित आहे. या ग्रहाचा बुडबुडा फोडणे आवश्यक आहे.

वस्तुतः सावरकरांच्या पुस्तकाप्रमाणेच मजुमदारांचे लिखाणही भावनाजन्यच आहे. पारतंत्र्याचा द्वेष व स्वातंत्र्यवीरांची पूजा ही भावना आहे. त्याचप्रमाणे पारतंत्र्याचे प्रेम व देशद्रोह्यांची पूजा या देखील भावनाच आहेत. भावनांपासून कोणीही मुक्त नाही. प्रश्न एवढाच आहे की सत्यशोधनाच्या मार्गात देशभक्ती व देशद्रोह या भावनांपैकी कोणती कमी हानिकारक आहे. यावर कोणताही सुबुद्ध माणूस

असेच म्हणेल की देशद्रोह ही एक अधम भावना आहे. उलट देशभक्ती ही उदात्त भावना आहे. सत्यनिष्ठा हा गुण अधम भावनेपेक्षा उदात्त भावनेच्या साहचर्याने राहणे अधिक संभवनीय आहे. प्रेम आंधळे असते हे खरे असले तरी काही एका मर्यादेपर्यंतच खरे आहे. आईचे मुलावर प्रेम असते म्हणून तिला त्याचे नकटे नाक झोकदार वाटेल. पण त्याच्यावर रोगाची छाया पडल्याचा संशय आल्याबरोबर योग्य ते उपचार करून त्यांचा बचाव करण्याची ती शिकस्त करील. त्याच्या रोगाचे कौतुक करीत बसणार नाही. तसेच सत्तावनचे युद्ध व सत्तावनचे वीर यांच्या क्षुद्र उणिवांकडे सावरकरांनी दुर्लक्ष केले असेल व अभिमानास्पद भाग खुलवून मांडला असेल. पण हे युद्ध मुळातच राष्ट्रविघातक होते, असा संशय येण्यासारखी परिस्थिती असती, तर त्यांनी त्यावर एवढा स्फूर्तिदायक ग्रंथ कधीच लिहिला नसता.

## निन्दकांची नीतिमत्ता

उलट प्रेमाप्रमाणेच द्वेष देखील आंधळा असतो व स्वदेशाचा द्वेष ही भावना अधम असल्यामुळे त्या द्वेषाच्या साहचर्याने अप्रामणिकपणासारख्या प्रवृत्ती रुजण्याचा अधिक संभव असतो. मजुमदार व फाटक यांच्या लिखाणात याचे प्रत्यन्तर मिळते. विष्णुभट गोडसेच्या "माझा प्रवास" या ग्रंथावरून तत्कालीन लोकांची सहानुभूती सत्तावनच्या युद्धाकडे नव्हती, असे सिद्ध होते असे मजुमदारांनी म्हटले आहे. मजुमदारांनी हा ग्रंथ वाचला नाही हे यावरून स्पष्ट आहे. झांशीच्या वेढ्यात राणी लक्ष्मीबाईंची सरशी होऊ नये आणि काल्पी व कानपूर येथील लढायात पेशव्याचा जय होऊन पेशवाईची पुनः स्थापना होऊ नये असे विष्णुभटाला वाटत होते असा आरोप करण्यास या पुस्तकात कुठेच जागा नाही. तेव्हा मजुमदारांनी न वाचलेला ग्रंथ वाचल्याची थाप मारण्याचा दांभिकपणा केला, हे स्पष्ट आहे.

दांभिकपणापेक्षा अधिक निन्दनीय अशी एक वृत्ती मजुमदारांनी प्रकट केली आहे व ती म्हणजे राष्ट्रपुरुषांवर जाणूनबुजून खोटे आरोप करण्याची. पृष्ठ ५४३ वर ते म्हणतात 'Nana perpetrated the horrible massacre of the British prisoners' पुढे ५९७ वर हेच इतिहासब्रुव लिहितात "... there are no means to determine his (Nana's) personal share in them', म्हणजे कत्तलीची जबाबदारी नानासाहेबावर वैयक्तिकरीत्या येते असा पुरावा मजुमदाराजवळ नाही. असे असताना Nana perpetrated the massacre असे म्हणायला मजुमदारांना शरम वाटली नाही.



सत्तावनचे दुसरे निन्दक न. र. फाटक यांनी "माझा प्रवास" या विष्णुभट गोडसे यांच्या पुस्तकाचे संपादन करताना तात्या टोपेच्या सैन्याने लूटमार कशी केली याचे वर्णन करणाऱ्या हस्तलिखितातील एका उताऱ्याचे छायाचित्र छापले आहे. वस्तुतः ब्रिटिश फौजांनी किती भयंकर लूटमार व कत्तली केल्या याची वर्णने विष्णुभटाच्या पुस्तकात जागोजाग आहेत. त्यातला एखादा उतारा न देता हाच उतारा देऊन फाटकांनी वाचकांची बुद्धिपुरःसर दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच तात्या टोपे झांशीवर १५००० सैन्य घेऊन आला असे फाटकांच्या आवृत्तीत विधान आहे. लहानपणी मराठी क्रमिक पुस्तकात याच पुस्तकातला एक उतारा वाचला. त्यात १०,००० हा आकडा दिलेला आहे. यावरून विष्णुभटांनी खरोखर कोणता आकडा दिला व फाटकांनी १५,००० कोठून आणले याचा खुलासा होणे आवश्यक आहे. वैद्यांचे हस्तलिखित निराळे असावे असा फाटकांचा एक तर्क आहे. पण त्याला प्रमाण नाही. वैद्य व फाटक यात कोणताही वाचक वैद्यांनाच जास्त विश्वसनीय मानील यात संशय नाही. फाटकांचा कुत्सितपणा याहीपेक्षा अधिक निंद्य रीतीने राणी लक्ष्मीबाईंच्या बाबतीत प्रकट झाला आहे. "शिकारीच्या शोकामुळे" राणीची "गैरवाजवी वागणूक होत नसे" असे विष्णुभटांचे वाक्य आहे. फाटकांनी "नसेच्या" जागी "असे" होते काय अशी शंका प्रकट करून सूर्यावर थुंकण्याचा प्रयत्न केला आहे. सत्तावनच्या निन्दकांची नीतिमत्ता कोणत्या दर्जाची आहे, हे यावरून स्पष्ट होते.

सत्तावनच्या निन्दकांचे लिखाण साधार आहे असे समजणाऱ्यांनी सावरकर व मजुमदार यांचे या विषयावरील लिखाण ताडून पहावे. जी घटना घडल्याबद्दल कुठेही आधार सापडत नाही अशी एखादी घटना घडल्याचे सावरकरांनी वर्णन केले आहे असा आक्षेप कुणालाही घेता येणार नाही. त्यांनी आपल्या विधानांना जागोजाग आधार दिले आहेत. मजुमदारांनी यापेक्षा अधिक काही केले आहे असे नाही. उलट मजुमदार सरळ थापा मारतात तशा थापा सावरकरांनी कुठेही मारलेल्या नाहीत.

निन्दकांचे आक्षेप अप्रस्तुत आहेत एवढेच केवळ नव्हे, तर हवेतल्या वावड्यांव्यतिरिक्त त्यात काही ऐतिहासिकता नाही हे दाखवून देण्यासाठी आता त्यांचा क्रमशः विचार करू.

## स्वराज्य आणि परराज्य

पहिला आक्षेप म्हणजे ब्रिटिशपूर्व स्वराज्यापेक्षा ब्रिटिश परराज्य अधिक प्रगत होते. या मुद्याची विस्तृत चर्चा येथे करणे शक्य नाही. पण आर्थिक उत्पादनशीलता, साक्षरतेचे प्रमाण, वैज्ञानिक व तांत्रिक प्रगती या सर्वच बाबतीत ब्रिटिशपूर्व भारताची स्थिती ब्रिटिश भारतापेक्षा अधिक समाधानकारक होती याबद्दल निर्विवाद पुरावे उपलब्ध आहेत, एवढेच येथे नमूद करणे आवश्यक आहे. (प्रकरणे १० व ११ पहा)

दिल्लीच्या नागरिकांनी १८५७ साली एक पत्रक काढले. त्यावरून इंग्रजी राज्याविरुद्ध असंतोष किती सार्वत्रिक होता हे दिसून येते. इंग्रजांनी आगगाड्या आणल्या, इंग्रजी शिक्षण आणले, म्हणून इंग्रजी पारतंत्र्याचे गोडवे गाण्याची आज फॅशन आहे. पण ज्या लोकांनी इंग्रजपूर्व भारतीय राज्ये पाहिली होती अशा सत्तावनच्या भारतीयांना पूर्वीच्या राज्यांच्या तुलनेने इंग्रजी राज्यात काहीच चांगले दिसत नव्हते, असे हेन्री लॉरेन्सने लॉर्ड कॅनिंगला लिहिलेल्या पत्रावरून स्पष्ट होते. क्षुद्र सरकारी नोकऱ्यात काही लोक गुंतले होते. पण असंख्य लोक बेकार झाले होते. लखनौच्या कादरअली याने ब्रिटिश राज्यात : १) धर्म, २) प्रतिष्ठा, ३) जीवन व ४) मालमत्ता या चार गोष्टी सुरक्षित नाहीत, पूर्वीच्या राज्यात त्या सुरक्षित असत असे आपल्या पत्रकात म्हटले आहे. ज्या ब्रिटिश न्यायपद्धतीचा आंग्लशिक्षित बराच बडिवार माजवितात तिच्यात काही न्याय आहे असा १८५७ सालच्या भारतीयांचा अनुभव नव्हता. पूर्वीच्या न्यायपद्धतीत कोणताही माणूस दाद मागण्यास सरळ न्यायाधीशासमोर उभा राहू शकत असे. पण ब्रिटिश न्यायपद्धतीत न्यायाधीशापर्यंत पोहोचणे हेच एक मोठे दिव्य होते. वकिलांच्या व न्यायालयांच्या लठ्ठ दक्षिणा दिल्याशिवाय पानही हालत नसे. हे सर्वसाधारण माणसाच्या आटोक्याबाहेरचे होते. शिवाय लाचलुचपतीचा रोग इतका सार्वत्रिक होता की न्यायदेवता ही पैशाची बटिक बनली होती.

## भ्रान्त विचार

स्वराज्य व परराज्य यांच्या तौलनिक मूल्यमापनाबद्दल सत्तावनच्या निन्दकांच्या मनात किती गोंधळ आहे याचे उदाहरण म्हणून मजुमदारांचे लिखाण उल्लेखनीय आहे. त्यांच्या मते ब्रिटिश राज्यामुळे भारतात एकराष्ट्रीयत्व स्थापन होऊन बौद्धिक पुनरुज्जीवन घडून आले. मग असे जर आहे तर मजुमदारांनी भारताचे एवढे भले करणाऱ्या ब्रिटिश



राज्याविरुद्ध झालेल्या सर्वच चळवळींचा धिक्कार करायला पाहिजे होता. फक्त सत्तावनच्या उठावाचीच निन्दा करून त्यांचे भागायला नको होते. पण उलट त्यांनी सुमारे पन्नास वर्षांच्या स्वातंत्र्याच्या चळवळीला हजारच्या जवळपास पृष्ठे वाहिली आहेत. त्यांना या चळीवळीबद्दल बराच आदर आहे. या आदराचे त्यांनी कोठेच समर्थन केले नाही. स्वातंत्र्याची चळवळ सुरू होण्याच्या सुमारासच ब्रिटिश राज्याची हितकारकता संपुष्टात येऊ लागली होती व ते नष्ट करून स्वराज्य स्थापल्याने भारताचे हित होणारे होते असे त्यांनी कोठेही सिद्ध केले नाही व आपले विचार तर्कशुद्ध ठरण्यास हे सिद्ध करणे जरूर आहे, याची त्यांना जाणीवही नाही.

वस्तुतः स्वराज्यापेक्षा परराज्य चांगले असू शकते असे मानले तर स्वातंत्र्याच्या चळवळीचीच केवळ नव्हे, तर राष्ट्रीय रक्षाखात्याचीच समर्थनीयता नाहीशी होते. उद्या पाकिस्तानने वा चीनने भारत व्यापला तर दुसरे पुनरुज्जीवन होणार नाही कशावरून? पुनरुज्जीवन होणार नाही व पारतंत्र्य हितावह ठरणार नाही हे निश्चित नाही, पाक व चिनी आक्रमणांना तोंड देण्याने जीवहानी व वित्तहानी होणार हे मात्र निश्चित आहे. मग संरक्षण खात्यावर कोट्यवधीचा खर्च कशाला? पाकला व चीनला भारत का व्यापू देऊ नये? या प्रश्नाला मजुमदार व त्यांचे सहप्रवासी यांच्या जवळ काय उत्तर आहे?

मजुमदारांच्या मेन्दूत किती सावळागोंधळ आहे याचा प्रत्यय सत्तावनच्या उठावाच्या मागे काही योजना नव्हती हे सिद्ध करण्यास ते जी प्रमाणे देतात त्यावरून देखील कसा येतो, हे पुढील विवेचनावरून दिसून येईल.

## सीतारामबाबाची साक्ष

सीतारामबाबाने आपल्या साक्षीत सांगितले की १८५४ पासून नानासाहेब साऱ्या राजेरजवाड्यांना पत्रे लिहून उठावाची योजना आखीत होते. या योजनेस फक्त त्रावणकोरच्या राजाची सहानुभूती नव्हती. औंध खालसा झाल्यावर नानांना पत्रावर पत्रे येऊ लागली. जमूच्या गुलाबसिंगाने शस्त्रास्त्रे, सैनिक व धन गोळा केले. काही धन एका लखनौच्या सावकारामार्फत नानासाहेबास पाठवले देखील.

ही साक्ष खरी असेल वा खोटी असेल, पण ती खोटीच आहे हे सिद्ध करण्यासाठी मजुमदार जे प्रमाण देतात ते हास्यापद आहे. ते म्हणतात, "ज्या राजेरजवाड्यांना नानांनी पत्रे लिहिली त्यात बायजाबाई शिंदे यांचे देखील नाव आहे. या बायजाबाई स्वातंत्र्ययुद्धात

कधीच सामील झाल्या नाहीत; उलट त्यांनी ब्रिटिशांशी आपल्या देशबांधवांविरुद्ध सहकार्य केले. यावरून असा निष्कर्ष निघतो की नानांनी बायजाबाईशी युद्धाच्या योजनेबद्दल वाटाघाट केली नव्हती.'' आहे की नाही इतिहासकार! क्रान्तीच्या योजनेची वाटाघाट ज्यांच्याशी होते ते सगळेच क्रांतीत भाग घेतात काय? ''बायजाबाईच्या चरित्र्यावरून असे दिसते की तिच्याकडे नानांचे पत्र आल्याबरोबर तिने नानांच्या कारस्थानाचा गौप्यस्फोट केला असता,'' असे कदाचित् मजुमदारांना म्हणावयाचे असेल. पण मजुमदारांच्या वतीने अशी सारवासारव करायची सोय नाही. कारण बायजाबाईला युद्धात भाग घेण्याची इच्छा नसली तरी नानांच्या कारस्थानाने ब्रिटिशांचे परस्पर उच्चाटन झाले तर तिला हवेच होते, म्हणून तिने नानांची चुगली केली नाही असाही तिच्या वर्तनाचा अर्थ लागू शकतो.

''भारतातल्या सर्व राजेरजवाड्यांशी नानाने संधान बांधले तरी त्याचा पुरावा पुढे कसा सापडला नाही?'' असा मजुमदार निर्बुद्धपणे प्रश्न विचारतात! सारा बनाव फसल्यावर नानांनी आपल्याशी संधान बांधले होते असे कुणी कबूल करील अशी मजुमदारांची अपेक्षा आहे काय? शिवाय नानांनी संधान बांधून देखील जे राजेरजवाडे स्वातंत्र्ययुद्धात सामील झाले नाहीत त्यांनी नानांची वेळीच आगळिक केली नाही एवढ्याच सिद्ध न करता येण्यासारख्या अपराधाखातर त्यांच्यावर धार धरायची शहाण्या इंग्रज राज्यकर्त्यांना जरूर वाटली नाही, हेही सहज समजण्यासारखे आहे.

नानासाहेबांनी बुद्धिपुरःसर स्वातंत्र्ययुद्धाचा व्यूह रचला असे सांगून त्यांना स्वातंत्र्यवीर ठरविण्याची संधी साधायची सोडून ''शिपायांनी भाग पाडल्यामुळे नानासाहेब युद्धात सामील झाले,'' असे तात्या टोपेने सांगितले या वरून या युद्धामागे नानांची काहीच योजना नव्हती असे अनुमान मजुमदार काढतात! मजुमदारांच्या तर्कशास्त्राची कमाल आहे! तात्या टोपेच्या काळी ब्रिटिशांच्या विरुद्ध योजनाबद्ध उठाव करणे हे जनतेला पूजार्ह वाटण्यासारखे कृत्य होते हे या युक्तिवादात मजुमदार कबूल करतात. मग उठावाला जनतेची सहानुभूती नव्हती या त्यांच्या पालुपदाचे काय? शिवाय नानांना स्वातंत्र्यवीर म्हणून कीर्ती मिळवून द्यावी. मग त्यापायी ते फाशी गेले तरी चालेल अशी तात्या टोपेची मनीषा असती तर यदृच्छया घडून आलेला उठावदेखील नानानेच घडवून आणला असे खोटे सांगून नानांना फुकटचे श्रेय देण्याचा प्रयत्न त्याने का केला नाही?

कये आपल्या India Mutiny मध्ये म्हणतो की ''एकमेकांशी काहीच संबंध नसलेल्या शेकडो साक्षीदारांच्या साक्षीवरून बंडाचा व्यूह नानानेच रचला होता याबद्दल माझ्या



मनात तिळमात्र शंका नाही.'' रसेल आपल्या डायरीत लिहितो की नाना व त्याचा हस्तक अजीमुल्ला हे बंडाचा उद्रेक होण्याच्या आधी यात्रेच्या निमित्ताने ट्रंक रोडवरील बहुतेक लष्करी ठाण्यांना भेटी देऊन आले होते. एक हिंदू व एक मुसलमान यांच्या या संयुक्त यात्रेचा अन्वयार्थ ''बंडाचे'' कारस्थान या एकाच वर्णनाने लागू शकतो.

## राणी लक्ष्मीबाईचा कार्यभाग

राणी लक्ष्मीबाईने पुरीमध्ये राहणाऱ्या आपल्या कुलपुरोहिताला मार्च १८५६ मध्ये एक पत्र लिहिले. त्यावरून राणी इंग्रजाविरुद्ध ''बंडाची'' उभारणी करीत होती असे दिसते. हे पत्र खरे नाही हे सिद्ध करण्यास डॉ. सेन पुढील कारणे देतात : १) राणीच्या इतर पत्रात मुसलमानी तारखा आहेत, या पत्रात इंग्रजी तारीख आहे. २) ''माननीय पण्डाजी'' व ''आपली लक्ष्मीबाई'' हे शब्दप्रयोग त्यावेळेच्या रिवाजास धरून नाहीत. ३) पत्रावरील मुद्रा इतर पत्रावरील मुद्रेसारखी नाही. ४) पत्रात चर्बीच्या काडतुसांचा उल्लेख आहे पण ही काडतुसे भारतात नोव्हेंबर १८५६ च्या आधी आली नव्हती.

याविरुद्ध असे म्हणता येईल की (१) मुसलमानी तारखा जाऊन इंग्रजी तारखा रूढ होण्याचा तो संक्रमणाचा काळ असल्यामुळे काही पत्रावर मुसलमानी तारखा व काही वर इंग्रजी तारखा वापरल्या गेल्या हे सहज शक्य आहे. (२) ''माननीय पंडाजी'' व ''आपली लक्ष्मीबाई'' हे लेखन देखील इंग्रजी पद्धतीची छाप पडत असल्याचे द्योतक असेल. (३) राजेलोक जन्मभर एकच मुद्रा वापरीत असतील हे शक्य नाही. मुद्रा घासून पुसून खराब होतात म्हणून नव्या कराव्या लागतात. नव्या करताना नेहमीच जुन्याची हुबेहूब नक्कल केली जात असेल असे नाही. आपल्या दर्जात पडलेल्या फरकानुसार मुद्रेतही फरक करणे त्यांना भाग होते. (४) चर्बीची काडतुसे नोव्हेंबर ५६ च्या आधी आली नाहीत असे सेन कशाच्या आधारावर म्हणतात हे ते सांगत नाहीत. डिसेंबर १८५३ मध्ये कर्नल टकरने आपल्या एका प्रतिवृत्तात अशा काडतुसांचा उल्लेख केला गेला होता असे कयेच्या इंडियन म्युटिनी मध्ये विधान आहे. सावरकरांनी याची दखल घेतली आहे. पण व्यावसायिक इतिहासकार म्हणून गाजलेल्या सेनांना याचा पत्ताही नाही. भावनावश म्हणून मानला गेलेला सावरकरांसारखा लेखक साधार विधान करतो, उलट निःपक्षपाती इतिहास लिहिण्याचा दावा करणारे सेन, मजुमदार प्रभृती ठोकून देतात याचे हे उत्तम उदाहरण आहे.

पत्र एखाद्या इंग्रजी जाणणाऱ्या माणसाने बनावट तयार केले असे सेन म्हणतात. असे पत्र बनावट तयार करण्यात त्याचा हेतू काय असावा या विषयी ते काहीच खुलासा करीत नाहीत. राणीच्या एखाद्या हितशत्रूने तिला फासावर चढविण्यासाठी हा खोटा पुरावा तयार केला म्हणावे तर ती आधीच सूर्यमंडळ भेदून अशा अधमांच्या कारवायांपलीकडे गेली होती.

पत्र राणीचेच असे मानले तरी ते अस्सल पत्रासारखे भासत नाही याची सरळ उपपत्ती देता येते. पत्र शत्रूच्या हाती लागले तर ते "माझे नव्हे" म्हणून सरळ कानावर हात ठेवता यावे म्हणून बुद्ध्याच त्यात कमअस्सलपणाचे पुरावे ठेवले असतील.

झांशीची राणी युद्धात का सामील झाली याची कारणे सांगताना मजुमदार म्हणतात की "बंडाशी" आपला संबंध नाही असे राणीने अनेक वेळा सांगूनही इंग्रजांचा त्यावर विश्वास बसला नाही, एवढेच नव्हे तर राणीला फासावर चढविण्याचा त्यांनी निश्चय केला होता. एवीतेवी मरण अटळ आहे तेव्हा धारातीर्थी देह ठेवावा म्हणून राणी युद्धात सामील झाली.

पण काहीच कारण नसताना राणीचा युद्धात हात होता अशी ठाम समजूत करून घेण्याचे इंग्रजांना काय कारण होते याचा खुलासा मजुमदार करीत नाहीत. चित्रकूटचे नारायणराव व माधवराव पेशवे युद्धाशी संबंध नसल्यामुळे आपण होऊन इंग्रजांच्या स्वाधीन झाले. तसेच राणीचा युद्धाशी संबंध नसता तर तिलाही निर्धास्तपणे इंग्रजांच्या स्वाधीन होण्यास हरकत नव्हती. ("Narayanrao & Madhavrao declared themselves as Peshwas हे मजुमदारांचे विधान, हे दोघे युद्धाशी संबंध नसल्यामुळे निःशंकपणे इंग्रजांच्या स्वाधीन झाले या विष्णुभटाच्या विधानावरून खोटे दिसते. मजुमदार आपल्या विधानास आधार देत नाहीत) राजा कुमारसिंग "बंडाची" तयारी करीत आहे अशा अनेक तक्रारी इंग्रजांकडे पोहोचल्या तेव्हा त्यांनी त्याची चौकशी केली व चौकशीत काहीच सापडले नाही म्हणून कुमारसिंगाविरुद्ध त्यांनी काहीच कारवाई केली नाही. मग झांशीच्या राणीच्या बाबतीतच निष्कारण दुराग्रह व डूख इंग्रजांनी का बाळगावा? इंग्रजांनी राणीला मारण्याचा निश्चय केला होता हे मजुमदारांचे म्हणणे खरे असेल तर राणीचा आधीपासूनच युद्धात भाग होता या बद्दल त्यांच्याजवळ पुरावा असला पाहिजे. तत्कालीन इंग्रज अधिकाऱ्यांचे मत चुकीचे होते, असे ठासून म्हणण्यास मजुमदार काहीच पुरावा देत नाहीत.



या बाबतीतील पुराव्याचा एक दुवा त्यांनी अज्ञानाने म्हणा वा बुद्धिपुरःसर म्हणा दडवून ठेवला आहे. राणीच्या नोकरीत असलेला लक्ष्मणराव नावाचा एक ब्राह्मण उठावाचे कारस्थान करीत आहे, असे दर्शविणारी काही पत्रे ब्रिटिश कमिशनरच्या हाती लागली. राणीची फूस नसताना लक्ष्मणरावासारखा एखादा नोकर युद्धाचा व्यूह रचील हे इंग्रजांना संभवनीय वाटले नाही. म्हणून त्यांनी राणीवर संशय घेतला. पुढे चौकशी झाली असती तर राणीचा हात किती गुंतला आहे हे लपून राहणे कठीण होते. पण इंग्रजांच्या हातात पत्रे लागल्याबरोबर त्याच्या आधारावर पुढे काही करण्याची त्यांना उसंत न देता क्रांतिकारकांनी उठाव केला व इंग्रजांची कत्तल केली.

## राजा कुमारसिंग

नानासाहेब पेशवे व राणी लक्ष्मीबाई यांच्याबरोबरच ज्याचे नाव सत्तावनच्या संग्रामात महत्त्वाचे आहे त्या राजा कुमारसिंगाचा युद्धाच्या पूर्व योजनेत काय भाग होता याबद्दल जे जे हाल म्हणतो की १८४५ पासूनच कुमारसिंग ब्रिटिशांविरुद्ध कारस्थाने करीत होता. १८४६ साली पाटण्यामध्ये एक ब्रिटिशविरोधी कट झाला त्यात कुमारसिंगाचा हात होता. इतर ब्रिटिश अधिकाऱ्यांनी देखील कुमारसिंग आपल्या रयतेस "तयार रहा मी केव्हाही बोलावीन" असे आदेश देत असे. त्याने शस्त्रास्त्रे व सैनिक गोळा केले होते. दानापूरच्या शिपायांनी त्याला आपला राजा निवडले आहे, शोण नदी पार करण्यासाठी त्याने शिपायांना नावा पुरविल्या आहेत, वगैरे प्रतिवृत्ते वरिष्ठांना कळविली होती. बेक म्हणतो, "कमिशनच्या कार्यालयात एक अनामिक अर्ज आहे. त्यात कुमारसिंगाच्या साऱ्या हालचालींची तक्रार आहे. एवढेच नव्हे तर २५ जुलैला तो उठाव करणार, असे देखील लिहिले आहे. या अर्जातले अक्षरन् अक्षर खरे ठरले आहे. त्याकडे दुर्लक्ष करण्यात फारच मूर्खपणा झाला."

एवढा निर्णायक पुरावा उपलब्ध असून देखील मजुमदार म्हणतात की, जास्त चौकशीमध्ये कुमारसिंगाविरुद्धचे आरोप सिद्ध होऊ शकले नाहीत त्याअर्थी कुमारसिंगाबद्दलची ही सारी प्रतिवृत्ते अफवेच्या स्वरूपाची असली पाहिजेत! खरेच आहे. इंग्रज हे देवयोनीतले! त्यांनी चौकशी केल्यावर कुमारसिंगाचे गुपित गुप्त राहील हे शक्यच नाही. कुमारसिंगासारख्या "काला आदमीने" इंग्रजांच्या दक्षतेवर कडी केली असणे शक्यच नाही. इशारे मिळूनही कुमारसिंगाने आपल्यावर मात केली म्हणून बेकसारख्या

इंग्रजाला हळहळ वाटते. पण मजुमदारासारख्या इंग्रजभक्तांचा मात्र इंग्रजी हेरखात्यावर बालंबाल विश्वास आहे. उन्हापेक्षा वाळू जास्त तापत असते हेच खरे.

१८५७ च्या सुरवातीस खेड्यापाड्यातून देखील चपात्या वाटण्यात आल्या. कुणीतरी खेड्यात दोन चपात्या घेऊन येई व तशाच दहा चपात्या करून, आणखी पाच खेड्यांत प्रत्येकी दोन दोन वाटण्यास सांगे. अशा रीतीने थोड्याच अवधीत भारताच्या बऱ्याच मोठ्याच भागात चपात्या वाटण्यात आल्या. सीताराम बाबाच्या सांगण्याप्रमाणे स्वातंत्र्ययुद्धाच्या नौबती झडणार याचा हा संकेत होता. मजुमदार म्हणतात की, चपात्या रोगनिवारणासाठी व लोकांना ख्रिस्ती बनविण्यासाठी इंग्रजांनीच वाटविल्या असे काही साक्षीदारांनी ऐकल्याचे सांगितले. यावरून चापात्यांचा स्वातंत्र्ययुद्धाशी काहीच संबंध नव्हता हे सिद्ध होते.

असे काही सिद्ध करणे हा तर मजुमदारांच्या हातचा मळ आहे. मजुमदारांना एवढाही विवेक नाही की "चपात्या आम्हाला मिळाल्या व ती स्वातंत्र्ययुद्धाची नौबत होती हेही आम्हाला माहीत होते पण आम्ही अधिकाऱ्यांना ही गोष्ट वेळीच कळविली नाही." असे कबूल करणे म्हणजे आपण त्या युद्धात सामील होतो असे कबूल करण्यासारखे होते. साराच बेत फसल्यावर असे कबूल करणे हा निर्बुद्धपणाच झाला असता.

वेलोरच्या बंडाच्या आधी देखील अशाच चपात्या वाटण्यात आल्या होत्या. यावरून अशा तऱ्हेने उठावाचे संदेश पोहोचविण्याचा प्रघात होता, असे म्हणण्यास आधार आहे.

## धार की धारा?

बरेच मुरके मारल्यावर मजुमदार हे कबूल करतात की राजेरजवाड्यांनी कारस्थान केले नसले तरी शिपायांनी कारस्थान केले असले पाहिजे, नाहीतर एक दोन महिन्यात एवढ्या मोठ्या प्रदेशावर उठाव झाला नसता. अहरानुल्लाने आपल्या साक्षीत सांगितले की शिपायांत सतत पत्रव्यवहार सुरू होता व उठावाचा बनाव बनत होता.

पण यावर देखील मजुमदारांची मल्लिनाथी अशी की बनाव बनत होता पण बनला नव्हता. तरवारीला धार होती, धारा नव्हती अशासारखाच हा शब्दच्छल आहे. योजना पूर्ण होण्याच्या आधीच उठाव झाला की ठरलेली योजना न पाळता उठाव झाला यात एवढा कोणता महत्त्वाचा भेद आहे?

उठावाची योजना आखताना भारताबाहेरील सत्तांची मदत मिळविण्याचा प्रयत्न



झाला की नाही असाही एक प्रश्न उद्भवतो. याबद्दल सेनांनी पुढील गोष्टी कबूल केल्या आहेत : (१) मुकुन्दलाल नावाच्या साक्षीदाराने सांगितले की शिद्दी कम्बर नावाचा एक माणूस बहादूरशहाने इराणच्या बादशहाकडे वाटाघाटीसाठी पाठवला. (२) हकीम अहरानुल्लाच्या म्हणण्याप्रमाणे मिर्झा-हैदराने (बहादूरशहाला?) शिया होऊन इराणच्या शहाशी दोस्ती जोडण्याचा सल्ला दिला. (३) मेजर हेरियटने सांगितले की इराणच्या शहाने भारताच्या कोणत्या प्रान्तावर कुणाला सुभेदार नेमायचे हेही ठरवून ठेवले होते. (४) भारतातून इराणकडे पत्रे गेली तशीच इराणातूनही "बण्डास" प्रोत्साहन देणारी पत्रे भारतात आली होती.

एवढे असूनही पुढे इराणकडून स्वातंत्र्ययुद्धाला एकाही कवडीची वा शिपायाची मदत मिळाली नाही यावरून व पत्रे पाठवली गेली पण त्यांची उत्तरे आल्याचा पुरावा सापडत नाही म्हणून सेन योजनेची शक्यता दूर सारतात. पण यावरून असे म्हणणे अधिक सयुक्तिक आहे की योजना शिजत होत्या पण त्यांना निश्चित आकार येण्याच्या आधीच उठाव होऊन सर्वच लागेबांधे विसकटले. पूर्ण ठरलेल्या योजना देखील काटेकोरपणे पार पाडणे एखाद्या प्रस्थापित सरकारला देखील जमत नाही. ६५ च्या भारत-पाक युद्धाचे सारे धुरीण हयात आहेत. खण्डोगणती तत्कालीन वर्तमानपत्रांचा पुरावा उपलब्ध आहे, असे असून देखील भारताला लाहोर घ्यायचे होते की नाही व भारताने शस्त्रन्यास का मान्य केला याबद्दल वाद होतो. मग ज्यांना पाठ टेकायला आपली म्हणता येईल अशी तसूभर भूमी देखील उरलेली नव्हती असे शिपायी व भारतीय राज्यकर्ते यांच्या गुप्त योजना प्रत्यक्षात असंबद्ध रीतीने प्रकट झाल्या तर त्यात आश्चर्य काय?

## अकाली स्फोट

मीरतला उठाव केल्यावर दिल्लीकडे जायचे हे आधी ठरले नव्हते; उठावानंतर चर्चा करून ते ठरविण्यात आले असे मजुमदार म्हणतात. हे खरे मानले तरी युद्धामागे योजना नव्हती असे त्यावरून सिद्ध होत नाही. ३१ मेला उठाव करण्याच्या योजनेप्रमाणे (Whites History a j. c. Wilson's official narrative) मीरतच्या शिपायांनी दिल्लीला जायचे असे ठरले नव्हते. हिंदुस्थानभर एकाच वेळी उठाव करून आपापल्या जागीच परराज्य नष्ट करायचे असे ठरले होते. साऱ्या भारतातली ब्रिटिश सत्ता नष्ट झाल्यावर दिल्लीतून लगेच बहादूरशहाच्या नावाने द्वाही फिरविण्याची योजना असेल.

२१ दिवस आधीच फक्त मीरतमध्ये उठाव केल्यावर मीरतमध्येच स्वस्थ बसल्याने सार्वत्रिक उठाव घडवून आणणे शक्य नव्हते. त्यासाठी दिल्लीची द्वाही फिरणे आवश्यक होते. म्हणून शिपायांनी दिल्लीकडे जाण्याचा निर्णय घेतला. काहीच पूर्वयोजना नसताना अचानक उठाव झाला असता तर आपण दिल्लीला पोहोचल्यावर दिल्लीचे शिपायी आपल्याला मिळतील अशी खात्री वा आशादेखील बाळगण्यास शिपायांना काहीच आधार नव्हता; व ज्या ठिकाणी सुसज्ज सरकारी फौज आहे अशा दिल्लीसारख्या ठिकाणी जाऊन आपण होऊन सरकारच्या तावडीत सापडण्याचा मूर्खपणा शिपायांनी कदापि केला नसता. दिल्लीचे शिपायी आपल्याला मिळतील ही आधीपासूनच खात्री असल्यामुळे शिपायांनी दिल्लीवर मोर्चा वळविला.

उठाव दडपून टाकण्यात आल्यावर त्याच्यामागचे सूत्रधार कोण याचा छडा लावण्याचा प्रयत्न करण्यात आला. तेव्हाच्या अनेक घटना दूरगामी योजना करण्यात आल्या होत्या असेच निःसंदेहपणे दाखवितात. कोल्हापूरच्या युद्धात पकडलेल्या एका नेत्याने पकडले जात असतानाच पुराव्याचे पत्र फाडून टाकले व खाल्ले. जेकब लिहितो की तोफेच्या तोंडी दिलेला एक योद्धा पहिल्या गोळ्याने मेला नाही तेव्हा "आता तरी नावे सांग, तुला जिते सोडतो" असे मी म्हणालो तेव्हा माझ्याकडे तुच्छतेने पाहून म्हणाला "मी केले ते केले" व नावे न सांगता दुसऱ्या गोळ्याच्या स्वागतास सज्ज झाला. "तोफेच्या तोंडी बांधले असताना दुसऱ्या एकाने एक नाव उच्चारले तेव्हा तेथे हजर असलेला एक सरकारी नोकर ज्याचे नाव उच्चारले गेले त्याला खबर देण्यास तेथून निसटला व तो संशयित पसार झाला." या व अशा शेकडो उदाहरणांवरून उठावाच्या आधी बराच पत्र व्यवहार व कारस्थाने सुरू होती हे स्पष्ट आहे. स्वातंत्र्ययोद्ध्यांना देशभरातील साऱ्या बातम्या अचूक व द्रुतगतीने मिळत हे देखील योजनापद्धतेचे लक्षण आहे.

## पाच लक्ष[७] पौंड

उत्तर प्रदेश सरकारने प्रकाशित केलेल्या Nanasaheb peshava and the Fight for Freedom या श्री. आनंदस्वरूप मिश्र यांच्या पुस्तकात यासंबंधी काही नवीन माहिती वाचण्यात आली. ही माहिती झाल्यावर सत्तावनचे युद्ध हे पूर्वनियोजित होते याबद्दल कुणाच्याही मनात शंका राहण्याचा संभव नाही. सत्तावनच्या निंदकांनी या माहितीची योग्य दखल घेतली नाही; यावरून त्यांचे लेखन सत्यगोपन आणि असत्यसूचन



यांनी कसे भरलेले आहे याचे आणखी एक प्रत्यंतर मिळते.

श्री. मिश्रांच्या म्हणण्याप्रमाणे स्वातंत्र्ययुद्ध दडपून टाकण्यात आल्यानंतर त्याची जी चौकशी करण्यात आली त्यात नानासाहेब पेशव्यावर असा आरोप करण्यात आला की, १८५६ साली इंग्लंडमधील बँकांत त्यांच्या नावे पाच लक्ष पौंड जमा होते. ते त्यांनी हळूहळू काढून घेतले; युद्धाला तोंड लागण्याच्या सुमारास त्यांच्या नावे फक्त तीन हजार पौंड उरले होते. हा आरोप खरा आहे की नाही याबद्दल इंग्लंडमधील बँकांकडून निर्वाळा घेण्यात आला होता की नाही याचा श्री. मिश्र उल्लेख करीत नाहीत. कदाचित् त्यांच्या आधारभूत लेखातच याचा खुलासा नसेल. पण या पुराव्याविरुद्ध सत्तावनचे निंदक जो युक्तिवाद लढवतात त्यावरून नानासाहेबांनी इंग्लंडमधील बँकांतून पैसे काढून घेतले ही केवळ कपोलकल्पना आहे असे निंदकांचे म्हणणे दिसत नाही; त्यांचे म्हणणे केवळ एवढेच की नुसते पैसे काढून घेतले एवढ्यावरून नानासाहेब युद्धाचा व्यूह रचीत होते असे सिद्ध होत नाही. युद्ध होणार असा त्यांचा अंदाज होता व इंग्रज ते युद्ध हरल्यास इंग्लंडच्या बँकेतले आपले पैसे जप्त होतील अशी त्यांना भीती वाटली म्हणून दूरदर्शीपणे त्यांनी पैसे काढून घेतले एवढेच सिद्ध होते.

## लियाकतअलीला पत्र

निंदकांचा हा युक्तिवाद फारच मासलेवाईक आहे. नानासाहेबांचा जर युद्धाच्या कारस्थानाशी काहीच संबंध नव्हता तर तब्बल एक वर्ष आधी त्यांना युद्ध पेटणार हे कसे अंदाजता आले? इंग्रजासारख्या दक्ष व सामर्थ्यशाली राज्यकर्त्यांना प्रत्यक्ष भडका उडेपर्यंत ज्या युद्धाची काहीच कल्पना नव्हती, त्याची वर्षभर आगाऊ कल्पना नानासाहेबांना झाली एवढे ते अचाट भविष्यदर्शी होते काय?

बापाचे पेन्शन मिळण्याची आशा उरली नाही म्हणून नानासाहेबांना बँकेतले हे पैसे खर्चासाठी काढावे लागले असाही तर्क सयुक्तिक नाही. कारण उत्पन्नावाचून राहणारा मनुष्य एका वर्षात पाच लक्ष पौंड खर्चणार नाही, तेच जन्मभर पुरविण्याचा प्रयत्न करील.

बँकेतील पैसे काढण्याचा संबंध नानासाहेबांच्या युद्धाच्या कारस्थानाशीच होता याला पुष्टी देणारे प्रमाण जॉन कये याने संपादलेल्या 'Confidential Records of the East India Company' या पुस्तकाच्या नवव्या खंडात मिळते. या खंडात अलाहाबादमधील क्रांतिकारकांचा पुढारी मौलवी लियाकत अली याला नानासाहेबांनी

लिहिलेले एक पत्र उद्धृत केले आहे, ते पत्र असे :-

स्वराज्याप्रीत्यर्थ देशभर उठाव करण्यासाठी ३१ मे हा दिवस निश्चित करण्यात आला होता. क्रांतीच्या बौद्धिक प्रणेत्यांनी या उठावाचे वेळापत्रक आखले होते. इंग्लंड इतर युरोपीय राष्ट्रांच्या साहाय्याने आपला शेजारी जो चीन त्याच्याशी लढाई करीत आहे. ७ मे रोजी जवळ जवळ चार पंचमांश ब्रिटिश लष्कर चीनकडे कूच करते झाले. गव्हर्नर जनरलने चीनकडे चाललेले ब्रिटिश लष्कर परत भारतात पाठवण्यासाठी मलाया येथील अधिकाऱ्याकडे "त्राहि" म्हणून हाक मारली आहे. आम्ही येथे मूळ वेळापत्रकाला चिकटून राहण्याचे ठरविले आहे. कानपूरला पहिली तोफ ३१ मेला डागली जाईल. त्यानंतर लखनौ, फौजाबाद, वाराणसी व अलाहाबाद येथे उठाव होतील. ईश्वर आमच्या योजना यशस्वी करून फिरंग्यांच्या जोखडातून आम्हाला मुक्त करो.

## अझीमुल्लाची दैनंदिनी

या पत्राच्या पुराव्याविरुद्ध सत्तावनचे निंदक आपला नेहमीचा युक्तिवाद वापरून म्हणतील की हे पत्र बनावट आहे. आपल्या पूर्वग्रहाच्या जे आड येईल ते बनावट वा प्रक्षिप्त आहे असे म्हणणाऱ्याशी वाद करण्यात अर्थ नाही..

पण वरील पत्रावर साहजिकच असा प्रश्न उपस्थित होतो की क्रान्तीचे कारस्थान करणारा मनुष्य कोणतीही सांकेतिक भाषा न वापरता इतके उघड पत्र लिहील काय? नाही लिहिणार हे स्पष्ट आहे. पण हे पत्र मेरठचा उठाव होऊन गेल्यानंतरचे आहे. उठावाने क्रांतीचा गौप्यस्फोट होऊन चुकला होता. त्यामुळे नानासाहेबांचे वरील पत्र इंग्रजांच्या हाती सापडले असते तरी फासे बिघडणार नव्हते. क्रांती यशस्वी होणार याबद्दल नानासाहेबांना पुरा विश्वास होता व ते लवकरच क्रांतियुद्धात उडी घेणार होते. पत्र इंग्रजांच्या हाती लागून नानासाहेबांविरुद्ध त्यांनी काही कारवाई करण्यास सुरुवात केली असती तर ते आव्हान उघड स्वीकारण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे नानासाहेबांना असे उघड पत्र लिहिण्याचे धैर्य झाले. पुढे चरखारी येथे नानासाहेबांना असे उघड लिहिलेल्या पत्रात काहीच आडपडदा नाही. तरीदेखील त्या पत्राच्या अस्सलतेबद्दल शंका घेतली जात नाही. यावरून प्रस्तुत पत्र उघड असल्यामुळे अस्सल नसावे अशी शंका घेण्याचे कारण नाही.

या पत्राला पुष्टी देणारा उल्लेख नानासाहेबांचा हस्तक अझीमुल्ला याच्या दैनंदिनीत



आढळतो. या दैनंदिनीअनुसार बापाचे पेन्शन आपल्याला देण्याचे इंग्रजांनी नाकारले तरी नानासाहेबांनी उघडपणे त्यांच्याशी शत्रुत्व दाखवले नाही. गुप्तपणे त्यांच्याविरुद्ध उठावाची तयारी सुरू केली. या तयारीचा एक भाग म्हणून अझीमुल्लाबरोबर यात्रेचा बहाणा करून वाराणसी, अलाहाबाद, बटेश्वर, गया, जनकपूर, पारसनाथ, जगन्नाथपुरी, पंचवटी, रामेश्वर, द्वारका, नासिक, अबू, उज्जयिनी, मथुरा, बद्रीनाथ आणि कामरूप वगैरे ठिकाणी दौरा केला. या पैकी बऱ्याच ठिकाणी ब्रिटिशांची लष्करी ठाणी होती. या दौऱ्यात खास विश्वासातील लोकांना ३१ मे १८५७ रोजी ब्रिटिशाविरुद्ध देशव्यापी उठाव होईल असे ते सांगत असत.

## हुतात्मा महंमद अल्ली

आपल्या विरुद्ध जाणाऱ्या इतर पुराव्याप्रमाणे अझीमुलाची दैनंदिनी देखील बनावट आहे असे सत्तावनच्या आक्षेपकांचे म्हणणे आहे. ही दैनंदिनी स्वतःला नानासाहेबांचा नातू म्हणविणाऱ्या सूरजप्रताप नावाच्या माणसाजवळ सापडली. ही उर्दू भाषेत असून खुद्द अझीमुल्लाच्या हस्ताक्षरात आहे असे सूरजप्रतापचे म्हणणे आहे. डॉ. ईश्वरीप्रसाद यांनी या दैनंदिनीचा अस्सलपणा सिद्ध होणे जरूर आहे असे गुळमुळीत विधान केले आहे. एकूण ही दैनंदिनी बनावट आहे, असे मानण्यास त्यांच्याजवळ प्रमाण नाही.

सूरजप्रताप हा खरोखरच नानासाहेबांचा नातू होता व त्याच्या जवळची दैनन्दिनी खुद्द अझीमुल्लाच्या हस्ताक्षरातील आहे हे खरे न मानले तरी ती स्वतः सूरजप्रतापने कपोलकल्पित गोष्टी रचून लिहिली वा लिहविली असे मानणे ही दुराग्रहाची परिसीमा होईल. पूर्वजांचे कागदपत्र नष्टप्राय स्थितीत आले म्हणजे त्यांच्या नकला करणे व नष्ट झाल्यास त्यातील मजकूर आहे तसा लिहून ठेवणे हा ते जतन करण्याचा एक मार्ग होता. असे कागदपत्र काटेकोर दृष्ट्या अस्सल नसले तरी त्यातील महितीचे ऐतिहासिक महत्त्व कमी होत नाही.

अझीमुल्लाच्या दैनंदिनीला पुष्टी देणारा पुरावा महंमद अली खानाच्या निवेदनात सापडतो. महंमद अली खान हा उन्नाव येथील ब्रिटिश फौजेच्या छावणीत हेरगिरी करीत असताना पकडला गेला. त्याला फाशीची सजा सुनावण्यात आली. इंग्रज लोक मुसलमानाला फाशी देण्याच्या आधी डुकराचे मास व हिंदूला फाशी देण्याच्या आधी गाईचे मास खाऊ घालीत. पण महंमद अली खानाच्या बाबतीत फोर्ब्स मिचेल नावाच्या

एका सार्जण्टने मध्यस्थी केली म्हणून त्याच्यावर हा जुलूम करण्यात आला नाही. महंमद अली खानाला याबाबतीत बरीच कृतज्ञता वाटली व तो फोर्बस् मिचेलशी मोकळेपणाने बोलू लागला. फाशीच्या आदल्या रात्री त्याने आपला वृत्तांत सांगितला. तो फोर्बस् मिचलने आपल्या आठवणीत लिहून ठेवला आहे. त्यात पुढील महत्त्वाची माहिती आहे.

## निर्णायक पुरावा

"नानासाहेबांची केस मांडण्यास अझीमुल्ला खान जेव्हा इंग्लण्डला गेला तेव्हा मी त्यांच्याबरोबर गेलो. पाच हजार पौंड खर्चूनही आम्हाला नानासाहेबांचे पेन्शन मंजूर करवून घेण्यात यश आले नाही. व आम्ही कॉन्स्टण्टिनोपल मार्गे भारतास परत निघालो. वाटेत क्रीमिया येथे रशियाकडून मार खाल्लेल्या ब्रिटिश फौजांची अवस्था आम्ही पाहिली. कॉन्स्टण्टिनोपल येथे आम्हाला स्वतःस रशियाचे हस्तक म्हणविणारे काही लोक भेटले. ते अझीमुल्लाला म्हणाले की, तुम्ही भारतात बण्ड उभारले तर रशिया त्याला सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे. तेव्हा मी व अझीमुल्लाने कंपनीचे राज्य उलथून टाकण्याची प्रतिज्ञा केली; खुदाच्या कृपेने आम्ही यात यशस्वी झालेलो दिसतो. कारण कंपनी सरकारला मिळालेला चोऱ्या व हडपेगिरीचा परवाना रद्द होणार असे वर्तमानपत्रावरून दिसते. आमचे बलिदान व्यर्थ ठरणार नाही... आमच्या पददलित बांधवांना बरे दिवस येतील... लखनौचे रक्षातट मी उभारलेले आहेत. आमचे शिपाई व गोलंदाज त्यामागे दटून उभे राहतील तर तुमच्या बऱ्याच भाईबंदांना पुनः तुमच्याबरोबर भोजन करण्याची संधी मिळणार नाही."

वरील वृत्तांत निर्णायक आहे. नानासाहेबांनी बँकेतून पैसे काढले, मौलवी लियाकत अलीला पत्र लिहिले, सूरजप्रतापजवळ अझीमुल्लाची अस्सल दैनंदिनी सापडली वगैरे गोष्टीबद्दल शंका घेणारे लोक देखील फोर्बस् मिचेलच्या वृत्तांतबद्दल शंका घेतील असे वाटत नाही. फोर्बस् मिचेलचा वृत्तांत खरा मानला तर पूर्वनिर्दिष्ट शंकनीय गोष्टी देखील खऱ्या मानाव्या लागतात. कारण या वृत्तांताने त्यांना पुष्टी मिळत आहे. नानासाहेबांनी आपली केस लढविण्यास ५००० पौंड खर्चले अर्थात् हे पैसे ब्रिटिश बँकेतून काढले. पुढे अझीमुल्लाने कान्स्टॅन्टिनोपल मधील आपले अनुभव सांगितल्यावर "बंडा" ची पूर्वतयारी सुरू झाली व त्यासाठी बाकीचे पैसे देखील काढले. मौलवी लियाकत अलीला उघड पत्र लिहिले त्यावेळी गोष्टी या थरास आलेल्या होत्या की पत्र इंग्रजांच्या हाती पडूनही विशेष काही बिघडणार नव्हते. अझीमुल्लाच्या दैनंदिनीतील वृत्तांतही या सर्वांशी जुळणाराच आहे.



## इंग्रजी व गायत्री मंत्र

महम्मद अली खानाच्या निवेदनावरून आणखी एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे १८५७ साली भारतीयांची विचारशक्ती कायम होती व ब्रिटिश राज्याचे खरे स्वरूप काय आहे हे त्यांना पुरेपूर कळत होते. अझीमुल्ला व महम्मद अली हे दोघेही इंग्रजी भाषा शिकलेले होते व ती शिकण्यात आपल्या कामास उपयुक्त असलेले एक साधन वापरणे हीच त्यांची दृष्टी होती. भारतात आलेले इंग्रज याच दृष्टीने मराठी, हिंदी व फ़ारसी शिकत. पुढे इंग्रजी शिक्षणाची महती इतकी वाढली की इंग्रजीची साधनरूपता नष्ट होऊन तीच उपास्यदेवता होऊन बसली. गायत्री मंत्राप्रमाणे ए. बी. सी. चा जप केल्याने बुद्धी प्रगल्भ होते अशी अंधश्रद्धा गोपाळराव देशमुखापासून तो चिंतामणराव देशमुखापर्यंत दिसून येते. आंग्लशिक्षितांच्या या वृत्तीमुळे ब्रिटिश राज्याच्या खऱ्या स्वरूपाचे आकलन करण्याची क्षमताच लोकहितवादीप्रमाणे त्यांच्यापैकी बहुतेकांतून नष्ट झाली. महम्मद अली व अझीमुल्ला यांना या हतप्रज्ञतेने पछाडले नव्हते. इंग्रजी राज्य म्हणजे चोऱ्या व हडपेगिरीचा ताम्रपट असे महम्मद अलीने त्याचे यथार्थ वर्णन केले आहे.

■■■

# प्रकरण चार | भूतो न भविष्यति असा जनतेचा उठाव

## स्वार्थ आणि परार्थ

सत्तावनच्या युद्धावरील तिसरा आक्षेप म्हणजे युद्धाचे पुढारी स्वार्थप्रेरित होते. युद्ध यशस्वी झाले असते तर बहादूरशहा, नानासाहेब पेशवे, राणी लक्ष्मीबाई व राजा कुमारसिंग यांना आपले गेलेले राज्य परत मिळाले असते. तात्या टोपे हा पेशव्यांचा नोकर होता व त्याने केलेल्या लढाया केवळ पेशव्यांची आज्ञा पालन करण्यासाठी केल्या. या प्रकारे सत्तावनच्या निंदकांनी युद्धाचे सारेच पुढारी निकालात काढले आहेत.

अशा तऱ्हेच्या वादपद्धतीला उत्तर द्यायचे म्हणजे तीच आक्षेपकांच्या गळी उतरवायची यापेक्षा दुसरा मार्ग नाही. जे राजे वा राज्यकर्ते देशावर आलेल्या परचक्राला तोंड देतात ते सर्वच वरील पद्धतीने निकालात निघू शकतात. "पाक व चीन यांनी भारतावर आक्रमण केले तेव्हा जे भारतीय सैनिक त्यांच्याविरुद्ध लढले ते स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी लढले



नाहीत. कारण, तात्या टोपेप्रमाणे ते केवळ नोकरी बजावीत होते. त्यांचा स्वार्थ त्यात गुंतलेला होता. स्वतंत्र भारताचे राज्यकर्ते देखील, परचक्राला तोंड देण्यात त्यांचा स्वार्थ गुंतला होता, म्हणून स्वातंत्र्यरक्षणासाठी लढले असे म्हणता येत नाही. राणा प्रतापने अकबराशी जो चिरस्मरणीय लढा दिला तोही स्वतःचे राज्य वाचविण्यासाठी म्हणजे स्वार्थसाधनाव्यक्तिरिक्त या लढ्यात उदात्त व स्फूर्तिदायक असे काही नव्हते. छत्रपती शिवाजी महाराजांनी मोगली आक्रमणाला जे तोंड दिले व पुढे त्यांच्या वंशजांनी खुद्द औरंगजेबाच्या आक्रमणाशी जी पंचवीस वर्षे अश्रुतपूर्व अशी झुंज दिली तिचे स्वरूप स्वतःचे राज्य वाचविणे या स्वार्थापुरतेच मर्यादित होते!" आम्हा नादान भारतीयांचा इतिहास जाऊ द्या. निन्दकांचे दैवत जे इंग्रज त्यांच्या एलिझाबेथ राणीने स्पॅनिश आरमाराचा धुव्वा उडविला ही एक इंग्रजी राष्ट्राची वीरगाथा समजली जाते. पण स्पॅनिश आक्रमण यशस्वी झाले असते तर एलिझाबेथचे राज्य गेले असते म्हणून ती स्वार्थासाठी लढली, त्यात राष्ट्रीय वीरगाथा ती कसली? अशी भूमिका निन्दक घ्यायला तयार असतील तर सत्तावनच्या पुढाऱ्यावरील त्यांचे आक्षेप निदान सुसंगतीच्या कसोटीला तरी उतरतील.

येथे नीतिशास्त्राचा एक महत्त्वाचा प्रश्न उद्भवतो. एखादी कृति केवळ स्वार्थ साधक आहे म्हणून हीन ठरते व एखादी केवळ निःस्वार्थ आहे म्हणून उदात्त ठरते काय? याचे उत्तर निःसन्दिग्धपणे नाही असे आहे. शेक्सपीअर, न्यूटन व तानसेन या प्रतिभाशाली पुरुषांनी कोणता त्याग केला? त्याग तर सोडाच, उलट पैसा, राजमान्यता, लोकमान्यता वगैरे जीवनात ज्या ज्या प्राप्तव्य गोष्टी आहेत त्या त्यांच्या पायाशी लोळण घेत होत्या. पण केवळ एवढ्याच कारणासाठी त्यांचे कार्य महनीय नव्हते असे म्हणता येईल काय? उलट रुचकर अन्नाचे सुख लागू नये म्हणून पालापाचोळा खाणारे, काट्यावर निजणारे, नाहक डोळे फोडून घेणारे व समाजहितासाठी काहीच न करणारे अतीव त्याग करीत असतात एवढ्याच कारणासाठी त्यांचे वर्तन रोगट नसून उदात्त असते असे म्हणणे समर्थनीय ठरेल काय?

दुसरे असे की सत्तावनच्या निन्दकांच्या मते त्या युद्धाची मूळ प्रेरणा शिपायांची होती, वर-उल्लेखिलेल्या पुढाऱ्यांची नव्हतीच. हे जर खरे असेल तर पुढाऱ्यांच्या हेतूंचा विचार करण्यापेक्षा शिपायांच्या हेतूंचा विचार करण्याने सत्तावनच्या युद्धाच्या स्वरूपावर प्रकाश पडण्याचा संभव अधिक आहे. पण शिपाई स्वार्थाने प्रेरित झालेले होते असे सत्तावनचा कोणताही निन्दक म्हणत नाही. शिपाई धर्मरक्षणासाठी लढले हे त्यांनाही

मान्य आहे. अर्थात सत्तावनच्या युद्धाची आदिप्रेरणा स्वार्थसाधना ही नसून धर्मरक्षण ही होती, हे सत्तावनच्या इरसाल निन्दकांना देखील मान्य करणे भाग आहे.

## राजेरजवाडे, शिपाई व जनता

चवथा आक्षेप : सत्तावनचे युद्ध हे राजेरजवाडे व शिपायांचे युद्ध होते, त्यात जनतेने भाग घेतला नाही. या आक्षेपात राजेरजवाडे व शिपाई हे जनतेतले वर्ग नाहीत, ते आकाशातून पडतात व इतर जनतेशी काहीही संबंध न ठेवता सागरातील एखाद्या बेटाप्रमाणे विभक्त जीवन जगतात हा गार्भितार्थ आहे. राजेरजवाड्यांच्या बाबतीत हे मत काही अंशी ब्रिटिश प्रचार व काही अंशी त्याच्या जोडीला मार्क्सच्या भाकडकथा यातून निर्माण झाले आहे. १८५७ साली राजेरजवाडे हेच जनतेचे राजकीय पुढारी होते. बिहारात मातीच्या भांड्यात अन्न खाणार नाही म्हणून कैदी बण्ड करून उठले तेव्हा त्यांची समजूत काढण्यासाठी इंग्रजांना राजा कुमारसिंगाची मनधरणी करण्याची पाळी आली होती. कुमारसिंग बण्डाची तयारी करीत आहे असा सुगावा लागूनदेखील त्याला उघडपणे कैद करण्याचे धैर्य इंग्रजांना झाले नाही. कारण असे काही केल्यास लोक बण्ड करतील असे त्यांना वाटत होते. कुमारसिंग इतका लोकप्रिय होता. पाटण्याच्या मॅजिस्ट्रेटला पाठविलेल्या हुकमात सरकारने स्पष्टपणेच याची कबुली दिली आहे. झांशीची राणी आपल्या प्रजेत किती लोकप्रिय होती याचे वर्णन पुढे करण्यात येईलच. औंधच्या नबाबांच्या लोकप्रियतेमुळे सारा औंध प्रान्त इंग्रजाविरुद्ध उठला होता. आजदेखील राजामहाराजांना स्वतःच्या मुलखात निवडणुकीत हरविणे फार कठीण आहे. म्हणून राजेरजवाड्यांचे बण्ड हे तस्मादेव जनतेचे बण्ड ठरते.

राजेरजवाड्यांप्रमाणेच शिपायांचा वर्ग हा देखील जनतेहून स्वतंत्र असा वर्ग नाही. एतद्देशीय शिपायांच्या मदतीने राज्य करणाऱ्या परकीय आक्रमकांनी ही कल्पना रूढ केली आहे. इंग्लण्डचा टॉमी हा इंग्रजी जनतेचा अविभाज्य घटक आहे, टॉमी ही इंग्रजी जनतेहून एक स्वतन्त्र जात आहे असे इंग्लंडमध्ये कुणी म्हणू जाईल तर त्याचे हसे होईल. पण शिपायांचा जनतेशी जेवढा संपर्क राहील तेवढाच परकीय सरकारला अधिक धोका असतो म्हणून या दोहात अनुल्लंघ्य भिंती निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. शिपाई व जनता असा भेद करणारे सत्तावनचे निन्दक कोणाची भाषा बोलत आहेत, हे यावरून स्पष्ट आहे.

शिपायाला आई, बाप, बायका, मुले, जात व मित्रपरिवार असतो. पोटासाठी



परकीय सरकारची त्याने नोकरी केली तरी त्याची ही बन्धने तुटत नाहीत. शिपायांच्या आप्तेष्टांमध्ये परकीय सरकारबद्दल द्वेष धुमसत नसता तर नुसता शिपायात तो पसरणे शक्य झाले नसते. रेव्हरंड केनेडी लिहितो, "जे शिपाई आम्हाला, निष्ठावान राहिले त्यांना इतर शिपायांनी बहिष्कृत केले. एवढेच नव्हे तर त्यांना जातीबाहेर टाकण्यात आले. काही लोकांना तर त्यांच्या घराची दारेदेखील बन्द झाली. त्यांचा चोहोकडे धिःकार होई व जिवाला देखील अपाय होण्याची भीती असे."

## जनतेचे पुढारीही तेच

मेरठच्या शिपायांना बेड्या ठोकण्यात आल्या तेव्हा इतर शिपायांना बाजारात फिरणे कठीण झाले. जाता येता त्यांची छी थू होऊ लागली. "तुमच्या बांधवांना इंग्रजांनी छळले अन् तुम्ही हातात बांगड्या भरून स्वस्थ बसला" म्हणून वेश्या देखील हिणवू लागल्या. मेरठचा उठाव अकाली होण्याचे हे एक कारण होते. झांशी पडली तेव्हा इंग्रज शिपाई झांशीत शिरून भयंकर जाळपोळ व कत्तल करू लागले. अशा परिस्थितीत देखील "झांशीच्या राणीने उगीचच इंग्रजाशी वैर काढून आमच्यावर हा दुर्धर प्रसंग आणला," अशी आपल्या राणीविरुद्ध तक्रार एकाही नागरिकाच्या तोंडून ऐकू आली नाही, असे विष्णुभट गोडसे याच्या वृत्तान्तावरून दिसते. तात्या टोपे पराभव झाल्यावर महिनोगणती देशभर फिरत होता, त्याला कुठेही लोकाश्रय मिळण्यास अडचण पडली नाही. साऱ्या भारतात नेहमी "वीरोत्तमा" लक्ष्मीबाई, "पाताळयन्त्री" नाना, "गरुडभरारी" तात्या टोपे व "ऐंशीतला तरणाबांड" राजा कुमारसिंग यांचे पोवाडे निनादत राहिले, त्यांचा पराभव करणाऱ्या रोज, कॅपवेल प्रभृतींचे पोवाडे भारतीय जनतेने कधी गायिले नाहीत.

सत्तावनच्या उठावाला जनतेची सहानुभूती नव्हती या आक्षेपाच्या समर्थनासाठी मंडलिकासारख्याचे उद्‌गार उद्‌धृत करण्यात येतात. तसेच हा उठाव फसला त्या अर्थी त्याला जनतेची सहानुभूती नसली पाहिजे असेही अनुमान काढण्यात येते. उठाव फसणे हे जर जनतेची सहानुभूती नसण्याचे प्रमाण असेल तर सत्तावनप्रमाणे बेचाळीसचा उठावदेखील फसला म्हणून त्यालाही जनतेची सहानुभूती नव्हती असे म्हणावे लागेल.

मंडलिकासारख्यांचे उद्‌गार प्रातिनिधिक समजण्याचे कारण नाही. ब्रिटिश राज्य आल्यावर इंग्रजी शिकून सरकारी नोकऱ्या व वकिली वगैरे सरकारसंबंधी व्यवसाय करणाऱ्या लोकांचा जो वर्ग उत्पन्न झाला त्याचा स्वार्थ ब्रिटिश राज्याशी निगडित होता. हा वर्ग

परकीयांचा बगलबच्चा होता, जनतेचा प्रतिनिधी नव्हता. परकीयांचे बगलबच्चे म्हणून इंग्रजी शिकलेल्या बंगाली बाबूंच्यावर जनता हल्ले करी, सत्तावनच्या आंग्लशिक्षिताप्रमाणेच बेचाळीस साली देखील क्रांतीच्या उठावानंतर एकाच महिन्यात काही लोकांनी क्रांतीच्या विरुद्ध उठाव करून गांधी टोप्या जाळण्याचा उपक्रम सुरू केला होता. युद्धकालात नोकऱ्या दिल्यामुळे ब्रिटिश सरकारबद्दल कृतज्ञ झालेले लोक या उठावाच्या मागे होते.

## मजुमदारांचा वदतोव्याघात

उठावाला जनतेची सहानुभूती नव्हती असा सतत उद्घोष करणाऱ्या मजुमदारांच्या लिखाणातच जनतेच्या उठावाचे पदोपदी उल्लेख आहेत. उदाहरणार्थ : A series of mutinies of sepoys, followed in many cases by the revolt of the civil population, convulsed nearly the whole of Northern India... The mutinies in Delhi and some other regions, notably Awadh, Rohilkhand and west Bihar, soon merged themselves into the revolts of the civil populations.'' म्हणजे जवळ जवळ सर्वच उत्तर भारतात शिपायाबरोबरच जनतेचेही उठाव झाले. जनतेच्या उठावाचे सगळ्यात रौद्र स्वरूप औंध प्रांतात दिसले. चार्ल्स बॉल लिहितो- ''या प्रांतात स्वातंत्र्ययोद्ध्यांना शिधा घेऊन फिरावे लागत नसे कारण त्यांना जनताच खायला घाली, त्यांना आपले सामान उघड्यावर ठेवून जाता येत असे कारण स्वतंत्रतासैनिकांचे सामान चोरण्याचा अधमपणा कोणीही करीत नव्हते. शत्रू कोठे आहे याची बित्तंबातमी त्यांना लोक पुरवीत. ब्रिटिश शिबिरातले सारे भारतीय हे स्वातंत्र्ययोद्ध्यांचेच हस्तक होते. ते त्यांना सारी माहिती पुरवीत.''

औंध प्रांताइतकीच नव्हे तर फार मोठ्या प्रमाणात इतर प्रांतातही अशीच परिस्थिती होती. ``All classess of people in India were thoroughly discontented and disaffected against the British" अशी कबुली मजुमदारच देतात. रे. केनेडी लिहितो, एक विद्वान ब्राह्मण मला म्हणाला. ''भारतातून तुमचे उच्चाटन व्हावे व वाडवडिलांच्या संस्कृतीअनुसार आम्ही जगावे ही माझी सर्वश्रेष्ठ इच्छा आहे.'' अलाहाबाद जिल्ह्यातील स्थानिक मॅजिस्ट्रेट लिहितो ''येथले सर्व जमीनदार व बहुतेक मुसलमान बंड करून उठले आहेत. अलाहाबादचे ब्राह्मण या उठावाचे पुढारी आहेत.''

## शेतकरी व व्यापारी

ब्रिटिश ''शांततेने'' सर्वात जास्त गांजलेला वर्ग म्हणजे शेतकऱ्यांचा. ब्रिटिशांची



सारापद्धती जीवघेणी होती. स्थूल उत्पन्नाच्या ५५ टक्केपर्यंत सारा मागितला जाई व उत्पन्न बहुधा होते त्याच्या सवाईने अंदाजले जाई. पूर्वीच्या पद्धतीत सारा पिकाच्या रूपात घेतला जाई व बाकी कितीही थकली तरी शेतकऱ्याचे शेत जप्त करण्यात येत नसे. पण ब्रिटिश पद्धतीत सारा थकणे व शेतीवाडी जप्त होणे हा शेतकऱ्यांचा नित्याचा भोग होऊन बसला. एडवर्ड्स नावाच्या लेखकाने एका वृद्ध शेतकऱ्याची हकीकत नमूद केली आहे. हा शेतकरी म्हणतो, ''मी फक्त अर्ज करण्यावरच हजार रुपये खर्च केले आहेत. माझी अनेक शेते जप्तीत निघाली. वाडवडिलांनी जोडलेले जडजवाहीर विक्रीस काढून साऱ्याची भरपाई करावी लागते. पूर्ण बरबांदीपासून या बलव्यानेच (बंडानेच) मला वाचविले.''

सरंजामशाहीमध्ये शेतकऱ्यांची स्थिती हालाची होते असे म्हणण्याची हल्ली फॅशन आहे. पण एडवर्ड्सला भेटलेल्या शेतकऱ्याच्या तोंडून वस्तुस्थिती वेगळीच असल्याचे कळून येते. जमीनदार वगैरे ''सरंजामशाही'' वर्ग हा कुळांना आपला त्राता वाटत असे. अडचणीच्या काळात जमीनदारच कुळांच्या मदतीला येत. म्हणून पुष्कळ शेतकऱ्यांनी आपल्या जमीनदारांच्या वतीने शस्त्र उपसले.

दिल्लीच्या नागरिकांनी एक पत्रक काढले होते. त्यात म्हटले आहे :-

''इंग्रज लोक २०० च्या जागी ३०० सारा मागतात. त्यानी चौकीदारी कर दसपट वाढविला आहे. विद्वान व प्रतिष्ठित लोक बेकार झाले आहेत. लक्षावधी लोक भिकेस लागले आहेत. सार्वजनिक रस्त्यावरून पदोपदी पैसे द्यावे लागतात.''

शेतकऱ्याप्रमाणेच व्यापाऱ्यांचा वर्गही असंतोषाने जळत होता. अझमगड मधील स्वातंत्र्यवीरांनी एक पत्रक काढले. त्यात व्यापारी वर्गाला उद्देशून म्हटले आहे ''इंग्रज लोकांनी तीळ, कापड, अफू वगैरे किफायतशीर मालाचा व्यापार आपल्या हाती ठेवला आहे, व तुमच्या हाती कवड्यांचा व्यापार दिला आहे.'' सरकारी नोकरांना उद्देशून हे पत्रक म्हणते ''साऱ्या बड्या हुद्द्यावर इंग्रज आहेत. तुम्ही नुसते सईस व चपराशी आहात. सैन्यात भारतीयासाठी सर्वात मोठा हुद्दा म्हणजे ६०, ७० रुपयाची सुभेदारी व असैनिक नोकऱ्यात ५०० रुपयाची सदर अमीनी.''

विद्वानांच्या बेकारीचा दिल्लीच्या पत्रकात उल्लेख आहे. अझमगडच्या पत्रकात इतर वर्गाच्या बेकारीचा उल्लेख आहे. बिहारात निघालेल्या एका पत्रकात देखील सरकारी नोकरीसाठी इंग्रजीची सक्ती करण्यात येते अशी तक्रार आहे. ''ज्ञान संस्कृत व फारशी भाषांच्या द्वाराही मिळविता येते. त्यासाठी इंग्रजीचे प्रस्थ काय म्हणून?'' असा या पत्रात

सवाल विचारला आहे. सरकारी नोकऱ्या, ख्रिस्ती धर्म व इंग्रजी भाषा यांच्या प्रचाराचे साधन म्हणून इंग्रजांनी राबविल्या याबद्दल जनतेत तीव्र असंतोष पसरला होता.

### पडलो तरी नाक वर

सहाराणपूर विभागात २२ जून रोजी रॉबर्ट्सन नावाचा मॅजिस्ट्रेट बंडखोर खेड्यांना दडपून टाकण्यात निघाला तेव्हा ढोलकी वाजवून हजारो खेडूत लढण्यास सिद्ध असलेले त्याला दिसून आले.

रेड पॅम्पलेटमध्ये म्हटले आहे की वाराणसीमध्ये बंड झाल्याबरोबर खेड्यापाड्यातली एकजात जनता बंड करून उठली. आसपासच्या प्रदेशातील ठाण्याशी असलेली दळणवळणाची साधने तोडण्यात आली.

रोहिलखंडात खानबहादूर खानाने ४०,००० ची नवी फौज उभारली. ही नागरिकांची फौज होती, इंग्रजांच्या नोकरीतील शिपायांची फौज नव्हती. झाशीमध्ये बंड करून उठलेले शिपाई तेथून दिल्लीस गेले. झाशीची राणी इंग्रजांशी ज्या सैन्याच्या साहाय्याने लढली. ते तिने स्वतः उभारलेले होते. नानासाहेब पेशव्यांचा पहिला उठाव बंड करून उठलेल्या शिपायांच्या मदतीने झाला असला तरी त्यांनी लवकरच इंग्रजांच्या तावडीतून मुक्त केलेल्या प्रदेशावर आपले सुरळीत राज्य स्थापन केले व राज्यव्यवस्थेच्या इतर उपक्रमाबरोबरच सैन्यभरतीचा उपक्रम देखील सुरू केला. पुढे तात्या टोपे दहा महिने उत्तर हिंदुस्थानात वावटळीसारखा फिरत होता. तेव्हा त्याने नवी सैन्ये उभारली. त्यांचा भरणा पुष्कळसा जनतेतून होत होता.

यावर मजुमदारांचे म्हणणे असे की जसे इंग्रजांच्या सैन्यात पगारासाठी शिपाई भरती होत तसेच स्वातंत्र्ययोद्ध्यांच्या सैन्यात देखील होत! एकूण इंग्रजांच्या पगारी शिपायांनी इंग्रजांच्या विरुद्ध बंड केले तर ते शिपायांचे बंड! उलट एतद्देशीय नेत्यांनी नागरिकांचे सैन्य उभारले व हे सैन्य इंग्रजांशी लढले तरी या सैनिकांना पगार मिळत होता म्हणून तेही शिपायांचे बंडच! अमेरिकेचा स्वातंत्र्ययोद्धा जॉर्ज वॉशिंग्टन याच्या स्वातंत्र्यसैनिकांना पगार मिळत नसे, अशी मजुमदारांची समजूत आहे काय?

सर्वत्र जनतेचे उठाव झाले असे कबूल करून सपशेल पालथे पडल्यावर मजुमदारांना आपल्या निंदापुराणाची आठवण झाली. ''जनतेने जर सर्वत्र उठाव केले तर 'शिपायांचे बंड' या आपल्या आवडत्या शब्दप्रयोगाचे काय?'' तेव्हा आपली मुजोरी कायम



ठेवण्यासाठी ते म्हणतात, ''हे उठाव लूटमारीच्या स्वरूपाचे होते.'' जनतेने केलेला कोणता उठाव लूटमारीचे स्वरूप धारण करीत नाही? ४२ सालच्या उठावात लूटमार झाली नाही काय? फ्रेंच राज्यक्रांती हा निवडणुकीनंतर सरकार बदलण्याचा शांततापूर्ण प्रकार होता काय?

### न भूतो न भविष्यति

सारांश, या स्वातंत्र्ययुद्धात राजेरजवाड्यापासून तो शेतकरी, व्यापारी, शिपाईगिरी करणारे ब्राह्मण, टोळीवाले सन्ताळ व भिल्ल, खोदकाम करणारे मजूर, खेड्यांची रखवाली करणारे पासी वगैरे समाजाच्या उच्चतम व नीचतम वर्गातील सारे लोक सामील होते. परराज्याविषयी एवढा, समर्थ व सार्वत्रिक द्वेष सत्तावनपूर्वी व नंतर कधीही दिसून आला नाही. त्यामुळे सत्तावनच्या सङ्ग्रामाला 'न भूतो न भविष्यति' असे म्हणायला हरकत नाही. २५ मे १८५९ चा टाइम्स लिहितो, ''या बंडामुळे भारताचे दूरदूरचे रहिवासी एकत्र आले. नेपाळपासून गुजरातच्या सीमेपर्यन्त व राजपुतान्याच्या वाळवंटापासून तो निझामच्या प्रदेशापर्यंत स्वातंत्र्ययोद्ध्यांचा संचार होत होता. त्यामुळे त्यांच्या लढ्याला राष्ट्रीय स्वरूप आले. क्षुद्र राज्यांचे क्षुद्र स्वार्थ, एकमेकांच्या चालीरीतीविषयी कोत्या भावना, या सर्व मागे पडल्या व या मोठ्या अखिल भारतीय घटनेकडे सर्वांचे लक्ष वेधले. बंडाचा बीमोड करण्याच्या आमच्या प्रयत्नांनी भारताचे राष्ट्रीयत्व जागृत झाले आहे. ते भविष्यकाळात अधिक प्रखर प्रतिकार केल्याशिवाय रहाणार नाही.''

म्हणजे सत्तावनच्या वीरांनी पेटविलेला अग्नी ते युद्ध फसले तरी ब्रिटिशांना पूर्णपणे विझविता आला नाही. परसत्तेचा ग्रास करू शकणाऱ्या ठिणग्या तो सर्वत्र पेरून गेला!!

यावरून जनतेची प्रेरणा व स्वातंत्र्ययुद्ध याबद्दल आणखी एक महत्त्वाचा मुद्दा सूचित होतो. तो म्हणजे जनतेची प्रेरणा हे जसे स्वातंत्र्ययुद्धाचे कारण असू शकते तशीच जनतेची राजकीय जागृती हे त्याचे कार्य देखील असू शकते. टाइम्सचा लेख सत्तावन पर्वाच्या या स्वरूपाकडे राज्यकर्त्यांचे लक्ष वेधीत आहे. लो. टिळकांना भारतीय असंतोषाचे जनक म्हणतात. त्यातील मर्म हेच होय. जनता पारतंत्र्यातच संतोष मानीत असली तर तिचा तो संतोष नाहीसा करणे हादेखील एक स्वातंत्र्याच्या चळवळीचा उद्देश असतो. सत्तावनचे युद्ध हा जनतेच्या सार्वत्रिक असंतोषाचा भडका होता हे वर दाखविलेच आहे. सत्तावनच्या युद्धाने पुढील स्वातंत्र्याच्या चळवळींना स्फूर्ती मिळाली हे मजुमदारांसारख्या निन्दकांनाही

नाकारता आले नाही. पारतंत्र्यावर शेवटचा प्रहार ज्या आझाद हिंद फौजेने केला ती राणी लक्ष्मीबाईंचा जयघोष करीत होती. ही घटना ती वीरांगना ग्वाल्हेरच्या रणांगणावर पडली असली तरी तिच्या रक्तातून पारतंत्र्याचा होम करणारा वैश्वानर पुढे निर्माण झाला हेच सिद्ध करीत आहे.

फॉरेस्टने या स्वातंत्र्ययुद्धाच्या एका पैलूवर प्रकाश टाकला आहे. तो लिहितो, "या बंडाचा सर्वात मोठा धडा हा की ब्राह्मण व शूद्र, हिंदू व मुसलमान, या आपाततः दोन ध्रुवासारख्या वाटणाऱ्या लोकांची परकीयांविरुद्ध एकजूट होऊ शकते. या देशात वेगवेगळे धर्म नान्दत असल्यामुळे परसत्तेला धोका नाही या भ्रमात परसत्तेने राहू नये. या देशातले नागरिक अनेकविध असले तरी एकमेकांच्या चालीरीतीबद्दल त्यांना आदर आहे व ते परस्परांच्या जीवनात सहभागी होतात."

भारताला ब्रिटिशांनी राष्ट्र बनविले, तत्पूर्वी तो नुसता खंड होता अशी वटवट आंग्लशिक्षित भलेही करोत. इंग्रजांना भारताच्या एकराष्ट्रीयत्वाचा प्रत्यय सत्तावनच्या संग्रामानेच आणून दिला होता.

## दक्षिण भारताचा कार्यभाग

सत्तावनच्या संग्रामामध्ये केवळ उत्तर भारताने भाग घेतला, दक्षिण भारताचा त्यात काही कार्यभाग नव्हता अशी आजपर्यन्त समजूत होती. पण आता व्ही. डी. दिवेकर यांनी परिश्रमपूर्वक तत्कालीन कागदपत्रे तपासून "साउथ इण्डिया इन १८५७" या नावाचा एक ग्रन्थच खास या विषयावर लिहिला आहे. हा ग्रन्थ वाचल्यावर कुणी या संग्रामात दक्षिण भारताला काही स्वारस्य नव्हते, असे म्हणण्यास धजावणार नाही.

पुस्तकाच्या प्रारम्भीच सत्तावनच्या संग्रामाचा दक्षिणेत कुठे कुठे उद्रेक झाला हे दाखविणारा नकाशा दिला आहे. त्यात महाराष्ट्र, कर्नाटक, आन्ध्र, तामिळनाडू व केरळ या प्रान्तातील जवळ जवळ सारीच शहरे दाखविली आहेत. ही शहरे पुढीलप्रमाणे आहेत. (१) सातारा (२) नरखेड (३) हैदराबाद, म्हैसूर (४) गंजम (५) चिंगलपुट (६) मद्रास (७) विशाखापट्टनम् (८) गोवा (पोर्तुगीजांच्या विरुद्ध संघर्ष) (९) पुणे (१०) विजापूर (११) बेळगाव (१२) कुड्डाप्पा कुनूर्ल वेल्लोर (१३) पान्देचरी, कुड्डलोर, थंजावूर, उत्तर अर्काट, सलेम मदुराई (१४) कोइम्बतूर (१५) मलबार, कालीकत, क्विलॉन (१६) औरंगाबाद (१७) हैदराबाद (१८) राजमुन्द्री मच्छलीपत्तन, गुन्तूर, (१९) बंगलोर (२०)



सावन्तवाडी (२१) कारवार (२२) कोल्हापुर (२३) मुम्बई (२४) हलगली, कर्नाटक (२५) सिरपूर, अम्बापानी, करगुण्ड-खानदेश (२६) नासिक अहमदनगर (२७) सोलापूर-मालखेड (२८) नरगुण्ड (२९) कोप्पल, (३०) बीड (३१) भालकी.

उत्तर भारतात कलकत्त्यापासून पंजाबपर्यन्त संग्रामाच्या ज्वाला भडकल्या होत्या. त्याच्या जोडीला दक्षिण भारतातील ज्वालांचे हे चित्र ठेवले की हा संग्राम अक्षरशः अखिल भारतीय होता याचे प्रत्यन्तर मिळेल. भारतात यापूर्वी व नंतर झालेले कोणतेही युद्ध एवढ्या सार्वत्रिकरीत्या लढले गेले नव्हते. केवळ युद्धच नव्हे, तर पुढे झालेली कोणतीही राजकीय चळवळ या युद्धाच्या तुलनेने अत्यन्त सीमित प्रदेशावर झाली हे कुणालाही नाकबूल करता येणार नाही.

केवळ प्रदेशाच्या दृष्टीनेच नव्हे, तर जनतेच्या दृष्टीने देखील उत्तर भारताप्रमाणेच दक्षिण भारतातील हे युद्ध अखिल जनतेचे होते. मासेमार, पठाण, रोहिले सरदार, जहागीरदार व वर्तमानपत्रे चालविणारे बुद्धिजीवी या सर्वांचा समावेश स्वातंत्र्ययोद्ध्यांत झाला होता, हे दिवेकरांच्या पुस्तकावरून स्पष्ट होते.

दिवेकरांच्या पुस्तकावरून दुसरी एक गोष्ट स्पष्ट होते. ती म्हणजे १८५७ साली सुरू झालेला हा संग्राम १८६२ सालापर्यन्त चालू होता. म्हणजे स्थळाच्या दृष्टीने त्याची व्याप्ति जशी विस्तृत होती तशीच कालाच्या दृष्टीने देखील ती प्रदीर्घ होती. पुढे झालेली कोणतीच चळवळ एवढ्या दीर्घकालपर्यंत चालली नव्हती.

एवढ्या विस्तृत क्षेत्रावर दक्षिण भारतात उत्थान होऊनही ते उत्तर भारतातील संग्रामाप्रमाणे सर्वविश्रुत का राहिले नाही? याचेही कारण दिवेकरांच्या पुस्तकावरून कळून येते. ही सारी उत्थाने मेरठला १० मे रोजी झालेल्या उत्थानाच्या नंतर झाली. मेरठच्या उत्थानाने जसे इंग्रजांना बेसावध पकडले तसे नंतर झालेल्या उत्थानांना करता आले नाही. कारण, अकाली झालेल्या त्या उत्थानाने ब्रिटिश लोक सावध झाले होते. याच वेळी तारेने संदेश देणारी यंत्रणा त्यांना उपलब्ध झाली. क्रांतिकारकांना या यंत्रणेची कल्पना नव्हती. त्यामुळे प्रत्यक्ष उठाव होण्याच्या आधीच इंग्रजांना त्याची बातमी लागून त्यांच्या देशभर पसरलेल्या सरकारला ती सर्वत्र कळत असे.

सुरुवातीला झालेल्या उठावात पहिले सात महिने फक्त विजयाची आशा वाटेल अशी परिस्थिती होती. पण दिल्ली पडल्यावर सारखे पराजय होत गेले व त्यामुळे निरुत्साहित होऊन पुष्कळशा लोकांनी उठाव केले नाहीत. ज्यांचा उत्साह अशा पराभवाने देखील

मावळला नाही, त्यांनी उठाव केले, पण ते प्रबल होण्याच्या आधीच दडपण्यात आल्यामुळे उत्तरेसारखी मोठमोठी युद्धे दक्षिणेत होऊ शकली नाहीत. पण यावरून या उठावांचे प्रमाण उत्तरेपेक्षा कमी होते, असे अनुमान काढणे बरोबर होणार नाही. ज्यांना विद्रोहाबद्दल सजा झाली त्यांची संख्या उत्तर भारतातील दण्डितांइतकीच मोठी आहे. यावरून या उठावाचे प्रमाण लक्षात येईल.

२८ जुलै १८५७ मध्ये इंग्रजांच्या हेरांनी एका कारस्थानाचा छडा लावला. या कारस्थानाची सूत्रे बेळगाव, म्हैसूर, कुर्नूल व मद्रासपर्यंत पसरलेली होती. जून १८५७ मध्ये सशस्त्र रोहिल्यांच्या काही तुकड्या ''आम्ही नानासाहेब पेशव्यांचे अनुयायी आहोत'' असे घोषित करून निझामाच्या राज्यातून कुर्नूल व कडाप्पामध्ये घुसल्या. नानासाहेबांनी चार जूनला कानपूरच्या संग्रामाचे रणशिंग फुंकले व पंधरा जूनच्या सुमारास सुदूर दक्षिणेमध्ये नानासाहेबांचा जयघोष करीत एक मुसलमान सेना प्रकट झाली. यावरून नानासाहेब केवळ कानपूरच्या शिपायांनी जबरदस्ती केल्यामुळे संग्रामात सामील झाले, त्यांच्या मनात संग्रामाची कोणतीही पूर्वयोजना नव्हती हा मजुमदारांचा आरोप निराधार ठरतो. नानासाहेब ४ जूनपासून कानपूरच्या संग्रामात मग्न असता सुदूर हैदराबादेत त्यांनी मुसलमानांची फौज उभारली असणे कितपत शक्य आहे? ही नानासाहेबांनी उभारलेली फौज नसून रोहिले केवळ स्वयंस्फूर्तीने उठाव करते झाले असे समजावे, तर दिल्लीच्या मुघल बादशहाचा जयघोष करायचे सोडून त्यांनी नानासाहेब पेशव्यांचा जयघोष का केला? निझामाच्या राज्यात पेशव्यांचा जयघोष करण्याऐवजी मुघल बादशहाचा जयघोष केल्याने निझामाचे साहाय्य मिळण्याचा जास्त सम्भव होता. तेव्हा रोहिल्यांचा हा उठाव अकस्मात झालेला नसून नानासाहेबांच्या योजनेचाच भाग होता, असे अनुमान सरळ आहे. जून ५७ मध्ये नानासाहेब व बंगाल आर्मीतले बण्ड करून उठलेले शिपाई यांचा पत्रव्यवहार व कित्येक हस्तक दक्षिणेत पकडले गेले. हे सारे काय ४ जून नंतर पाठवले गेले होते व १५ दिवसाच्या आत साऱ्या दक्षिणेत पसरले?

आणखीही काही प्रश्न उपस्थित होतात. नागपूरमध्ये जेव्हा साऱ्या युरोपियनांना मारण्याचे कारस्थान उघडकीस आले तेव्हाच औरंगाबादमध्येही उठाव कसा झाला? जर हे केवळ शिपायांचे बण्ड होते तर अनेक ठिकाणी शिपाई उठण्याच्या आधीच जनता उठली याचा अन्वयार्थ कसा लावायचा? फाशी दिले गेलेले व तोफेच्या तोण्डी देण्यात आलेले क्रांतिकारी शिपाई पेशाचे नव्हते. भिल्ल, मच्छीमार, गोण्ड वगैरे लोक बण्ड



करण्याच्या आरोपावरून फाशी दिले गेले, नानासाहेब व लक्ष्मीबाई राज्य व पेन्शन मिळविण्यासाठी युद्धात पडले हा आरोप खरा मानला, तर ब्राह्मणापासून भंग्यापर्यंत व पंजाबपासून केरळ तामिळनाडूपर्यन्त जे लोक इंग्रजांविरुद्ध उठले त्यांचा उद्देश झाशीचे राज्य राणी लक्ष्मीबाईला देणे व नानासाहेबांना पेन्शन मिळवून देणे हाच होता, असेही मानावे लागेल.

''नानासाहेब हे जर या क्रान्तीचे प्रणेते होते तर खुद्द महाराष्ट्रात क्रान्तीने पेट का घेतला नाही?'' असे विचारण्यात येते. पण पेट घेतला नाही याचा अर्थ युद्ध पेटविण्याचा प्रयत्न झाला नाही असा नाही. महाराष्ट्रात छत्रपतीच्या पुनःस्थापनेचा प्रयत्न जरूर झाला. हा प्रयत्न करणारा रंगो बापूजी हा होता. रंगो बापूजी छत्रपती प्रतापसिंहांचा वकील होता. १८५६ मध्ये त्याने छत्रपतींच्या नावाने सैन्य जमविण्यास प्रारम्भ केला. या सैन्यात मांग, रामोशी व मच्छीमार जातीचे लोक होते. एप्रिल/मे १८५७ मध्ये रंगो बापूजीने कोल्हापूर, बेळगाव, धारवार व सातारा येथील ब्रिटिश फौजांत असन्तोष पसरविण्याचा प्रयत्न केला. त्याने या फौजांना १८५७ मध्ये इंग्रजांच्या विरुद्ध सारा भारतच उठेल असे सांगितले होते. मे अखेरपर्यंत स्वातंत्र्यसेनेची तयारी पूर्ण होत आली होती. १० जून १८५७ ला ही सेना साताऱ्यावर चालून गेली. पण्ढरपूरच्या खजिन्यावरही धाड घालण्यात आली. पण ब्रिटिशांना या सर्व व्यूहांची आगाऊ बातमी मिळत राहिली व उठावाने उग्र स्वरूप धारण करण्याच्या आधीच तो दडपून टाकण्यात आला. रंगो बापूजीला पकडून ग्वाल्हेरच्या तुरुंगात पाठविण्यात आले. परंतु तो तेथून निसटला. त्याला पकडण्यासाठी इंग्रजांनी इनाम जाहीर केले, पण तो पकडला गेला नाही. नानासाहेबांचे धाकटे भाऊ रावसाहेब नानासाहेबांच्या पराजयानंतर दक्षिणेत आले व त्यांनी काही काळपर्यंत पेशवाईचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी १८६२ मध्ये नवी सेना उभारण्याचा प्रयत्न केल्याचा पुरावा आढळतो. त्यांच्या अनुयायांत ब्राह्मण, रेड्डी, कोमटी, मराठा, पुरभय्ये, मारवाडी, गौंड, सारस्वत इत्यादी जातींचे लोक होते. सावकारांनी क्रांतियुद्धासाठी पुष्कळ धन दिले. इंग्रजांनी रावसाहेबांना पकडण्यासाठी फौज पाठविली, पण रावसाहेबांनी त्यांना हुल देऊन नरसिंगी गाठली. तेथे त्यांना पकडण्यात आले, पण ते निसटले. शेवटी ते जम्मूमध्ये चेनानी गावात सापडले. त्यांना कानपूरमध्ये फाशी देण्यात आले.

■■■

# प्रकरण पाच | स्वधर्म आणि स्वदेश

१८५७ च्या सुमारास ब्रिटिश सत्तेविरुद्ध जो सार्वत्रिक द्वेष जनतेत पसरला होता त्याचे कारण प्रशासनिक अंदाधुंदी, लुटारू आर्थिक धोरण व वांशिक अरेरावी हे होते. पण सर्वांपेक्षा अधिक प्रबळ कारण धार्मिक होते. "लोकांना भिकेस लावून इंग्रजांचे समाधान झाले नाही. आता त्यांनी आमचा धर्मही हिरावून घेण्याचा चंग बांधला आहे," असे क्रांतिकारकांच्या एका पत्रकात विधान आहे. ईस्ट इण्डिया कंपनीच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचा अध्यक्ष मँगल्स याने लोकसभेत उघडच सांगितले की, "नियतीने भारतासारखा खंडप्राय देश आपल्या स्वाधीन केला आहे, तो ख्रिस्ताचे निशाण त्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत फडकविण्यासाठी. साऱ्या भारताचे ख्रिस्तीकरण करण्याच्या प्रयत्नात काही खंड व ढिलाई पडू देता उपयोगी नाही. आपण या साठी आपली सारी शक्ती वेचू या."

ज्या इंग्रजी शिक्षणाची महती गळे काढून गाण्याची आज फॅशन पडली आहे तिचा प्रणेता जो मेकॉले त्याने "माझी शिक्षण पद्धती रूढ झाल्यावर दोन-तीन पिढ्यांत



भारतात मूर्तिपूजक राहणार नाही" अशी एका पत्रात प्रौढी मारली आहे. (ऑक्टोबर १८३६)

मेकॉलेच्या या उद्देशास अनुसरून सरकारी शाळांतून सक्तीने बायबल शिकविण्यात येई व "तुमचा त्राता कोण?" वगैरे प्रश्नांना ख्रिस्ती धर्माला संमत अशी उत्तरे मुलांनी द्यावी अशी अपेक्षा असे. सरकारी कार्यालयातून गोरे अधिकारी सारा काळ कनिष्ठांनी ख्रिस्ती झाले पाहिजे असे बजावीत. श्रीराम व महमद पैगंबर यांना घाणेरड्या शिव्या देण्यात येत. एखाद्या शिपायाने प्रत्युत्तर दिले तर त्यांची घी-रोटी बंद करण्यात येई. इंग्रजांनी एतद्देशीय राज्येच खालसा केली असे नाही. मंदिरे व मशिदी यांची उत्पन्ने देखील मोठ्या प्रमाणावर जप्त केली. झांशी खालसा केल्यावर तेथील महालक्ष्मीच्या देवळाचे उत्पन्न देखील जप्त केले व झाशीत सर्रास गोवध सुरू केला. राणीने या विरुद्ध पुष्कळ आक्रोश केला पण त्याचा काही उपयोग झाला नाही. ख्रिस्ती होणाऱ्यांचा वाडवडिलांच्या मालमत्तेवरील हक्क कायम रहावा म्हणून कायद्यात फेरबदल करण्यात आले.

## सैन्याचे ख्रिस्तीकरण

कॅ. व्हीलर हा बराकपूर छापणीचा मुख्य होता. तो शिपायामध्ये ख्रिस्ती धर्मप्रसारक चोपड्या वाटे व धर्मांतराचा आग्रह करणारी प्रवचने देई. अधिक बोटचेप्या शिपायांना बंगल्यावर बोलावून धर्मांतराबद्दल दडपण आणी. धर्मान्तराचा प्रचार करण्याबद्दल त्याला एकदा शिपायांनी आपल्या आळीतून हाकलून दिले होते. ज्या मार्गाने शिपाई कूच करीत त्या मार्गावरील नागरिकांत देखील ख्रिस्ती धर्माचा प्रचार करण्यास तो सैनिकांचा उपयोग करी. मे. मॅकेन्झी नावाचा दुसराही एक अधिकारी अशाच कारवाया करी, असा उल्लेख सापडतो. सर थॉमस मनरो नावाच्या इंग्रजाने असे करणे धोक्याचे आहे, असा सरकारला इशारा दिला होता, पण तिकडे सरकारने लक्ष दिले नाही.

बंगाल इन्फण्ट्रीचा कमाण्डर लिहितो, "गेल्या वीस वर्षांपासून सैन्याचे ख्रिस्तीकरण करण्याचे धोरण मी अमलात आणीत आहे. हीदनांचे आत्मे सैतानापासून वाचविणे हे सैनिक अधिकाऱ्यांचे एक कर्तव्यच आहे."

रेव्हरेण्ड केनेडी लिहितो, "कितीही संकटे येवोत, आपल्या हातात भारताचे राज्य आहे तोपर्यन्त कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंत ख्रिस्ती धर्म पसरविण्याचे काम आपण कसोशीने केले पाहिजे. हिंदू व मुसलमान धर्माचा द्वेष नेटिवांच्या मनात रुजेपर्यन्त आपल्या

प्रयत्नांना खंड पडता उपयोगी नाही. या कामात आपण आपली सर्व सत्ता पणास लावली पाहिजे.''

रेव्हरेण्ड गोपीनाथ नंदी नावाचा एक तत्कालीन ख्रिस्ती लिहितो, ''तुरुंगातील कैद्यांना मी रोज ख्रिस्ती धर्माचे धडे देत होतो. पटवारी व खेड्यातील हिशेबनीस यांना देखील ख्रिस्ती धर्माचे पाठ व बायबलच्या प्रती देण्यात येत.''

सैन्यामध्ये मिशनरी हे कर्नलच्या हुद्यावर असत. एडमंड नावाच्या एका गृहस्थाने लिहिलेले एक पत्रक साऱ्या देशात वाटण्यात आले. त्यात साऱ्या भारतवासीयांनी आपले धर्म सोडून ख्रिस्ती होण्याचा समय जवळ आला आहे, असे म्हटले होते. इंग्रजांच्या लुटारू सारावसुलीमुळे वारंवार दुष्काळ पडत, दुष्काळात उघड्यावर पडलेल्या मुलांना मिशनरी उचलून नेत व ख्रिस्ती बनवीत. सर सय्यद अहमदांनी या बाबतीत असे म्हटले आहे की, असे दुष्काळ पाडून येशूच्या कळापाची भरती करावी हाच सरकारचा उद्देश आहे अशी जनतेची धारणा आहे.

## ठिणगी पडली

जनतेचा रोष असाच धुमसत असता एक घटना घडली. डमडम येथील पलटणीतील एक ब्राह्मण शिपाई लोट्यात पाणी घेऊन जात असता, एका खालच्या जातीच्या माणसाने त्याला पिण्यास पाणी मागितले. तेव्हा तो शिपाई म्हणाला, ''तुझ्या स्पर्शाने माझा लोटा विटाळेल.'' यावर तो माणूस हसला व म्हणाला ''माझ्या स्पर्शाने तुझा लोटा विटाळतो आणि गोमातेची चर्बी लावलेली काडतुसे तोंडाने तोडताना तू विटाळत नाहीस ना.'' झाले!! ही वार्ता हा हा म्हणता साऱ्या भारतात पसरली. विनायक कोंडदेव ओकासारख्या लेखकांनी काडतुसांना गाईची व डुकराची चर्बी लावली ही शिपायांची अडाणी समजूत होती व नानासाहेब व लक्ष्मीबाई यांच्यासारख्या समजूतदार लोकांनीदेखील मूर्खपणे त्यावर विश्वास ठेवला, असा आरोप केला आहे. पण मजुमदारांसारख्या निंदकांनादेखील चर्बीचा आरोप अक्षरशः सत्य होता हे कबूल करावे लागले आहे. खरे अडाणी शिपायी नसून विनायक कोंडदेव ओकासारखे लोकच होते.

पण एवढे करून मजुमदार-सेन यासारख्या लेखकांची अशी भाबडी समजूत आहे

बुद्धी गहाण ठेवली म्हणजे नाकासमोरची गोष्ट पाहण्याचे सामर्थ्य देखील कसे नाहीसे होते याचे हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. ख्रिस्तीकरणाचा प्रयत्न किती मोठ्या प्रमाणावर सैन्यातदेखील सुरू होता याचे सेनांनी स्वतःच वर्णन केले आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरने आपल्या सत्तेचा उपयोग आपण भारताचे ख्रिस्तीकरण करण्यासाठी केला पाहिजे, असे उघडच म्हटल्याचे मजुमदारांना माहीत नसणे संभवनीय नाही. शिवाय काडतुसांबद्दल आपला असंतोष शिपायांनी सत्तावनच्या बऱ्याच आधीपासून व्यक्त करायला सुरवात केली होती. शिपायांच्या तक्रारीत तथ्य आहे असे काही ब्रिटिश अधिकाऱ्यांनी देखील सांगितले होते. पण तरीही तक्रारी दूर करण्यात आल्या नाहीत.

चर्बीची काडतुसे वापरण्यात पुढील धोरणे दिसतात : (अ) बराच काळपर्यंत काडतुसाचे स्वरूप गुप्त ठेवणे, (ब) बराच काळ गेल्यावर आपण दिवसानुदिवस गायीची व डुकराची चर्बी तोंडात घातली व धर्मभ्रष्ट झालो हे शिपायांना कळू देणे. शिपायांना हे कळलेच नाही तर त्यांना धर्मभ्रष्ट करण्याच्या दृष्टीने काडतुसांचा काहीच उपयोग नाही, (क) शिपायांना धर्मभ्रंशाचा धक्का बसल्यावर देखील ''मायबाप सरकारचा यात काही दुष्ट हेतू नव्हता ही केवळ चूक झाली'' अशी मजुमदार आणि कंपनीप्रमाणे शिपायांची श्रद्धा कायम ठेवणे.

ही धोरणें साधली तर शिपायांचा रोष सरकारकडे वळणार नाही व ते बऱ्या बोलाने ख्रिस्ती होतील असा सरकारचा अन्दाज होता.

म्हणूनच काडतुसांबद्दल तक्रारी आल्यावर सरकारने सरळ याची कबुली दिली नाही व ही गोष्ट सरळ नाकबूलही केली नाही. उलट काडतुसे बदलण्यात येत आहेत असे खोटेच सांगून तीच काडतुसे चालू ठेवली.

शिपाई अत्यंत मूर्ख आहेत अशी इंग्रजांची समजूत होती. बण्डाचा डोंब उसळल्यावर देखील ''शिपायांच्या वर्तनाचा अन्वय लावीत बसणे व्यर्थ आहे. वर्तनाला अन्वयार्थ असण्याइतकी अक्कल शिपायात आहे तरी कोठे?'' असे एका इंग्रजाने उद्‌गार काढले होते. अर्थात् काडतुसांच्या प्रकरणामुळे शिपायास आपल्या हेतूबद्दल संशय येऊन ते क्रुद्ध होतील असे इंग्रजास वाटले नाही. अभावितपणे घडलेल्या चुकीमळे आपण बाटलो,

## स्वधर्म आणि स्वदेश

पण शिपाई मजुमदार आणि कंपनीपेक्षा अधिक शहाणे व स्वाभिमानी होते. त्यांनी धर्मरक्षणासाठी शस्त्र उपसले. सत्तावनचा उठाव शिपायांनी केला असला तरी तो आपल्या धर्माच्या रक्षणासाठी केला, पगारवाढ वगैरेसारख्या व्यावसायिक तक्रारीसाठी केला नाही. हिंदू व मुस्लिम धर्म ही काही शिपायांची मिरास नव्हती. अखिल भारताचाच समावेश या धर्मात होत होता. म्हणजे ज्या तत्त्वासाठी हा लढा झाला ते अखिल भारतीयांना प्रिय असलेले तत्त्व होते. केवळ शिपायांना प्रिय असलेले तत्त्व नव्हते. म्हणून शिपायांचा लढा हा साऱ्या राष्ट्राचा लढा होता.

शिपायांप्रमाणेच त्यांचे पुढारीही धर्मासाठी लढले. नानासाहेब पेशवे म्हणतात "इंग्रज लोकांनी आजपर्यंत फसवाफसवीच्या मार्गाने भारतीयांना धर्मभ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला. फसवाफसवीने काम साधत नाही असे पाहून आता त्यांनी या कामासाठी बलप्रयोग करण्यास सुरवात केली आहे. इंग्रजांची अरेरावी, दुष्टावा व अन्याय इतका वाढत गेला की त्यांना शासन करण्यासाठी भारतात हिंदू व मुसलमान राज्ये स्थापन करण्यास ईश्वराने माझी योजना केली आहे."

राणी लक्ष्मीबाई विष्णुभट गोडसेला म्हणाली "मी अर्धा शेर तांदळाची धनीण. मजला ... विधवा धर्म सोडून हा उद्योग करण्याची जरूर नव्हती. परंतु हिंदू धर्माचा अभिमान धरून या कर्मास प्रवृत्त झाले व याजकरिता वित्ताची, जीविताची सर्वांची आशा सोडली."

सारांश सत्तावनचे युद्ध हे धर्मरक्षणाचे युद्ध होते. मजुमदारप्रभृतींचे म्हणणे असे की धर्मासाठी लढणे म्हणजे देशासाठी लढणे नव्हे देश, राष्ट्र, वगैरे कल्पना इंग्रजी शिक्षणाने निर्माण केल्या.

ब्रिटिशपूर्व भारतीय नेत्यांचे विचार समजून घेण्यास फारच थोडी सामग्री उपलब्ध आहे. पण जी आहे त्यात राष्ट्र, देश, मातृभूमी वगैरे शब्द आढळत नाहीत, निदान आजच्या इतक्या प्रचुरतेने आढळत नाहीत, हे खरे आहे. पण 'राष्ट्र' व 'मातृभूमी' या शब्दात अशा कोणत्या लोकोत्तर व धर्मात समाविष्ट नसलेल्या कल्पना आहेत की ज्यांच्यापुढे राणी लक्ष्मीबाईचा हिंदू धर्माभिमान हिणकस वाटावा? हिंदू धर्माचा अभिमान बाळगणाऱ्यांच्या मनात भगवान् शंकराने पुनीत केलेला हिमालय, भगीरथाने स्वर्गातून आणलेली गंगा, कृष्णाच्या मुरलीचे स्वर जेथे अजून घूमत आहेत अशी यमुना, अगस्तीपुढे



नम्र झालेला विंध्य, रामाच्या सेतुबंधाची साक्ष बाहणारे रामेश्वर यांच्याबद्दल पावित्र्य-भावना नसेल हे शक्य आहे काय? मातृभूमीचा अभिमान तो आणखी काय असतो? मातृभूमी या शब्दात माझा या भूमीवर जन्म झाला ही केवळ वैयक्तिक घटना सूचित होते. उलट धर्मभूमीच्या कल्पनेत आपली सारी सांस्कृती इथे जन्मली व वाढली ही अधिक व्यापक भावना व्यक्त होते. धर्म म्हणजे उपासनापद्धती व पूजाविधी एवढाच संकुचित अर्थ केला तर धर्माभिमान हे राष्ट्राभिमानाचे स्वरूप आहे असे म्हणता येणार नाही. पण धर्म या शब्दाची व्याप्ती एवढी संकुचित कधीच नव्हती "धारणाद्धर्म इत्याहुः।" म्हणजे समाजाचे धारण करणाऱ्या सर्वच गोष्टी धर्मात समाविष्ट होतात. ज्याने निःश्रेयसाबरोबरच अभ्युदय देखील साधतो तो धर्म असे कणादाने म्हटले आहे. अर्थात हिंदूधर्म या शब्दात हिंदूची राज्यव्यवस्था, चालीरीती, ज्ञानविज्ञान, कलाकौशल्य, भाषा, साहित्य, या सर्व परंपराचा समावेश होतो. धर्माभिमान ही भावना देशाभिमानाच्या केवळ भौगोलिक भावनेपेक्षा कोणत्याही अर्थाने कमी व्यापक नाही.

## सारेच फसले नाही

हिन्दू धर्माभिमान हा भारतीय राष्ट्रभिमानापेक्षा कमी व्यापक आहे. कारण भारतात हिंदू व मुसलमान या दोघांचाही समावेश होता असे यावर म्हणण्यात येईल, हिंदू व मुसलमान भारत नावाच्या एकाच भूभागात राहतात या व्यतिरिक्त त्यांना एका राष्ट्राचे घटक मानता येईल असे कोणते दुवे आहेत याचे निःसंदिग्ध व सर्वमान्य उत्तर आजच्या भारतीयांना देखील देता येत नाही. तेव्हा सत्तावनच्या संबंधात या प्रश्नाची चर्चा करण्यात अर्थ नाही. पण सत्तावनच्या संग्रामात भारतीय हिंदू व मुसलमान यांच्यात जेवढी एकवाक्यता दिसली तेवढी पुढे केव्हाही दिसली नाही यावरून हिंदू मुसलमानांच्या संयुक्त राष्ट्रीयत्वाच्या ध्येयाची कसोटी लावली तरी सत्तावनच्या संग्रामाची सर पुढच्या कोणत्याही चळवळीला येत नाही.

सत्तावनचे युद्ध हिंदू व मुसलमान धर्मांच्या रक्षणासाठी झाले यावरून या युद्धाच्या मागे तात्त्विक भूमिका नव्हती हा प्रथितयश कादंबरीकार श्री माडखोलकर यांचा आक्षेप निरर्थक ठरतो. युद्धाच्या मागे तात्त्विक भूमिका नव्हती या म्हणण्याचा अर्थ हिंदू व मुसलमान या धर्मांना तात्त्विक भूमिका नाही असा होतो. सत्तावनचे निन्दक किती अर्थशून्य विधाने करतात याचे हे एक उदाहरण आहे.

स्वातंत्र्ययुद्ध फसले हे खरे आहे. पण धर्मरक्षण हा त्यांचा एक उद्देश लक्षात घेता ते सर्वस्वी फसले नाही असे म्हटले पाहिजे, कारण सत्तावननंतर भारतीयांच्या धर्मात ढवळाढवळ करणार नाही अशा स्वरूपाचे वचन व्हिक्टोरिया राणीने आपल्या जाहीरनाम्यात ग्रथित केले व भारताचे ख्रिस्तीकरण करण्याचा प्रयत्न इंग्रज सरकारने कायमचा सोडून दिला.

सत्तावनच्या धर्मयुद्धाबद्दल आदर कमी करण्यासाठी कधी कधी असे प्रतिपादन करण्यात येते की ज्या धर्माचे रक्षण स्वातंत्र्ययोद्ध्यांना अभिप्रेत होते त्याचे स्वरूप गोमांसाचा विटाळ या अंधश्रद्धेच्या स्वरूपाचे होते. तेव्हा अशा युद्धाबद्दल आपण अभिमान का बाळगावा?

हा प्रश्न विचारणाऱ्यांना अंधश्रद्धा म्हणजे काय हे कळत नाही हे स्पष्ट आहे. अनेक तऱ्हेने उपयोगी पडणाऱ्या गायीसारख्या पशूबद्दल कृतज्ञता ही एक उदात भावना आहे. हिंदू समाजाला ही भावना लांछनास्पद नसून भूषाणास्पद आहे.

गोपूजेची भावना नैतिक दृष्ट्या मोठी उदात्त असेल पण ज्या हिंदू समाजाला माणसांना पोसण्याची देखील ऐपत नाही त्याने निरुपयोगी गायींना पोसण्याची उठाठेव करणे हा शुद्ध मूर्खपणा आहे. अशा मूर्खपणास उत्तेजन देणाऱ्या प्रवृत्ती निंद्य मानल्या पाहिजेत असे एक ''पुरोगामी'' मत प्रचलित आहे.

पुष्कळशा पुरोगामी मताप्रमाणेच हेही मत संबंधित तथ्यांच्या अज्ञानावर आधारलेले आहे. गोमांस खाणारे, दूध न देणाऱ्या म्हाताऱ्या व निरुपयोगी गायीचेच मांस खातात अशी या 'पुरोगाम्या' ची समजूत आहे. वस्तुतः निरुपयोगी गायीचेच मांस देखील खाण्यास निरुपयोगी असते. गोमांसास चटावलेले लोक दुभत्या तरुण गायी व त्या पेक्षाही खुसखुषीत मांसासाठी वासरे देखील मारतात. यदृच्छया जन्मास आलेल्या गाईच मारल्या जातात असे नाही. मांसासाठी गायींची उपज मुद्दाम वाढविण्यात येते. दूध दुभते व बैल यांच्यासाठी जेवढ्या गायी लागतात त्याच्यापेक्षा अनेकपटींनी जास्त मांसासाठी लागतात. कारण गायी व बैल ही जगली तर साधारणपणे १० वर्षे उपयुक्त असतात. १० वर्षात एक गाय जेवढे दूध, मूत्र व शेण देते व बैल जेवढ्या किमतीची मजुरी करतो तेवढे त्यांना एका झटक्यात मारून मिळणाऱ्या त्यांच्या मांसाचे पोषणमूल्य नसते. सारांश गोमांसभक्षण हा अत्यन्त श्रीमन्त राष्ट्राचा चोचला आहे. अन्नसमस्या सोडविण्यासाठी गोमांसभक्षण करावे असे म्हणणारे लोक ''भाकर गिळत नाही तर पुरणपोळी खा'' असा उपदेश करणाऱ्या मेरी ॲण्टायनेटच्या जातींचे आहेत.



म्हातारपणी गाय दूध देईनाशी होते व बैल थकतो तेव्हादेखील हे प्राणी अगदीच निरुपयोगी होत नाहीत. या प्राण्यांचे मलमूत्र देखील उपयोगी असते. इन्धन या दृष्टीने १० टन शेणाचे मूल्य १ टन कोळसा व दोन टन लाकूड यांच्याबरोबर असते. गोमयाचे मूल्य खत म्हणून यापेक्षाही अधिक आहे. या मूल्यातून म्हाताऱ्या गायी-बैलांना पोसण्याचा खर्च पूर्णपणे न निघाला तरी या प्राण्यांच्या साऱ्या जन्मातील उपयुक्ततेच्या मानाने तो अगदीच क्षुद्र आहे.

हिन्दूच्या गोपूजेला आर्थिक दृष्ट्या आत्मघातकी म्हणून हसणारे गोरे लोक गायीच्या मानाने ज्याची उपयुक्तता शून्य आहे अशी कुत्री पाळण्यात मात्र शतपटीने अधिक खर्च करतात. कुत्र्याचे अन्न विकणारी खास दुकाने पाश्चात्त्य देशात असतात. इंग्लंडमध्ये तीन घरामागे एक कुत्रा असतो असे मानले तरी कुत्र्यांची संख्या कोटीच्या जवळपास असली पाहिजे. कोट्यवधी निरुपयोगी कुत्री पाळणारे इंग्रज सुधारलेले व गायीसारख्या उपयुक्त पशूबद्दल कृतज्ञता बाळगणारा हिंदू मात्र अडाणी! आणि या न्यायाला म्हणावे बुद्धिवाद!!

शिपायांचा गोमांसभक्षणाला विरोध होता. पण हा विरोध गायीबद्दल पूज्यता व्यक्त करणारा आहे, अजाणता वा स्वधर्मासाठी लढण्यास आवश्यक म्हणून गोमांस तोंडात घातले तर तेवढ्याने धर्म बुडत नाही एवढा विवेक शिपायांना होता. आपला धर्म बुडवू पाहणाऱ्याविरुद्ध जेव्हा त्यांनी शस्त्र उपसले तेव्हा ज्या अपवित्र काडतुसांनी त्यांचा धर्म बुडविण्याचे कारस्थान शत्रूने रचले होते, तीच काडतुसे वापरून त्यांनी शत्रूवर गोळ्यांचा वर्षाव केला. शिपायांचा राग काडतुसे वाटण्यासारख्या एकट दुकट कृत्यावर नसून आपल्या धर्माला शत्रुस्थानी लेखणाऱ्या परसत्तेवर होता.

## सतीचा कायदा

परकीय सत्तेबद्दल सहानुभूती व स्वातंत्र्ययुद्धाबद्दल अनादर निर्माण करण्यासाठी कधी कधी असे म्हणण्यात येते की, स्वातंत्र्ययोद्धे ज्या धर्माचे रक्षण करू पाहात होते, त्यात सतीच्या अमानुष चालीचा, अंतर्भाव होत होता. कनवाळू इंग्रजांनी ज्या चालीवर बंदी घातली होती ती त्यांना पुनः सुरू करायची होती. स्वातंत्र्ययुद्धाच्या विरुद्ध काही बोलता येण्यासारखे उरू न देण्याचा ज्यांनी चंग बांधला आहे अशा मजुमदारासारख्या लेखकांनी ''सतीच्या चालीवर बंदी उठवा'' अशी स्वातंत्र्योद्ध्यांनी कोणत्याही पत्रकात व भाषाणात मागणी केल्याचे दाखवून देता आले नाही. उलट या युद्धाची एक प्रमुख

स्फूर्तिदेवता राणी लक्ष्मीबाई ही स्वतः विधवा होती. ती सती गेली नाही, एवढेच नव्हे, तर तिने केशवपन देखील केले नाही. या अमर्यादेबद्दल तिने एक क्षुद्र प्रायश्चित्त घेतले व तेवढ्याने तत्कालीन समाजाचे समाधान झाले. तिच्या प्रजाजनांना तिच्याबद्दल वाटणाऱ्या आदरात या असनातनी वागणुकीने काहीही फरक पडला नाही.

दुसरे असे की इंग्रजांनी सतीबंदीचा कायदा केला त्याला देखील राजा राममोहन रायसारख्या भारतीय सुधारकांचे प्रयत्नच कारणीभूत झाले. इंग्रजांच्या पूर्वीदेखील सती जाण्यासाठी कुणावर दडपण आणणे हा पेशव्यांनी गुन्हा ठरविला होता. पेशव्यांच्याही पूर्वी अकबराने सतीवर बंदी घातली होती. त्यासाठी अकबराविरुद्ध लोकमत खवळल्याचा कुठे उल्लेख सापडत नाही. सतीची चाल वरिष्ठ मानलेल्या जातीतच फक्त होती व या जातीत देखील सती गेल्याची उदाहरणे तुरळकच आहेत. पेशव्यांच्या घराण्यात रमाबाई व चिमाजी अप्पांची पत्नी यांच्या खेरीज कुणी सती गेल्याचा उल्लेख नाही. बहुसंख्य समाजाला सतीबंदीविरुद्ध बंड करून उठण्याइतके सतीच्या चालीचे महत्त्व कधी वाटले नाही. तेव्हा सत्तावनच्या संग्रामाच्या कारणात सतीबंदीचा उल्लेख हेतुपुरस्सर केलेल्या दुष्ट प्रचाराच्या स्वरूपाचा आहे.

नानासाहेब पेशव्यांनी मुक्त केलेल्या प्रदेशावर आपली राज्यव्यवस्था सुरू केली ती पुष्कळशा बाबतीत परंपरागत हिंदू कायद्याप्रमाणे होती. तरी त्यांनी सतीबंदी उठविल्याचा दाखला सापडत नाही. फौजदारी गुन्ह्याबद्दल आज क्रूर वाटणाऱ्या काही सजा त्यांनी दिल्याचा उल्लेख आहे. यावर सेनांनी पेशवाईची पुनः स्थापना म्हणजे पुच्छप्रगती ठरली असती असा ध्वनी काढला आहे. दण्डविधान कडक असावे की सौम्य असावे हा चर्चेचा विषय आहे. पण कडक दण्डविधान अनिष्ट असे मानले तरी ते सौम्य करण्यासाठी आम्हाला परसत्तेची जरूर वाटावी हे बुद्धीचे दिवाळे वाजल्याचे लक्षण आहे. जहाजांच्या कप्तानाने जहाजाबरोबर समुद्राच्या तळाशी गेले पाहिजे अशी पाश्चात्त्य देशात परंपरा आहे. ही परंपरा सतीच्या चालीसारखीच अमानुष आहे. या परंपरेवर बंदी पडावी म्हणून तुम्ही आपला देश जपानी व चिनी यांच्या स्वाधीन करा, असे इंग्रजांना कोणी म्हटले, तर तो असा सल्ला देणाऱ्याचे कसे स्वागत करील?

■ ■ ■





# प्रकरण सहा | एक चिरन्तन स्फूर्तिस्थान

परसत्तेविरुद्ध एवढ्या विस्तृत प्रदेशावर एकाच वेळी उठाव झाल्याचे उदाहरण भारताच्या इतिहासात दुसरे नाही. या क्रांतियुद्धात एक लाख शिपाई व एक लाख नागरिक वीरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. या वीरांनी दिल्ली, औंध, रोहिलखंड, कानपूर, झाशी व ग्वाल्हेर या भागात इंग्रजी सत्ता समूळ नष्ट केली होती. या याशिवाय मध्यप्रदेश, मध्यभारत, पश्चिम बिहार येथे देखील क्रांतीची ज्वाला पेटली होती. एकूण एक लाख वर्ग मैल भूमी मुक्त झाली होती व चार कोटी भारतीय स्वराज्याचा आस्वाद घेऊ लागले होते.

पण हे सर्व एक वर्षाच्या आत संपले! संपेना!! "क्षण एक पुरे" स्वत्त्वाचा "वर्षाव घडो मरणांचा, मग पुढे!!" भारताच्या इतिहासात या एका वर्षाचे मूल्य पुढील ९० वर्षांच्या कुत्तेमोल जिण्याच्या मानाने अनन्यसाधारण आहे.

फाटक म्हणतात सत्तावनची क्रांती यशस्वी झाली असती तर भारत खंडित झाला असता. ती फसल्यामुळे पुढे अखंड भारताला स्वराज्य मिळाले!! ४७ साली "झेलमचे अश्रू" वाहून भारत खण्डित झाला हा ताजा इतिहास

फाटकांच्या स्मरणात नाही. कदाचित् हे खण्डित स्वातंत्र्य अखंड करण्यासाठी चिनी आक्रमणाचे स्वागत करून चिन्यांना पाकिस्तानसकट सारे हिंदुस्थान द्वीपकल्प व्यापू द्यावे व मग त्यांच्याविरुद्ध शंभर वर्षे सत्याग्रह करून अखंड भारताचे स्वराज्य स्थापन करावे, अशी अभिनव योजना फाटकांच्या मनात घोळत असेल!!

वर्षभराचे स्वराज्य स्थापन झाले यापेक्षा अधिक चिरस्थायी अशी या युद्धाची फलश्रुती म्हणजे धर्मात ढवळाढवळ करणार नाही असे व्हिक्टोरिया राणीने आपल्या घोषणापत्रात आश्वासन दिले. यापुढे ख्रिस्तीकरणाचे जे प्रयत्न झाले त्यात इंग्रजांनी उघडपणे व मोठ्या प्रमाणावर आपल्या राजकीय सामर्थ्याचा उपयोग केला नाही. ''हा उठाव दडपून टाकण्याच्या आपल्या प्रयत्नामुळे पुढे होणाऱ्या यापेक्षाही मोठ्या उठावांची बीजे रोवली गेली आहेत'' ही टाइम्सच्या लेखकाला वाटलेली भीती मात्र खरी ठरली नाही. ब्रिटिशांच्या विरुद्ध सत्तावनच्या तोडीचा उठाव पुढे कधीच झाला नाही, सत्तावनच्या युद्धात भारतीयांना ब्रिटिशांच्या विरुद्ध म्हणण्यासारखा जय कुठेच मिळाला नाही. त्यामुळे भारताच्या बऱ्याच मोठ्या भागात उठाव झाला नाही. झालेले उठावदेखील इंग्रजांनी इतक्या क्रूरतेने मोडून काढले की भारतीयांना इंग्रजांच्या सामर्थ्याची कायमची दहशत बसली. इंग्रजांचा पराभव करण्याची महत्त्वाकांक्षा मूर्खपणाची आहे अशी धारणा झाल्यावर ''जे आपल्या नशिबी अपरिहार्यपणे आले आहे त्या इंग्रजी राज्यातच काय चांगले गुण आहेत हे पहावे, उगीच आकाशकुसुमासारख्या असलेल्या स्वातन्त्र्यासाठी धडपडण्यात काय अर्थ,'' अशी भारतीयांची प्रवृत्ती होऊ लागली.

## तात्या टोपेचे तेजस्वी उद्गार

या प्रवृत्तीला खतपणी पुरविण्याचे काम इंग्रजी शिक्षणाने केले. ''हे केवळ शिपायांचे बंड होते; राष्ट्र, स्वातन्त्र्य वगैरे कल्पनाच मुळात आम्ही तुम्हाला शिकविल्या, सत्तावन सालच्या तुमच्या अडाणी पूर्वजांना त्यांचा गंधही नव्हता, आम्ही येण्याच्या आधी भारतात स्वराज्य होतेच कुठे, केवळ मराठ्यांची लूटमार सुरू होती, तिला पायबंद घालून आम्हीच येथे शांतता स्थापित केली'' वगैरे इंग्रजी मंत्रांची जपमाळ भारतीय सुशिक्षित ओढीत होते. सत्तावनच्या संग्रामाबद्दलच्या स्मृती इंग्रजी शिक्षणाने याप्रमाणे दूषित केल्या नसत्या तर टाइम्सच्या लेखकाला वाटल्याप्रमाणे ब्रिटिशराज्याविरुद्ध अधिक सामर्थ्यशाली उठाव घडवून आणण्याची स्फूर्ती देण्याचे सामर्थ्य त्याच्यात खचीतच होते, हे सावरकरांनी १८५७



चे स्वातंत्र्यसमर हा ग्रंथ लिहून उत्कृष्टपणे दाखवून दिले आहे. एका देशभक्तामागे दहा देशद्रोही निघाले व रणांगणावर सतत पराभव झाला ही सत्तावनची कहाणी वाचताना अंतःकरण कष्टी होते हे खरे आहे. पण या शोकान्तिकेत देखील भवितव्याबद्दल आशा निर्माण करणाऱ्या अनेक घटना आहेत. त्यापैकी काही घटनांचा आता विचार करू.

तात्या टोपेवर राजद्रोहाचा अभियोग चालविण्यात आला तेव्हा स्वतःच्या कृत्याचे त्याने जे संक्षिप्त समर्थन केले ते अन्वर्थक आहे. ''मी जे केले ते माझे धनी पेशवे यांच्या आज्ञेने केले. युद्धाव्यतिरिक्त इतरत्र मी कुणाचीही हत्या केली नाही,'' असे तात्या टोपेचे उद्गार आहेत. या उद्गारांचे गर्भितार्थ महत्त्वाचे आहेत. ते म्हणजे इंग्रजांविरुद्ध युद्ध करण्याचा आदेश देण्याचा पेशव्यांना अधिकार होता. कारण ते या देशाचे सार्वभौम शासक होते. या आदेशाचे पालन करणे हा गुन्हा होऊ शकत नाही. सत्तावनचे युद्ध हे देशाचे राज्यकर्ते व इंग्रज आक्रमक यांच्यातले युद्ध होते. आक्रमकाविरुद्ध युद्ध हे बंड होऊ शकत नाही. अर्थात तात्या टोपेच्या अपराधांची चौकशी करायची असेल, तर युद्धाव्यतिरिक्त हत्या करण्याचा मानवतेविरुद्ध अपराध त्याने केला की नाही एवढ्याच गोष्टीची फक्त चौकशी व्हायला पाहिजे. अर्थात ही भूमिका इंग्रजांची सत्ता मुळातच नाकबूल करणारी पूर्णस्वातंत्र्यवादी भूमिका होती.

## दत्तक बाप

नानासाहेब पेशवे पराभूत होऊन देशोधडीला लागले, पण त्यांचे मन पराभूत झाले नाही. ब्रिटिशसरकारला त्यांनी जे पत्र लिहिले ते या संबंधात वाचण्यासारखे आहे. ''मी तुमच्याशी लढलो व जिवात जीव आहे तोपर्यंत लढणार. मी कोणताही अपराध केलेला नाही. कुणाचाही खून केला नाही. मीही माणूस आहे. मी तुमच्यापासून दोन कोसावर राहतो. तुमचे राष्ट्र मोठे बलाढ्य आहे. माझे सैन्य माझ्या आज्ञा पाळत नाही. मला पाय टेकण्यास भूमी उरलेली नाही. तरीपण तुम्ही दोन वर्षे लढूनही माझा नाश करू शकला नाही, हे आश्चर्य आहे. मी दोन वर्षांपासून काही सैन्य राखून ठेवले आहे. ते काय करू शकते हे मी लवकरच दाखवीन. आपण लवकरच भेटू व मग तुमच्या रक्ताचे गुडघाभर खोल पाट वहातील. ब्रिटिशासारख्या बलाढ्य राष्ट्राचा मी शत्रू म्हणून ओळखला जातो, हा माझा मोठाच मान मी समजतो. मरण कोणालाही चुकत नाही. मग मी का भ्यावे?''

दुसऱ्या एका पत्रात नानासाहेब म्हणतात, ''तुम्ही सांगता त्याप्रमाणे मी शरण

येणार नाही. एखाद्या परेंचे सेनापतीच्या मार्फत खुद्द तुमच्या राणीचे पत्र आले तर मी त्याची दखल घेईन. नाहीतर तुमच्याशी जे बोलायचे ते मी तलवारीने बोलीन.''

नानासाहेबांनी यात असे सूचित केले आहे की, ''मी भारताचा पेशवा. माझा दर्जा इंग्लंडच्या राणीबरोबरचा आहे. चालू युद्ध हे ईस्ट इंडिया कंपनी व तिचा नाना नावाचा प्रजाजन यांच्यातील युद्ध नसून भारत व इंग्लंड यांच्यातील युद्ध आहे. भारताचे पेशवे इंग्लंडच्या राणीशी बातचीत करतील. कंपनीच्या अधिकाऱ्यांना ते ओळखीत नाहीत.''

होप ग्राण्टला लिहिलेल्या पत्रात नानासाहेब म्हणतात. ''भारतात हात- पाय पसरून मला चोर ठरविण्याचा तुम्हास काय अधिकार? या देशावर राज्य करण्याचा अधिकार तुम्हास कोणी दिला? तुम्ही फिरंगी भारताचे राजे आणि आम्ही भारतवासी आमच्याच देशात चोर! खासा न्याय!!''

''बंडवाल्यांनी'' कोठेही इंग्रजांचा पराभव केल्याचे उदाहरण नाही म्हणून न. र. फाटक हिणवितात. त्यांच्या व मजुमदारांच्या लिहिण्याचा झोक असा की जणू इंग्रजांचे पराक्रम हे त्यांच्याच बापजाद्याचे पराक्रम होते. लक्ष्मीबाई, तात्या टोपे, कुमारसिंग वगैरे मंडळी ही सावरकरासारख्या ''काला आदमी'' ची पूर्वज मंडळी होती. मुलगा दत्तक घेण्याची चाल आहे. पण या लेखकांनी बाप दत्तक घेण्याचा जो उपक्रम केला आहे तो अपूर्व आहे. ''बंडवाल्यांनी'' इंग्रजांचा पराभव केला नाही म्हणून पारतंत्र्य कायम राहिले हे सावरकरांसारख्या सत्तावनच्या अभिमान्यांना चांगले माहीत आहे. सत्तावनचे वीर युद्धसामर्थ्यात इंग्रजांपेक्षा वरचढ होते अशी फुशारकी सत्तावनच्या कोणत्याही अभिमान्याने मारलेली नाही. इंग्रजांचा पराभव करणे नेपोलियन व हिटलरसारख्या योद्ध्यांनाही जमले नाही. ते राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे व कुमारसिंग यांना जमले नाही यात आश्चर्य नाही. अशा अजिंक्य शत्रूविरुद्ध या वीरांनी दोन हात केले व धारातीर्थी देह ठेवला हीच मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे.

दुसरे असे की इंग्रजांची भाटगिरी करताना मजुमदारांनी बऱ्याच भाकडकथा खऱ्या मानल्या आहेत. लखनौ व कानपूर येथे मूठभर इंग्रजांनी हजारो शिपायांना कसे थोपवून धरले याची अद्भुतरम्य वर्णने इंग्रज लेखकांनी दिली आहेत. मजुमदारांनी कोणतीही चिकित्सकता न दाखविता त्यांच्या सुरात सूर मिळविला आहे. लखनौ व कानपुर येथे इंग्रज व स्वातंत्र्ययोद्धे यांचे तौलनिक बलाबल काय होते याचा स्वातंत्र्ययोद्ध्याच्या बाजूच्या व्यक्तींनी लिहिलेला सविस्तर वृत्तांत उपलब्ध नाही. अशा वृत्तांतास आधारभूत अशी



कागदपत्रे ज्यांच्याजवळ होती त्यांनी ती इंग्रजांच्या भीतीने जाळून टाकली. पण झाशीच्या वेढ्याचा विष्णुभटाने लिहिलेला वृत्तांत उपलब्ध आहे. त्यावरून इंग्रजांच्या वृत्तांतात बऱ्याच थापा असतात असे स्पष्ट दिसते. ह्यू रोजने अवघ्या दोन हजार फौजेनिशी झाशीला वेढा घातला व १५०० सैनिकांच्या साहाय्याने तात्या टोपेच्या २२,००० फौजेचा पराभव केला अशी रोजची भाटगिरी मजुमदारांनी गायिली आहे. विष्णुभटाने रोजच्या फौजेची संख्या ६०,००० व तात्या टोपेच्या फौजेची दहा ते पंधरा हजार दिली आहे. ह्यू रोजच्या फौजेचा कूच ५ मैल लांब होता यावरून त्याची फौज ६०,००० ची होती हे विश्वसनीय ठरते. इतर ठिकाणच्या लढायातील इंग्रजांनी दिलेल्या निरनिराळ्या वृत्तांतात मेळ नाही. होप ग्राण्ट म्हणतो की लखनौच्या वेढ्यात ''बंडवाल्यांच्या'' सैन्यात ३०,००० शिपाई व ५०,००० स्वयंसेवक होते. मलेसनच्या मते ही संख्या १२१००० होती व सेनापती कॉलिन बरोबर गेलेल सिव्हिल कमिश्नर म्हणतो की ही संख्या दोन लक्ष होती!! इंग्रजांनी दिलेले शत्रुसैन्याच्या संख्येचे आकडे मनःपूत फुगवून दिलेले आहेत व स्वतःच्या सैन्याची संख्या चोरून ठेवली आहे. भारतीय सैनिक इंग्रजांच्या फौजेतील सैनिकापेक्षा संख्येने फारसे अधिक असण्याचा संभव नाही. शिवाय इंग्रजांचा तोफखाना व इतर शस्त्रसामग्री श्रेष्ठ होती. तात्या टोपे व लक्ष्मीबाई यांचा पराभव का झाला हे यावरून स्पष्ट आहे.

## 'वीरोत्तमा' लक्ष्मीबाई

सत्तावनच्या वीरांचा पराभव झाला असला तरी इंग्रजांचा रणांगणावर पराभव करणे शक्य आहे, असे वाटण्याइतपत त्यांचा पराक्रम नेत्रदीपक होता. राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे व राजा कुमारसिंग हे तिघेही आपापल्या परीने लोकोत्तर होते. त्यांच्यात सरस, नीरस ठरविणे अशक्य आहे. पण १९५७ च्या स्वातंत्र्यदिनी सत्तावनच्या वीरांना श्रद्धांजली वाहताना पं. नेहरू म्हणाले त्या प्रमाणे सत्तावनच्या संग्रामात ''सबसे प्यारा नाम झांशीकी रानी लक्ष्मीबाईका है।'' राणी लक्ष्मीबाईचे दर्शन वीर व देशभक्त या स्वरूपात होते तसेच त्याच्या जोडीला एक लोकोत्तर स्त्री व लोकोत्तर राणी म्हणून देखील होते. जॉन लँग नावाच्या वकिलाने तिचे पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे-

''ती मध्यम बांध्याची होती. तिचा चेहरा पूर्ण वर्तुळाकार होता. चेहऱ्यावर बुद्धिमत्तेचे तेज झळकत होते. वर्ण निमगोरा होता. डोळे तीक्ष्ण व नाक नाजूक वळणाचे होते. सोन्याच्या कर्णभूषणाव्यतिरिक्त अंगावर काही दागिने नव्हते. ती तलम मलमलीची

शुभ्र साडी नेसत असे. राणीच्या बांध्याचा आकार धारण करून विराजमान झालेली ती साडी पाहिली की त्या बांध्याचे शिल्प किती मनोहर आहे, याचा प्रत्यय येई. तिचा आवाज मात्र या नाजूक सौंदर्यास साजेसा नव्हता.'' कारण तो योद्ध्याचा आवाज होता. त्या सुंदर स्त्रीच्या शरीरात योद्ध्याचे व्यक्तित्व वास करीत होते. याचा प्रत्यय रणांगणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी तिच्या करारी आवाजातून येत असे. याच करारी आवाजात तिने मे. एलिसला सांगितले ''नहि दूंगी मेरी झाशी!!''

### राणीचे रामराज्य

राणीचे प्रत्यक्षदर्शीने केलेले आणखी एक वर्णन उपलब्ध आहे. इंग्रजांच्या सैन्यातील ब्रिगेडियरच्या स्तरावर असलेला हा एक इंग्रज होता. त्याचे नाव फल्याशमन. वर्णन असे आहे:-

राणीजवळ सैन्य नाही. पण तिला सैन्याची जरूर नाही. तिचे सारेच प्रजानन लढवय्ये आहेत. ती ज्या जमिनीवरून चालते त्या जमिनीची ते पूजा करतात. तिने नुसती शीळ वाजवली तरी ते तिच्याभोवती गोळा होतील.

मी राणीला भेटायला गेलो तेव्हा राणी व्हिक्टोरियाची एक तसबीर तिला अर्पण करण्यासाठी घेऊन गेलो होतो. तिचे दर्शन होण्याच्या आधीच तिचा हुजऱ्या माझ्यापासून ती घेऊन गेला. काही वेळाने ती तसबीर जमिनीवर पडल्याचा किंवा पाडल्याचा आवाज मला ऐकू आला. मला तिच्या खोलीत प्रवेश करता आला तेव्हा मी चकितच झालो. राणी वयस्क असावी असे मला वाटत होते. पण ती झोपाळ्यावर बसलेली ऐन तारुण्यातली एक मुलगी होती. तिचे डोळे बदामाच्या आकाराचे पण वर्णाने काळे होते. तिचा वर्ण दुधाळ कॉफीसारखा होता. नाक लांब व सरळ होते. तिचे तोंड व हनुवटी लाल दिसत होती (?) काळ्याभोर केसांची वेणी पाठीवर रुळत होती व त्यात खड्याचे अलंकार होते. वक्षःस्थलाच्या खालच्या भागांची व प्रकोष्ठांची तलम सन्धिप्रकाशासारखी ''साटीण'' दिसत होती. भांगातून एकच मोती जातीची खूण (?) असलेल्या कपाळावर डोकावत होता.

तिने तीन वेळा झोका घेतला व जमिनीला पाय टेकवून झोका थाम्बविला.

मला ही तरुणी राणी असेल असे वाटलेच नव्हते. त्यामुळे मी विचारले ''तुमची मालकीण कुठे आहे?''



तिने उत्तर दिले ''मला मालकीण नाही. मी लक्ष्मीबाई झाशीची महाराणी आहे.''

मला यावर विश्वास ठेवायला वेळ लागला नाही. तिच्या भेदक डोळ्यांनीच माझी खात्री पटली की जिने आयुष्यातं कधी कोणाचीच परवानगी मागितली नाही अशी ही स्त्री आहे. जिच्या अंगप्रत्यंगावरच राणी हा छाप आहे अशा त्या स्त्रीकडे पाहून मी अवाक् झालो.

''तुम्ही माझ्यासाठी भेट आणली आहे असे कळले?''

''होय'' म्हणून मी ती भेट दिली.

तिने ती भेट हातात घेतली व तिच्या वजनाचा अन्दाज घेतला व आपल्या झोपाळ्यावरच मागे वाकून मला खणखणीत आवाजात विचारले

''तुम्ही माझ्याकडे असे टक लावून का पाहत आहात?''

माफ करा राणीसाहेब ''एवढी सुन्दर राणी'' वगैरे काहीतरी मी म्हणणार होतो पण ताळ्यावर येऊन म्हणालो,'' थेट राणीसारखीच राणी पाहायला मिळेल अशी माझी अपेक्षा नव्हती.

''त्या राणीसारखी?'' तिने अन्थरुणावर पडलेल्या व्हिक्टोरियाच्या तस्बीरीकडे बोट दाखवून विचारले.

''ती देखील आपल्या परीने राणीच आहे'' मी उत्तर दिले

तिने अधिक न बोलता माझी भेट उघडायला मला सांगितले.

भेट ही एक अत्तराची बाटली होती. मी अदबीने म्हणालो, ''भारतात भेट देण्यासाठी अत्तर आणणे म्हणजे न्यू कासलला कोळसा नेण्यासारखे आहे. पण अत्तराची विविधता न आवडणारी स्त्री असेल असे मला वाटत नाही. शिवाय हे अत्तर फ्रेंच आहे.''

''म्हणजे महागडे असे तुम्हाला म्हणायचे आहे. कर्नल साहेब तुम्ही धनवान आहात काय? तुमच्या येण्याचा हेतू काय? जे मला पत्राने व निरोपाने सांगता आले नसते असे तुम्ही काय सांगणार आहात?'' असे म्हणून ती जवळच्या गच्चीकडे वळली तेव्हा तिच्या साडीची हालचाल न विसरता येण्यासारखी होती.

आपले राणीशी काही खरे काम नाही व आपण थापा मारतो आहोत हे राणीने ओळखले हे फूलशॅमच्या लक्षात आले. त्याने सम्भाषणाचा ओघ दुसरीकडे वळविला व त्यात ब्रिटिश राज्य कसे सर्वांनाच लाभकारक आहे हे सांगण्यास सुरवात केली. तेव्हा राणी म्हणाली-

"ब्रिटिश राज्य एवढे हितकर असल्यामुळेच झाशीच्या रस्त्यात आज एकाच्या जागी दहा भिकारी झाले आहेत. ठगांचा बंदोबस्त केल्याबद्दल तुम्ही बढाई मारता. पण हे ठग हिन्दू नसते व त्यांनी ख्रिश्चनांना मारले नसते तर तुम्ही ठगांचा बंदोबस्त करण्याच्या भानगडीत पडला असता काय?" तुमच्या सतीबंदीच्या कायद्यामुळे मी वाचले असे तुम्ही सुचविता. मला सती जाण्यास कोण भाग पाडणार होते? झाशीत झाशीच्या महाराणीचे राज्य राहिले असते व झाशीचे कायदे तिनेच केले असते.

राणीचे मन राजवाड्यापेक्षा बाहेरच अधिक रमत असे. रक्षकांच्या कवायती पाहणे व आपला आठ वर्षाचा मुलगा दामोदर व त्याचे सोबती यांच्या लीला पाहणे हा तिचा छन्द असे. कुस्त्या पाहण्याचा तिला नाद होता. पण कुस्त्या पाहताना ती चेहरा झाकू घेत असे. तिचा खजीनदार तिच्या समोर भिकाऱ्यांना नाणी वाटत असे.

ती मला म्हणाली

"तुम्ही आम्हाला पायदळी तुडविता ते आम्हाला सुधारण्यासाठी आमच्या चालीरीती आमच्या आहेत त्या तुमच्यासारख्याच असल्या पाहिजेत असा तुमचा आग्रह का? तुम्ही आम्हाला आमच्या पद्धतीने जगू का देत नाही? तुमच्या आगगाड्या व तारखाते यांनी काय भले केले आहे हे माहीत नाही. पण आमची जनता आमच्या बैलगाडीच्या काळाकडेच आपलेपणाने पाहत आहे. तुम्ही आता विद्यापीठे स्थापन करू म्हणता. तुम्ही त्यात आम्हाला नको असलेले तत्त्वज्ञान शिकवाल. तुम्ही शिकविलेल्या विज्ञानाचा या देशाला कोणताही उपयोग होणार नाही. तुमचे कायदे आम्हाला अगम्य आहेत. दुसऱ्यांनी कसे जगावे हे ठरविण्याचा तुमचा हट्ट का?"

इंग्रजांनी शिकविलेल्या विज्ञानाचा भारताला काही उपयोग होणार नाही हे राणीचे वचन भविष्यदर्शी ठरले. भारतात विज्ञानाची पोपटपंचीच झाली. नवे विचार करण्याची पात्रता आलीच नाही. हे दोनशे वर्षांच्या इंग्रजी शिक्षणानंतर रामन् हा एकमात्र नवे विचार करू शकणारा वैज्ञानिक भारतात झाला यावरून सिद्ध झाले. हजारो कोटी रुपये खर्चून आमच्या रक्षाविज्ञानखात्याला रणगाड्यांचे ऊर्जक बनविता येत नाही.

राणी पुढे म्हणाली, "माझे व माझ्या मुलाचे राज्य नष्ट होणार ही फार मोठी शोकान्तिका आहे असे मी समजत नाही. पण तुम्ही हा देश असा बदलणार आहात की सारी जनता स्वत्व विसरून मेण्ढरांच्या कळपात जाऊन बसेल. हे होऊ नये म्हणून मला जे करणे शक्य आहे ते मी करीन."



प्रातःकाली पाचला उठून ती आपल्या दिनचर्येस प्रारंभ करी. अभ्यंग स्नानानंतर तुलसी पूजा व नंतर दरबारच्या गायकाच्या सुरांनी पार्थिवपूजेस आरंभ होत असे. पुढे पुराणश्रवण व मग दरबार. दरबारात शेकडो लोक येत पण त्यातला एखादा एखाद्या दिवशी आला नाही, तर ते तिच्या नजरेतून सुटत नसे. दरबारचे काम झाल्यावर भोजन व वामकुक्षीनंतर नजराण्यांचे परीक्षण. दुपारी तीनला पुनः दरबार. या दरबारात ती मर्दानी पोषाख करी. खाली पायजमा, कमरेत कशिद्याचा दुपट्टा व तलवार, गळ्यात मोत्याची माळ आणि डोक्यास फेटा. दरबारच्या दिवाणखान्यात उघडणाऱ्या एका लहान खोलीत तिचे सिंहासन असे. या खोलीच्या दारावर सोनेरी नक्षीकाम व चिकाचे पडदे असत. दाराबाहेर सोने व रुप्याच्या गदा धारण करणारे हुजरे दक्षतेने उभे असत. समोर दिवाणजी व त्याच्या मागे दप्तरदार असत, कोणत्याही कागदातला मुद्दा राणीच्या चाणाक्ष बुद्धीस तेव्हाच अवगत होई व त्यावर ती स्पष्ट व निःसन्दिग्ध असे आदेश देई.

मंगळवारी व शुक्रवारी महालक्ष्मीच्या दर्शनाचा कार्यक्रम असे. महालक्ष्मीचे देऊळ कमळांनी भरलेल्या एका तळ्याच्या काठाशी होते. राणी महालक्ष्मीस जाण्यास निघाली की राजवाड्यातला चौघडा वाजे व महालक्ष्मीच्या मंदिरातला चौघडा त्यास साथ देई. एकदा देवळावरून परत येताना शेकडो भिकारी राणीच्या मार्गात आले. राणीने चौकशी केली तेव्हा तिला सांगण्यात आले की, हे भिकारी थंडीने कुडकुडत आहेत. हे ऐकून त्या दीनवत्सल राणीचे हृदय द्रवले व तिने साऱ्या भिकाऱ्यांना गरम कोट, टोप्या व कांबळी वाटण्याचा हुकूम दिला. लढाईत जखमी झालेल्या शिपायांची ती जातीने शुश्रूषा करी. शौर्याने कोण लढले याची अचूक माहिती तिला असे व शूरांचा सत्कार करण्यास ती कधी चुकली नाही.,

खास प्रसंगी राणीची स्वारी निघे तिचा थाट काय वर्णावा! ती कधी पालखीत, तर कधी मर्दानी पोशाखात घोड्यावर स्वार असे. तिच्या पुढे व मागे शंभर शंभर स्वार व अग्रभागी झाशीचा झेंडा फडकत असे.

## झाशीचा वेढा

राणीच्या रामराज्यात सुखाने राहणाऱ्या झांशीवर ६०,००० इंग्रजी फौजेची धाड आली. तात्या टोपे मदतीस आला पण त्याचे सामर्थ्य अपुरे पडले व त्याला माघार घ्यावी लागली. याप्रमाणे पुढे पराभव आ वासून उभा असताना ती धैर्यशाली डगमगली नाही. ती आपल्या शिपायांना म्हणाली

"आजपर्यंत झाशी लढली ती पेशव्यांच्या भरवशावर लढली नाही व पेशव्यांचा पराभव झाला म्हणून झाशी रणांगण सोडणार नाही. आजपर्यंत शौर्याने लढलात, तसेच लढत रहा."

साऱ्या बाजूने इंग्रज हल्ला करीत होते. त्यांना तोंड देण्यास राणी स्वतःच्या सैनिकांना प्रोत्साहन देऊ लागली. कुणाला तिने सोन्याचे कडे बक्षीस दिले, कुणाला पोषाख दिले, कुणाला शाबासकी दिली, कुणाचा आपल्या अमृततुल्य स्मिताने सत्कार केला, तर कुणाला आपल्या धीरगंभीर वाणीने प्रोत्साहन दिले. राणीचे सैनिक प्राणपणाने लढू लागले. गुलाम गौसखान व कुवर खुदाबक्ष हे राणीचे गोलंदाज मुख्य दरवाजावर चाल करून येणाऱ्या इंग्रजावर गोळ्यांचा वर्षाव करू लागले. बुरुजा-बुरुजावरून अग्निशस्त्रे आग ओकू लागली. गोळ्या व उल्कास्त्रे यांचा पाऊस पडला. त्यातून "हरहर महादेव", "मारो फिरंगीको" म्हणून राणीचे सैनिक गर्जना करू लागले. ले. डिक् व ले. मॅक्लेजॉन शिड्यांवरून चढून गोऱ्या शिपायास "आगे बढो" म्हणून आदेश देत होते. त्यांना राणीच्या गोळ्यांनी टिपले व झाशीवर आक्रमण करू पाहणाऱ्या त्या गोऱ्यांची शरीरे धाडकन कोसळली. त्यांच्यामागून ले. बोनस व फॉक्स चढून आले, पुनः राणीच्या सैनिकांनी फैरी झाडल्या, पुनः फिरंगी खाली कोसळले. त्या बरोबर इंग्रजी शिड्या हादरल्या. गोऱ्या फौजेला परतण्याचा आदेश देणारा बिगुल वाजला. दगडा-दगडाआड लपून गोरे शिपाई माघार घेऊ लागले. या प्रसंगाचे वर्णन करताना लो. म्हणतो की प्लूटो हा नरकाधिपती व कराल सर्पकेशी ग्रीक देवता फ्लूरी याच जणू इंग्रजी सैन्यावर तुटून पडल्या होत्या.

मुख्य दरवाजाने इंग्रजांना पिटाळून लावले पण फितुराने दक्षिणेकडील ओरछा-दरवाजा शत्रूच्या स्वाधीन केला. इंग्रज सैनिकांच्या झुंडीच्या झुण्डी आत येऊ लागल्या व त्यांनी सशस्त्र व निःशस्त्र, बाल व वृद्ध, स्त्री व पुरुष यांची कत्तल करायला सुरुवात केली.

ते दृश्य पाहताच महिषासुरमर्दिनीचे रक्त उसळून आले. अवघे पंधराशे निवडक सैनिक घेऊन ती किल्ल्याखाली उतरली व नंगी समशेर घेऊन इंग्रजावर तुटून पडली. गोऱ्यामागे गोरा राणीच्या तलवारींनी कापला गेला. ते पाहून उरलेले गोरे सैनिक शहराकडे पळाले व घरे, विहिरी वगैरेंच्या आडोशाने बंदुका चालवू लागले.

राणीचे शौर्य पाहून सर्वांनाच स्फुरण चढले. राणीचे अवघे पन्नास शिपाई पागांचे रक्षण करीत होते. ह्यू रोज साठ हजार सैन्यानिशी झांशीवर चालून आलेला होता. पण



राणीच्या पन्नास सैनिकांपैकी प्रत्येकजण मारला गेला तेव्हाच इंग्रजांना पागा सर करता आल्या.

## परशुरामाचा पर्वतभेदी बाण

झांशी इंग्रजांच्या सेनासमुद्रात बुडाली तेव्हा राणीने इंग्रज सैन्याची फळी फोडून काल्पीस पेशव्यांना जाऊन मिळण्याचा डाव रचला. सुमारे तीनशे निवडक स्वार बरोबर घेतले. पायात पायजमा, अंगात तारेचे चिलखत, कमरेस जंबिया व तलवार, अशा वेषात ती आपल्या जातिवंत घोड्यावर आरूढ झाली, इंग्रजी फौज आडवी आली तेव्हा "हर हर महादेव" गर्जना करीत ती तिच्यावर तुटून पडली. दूरच्यास बंदुकीच्या फैरी झाडून व जवळ येऊ धजावणाऱ्यास तलवारीने कंठस्नान घालीत ती जी भरधाव निघाली ती एखादा बाण ढालीस भेदून बाहेर पडावा त्याप्रमाणे इंग्रजी फौजेची फळी फोडून पार झाली.

मुख्य फौजेची फळी फोडून राणी पार गेल्यावर ले. बोकर पाठलागास निघाला. पण राणीच्या विद्युद्वेगी घोड्याने त्याला कित्येक मैल मागे टाकले. सकाळच्या प्रहरी राणी भंडीर नावाच्या खेड्यात पोहोचली. तेथील महालकऱ्याने राणीचा सत्कार करून तिला भोजन दिले.

सकाळची न्याहरी उरकून पुनः काल्पीकडे घोडा पिटाळला तोच बोकरची तुकडी पाठीवर येऊन आदळली. राणीजवळ अवघे पंधरा-वीस सैनिक उरले होते. बाकीचे शत्रूची फळी फोडून आपल्या प्राणप्रिय राणीचा प्राण वाचवण्यात धारातीर्थी पडले होते वा वाट चुकून अन्य मार्गाने गेले होते. बोकरला पाहताच राणी मागे फिरली. तिची तलवार विजेसारखी चमकली. बोकर घोड्यावरून खाली पडला. राणीचा प्रसाद मिळाल्यावर त्याने पाठलागाचा नाद सोडून दिला. राणीने परत काल्पीकडे धाव घेतली. सकाळपासून सुरू झालेली ही घोडदौड मध्यरात्रीपर्यंत सुरू होती. मध्यरात्री राणी सुखरूप काल्पीस पोहोचली. तिने ९० मैल अंतर कापले. एवढेच नव्हे, तर वाटेत बोकरासारख्या योद्ध्याला पाणी पाजले!

राणी इंग्रजांच्या वेढ्यातून काल्पीकडे कशी गेली याबद्दल ब्रिगेडियर फर्लॅशॅमने वेगळाच वृत्तान्त दिला आहे. तो असा-

लॉर्ड कॅनिंगने सर ह्यू रोजला सांगितले की राणीला न मारता जिवंत पकडून आणावे. हे कसे साधता येईल याचा विचार करून ह्यू राजने ब्रिगेडियर फल्यार्शॅमला राणीकडे

पाठवले. त्याने रोजचा निरोप राणीला कळविला. तो असा- "तुम्हाला मारण्याचा आमचा इरादा नाही. त्यामुळे तुम्ही प्राणपणाने लढण्याचा विचार सोडून शरण यावे. गोष्टी या थराला पोहोचल्यावर तुम्हाला तुमच्या सैन्याला उघडपणे सोडता येणार नाही. तेव्हा मी उपाय सुचवितो "ओरछा रस्त्याने तुम्ही निसटल्यास तुम्हास कोणीही अडविणार नाही. थोडे अंतर कापल्यावर तुम्ही आमच्या सैन्याकडे यावे तुमचे स्वागत होईल."

हा निरोप ऐकल्यावर राणीने शेरखान नावाच्या आपल्या अंगरक्षकाला फल्याशॅमला कैद करण्यास सांगितले. वेढा फोडून जाताना तिने फल्याशॅमला एका दुसऱ्या घोड्याला बान्धून आपल्या बरोबर घेतले. राणीचा मुलगा प्रचलित वृत्तान्ताप्रमाणे तिच्या पाठीवर बान्धलेला नसून एका वेगळ्या घोड्यावर एका वेगळ्या स्वाराच्या रक्षणाखाली होता. हेच जास्त सयुक्तिक आहे. कारण मुलगा पाठीवर बान्धून युद्ध करणे शक्य नव्हते. ओरछा रस्त्यावर आल्यावर राणीने इंग्रजी छावणीचा रस्ता सोडून काल्पीचा रस्ता धरला. थोडी मजल केल्यावर इंग्रजांचे घोडेस्वार पाठलाग करीत आले. त्यापैकी एकाने तिच्यावर हल्ला केला. तेव्हा तिचा घोडा किंचित वाकला. राणीने त्याला लगामाने सरळ केले व हल्ला करणाऱ्या स्वारावर वार केला. तो त्याच्या हाताला लागला व त्याने माघार घेतली. राणीची तरवार त्याच्या रक्ताने माखली. ती तरवार तिने फल्याशॅमच्या समोर नाचविली व राणी शरण येणार नाही असें सुचविले.

राणी सुखरूप पोहोचली पण तिचा विश्वासू सेवक, तिचा लाडका घोडा, राणी खाली उतरल्यावर धाडकन् मूर्च्छित पडला. कर्तव्यपूर्ती होईपर्यंत ते मुके जनावर तहान, भूक व थकवा विसरले होते. पण कर्तव्य संपल्याबरोबर शरीराचे दौर्बल्य प्रकट झाल्याशिवाय राहिले नाही! ५७ सालच्या अनेक मानवदेहधारी देशद्रोह्यांपेक्षा त्या मुक्या जनावराचे जीवन अधिक उदात्त होते!

## काल्पी व ग्वाल्हेर

पुढे ह्यू रोज काल्पीवरही चालून आला. त्याला तोंड देण्यासाठी पेशव्यांची सेना पुढे सरसावली. बिनीच्या तुकडीने सरळ हल्ला केला पण तिला मागून तोफांचा पाठिंबा अपुरा पडल्यामुळे माघार घ्यावी लागली. हे पाहून राणीने आपला घोडा पुढे घातला;तिचे केशरी घोडदडही मागोमाग आले. झंझावातासारखा हा हल्ला झाल्याने इंग्रजांच्या उजव्या बाजूने कच खाल्ली व त्यांची फौज पळू लागली. मागे तोफखाना होता तो राणीच्या



घोडदळावर आग ओकू लागला. पण चार भोडोत्र्यांच्या तोफांचे गोळे त्या स्वातंत्र्यदेवतेला अडवणार काय? ती बेधडक तोफखान्यावर चालून गेली. काही गोलंदाज तिने कापून काढले. उरलेले तोफा सोडून पळाले.

पुढे क्रांतिकारकांचा मोर्चा ग्वाल्हेरवर वळला. शिंदे स्वातंत्र्ययुद्धात सामील होतील असे पेशव्यांना वाटत होते. पण जयाजीराव शिंदे आपली सारी फौज घेऊन आपल्या धन्यावरच चालून आला. शिंद्यांना जोडेराखणीतून मुक्त करून सिंहासनावर बसवणारे पेशवे हे त्याला शत्रू वाटत होते व देशाचे शत्रू फिरंगी हे त्यांचे धनी झाले होते.

जयाजी शिंदे पेशव्यावर चालून येत आहे असे पाहून राणीने आपले तीनशे सैनिक सिद्ध केले व सरळ जयाजीराव शिंदे व त्यांचे अंगरक्षक "भालेघाटी" यांच्यावर ती तुटून पडली. राणीचा हा हल्ला होताच जयाजी व त्याचे भालेघाटी, शेपूट दाबून पळाले, बाकीचे सारे सैन्य पेशव्यांचा जयजयकार करीत क्रान्तिकारकांच्या निशाणाखाली आले

## सूर्यमण्डल भेदिले

ग्वाल्हेर सर झाले. आपण क्रांतीची ज्योत विझविली असे ह्यू रोजला वाटत होते, पण त्या क्रान्तीचा लहानसा स्फुल्लिंग राणीच्या रूपाने ग्वाल्हेरीवर पडला व ती ज्योत पुनः नव्या तेजाने धगधगू लागली.

ग्वाल्हेर सर केल्यावर इंग्रजी फौज ग्वाल्हेरवर चालून येईपर्यंत पेशव्यांना पंधरा दिवसांची उसंत मिळाली होती. तिचा उपयोग सैन्याची शिस्त व सज्जता वाढविण्यासाठी करावा म्हणून राणीने खडसावून सांगितले पण पेशव्यांनी राज्याभिषेकाचे उत्सव करण्यात व्यर्थ वेळ घालविला. राणीची दक्षता पेशव्यात नव्हती.

इंग्रज प्रचंड सैन्य घेऊन ग्वाल्हेरवर चालून आले. राणी त्यांच्याशी सामना देण्यास पुनः सज्ज झाली. पूर्व दरवाजाचे रक्षण करण्याची कामगिरी तिच्यावर सोपविण्यात आली होती. इंग्रजांच्या बाजूने या आघाडीची जबाबदारी जनरल स्मिथवर होती. राणीने काशी व मुन्दर या आपल्या सख्यांना युद्धाचे पाठ दिले होते. सैनिक वेषात त्याही घोड्यावर आरुढ झाल्या. जनरल स्मिथने अनेक वेळा राणीच्या फळीवर हल्ला केला. पण समुद्राच्या लाटा कितीही उसळल्या तरी पर्वतावर आदळून ओसरतात त्याप्रमाणे स्मिथच्या सैनिकांना पुनः पुनः मार खाऊन परतावे लागले. तेव्हा राणीचा पराभव करण्याचा नाद सोडून त्याने आपला मोर्चा दुसरीकडे वळविला.

राणीच्या शेवटच्या संगरलीलेचा वृत्तांत निश्चित नाही. घोड्यावर स्वार होऊन ती व तिची प्राणप्रिय सखी मुन्दर एका टेकडीवरून शत्रुसैन्याची टेहेळणी करीत असता फिरंगी गोळी लागून मरण पावल्या व मग भोवतालच्या लोकांनी घाईने राणीचा दहनविधी उरकून घेतला असे रॉबर्ट हॅमिल्टन म्हणतो, उलट मॅक्फर्सनचा वृत्तांत प्रचलित वृत्तांताशी अधिक जुळतो. प्रचलित वृत्तांताप्रमाणे तिच्या साऱ्या सैन्याचा मोड झाल्यावर ब्रिटिश हुसार तिचा पाठलाग करू लागले. पुढे राणी व मागे मुंदर घोड्यावर स्वार होत्या. मुंदर मागे पडू लागली. तिला एका फिरंग्याने गाठले "बाईसाहेब मेले!!" म्हणून मुंदरची किंकाळी ऐकू आली. राणीचे हृदय कालवले. स्वतःच्या सुरक्षिततेची फिकीर न करता ती मागे वळली, मुंदरचे प्राण घेणाऱ्या फिरंग्याला तिने कंठस्नान घातले व पुनः वेगाने घोडा पुढे फेकला. घोडा एका ओढ्यावरून उडी न मारता तेथेच घुटमळू लागला. फिरंगी पाठीशी येऊन थडकले, तेव्हा राणी परत फिरली. तिची तलवार म्यानातून निघाली. राणीची एक तलवार व फिरंग्यांच्या तलवारी अनेक. वैश्वानराच्या सप्त जिव्हा स्वातंत्र्याच्या उमलत्या कलिकेला ग्रासू लागल्या. एक वार डोक्यावर लागला व उजवा डोळा लोंबू लागला. दुसरा वार छातीवर लागला. तिचे प्राण कंठाशी आले. पण त्याही परिस्थितीत ती जमिनीवर कोसळली नाही, घोड्यावरच पालथी बिलगून राहिली. तो विश्वासू घोडा तिला गर्दीतून बाहेर घेऊन आला. जवळच एका गवताच्या गंजीवर तिला विधिपूर्वक अग्नी देण्यांत आला!!

■■■





प्रकरण सात

# मानवी गरुड व ऐंशीतला तरणाबांड

सत्तावनच्या क्रांतीयुद्धाने एका नाजूक स्त्रीला रणदेवता बनविले. तसेच एका साध्या कारकुनाला ब्रिटिशांच्या मुरलेल्या सेनापतीशी झुंज देण्याची स्फूर्ती दिली.

तात्या टोपे हा पेशव्यांच्या वाड्यातला एक साधा कारकून होता. त्याला सैनापत्याचे शिक्षण व अनुभव मिळालेला नव्हता. एवढी पूर्वतयारी असता अचानक बंड करून उठलेल्या शिपायांचे सैन्य घेऊन इंग्रजासारख्या विश्वविजयी शत्रूशी लढण्याची जबाबदारी त्याच्यावर येऊन पडली. ती त्याने उत्साहाने पत्करली. इंग्रजांनी कानपूर काबीज केले. क्रांतिकारी सैन्याची वाताहत झाली. तेव्हा तात्या टोपे ग्वाल्हेरला गेला व मुरारच्या छावणीतले सैन्य फितवून त्याने आपल्या बाजूस आणले. या सैन्याच्या साहाय्याने त्याने कानपूरजवळील काल्पीचा किल्ला काबीज केला व पुढील लढायांसाठी काल्पी हा तळ बनवून कानपूर इंग्रजांच्या तावडीतून सोडविण्यासाठी कानपूरवर मोर्चा वळविला.

कानपूरच्या ब्रिटिश फौजांवर यावेळी जनरल विंडहॅम हा सेनापती होता. विंडहॅमने युरोपच्या रणांगणावर नाव कमावले होते. अशा सेनापतीशी टक्कर देण्यास बंड करून उठलेले शिपायी व त्याच्यात उत्साहाने सामील झालेले काही अडाणी शेतकरी यांना घेऊन कालचा कारकून तात्या टोपे कानावरची लेखणी खाली ठेवून जिचे नुकतेच पाणिग्रहण केले होते ती तलवार परजून सरसावला. आपले कोठार जालन्याला ठेवून त्याने कानपूरच्या आसपासची काही खेडी आणि वाटेतील महत्त्वाची ठाणी काबीज केली व शिवराजपुराकडे धडक मारली. यामुळे विंडहॅमच्या सैन्याची नाकेबंदी होऊ लागली.

## हरिण लांडग्याचा पाठलाग करते

विंडहॅमला असे शिकविण्यात आले होते की आशियाई सैन्य आपल्या तोंडावर शत्रूने बेधडक चाल केली की कच खातात, मग शत्रूचे बल कितीही कमी का असेना? या शिकवणुकीनुसार तात्या चालून येण्याची वाट न पाहता विंडहॅमच काल्पीजवळील एका पुलापर्यंत येऊन धडकला.

तात्या सिरखंडीवरून पांडू नदीवर आला तेव्हा विंडहॅमने त्याच्यावर सरळ हल्ला केला. तात्याने जंगलाच्या आश्रयाने इंग्रजी फौजांवर तोफांचा मारा केला. पण विंडहॅमची सुरवातीची धडक यशस्वी होऊन तात्याच्या तीन तोफा त्याने काबीज केल्या. आपण नेहमीप्रमाणे विजयी झालो म्हणून विंडहॅम हुरळून गेला. पण इंग्रजांचे नेहमीचे भाग्य यावेळी पारखे झाले आहे हे त्याला लवकरच भयंकर रीतीने कळून चुकले. तात्याचे "एशियाटिक" नेहमीप्रमाणे गोऱ्यापुढे पळ न काढता सरळ तोंडावर चालून आले व गोऱ्यांनाच पळ काढावा लागला. हरिणच लांडग्याचा पाठलाग करू लागले. गोऱ्या फौजेने पळून थेट कानपूर गाठले.

तात्याही ससाण्यासारखा मागून आला. इतक्यात शेवली आणि शिवराजपूर येथील क्रांतिकारकांच्या साऱ्या टोळ्या तात्यांच्या मदतीस आल्या व त्यांनी इंग्रजी फौजेच्या उजव्या फळीवर गोळीबार सुरू केला. इंग्रजी फौजा माघार घेऊ लागल्या. तात्याने आपल्या सैन्याची व्यूहरचना अर्धवर्तुळाकार केली. या अर्धवर्तुळाच्या कैचीत सारी ब्रिटिश फौज फस्त करण्याचा तो प्रयत्न करू लागला. या कैचीचा भेद करून जाण्याची विण्डहॅमने शिकस्त केली पण ती अभेद्य असल्याचा त्याला अनुभव आला. त्याची डावी फळी तोफा सोडून पळाली. उजवी फळीही लवकरच मोडली. इंग्रजांचे हजारो तंबू, बैल व सारी रसद तात्याच्या हाती आली. अर्धे कानपूरही त्याने काबीज केले.



माघारी गेलेल्या विण्डहॅमने दुसऱ्या दिवशी सकाळी पुनः हल्ला केला. हल्ला निकराचा होता पण तो लाटांनी खडकावर हल्ला करावा त्याप्रमाणे विफल ठरला. ब्रि. विल्सन, मे. स्टर्लिंग, कॅ मॅक्री वगैरे इंग्रज अधिकाऱ्यांचे मुडदे पडले. संध्याकाळपर्यंत तुंबळ युद्ध होऊन इंग्रजांचा निःपात झाला व सारे कानपूर तात्याच्या हाती आले.

तात्याच्या या विजयाबद्दल चार्ल्स वालच्या इण्डिन म्यूटिनी या ग्रंथात पुढील उद्‌गार आढळतात : "सर्वत्र विजयी म्हणून विश्वविख्यात असलेल्या इंग्रजी फौजेने भारताच्या तुच्छ गणलेल्या रहिवाशासमोर हार खाल्ली! तिचे सारे शिबिर व शस्त्रास्त्रे भारतीयांच्या हाती सापडली. भारतीयांसमोर आपले हत्ती, घोडे व उंट घेऊन 'फिरंगी' पळत सुटले. फारच लाजिरवाणी घटना घडली."

## तात्याची गरुडभरारी

तात्या टोपेने केलेला विण्डहॅमचा पराभव कौतुकास्पद असला, तरी त्याचे नाव त्या काली भारतात व युरोपात सर्वतोमुखी झाले ते विण्डहॅमच्या पराभवामुळे नसून त्याच्या गनिमी काव्यामुळे. शूराची खरी परीक्षा पराभवाच्या काळी होते. दिल्ली, लखनौ, झांशी, काल्पी, कानपूर व ग्वाल्हेर हे क्रांतीचे सारे बुरुज ढासळून पडले. राणी लक्ष्मीबाई व राजा कुमारसिंग हे योद्धे इहलोक सोडून गेले. इंग्रजांची सर्वत्र सरशी झाल्यामुळे नवीन पलटणी बंड करून उठणे तर दूरच, बंड करून उठलेले शिपायी देखील शरणागती पत्करू लागले. आता सर्व संपले असेच सर्वांना वाटले असले पाहिजे. पण अशा हताश परिस्थितीत देखील तात्याने शस्त्र खाली ठेवले नाही. इंग्रजांशी समोरासमोर लढायचे सोडून त्याने आता गनिमी काव्याचा अवलंब केला. एक समकालीन इंग्रज लिहितो, "यानंतर तात्याने पीछेहाटीचा डाव अशा अद्‌भुत रीतीने मांडला की त्याचा पूर्वीचा पराभव कःपदार्थ वाटू लागला. पूर्ण पराभवानंतर देखील दहा महिने त्याने लढा चालू ठेवला. त्याचे नाव साऱ्या युरोपात त्याचा पराभव करणाऱ्या इंग्रज सेनापतीपेक्षाही अधिक गौरवाने उच्चारले जाते. त्याचे काम जवळ जवळ अशक्य कोटीतले होते. सतत पराभवामुळे खचलेल्या शिपायांना संघटित ठेवून धीर देणे, त्यांच्यासाठी शस्त्रास्त्रे व अन्नपाणी यांची व्यवस्था करणे व चारी बाजूने लांडगेतोड करीत असलेल्या ब्रिटिश फौजांपासून कधी हुलकावण्या देऊन तर कधी तोंड देऊन आपला बचाव करणे. अशाही परिस्थितीत तात्याने नवीन सैनिक गोळा केले; रोजी साठ मैलाच्या वेगाने भराऱ्या मारल्या, अनेक शहरे काबीज केली व इंग्रजांना उसंत मिळू दिली नाही."

**(Friend of India)**

१७ जानेवारी १८५९ चा टाइम्स लिहितो "आमचा उल्लेखनीय मित्र तात्या टोपे हा मोठा त्रासदायक व चाणाक्ष शत्रू आहे. त्याची स्तुती कशी करावी? अनेक महिन्यांपासून सारे मध्य हिंदुस्थान त्याच्या नावाने दुमदुमत आहे. त्याने आमची ठाणी व खजिने लुटले. नवी सैन्ये उभारली व गमावली. त्याचे एक सैन्य नाहीसे करावे तोच तो दुसरे उभे करतो. त्याची गरुडभरारी बहुशाख सौदामिनीप्रमाणे आहे. त्याने नर्मदा दोन्ही बाजूने पार केली, आमच्या फौजांच्या मागे, पुढे व मध्ये देखील अनिर्बंध संचार केला. एरियल देखील एवढा सूक्ष्मगामी नव्हता. नद्या, पर्वत, दऱ्या व दलदली त्याला अडवू शकत नाहीत. तो पोर्टिअससारखा हुलकावण्याबहाद्दर आहे."

## राजा कुमारसिंग

सत्तावनच्या उठावाने एका कारकुनाला सेनापतीची क्षमता दिली तसेच ऐंशी वर्षाच्या एका वृद्धामध्ये स्वतःचे शरीर संभाळण्यासाठी काठीचा आश्रय घेण्याऐवजी तरवारीच्या तांडवाने रणांगणावर शत्रूची मस्तके उडविण्याचे सामर्थ्य दिले. ऐंशी वर्षाचा हा भीष्माचार्य म्हणजे राजा कुमारसिंग. कुमारसिंगाची वीरगाथा, तात्या टोपे व राणी लक्ष्मीबाई यांच्याइतकीच रोमांचकारी असून देखील त्यामानाने अप्रसिद्ध आहे ही फार शोचनीय गोष्ट आहे.

कुमारसिंग उठावाची तयारी करीत आहे अशा अनेक तक्रारी पाटण्याचा कमिशनर टेलर याच्याकडे पोहोचल्या होत्या. पण ऐंशी वर्षाचा म्हातारा इंग्रजाविरुद्ध युद्धास उभा ठाकणार आहे ही कल्पनाच टेलरला अशक्य कोटीची वाटली. तरीपण सेनापती या नात्याने नव्हे तरी कारस्थानांचे केंद्र म्हणून "बंड" वाल्यांना त्याचा उपयोग होण्याचा संभव होता. म्हणून कुमारसिंगाला आपल्या घरी बोलावून कपटाने अटक करण्याचा टेलरने डाव रचला. (अफजलखान प्रसंगाबद्दल गाजावाजा करणाऱ्या इंग्रज इतिहासकारांना यात काहीच विशेष घडले असे वाटत नाही हे लक्षात ठेवण्यासारखे आहे) "तुमचे वय झाले आहे, तुमची प्रकृतीही बरी नसते. म्हणून तुमच्या भेटीस मी उत्सुक आहे" असा टेलरने निरोप पाठवला. त्यावर कुमारसिंगाने उत्तर दिले : "खरेच आहे. मी आजारी आहे. त्यामुळेच मी येऊ शकणार नाही. मला बरे वाटले की येईन."

कुमारसिंगाला लवकरच "बरे वाटले" व तो जाण्यास निघाला.



दानापूरच्या शिपायांची टोळी घेऊन तो ब्रिटिश सत्तेचा नाश करण्यासाठी जगदीशपुरातून बाहेर पडला. त्याने आरा काबीज केले, तेथील खजिना ताब्यात घेतला व ब्रिटिश सत्तेची चिन्हे नष्ट केली.

ही बातमी ऐकताच डनबारच्या नेतृत्वाखाली एक ब्रिटिश दळ आऱ्यावर चाल करून येऊ लागले. रात्रीची वेळ होती. आरा जवळ आला तरी कुमारसिंगाचे कुठेच चिन्ह दिसेना. आपल्या आगमनाची वार्ता ऐकताच म्हातारा पळून गेला अशी डनबारला आशा वाटली. तोच भोवतालच्या आम्बराईतून सू सू गोळ्या सुटू लागल्या व डनबारचा एकेक सैनिक कोसळू लागला. आम्बराईमध्ये सैनिक कुठेही दिसेनात. आम्ब्याची झाडेच फैरी झाडत आहेत की काय असे वाटत होते. डनबारचा बळी पडला. बाकीचे फिरंगीही पळू लागले. पळता पळता एका खड्ड्यामध्ये त्यांनी आश्रय घेतला. पण कुमारसिंगाच्या धडकीमुळे आपल्या जखमी साथीदारांना तेथेच सोडून ते शोण नदीकडे पळाले व आपल्या नावा शोधू लागले. पण पुष्कळशा नावा कुमारसिंगाच्या शिपायांनी जाळून टाकल्या होत्या.

## वृद्ध योद्ध्याचे वृकयुद्ध

पुढे ब्रिटिश फौजांच्या वाढत्या सामर्थ्यामुळे कुमारसिंगाला आपली राजधानी जगदीशपूर सोडावी लागली व त्याने गनिमी काव्याचा अवलंब केला. बीव्ह्यामधील क्रान्तिकारक त्याने आपल्या जोडीस घेतले व अन्त्रोलियावर झडप घातली. अन्त्रोलिया अजिमगडापासून २५ मैलावर आहे. कुमारसिंग अजिमगडाच्या इतक्या जवळ आलेला पाहून मिलमन कुमारसिंगावर चालून गेला. कुमारसिंगाने त्याला सरळ तोण्ड न देता हूल दिली व तो सैन्यासकट दिसेनासा झाला. मिलमनचे सैन्य रात्रभराची मजल मारून दमलेले होते. शत्रूशी लढावे न लागताच जय मिळाला म्हणून मिलमन हुरळून गेला व त्याने सैन्यास नाश्ता करून विश्रान्ती घेण्याची परवानगी दिली. सारे सैन्य एका आम्बराईखाली आराम करू लागले. कोणी पावाचा तुकडा तोण्डात घातला, कोणी चहाचा पहिला घुटका घेतला तोच...

"धाड् धाड्!!" कुमारसिंगाच्या बन्दुका गरजू लागल्या. नाश्त्याची बैठक उधळली. तोण्डातले घास गळून पडले. आपल्या शस्त्रापर्यन्त पोहोचायच्या आधीच काही सैनिक पालथे झाले. उसाची शेते, आंब्याची झाडे, मातीचे ढीग यांच्यातून कुमारसिंगाच्या गोळ्या

सू सू सुटत होत्या. मिलमनने पळ काढला. कुमारसिंगाने त्याची लांडगेतोड सुरू केली व मिलमनला अजिमगडापर्यन्त पिटाळले.

अजिमगडामध्ये आणखीही ब्रिटिश फौज होती. ती मिलमनच्या मदतीला आली व या दुहेरी फौजेने कुमारसिंगावर फेरहल्ला केला. पण कुमारसिंगाने पूर्वीप्रमाणेच कच खाल्ल्याचे सोंग करून ब्रिटिश फौज अडचणीच्या ठिकाणी आणली व तिच्यावर हल्ले सुरू केले. पुनः ब्रिटिश फौजेने पळ काढला व ती अजिमगडातील तटबन्दीच्या आड दडून [illegible]

कुमारसिंगाचा पाठलाग करण्यासाठी लूंगार्डने घोडदळाची एक तुकडी पाठवली. ही तुकडी माऱ्याच्या टप्प्यात येताच कुमारसिंगाचे तीवर गोळ्यांचा वर्षाव करण्यास सुरुवात केली. एकेक फिरंगी कोसळू लागला व लवकरच पाठलाग करणाऱ्यांनीच पळ काढला. ही बातमी ऐकून डग्लस ताजी फौज घेऊन लूंगार्डच्या मदतीस आला. तेव्हा कुमारसिंगाने आपल्या फौजेने तीन भाग केले. एका भागाला डग्लसचा हल्ला रोखून धरण्याचे काम सांगण्यात आले व दुसरे दोन भाग निरनिराळ्या मार्गांनी मार्गक्रमण करू लागले. पहिल्या [illegible]

जगदीशपुरावर चालून आला व त्याने कुमारसिंगाच्या सैन्यावर तोफांचा मारा सुरू केला. कुमारसिंगाजवळ तोफा नव्हत्या, तरी त्याने ग्रॅण्डचा हल्ला परतवून लावला व त्याच्या घोडेस्वारांनी ब्रिटिश फौजेची लांडगेतोड सुरू केली. ब्रिटिशांना पळता भुई थोडी झाली. त्यांच्या जखमी सैनिकांना उचलून नेण्यासाठी सोळा हत्ती वापरण्यात आले. त्यांच्या तोफा देखील कुमारसिंगाच्या हाती लागल्या.

राजधानीवरचा हल्ला परतवून लावल्यावर कुमारसिंग परतला पण त्याच्या मनगटावर झालेली जखम विषारी ठरली. शेवटच्या विजयानन्तर तीन दिवसांनी तो इहलोक सोडून गेला. कुमारसिंग जिवन्त असेपर्यंत ब्रिटिशांना त्याचा पराभव करता आला नाही. ऐंशी वर्षांच्या या राजपूत वीराने जेता म्हणून जगाचा निरोप घेतला.

मजुमदारासरखे करण्टे लेखक, सत्तावनचा उठाव ललाटी अपयश घेऊनच जन्माला आला, the fight was hopeless from the very begining असे म्हणतात. जे घडले तेच घडणे अपरिहार्य होते असे म्हणून शहाणपणा पदरी घेणे फारच सोपे आहे. मजुमदारांना इंग्रज कितीही अजिंक्य वाटत असले तरी सत्तावन साली थोडक्यात निभावली, दैवाने थोडी जरी साथ सोडली असती तरी भारतातून अपमानास्पद रीतीने आपली हकालपट्टी झाली असती असे इंग्रज लेखक कबूल करतात. क्रान्ती फसण्याचे मुख्य कारणही त्यांच्या मते हेच होते की गुरखे शीख, वगैरे अनेक भारतीय लोक देशाचा द्रोह करून परकीय सत्तेला मदत करीत होते. रसेल म्हणतो : It must be admitted that the British would have been exterminated if the natives had been all hostile to them. Our siege of Delhi would have been quite impossible if the Sikhs had not joined our battalions, इंग्रजांचे सामर्थ्य केवढेही असो. आमच्या पराभवाचे कारण आमचा देशद्रोह हेच होते.

■■■





# प्रकरण आठ | जिहादाचे धर्मयुद्धात रूपान्तर करणारा महान् संग्राम

गेल्या वर्षी सत्तावनची दीडशेवी शताब्दी साजरी झाली. त्या निमित्त बरेच नवे लिखाण झाले. त्यात माझ्या या ग्रन्थातील प्रतिपादनाचा पुनर्विचार करावा लागेल असे काहीही नाही. पण ''काश्मीर'' ''पहिले खलीफा'' वगैरे अभ्यासपूर्ण ग्रन्थ लिहिणाऱ्या श्री. शेषराव मोरे यांनी ''१८५७ चा जिहाद'' या नावाचा ग्रन्थ लिहून सत्तावनचे युद्ध हे मूलतः व मुख्यतः इंग्रजी राज्य नष्ट करून त्या जागी साऱ्या काफिरांची कत्तल करण्याचे ध्येय गाठणाऱ्या मुसलमानांच्या वहाबी सारख्या पंथानी केलेला जिहाद होता, असा सिद्धान्त माण्डला आहे. पूर्वी कधी न ऐकलेले सत्तावनचे हे वर्णन वाचून तो ग्रन्थ वाचण्याची इच्छा झाली व तो वाचून आता हे प्रकरण लिहीत आहे.

मोरे यांनी ज्या क्रमाने विधाने केली आहेत. त्याच क्रमाने त्यांची विधाने घेतो.

**पृष्ठ १९**

"मुसलमानांचा भारतावर आक्रमण करण्याचा हेतू भारताला इस्लामी देश बनविणे हा होता" हे वाक्य अतिव्यापक आहे. त्याची पूर्ण शहानिशा करण्यासाठी कासिमच्या सिंध प्रान्तावरील स्वारीपासून औरंगजेबापर्यंतचा इतिहास तपासावा लागेल. पण हे वाक्य वाचल्याबरोबर अकबराचा अपवाद कोणाच्याही लक्षात येण्यासारखा आहे. अकबराने स्वतःच इस्लामचा त्याग करून दिने इलाही हा नवीन धर्म स्थापन केला होता. त्या धर्माचे तत्वज्ञान जिहादी होते असा आरोप करता येणार नाही. अकबराने जिझिया कर रद्द केला होता.

अकबराचे धोरण जहांगीरने पुढे चालू ठेवले होते. त्याने जिहादी प्रचार करणाऱ्या सरहिन्दीला अटकेत टाकले.

औरंगजेबाचा भाऊ दारा शुकोह याने उपनिषदांची भाषान्तरे करविली होती.

अपवाद सांगितल्याने नियम सिद्ध होतो असा यावर आक्षेप घेण्यात येईल. पण सारे मुस्लिम राज्यकर्ते जिहादी तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते होते या मताचे खण्डन करण्यासाठी डॉ. ताराचन्द यांनी लिखाण केले आहे. भारताचे शिक्षणमंत्री व ऑक्स्फर्डमधून इतिहासात डी. फिल् मिळविलेले डॉ. नूरुल हसन यांनी खुद्द औरंगजेबाने हिन्दू मन्दिरांना देणग्या दिल्याचीं उदाहरणे दिली आहेत.

श्री मोरे अरबांच्या इतिहासाशी चांगले परिचित आहेत. अरबांनीच इस्लामच्या स्वीकारानन्तर हिन्दूंच्या विद्यांचे अध्ययन करून भारतीय अंकगणित, बीजगणित, आयुर्वेद इत्यादि विद्या युरोपात प्रसारित केल्या म्हणून युरोपात विज्ञानाचा वृक्ष फोफावू शकला. बर्टरॅण्ड रसेलने Numero Algartimi Indum म्हणजे "हिन्दूंचे संख्यांचे शास्त्र" नावाच्या एका लॅटिन ग्रन्थाचा उल्लेख केला आहे. हा ग्रंथ एका अरबी ग्रंथाचा अनुवाद आहे. ज्यांना इंग्रज लोक अॅरेबिक संख्या असे म्हणतात त्यांना अरबी भाषेत हिन्दसा म्हणजे हिन्दू संख्या असे म्हणतात.

केवळ जिहादी, काफिरांच्या विद्याचे अध्ययन करून त्यांचा प्रसार कराण्याचे कार्य करणार नाहीत.

मौ. आझाद भारताचे इस्लामीकरण करण्याच्या पक्षाचे होते. पण त्यांनी गांधींच्या सत्याग्रहात भाग घेतला होता व गांधींच्या "रघुपति राघव राजाराम" या भजनावर त्यांनी कधी आक्षेप घेतल्याचे ऐकिवात नाही. पं. नेहरू यांनी बरेच इतिहासलेखन केले आहे.



Mughlas werw the national rulers of India हे त्यांचे सुभाषित प्रसिद्ध आहे.

तेव्हा मोरे यांच्या विधानाला दुसरी बाजू आहे. तिच्या खण्डनार्थ त्यांनी एखादे प्रकरण लिहायला हवे होते.

**पृष्ठ ४०**

उत्तर भारतात अयोध्या प्राप्ताचा पदच्युत नबाब वजीर अली खान (१७८१ ते १८१८) इंग्रजांच्या उच्चाटनाचे प्रयत्न करीत होता. हे वजीर अलीचे कारस्थान व बण्ड म्हणून ओळखले जाते. वजीरअली आपल्या प्रजेत अतिशय लोकप्रिय होता. सैन्यातील मोठा भाग त्याच्या बाजूने झाला होता.

त्याने अफगाणिस्तानच्या झमानशहाशी सन्धान बान्धून त्याला भारतावर स्वारी करण्यास उद्युक्त केले.

वजीर अलीच्या या कारवाया जिहादी होत्या याचा पुरावा मोरे यांनी दिला नाही. शिवाय तो आपल्या प्रजेत अतिशय लोकप्रिय होता यावरून तो हिन्दूतही लोकप्रिय हाता असे मानले पाहिजे कारण अयोध्येची बहुवंश प्रजा हिन्दू आहे. तसेच सैन्यातील फार मोठा भाग वजीर अलीच्या बाजूने होता यावरून तो हिन्दू सैनिकांतही प्रिय होता असे म्हणता येते. कारण हे सैन्य बव्हंवश मुस्लिमांचे होते ,असा पुरावा मोरे देत नाहीत.

**पृष्ठ ४२ ते ४५**

या पृष्ठांवर हाजी शरियत उल्लाह यांचा जिहादी म्हणून उल्लेख आहे. त्यांनी बंगालमध्ये स्थापन झालेल्या ब्रिटिश सत्तेविरुद्ध आवाज उठविला कारण तेथे करवसुलीचे काम इंग्रजांच्या वतीने करणारे हिन्दू श्रीमन्त झाले होते व मुस्लिम रयत गरीब झाली होती.

पण शरियत उल्लाहच्या अनुयायांनी बंगालच्या हिन्दूविरुद्ध कोणती दुष्कृत्ये केली हे मोऱ्यानी सांगितलेच नाही. हिन्दूविरुद्ध दुष्कृत्ये करण्यास त्यांना धर्माव्यतिरिक्त आर्थिक कारणही होते हे स्वतः सांगताना शरियत उल्लाहला जिहादी ठरविण्याच्या प्रयत्नाच्या हा उल्लेख विरुद्ध जातो हेही त्याच्या लक्षात आलेले दिसत नाही.

शरियत उल्लाहचा पुत्र दादू मिया याने ८०००० अनुयायी गोळा केले. त्यांनी १८५७ च्या उठावात सक्रिय भाग घेतला होता असे मोरे सांगतात. मोऱ्याच्या विवेचनावरून हा उठाव बंगालमध्ये झाला होता असा ध्वनी निघतो. सर्वसाधारण समजूत अशी आहे की १८५७ मध्ये बंगालमध्ये उठाव झालाच नाही. या उठावाबद्दलचे जे सरकारी प्रतिवृत्त मोरे यांनी उद्धृत केले आहे. त्यात या मुस्लिम बण्डखोरांनी हिन्दूवर अत्याचार केले असा उल्लेख नाही.

**पृष्ठ ५८ ते ६२**

रणजीतसिंगाच्या कृपेने पेशावरमध्ये राज्य करणाऱ्या यार मुहम्मद खानाने शिखांच्या विरुद्ध मुसलमानांनी १८२७ मध्ये सुरू केलेल्या युद्धातून माघार घेतल्यामुळे मुसलमानांचा पराभव झाला असे ५९ व्या पृष्ठावर सांगितले आहे. ६२ व्या पृष्ठावर रणजितसिंगाने १८३१ मध्ये एका मुस्लिम सेनेचा पराभव केला असे सांगितले आहे. १८५७ च्या तथाकथित मुस्लिम जिहादाशी या दोन घटनांचा संबंध काय?

पृष्ठ ७३ वर स्वतः मोरे यांनीच खालील विधान केले आहे-

"प्रा. मजुमदार यांनी या चळवळींची थोडक्यात माहिती दिली आहे, पण त्याचा पुढच्या १८५७ च्या उठावाच्या स्वरूपाशी संबंध जोडलेला नाही."

येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की रमेशचन्द्र मजुमदार यांनी सत्तावनच्या उठावाची निन्दा करण्याची प्रतिज्ञाच केली होती. तसेच ते डॉ ताराचन्द, पं. नेहरू वगैरेसारखे मुस्लिम पक्षपती नसून उलट मुस्लिम इतिहासाकडे चिकित्सकतेने पाहत होते. त्यांना देखील जिहाद व १८५७ यांचा संबंध तद्विषयक आधार वाचून देखील दिसला नाही.

**पृष्ठ ७२, ७३**

"पनिपतच्या लढाईत उत्तरेतल्या हिन्दूंनी मराठ्यांना पाठिंबा दिला नाही. माण्डलिक बनण्याची मानसिकता हे मदत न करण्याचे मुख्य कारण होते."

मोऱ्यांची माहिती चुकीची आहे. भरतपूरचा सूरजमल जाट भाऊसाहेबांच्या मदतीस होता पण लष्करी हालचालीबद्दलच मतभेद झाल्यामुळे सोडून गेला. सोडून गेल्यावरही त्याने वाताहत झालेल्या मराठा सैन्याला व भाऊसाहेबांच्या कुटुंबाला संरक्षण दिले.

या पेक्षाही मोठे कार्य शिखांनी केले. **पानिपतात मराठ्यांचा पराभव झाला असला तरी भारताचा पराभव झाला नाही.** अब्दाली जेता म्हणून परत गेला नाही. शिखांनी त्याच्या सैन्याची लाण्डगेतोड केली व कसाबसा जीव वाचवून तो तुटपुंज्या सैन्यानिशी स्वदेशी परतला. आठ लाख सैन्य घेऊन रशियावर स्वारी करणाऱ्या व आठ सैनिक घेऊन स्वदेशी परतणाऱ्या नेपोलियनसारखी त्याची दशा झाली. सविस्तर माहितीसाठी खुशवन्तसिंगांचा 'शिखांचा इतिहास' पहावा.

मराठे उत्तरेत बदनाम झाले होते. हा काही लेखकांनी पसरविलेला गैरसमज आहे. पानिपत हरयाणामध्ये आहे. या प्रदेशातच मराठ्यांचे सैन्य पानिपतच्या पूर्वी हालचाली करीत होते. त्यामुळे तेथील जनतेला त्रास झाला असणारच. तरी हरयाणामध्ये



भाऊसाहेबांची वीरगाथा त्यांच्या काळापासून गायिली जाते व या गायनावरच जगणारा एक वर्ग हरयाणामध्ये होता.

१८५७ ला विरोध करण्यात श्री. मोरे यांना तो उठाव सफल होऊन स्वराज्य स्थापन झाले असते त्यापेक्षा मा बाप इंग्रज सरकार बरे असे वाटते हे त्यांच्या पुस्तकावरून स्पष्ट आहे. मुसलमान आक्रमक लूट करीत होते तरी उत्तरेतील हिन्दूंना राग आला नाही म्हणून ते त्यांची कीव करतात. इंग्रजांनी दर वर्षीच दहा गझनवी करणार नाहीत एवढी भारताची लूट केली हे ब्रिटिश राज्याची अर्थशास्त्रीय चिकित्सा करणाऱ्यांनी दाखवून दिले आहे. भारतातून "विकत" घेतलेल्या मालाची किंमत भारताकडून वसूल केलेल्या करातूनच फेडली जात असे, असे ब्रिटिश कालाच्या आर्थिक इतिहासात नमूद आहे.

**पृष्ठ ८०, ८१**

हॉडग्सन म्हणतात, "ब्रिटिशांनी पर्शियनऐवजी इंग्रजी भाषा आणली. हा बदल मुसलमानासाठी राज्यकर्त्या वर्गातून त्यांची हकालपट्टी होती. उलट हिन्दूसाठी केवळ मालकबदल होता." सफदर महमूद यांनी म्हटले आहे, "हिन्दूंनी नवी राज्यपद्धती मोकळ्या मनाने स्वीकारली कारण त्यांच्या साठी तो धनीबदल होता."

मोरे यांनी ही विधाने स्वीकारली आहेत. याचा अर्थ त्यांच्या मते भारतातील मुसलमानांची भाषा फारसी आहे. पंजाबी भाषी प्रान्तात पंजाबी भाषा समप्रमाणतच हिन्दू व मुसलमान यांची भाषा आहे. बंगालमध्ये बंगाली भाषेची तीच स्थिती आहे. मुस्लिम बंगाल्यांनी बंगालीचा अभिमान धरूनच तथाकथित मुस्लिमभाषा जी उर्दू तिचा विरोध केला व बंगलादेशची स्थापना केली.

पृष्ठ ८३ वर डॉ. ताराचन्दांचा हवाला देऊन मुसलमानांनी इंग्रजी शिक्षणाचा स्वीकार केला नाही याचे कारण ते फारसीला आपली भाषा समजत होते, व म्हणूनच ते हिन्दूपेक्षा जास्त ब्रिटिशविरोधक होते असे मत माण्डले आहे. मुघलांच्या काळात कायस्थ लोक जितके फारसीत प्रवीण होते, तितके भारतीय मुसलमानांचे कोणते वर्ग प्रवीण होते?

शीख रणजितसिंगाने स्वतःचे राज्य स्थापन केल्यावरही फारसीतच राज्यकारभार सुरू ठेवला होता.

हैदराबाद संस्थानात मुसलमानी समजली जाणारी उर्दू ही राजभाषा होती. हैदराबादचे मुसलमान हैदराबादच्या हिन्दूपेक्षा शिक्षणात जास्त पुढे होते असे प्रमाण आहे काय?

**पृष्ठ ८४**

या पृष्ठावर ब्रिटिश राज्यामुळे मलमल विणणे, जहाजे बनविणे, तालुकदारी, करवसुली वगैरे जे व्यवसाय नष्ट झाले ते मुख्यतः मुसलमानांच्या ताब्यात होते व त्यामुळे मुसलमानांची इंग्रजांवरील नाराजी हिन्दूंपेक्षा पुष्कळ अधिक होती असा मुद्दा माण्डला आहे. याच्या पुष्ट्यर्थ या व्यवसायाचे धर्मशः आकडे दिलेले नाहीत. जहाजांचा उद्योग मुख्यतः पारशांच्या ताब्यात होता अशी माझी माहिती आहे. करवसुली कुलकर्णी करीत असत. हे कुलकर्णी मुख्यतः मुस्लिम होते याला आधार काय? ही विधाने जर विशिष्ट प्रान्तापुरती असतील तर १८५७ चा या प्रान्तातला उठाव जास्त तीव्र होता, असे दाखवून द्यायला पाहिजे होते. हिन्दू जमीनदारांचा फायदा झाल्यामुळे बंगालमध्ये उठाव झाला नाही असे सूचित करायचे असेल तर मोऱ्यांच्या मते मुसलमानांचा असलेला हातमागाचा उद्योग गेल्यामुळे बंगाली मुसलमानांनी सत्तावनमध्ये उठाव का केला नाही?

**पृष्ठ ८६, ८७**

उठावाच्या कारणाबद्दल मोरे म्हणतात ''पूर्वीचे मुसलमानांचे राज्य जाऊन त्या जागी ब्रिटिश राज्य आल्यामुळे निर्माण झालेली ही कारणे आहेत.''

म्हणजे मोरे यांच्या मते ब्रिटिशांचे राज्य येण्यापूर्वी भारतावर मुसलमानांचे राज्य होते.

येथे हे सांगितले पाहिजे की ब्रिटिशांनी दिल्ली घेतली ती मराठ्यांकडून. मुघल बादशहा हा स्वराज्य, चौथ आणि सरदेशमुखीच्या तहानुसार छत्रपतीचा माण्डलिक झालेला होता. महादजी शिन्दे हा बादशहाचा ''वकीले मुतालिक'' म्हणजे बादशहाला न विचारता त्याच्या नावे आज्ञा काढणारा होता.

हा ''वकीले मुतालिक'' पेशव्यांच्या सरदारापैकी एक होता व पेशवे हे छत्रपतीचे पंतप्रधान होते. दिल्लीच्या दक्षिणेस मराठ्यांची सार्वभौमता होती. पंजाब, सीमाप्रान्त व काश्मीर येथे रणजीतसिंगाचे राज्य होते. रणजितसिंग हा ''जागे धर्म हिन्दू सकल भण्ड भाज'' अशी गर्जना करणाऱ्या गुरू गोविन्दसिंगांचा अनुयायी होता.

''उठाव झाल्यावर येथे मुसलमानांचे राज्य येणार आहे हे हिन्दूंनी मान्य केले होते.''

उठावाच्या योजनेत भारतात ब्रिटिशपूर्व राजयव्यवस्था आणायची होती. ती एका वाक्यात सांगायची म्हणजे मराठ्यांच्या अंकित असलेला नामधारी बादशहा व प्रत्यक्षात



राज्य करणारे पेशवे. शीख सामील झाले असते तर रणजितसिंगाच्या राज्यात शीख.

**पृष्ठ ८७**

''ब्रिटिश शासनाने आपले धर्मान्तराचे ध्येय कधीही घोषित केलेले नव्हते. त्यांच्या राज्यात एक लाखापेक्षा अधिक धर्मान्तरे झालेली नव्हती. ही धर्मान्तरे जोरजबरदस्तीने झाली नव्हती. खुद्द नानासाहेबांच्या बिठुरात मिशनऱ्याची शाळा चालू होती. बनारस मधील शाळेत बायबल शिकविले जात होते.''

मोऱ्यानी ईस्ट इण्डिया कम्पनीच्या डायरेक्टरची घोषणा वाचलेली दिसत नाही. ''प्रभूने आपल्या हाती एवढ्यामोठ्या देशाचे राज्य सोपविले आहे ते त्याच्या धर्माचा प्रसार करण्यासाठी. याच्या आधी इंग्रजांनी धर्मासाठी बलप्रयोग केला नाही कारण बाटवाबाटवीसाठी मराठ्यांनी पोर्तुगीजांना ठेचून काढले होते हे उदाहरण त्यांच्यासमोर होते.''

नानासाहेबांचे बिठूर असा त्यांनी उल्लेख केला आहे. नानासाहेबांना पेशवा मानण्यास इंग्रजांनी नकार दिला होता व त्यांचे पेन्शनही रद्द झाले होते. मग बिठुरात राज्यकर्त्यांच्या धर्मप्रसाराला मनाई करण्याची सत्ता नानासाहेबांजवळ होती काय?

बनारसमधील शाळेत बायबल शिकविले जात होते याचा बन्दोबस्त मोऱ्यांच्या मते ज्या जिहाद्यांची सत्ता बनारसवर होती त्या जिहादिंनी करायला पाहिजे होता. त्यांनी तसे केले नाही यावरून बायबलच्या शिकवणुकीपेक्षा इंग्रजी राज्यावर त्यांचा राग जास्त होता असे समजायचे काय? असे असेल तर ते जिहादी कसले?

''बण्ड'' मोडून काढले तेव्हा राणीने जाहीरनामा काढला. त्यात ''धर्मात हात घालणार नाही'' असे वचन आहे. हे वचन घालण्यास काही इंग्रजांनी विरोध केला होता. आपला विजय धर्मप्रसारासाठीच आहे असे त्यांचे म्हणणे होते.

**पृष्ठ ५७**

च्या तळटीपेत मोऱ्यांनी ब्रिटिश अडव्होकेट जनरलेचे उद्‌गार उदधृत केले आहेत. त्यात तो म्हणतो ''पूर्वी मुसलमानांनी हिन्दूंचे धर्मान्तर केले त्याच्याविरुद्ध हिन्दू उठले नाहीत मग आताच कसे उठतील?''

शिवाजीच्या महाराष्ट्रातील एका लेखकाने या उद्‌गाराशी सहमत व्हावे? पंजाबात शिखांचे बलिदान व शेवटी मुस्लिम सत्तेचे उच्चाटन करून त्या जागी शीख सत्तेची स्थापना हा इतिहास मोरे विसरले? रणजितसिंगाने अफगाणिस्तानच्या शहाकडे गझनवीने

लुटून नेलेल्या सोमनाथच्या दरवाजांची मागणी केली होती. त्या पूर्वी सायण माधवांनी मुसलमानांचे धर्मान्तराचे शस्त्र त्यांच्याच विरुद्ध वापरून विजयनगरच्या साम्राज्याची स्थापना केली होती. हे साम्राज्य २५० वर्षे टिकले होते.

अरबांनी सिन्ध प्रान्त घेण्याआधी त्यांचा अनेक वेळा पराभव झाला होता. अरबांनंतर मुस्लिम स्वारी झाली ती तीनशे वर्षांनंतर. पुढे बव्हंवश भारत ५०० वर्षे मुसलमानांच्या ताब्यात राहून देखील बहुसंख्य देश हिन्दू राहिला, कारण हिन्दूंचा प्रतिकार कधी लुप्त झालाच नाही.

"बाटविण्यासाठी ज्या काडतुसांच्या रायफली इंग्रजांनी सुरू केल्या त्या अद्यापि यावयाच्याच होत्या. त्यांचा प्रत्यक्ष परिणाम झालेलाच नव्हता."

काडतुसांच्या प्रकरणात शिपायांची तक्रार रास्त होती हे मजुमदारांनी कबूल केले आहे. या संबंधी राणी लक्ष्मीबाईचे मोडी लिपीतील पत्र उपलब्ध आहे. त्या पत्राची तारीख १८५७ ची आहे. हे पत्र दिल्ली येथील १८५७ च्या प्रर्दशनात माण्डलेले होते. सुरेंद्रनाथ सेन यांच्या पुस्तकात त्याचा उल्लेख आहे. सावरकरांच्या पुस्तकात देखील काडतुसांचे प्रकरण १८५३ च्या सुमारासच उघडकीस आल्याचा उल्लेख आहे.

**पृष्ठ ८९**

"कोणते राज्य प्रागतिक, हितकारक. निदान आपल्यासाठी चांगले याचा विचार त्यात भाग घेणाऱ्या हिन्दूंनी केला नव्हता."

The cat is out of the bag सत्तावनचे युद्ध हे स्वातन्त्र्ययुद्ध नव्हते असे म्हणणाऱ्यांना असे म्हणायचे असते की इंग्रजी राज्य हेच स्वातन्त्र्यापेक्षा चांगले. असा मुद्दा सत्तावनच्या विरोधकांना माण्डायचा असेल तर त्या साठी सत्तावनचा बळी कशाला? त्यांनी तो उघडपणे माण्डावा व सुसङ्गतपणे वापरावा. केवळ सत्तावनच नव्हे तर गान्धी व बोस यांचे प्रयत्न देखील निन्दनीय होते कारण त्यांनी "प्रागतिक व हितकारक" इंग्रजांचा द्रोह केला असे प्रतिपादण्याचे धैर्य व प्रामाणिकपणा दाखवावा.

"हिन्दूंच्या सहकार्याशिवाय ब्रिटिशाविरुद्ध संघर्ष शक्य नाही हे लक्षात घेऊन मुसलमानांनी त्यांना जवळ करण्याचा प्रयत्न केला."

हे वाक्य लिहून मोरे यांनी आपले सर्व प्रतिपाद्यच खोडून काढले आहे. क्रान्तिकारकांच्या बाजूने लढणारे सर्व मुसलमान जिहादी होते. पण हे युद्ध जिंकल्या नंतरच ते आपले जिहादी स्वरूप प्रकट करणार होते. सत्तावनच्या संग्रामात ते कधीही प्रकट झाले नाही याची ही कबुलीच आहे.



आजकाल मुसलमानांत जिहादी वृत्तीने उचल खाल्ली आहे. या जिहाद्यापैकी कोणीही आपले उद्देश लपवून ठेवीत नाही. आज जिहादींच्या हातात काडीचीही सत्ता नाही व त्यांच्या विरुद्ध अमेरिका, रशिया व चीन यासारखे बलाढ्य देश उभे ठाकलेले आहेत. राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, राजा कुमारसिंग वगैरेंचे सहकार्य मिळावे म्हणून आपले जिहादी स्वरूप लपवून ठेवणारे मुसलमान हे वस्तुतः जिहादी असूच शकत नाहीत. आजच्या मुस्लिम जिहाद्यांच्या विरुद्ध महासत्ता उभ्या ठाकल्या असताना देखील ते आपली उद्दिष्टे लपवून ठेवीत नाहीत व अमुक हल्ला आम्हीच केला म्हणून अभिमानपूर्वक सांगतात.

**पृष्ठ ९०**

"हा उठाव उत्तर भारतापुरताच मर्यादित होता"

या विधानाचे आता सप्रमाण खण्डन झालेले असून देखील मोरे यांनी तोच पुनः उगाळला आहे. दक्षिणेत उत्तर भारतासारख्या लढाया झाल्या नाहीत याचे कारण उठाव होणार याची बातमी इंग्रजांना तारेच्या शोधामुळे आधीच लागत होती. यावरून उठावाचा विस्तार कमी होता असे ठरत नाही. उठावासाठी सजा झालेल्यांची संख्या दक्षिणेत उत्तरेपेक्षाही जास्त होती. यावरून उठावाची सार्वत्रिकता सिद्ध होते.

अमेरिकेच्या स्वातन्त्र्ययुद्धात १८५७ पेक्षा जास्त मोठ्या प्रमाणावर उठाव झाला होता काय?

**पृष्ठ ९४**

१८५७ हा मुस्लिम जिहाद होता असे प्रतिपादन करताना देखील मोरे यांना न. र. फाटकांचा शिपाईगर्दी हा शब्द प्रिय आहे. शिपाईगर्दी हा शब्द इंग्रजीतील Sepoy Mutiny या शब्दाचा पर्याय म्हणून वापरलेला आहे. शिपायांचे बण्ड हा जिहाद असून शकत नाही कारण शिपायांचे बण्ड शिपाईपेशाच्या लोकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी झालेले असते. राज्यकर्त्या इंग्रजांना मुसलमान बनविणे हा शिपायांचा बण्डाचा उद्देश असू शकत नाही. तेव्हा मोऱ्यांनी केवळ सत्तावनला शिव्या देण्यात आनन्द होतो म्हणून त्याचे वर्णन जिहाद व शिपायांचे बण्ड या दोन्ही शब्दांनी करू नये.

**पृष्ठ ११३**

"कानपूरहून लखनौस जाताना ब्रिटिशांना प्रचण्ड संघर्षाला तोण्ड द्यावे लागत होते. हा अवघा ३६ किलोमीटरचा भाग त्यांना जिंकता न येऊन १५ दिवसानंतर ते

कानपूरला परत गेले. याचे कारण या भागातील जनता कडवी ब्रिटिशविरोधी होती हे होय.''

कानपूर ते लखनौ या प्रदेशातील जनता मुख्यतः जिहादी मुस्लिम होती काय? सत्तावनच्या निन्दकांच्या विरुद्ध प्रमाणे त्यांच्याच लिखाणात कधी सापडतात याचे हे एक उदाहरण आहे.

**पृष्ठ १४६**

''इंग्रजांच्या सैन्याने लढाई करून कुवरसिंगाच्या ताब्यात असलेले आझमगड मुक्त केले''

या वाक्यात लेखकाची मनोवृत्ती स्पष्ट झाली आहे. कुवरसिंगाच्या आधी आझमगड होते तेव्हा ते बद्ध होते. इंग्रजांनी ते घेतले तेव्हा ते मुक्त झाले. याच न्यायाने १५ ऑगस्ट १९४८ साली इंग्रजांच्या हाती मुक्त असलेला भारत बद्ध झाला.

**पृष्ठ १५०**

''असे जिहादी क्रान्तीचे जाळे विणणारा एक नेता नक्कीखान याने मंगल पाण्डे यास उठावासाठी प्रवृत्त केले.''

नक्कीखानाने प्रवृत्त केल्यावर मंगल पाण्डेने काय केले? काफिर हिन्दूंना मारले काय? मूर्ती फोडल्या काय? त्याने इतर शिपायांना इंग्रजांविरुद्ध उठण्यास आवाहन केले. तेव्हा मंगल पाण्डेला स्फूर्ती देण्यात नानासाहेब पेशवे व राणी लक्ष्मीबाईबरोबरच कोणी नक्कीखान होता या माहितीचे महत्त्व काय?

पृष्ठ १५२ वर मोरे सांगतात ''मंगल पांडे यास फाशी देऊन त्याचे दहन केल्यावर त्याची रक्षा घेऊन नक्कीखान त्याच्या जन्मगावी गेला व ती रक्षा त्याच्या आईच्या स्वाधीन केली. त्याच्या निधनाने नक्कीखान व पीर अली या दोघांनाही रडू कोसळले.''

हे वर्तन जिहादी मुसलमानाचे आहे काय?

मोरे पुढे सांगतात ''नक्कीखान बराकपूर येथील हिन्दू धर्मसभेसही जात असे. तो त्या सभेचा सदस्य बनला होता. त्याला सभेच्या बैठकीत खास जागा दिली जात असे. मंगलबरोबर कलकत्त्यास जाऊन तो गंगेत स्नानही करीत असे.''

नक्कीखानाच्या गंगास्नानाचे वर्णन करणारे मोरे पृष्ठ १५६ वर यमुना पार करताना तुर्की स्वार जय जमुनाजी म्हणून गर्जले या सावरकरांच्या वर्णनावर, ''नदीला वन्दन करणे इस्लामला मान्य नाही'' म्हणून आक्षेप घेतात.



हे सगळे वर्णन वाचून नक्कीखान व तुर्की स्वार कधी काळी जिहादी असले तरी मंगल पाण्डे आदी देशभक्तांच्या संगतीने भारतीय झाले होते, असे अनुमान निघते.

**पृष्ठ १५३**

उठावापूर्वी चपात्याद्वारे उठावाचा सन्देश देण्याची योजना वलीउल्लादी ''जिहादी'' मण्डळींनीच केली होती. चपाती हे मुस्लिम प्रतीक आहे. चपाती हे पृथ्वीचे चिन्ह आहे. त्याचा सांकेतिक अर्थ मुस्लिमांनी आपले भवितव्य स्वतःच्या तळहातावर घेतले पाहिजे असा होतो.

चपात्याचा असा अर्थ होतो या मताच्या पुष्ट्यर्थ मोरे यांनी दोन पुस्तकांची नावे दिली आहेत. या दोन पुस्तकांत वरील मताच्या पुष्ट्यर्थ कुराण, हादिस व निदान वली उल्लादिकांच्या वाङ्मयातील काही उतारे दिले असते तर त्यात काही विश्वासार्हता आली असती. चपातीचा अर्थ तळहात असा असेल व मुस्लिमांनी आपले शिर तळहातावर घेण्याची वेळ आली आहे असा त्याचा अर्थ असेल, तर हिन्दूचे मन जिंकण्यासाठी गंगेत स्नान करणाऱ्या व जय जमुनाजी अशी गर्जना करणाऱ्या जिहाद्यांनी इस्लामी चपात्या न पाठविता दुर्गेच्या मूर्ती पाठवून हिंदूंना संदेश का दिला नाही?

**पृष्ठ १४९**

पराभवानंतर ''अयोध्येची बेगम नेपाळच्या आश्रयाला गेली व शेवटपर्यंत तिकडेच राहिली'' एकूण काफिरांना जिवन्त राहण्याचाच अधिकार नाही असे मोऱ्यांच्या मतानुसार-मानणारी ही ''जिहादी'' बेगम एखाद्या मुसलमानी राज्यात पळून न जाता एका हिन्दू राजाच्या आश्रयाला गेली. ही जिहादीण जिहादासाठी आपला उपयोग करून घेणार हे त्या मूर्ख राजाच्या लक्षात आले नाही व म्हणून इंग्रजांचा रोष होण्याचा धोका पत्करूनही त्याने तिला आश्रय दिला.

**पृष्ठ १५८**

शिपाई दिल्लीत शिरले तेव्हा ''दीन दीन'' म्हणून गर्जना करीत होते यावरून ते जिहादी होते असे मोरे सुचवितात. पण इंग्रजांच्या सैन्यातले शिपाई देखील आपापल्या रेजिमेण्टच्याच गर्जना देत असत ''हेल ब्रटानिया'' म्हणत नसत. मराठा रेजिमेण्ट देखील ''हर हर महादेव''च्याच गर्जना करी.

''या शिपायांनी ख्रिस्ती लोक मुसलमान होण्यास तयार झाले असूनही त्यांची कत्तल केली'' अशी मोरे यांची तक्रार आहे. हे शिपाई जर जग मुसलमानमय करू इच्छिणारे

जिहादी होते तर त्यांनी आयतीच इस्लामचा कळप वाढविण्याची सन्धी मिळत असताना असे का केले?

**पृष्ठ १६५**

वल्लभगडचा राजा नरसिंह हा दिल्लीला आपली फौज घेऊन आला होता. मोरे त्याबद्दल म्हणतात,

''इस्लामच्या कार्याला त्याने इतके वाहून घेतले होते की त्याने इस्लामचा स्वीकार करण्याचेच बाकी ठेवले होते.''

म. गान्धी व पं. नेहरू यांच्यावरही अशीच टीका होत होती. यावरून गान्धींची चळवळ हा जिहाद ठरत नाही.

**पृष्ठ १६६, ६७**

दिल्ली येथील उठाव हा मुसलमानांचा जिहाद होता असे सिद्ध करण्यासाठी खालील विधाने केली आहेत-

दिनांक १९ मे रोजी दिल्लीतील अनेक मौलवींनी व मुसलमानांनी मशिदीत हिरवे ध्वज उभारून हिन्दू विरूद्ध जिहादाची घोषणा केली...

या घटनेने बादशहाला राग आला. जिहादचा ध्वज काढून टाकण्याचा आदेश देण्यात आला... बादशहाने स्पष्ट केले की जिहादची कल्पना मूर्खपणाची आहे. भेटायला येणाऱ्या हिन्दूंना आश्वासन दिले की जिहाद हा इंग्रजाविरुद्ध आहे. हिन्दूविरुद्ध जिहाद बन्द करण्याचा मी आदेश दिला आहे.

बादशहाने एक निवेदन प्रसिद्ध केले. दवण्डी देऊन सर्वांना सांगण्यात आले की हिंदू आणि मुस्लिमांनी आपसात संघर्ष करू नये.

१ ऑगस्ट १८५७ रोजी बकरी ईद होती... बादशहाने सेनापतीला आदेश काढण्यास सांगितले की ईदसाठी कोणीही गायी मारू नयेत व तसे केल्यास कठोर शिक्षा केली जाईल.

हिन्दूंनी ख्रिश्चनांना कसे वाचविले हे ख्रिश्चनांनी नंतर लिहून ठेवले आहे.

बादशहाने ४ सप्टेम्बर रोजी जयपुर, जोधपुर, बिकानेर व अल्वार येथील संस्थनिकांना पत्रे पाठविली.. ''या राज्यक्रान्तीचे धुरीणत्व आपण स्वीकारावे'' असे आवाहन केले.

दिल्लीचा लढा हा जिहाद होता हे सिद्ध करण्यासाठी मोरे यांच्याजवळ एवढाच मसाला आहे यावरून पुढील गोष्टी सिद्ध होतात. दिल्लीत जिहाद झाला नाही. जिहादसाठी



काही लोकांनी थोडी कुरबुर केली व ती बादशहाने गप बसविली. एका मुसलमान बादशहाने ईदेच्या दिवशी गोवधबन्दीचा आदेश काढला. ज्या प्राणपणाच्या लढाया झाल्या त्या इंग्रजांशीच झाल्या.

शिखांनी १८५७ साली उठाव केला नाही कारण पतियाळा, नाभा, जिंन्द व कपूरथला ही संस्थाने इंग्रजांनी खालसा न केल्यामुळे तेथील राजे इंग्रजाविरुद्ध उठले नाहीत. पण ''पंजाब भागातील उठाव करून दिल्लीकडे धाव घेणाऱ्या अनेक बण्डखोर शिपायांना या राजांनी अडविले होते'' करपुथलाचे महाराज जालन्दरचा उठाव मोडण्यासाठी सैन्यानिशी चालून आले असे मोरे सांगतात. म्हणजे पंजाबात देखील उठाव झालाचहोता. पंजाबमधील शिखांची संख्या लक्ष्यात घेता शीख जनतेने उठाव केलाच नाही ही सर्वसाधारण समजूत बरोबर नाही.

**पृष्ठ १८७**

जिहादच्या घोषणांनी आग्रा शहर दुमदुमुन गेले. जिहाद फक्त ख्रिस्त्याविरुद्ध असल्यामुळे ते आग्र्यातील हिन्दूंच्या वाटेसच गेले नाहीत.

या पुस्तकात जागोजाग पसरलेल्या अशा विधानामुळे ३७६ पृष्ठांच्या पुस्तकातील मुख्य सिद्धांत कोसळतो हे लेखकाच्या लक्षात आले नाही.

**पृष्ठ १९०**

बण्डखोरांनी मुजफरनगर काबीज केल्यावर तेथील महाजनावर हल्ले केल्यावर या पृष्ठावर वर्णन आहे. याने लेखकाच्या जिहादी सिद्धान्ताला पुष्टी मिळत नाही. धन लुबाडणे एवढाच उद्देश सिद्ध होतो. जिहादी फक्त धनवान हिन्दूवर हल्ले करीत नाही. पृष्ठ १९५ वर बंगाली हिन्दू इंग्रजधार्जिणे म्हणून त्यांच्यावर हल्ले झाल्याचा उल्लेख आहे. बंगाली हिन्दू व अन्य हिन्दू असा भेद जिहादी करीत नाही.

**पृष्ठ १९९**

''इमीदपूरमध्ये वहिदुझमन हा नानासाहेबांच्या वतीने राज्यकारभार पाहू लागला''

हा वहिदुझसमन जिहादी होता व नानासाहेबांचे नाव केवळ हिन्दूना वश करण्यासाठी त्याने वापरले असे कुठेच वर्णन नाही.

''मीरत व दिल्लीचा उठाव झाल्याचे ऐकताच नाना साहेबांनी त्याची निन्दा केली होती. शिपायांना बण्ड करण्यास प्रवृत्त करण्यात त्यांचा मुळीच हात नव्हता, हे सर्वच इतिहासकारांनी मान्य केले आहे.''

"सर्वच इतिहासकारांनी हे मान्य केले आहे" हे खरे नाही हे या पुस्तकात दाखविलेच आहे. सत्तावनचा उठाव मोडून काढल्यानंतर इंग्रजांनी त्याची कारणे व त्यासाठी जबाबदार व्यक्ती यांचा शोध घेण्यास बऱ्याच चौकशा केल्या होत्या. त्यात हा सर्व व्यूह नानाने रचला असा आरोप अनेकांनी केला. हा समकालीन पुरावा न घेता २००२ मध्ये लिहिलेले एक पुस्तक मोऱ्यांनी आधारास घ्यावे हे त्यांच्यासारख्या संशोधकास शोभणारे नाही.

नानासाहेबांनी आपले बन्द झालेले पेन्शन सुरू व्हावे यासाठी जी खटपट केली तिचा हवाला देऊन मोरे म्हणतात, अशा स्वभावाचा माणूस अचानक बण्ड करून उठतो, इंग्रजांना आकस्मिक धोका देण्याइतका कुटिलपणा, क्रूरपणा विश्वासघातकपणा त्यांच्या ठिकाणी होता असे कोणी मानीत नाही.

हा गहजबच आहे. शत्रूला आकस्मिक धोका देण्याचा आरोप कोणत्याही विजयी सेनापतीवर करता येईल याला विश्वासघात म्हणत नाहीत. शत्रूवर जय मिळविण्यासाठी फक्त शस्त्रबळ वापरावे. डावपेच वापरू नयेत अशी युद्धनीती कोणत्या सेनापतीने वापरली आहे याची उदाहरणे मोरे देतील काय? इंग्रजांनी भारताचे स्वामित्व विश्वासघाताशिवाय मिळविले काय?

नानासाहेबांनी आपले पेन्शन चालू व्हावे म्हणून प्रयत्न केला तसेच राणी लक्ष्मीबाई झाशीच्या किल्ल्यावर यूनियन जॅक लावीत होती त्या अर्थी हे दोघे स्वातन्त्र्ययोद्धे नव्हते, असा प्रचार केला जातो. यासाठी हे विचारात घेतले जात नाही की नानासाहेबांचे पेन्शन चालू झाले असते व झाशी खालसा झाली नसती, तर नानासाहेब व राणी लक्ष्मीबाई यांनी क्रान्तियुद्धात उडी घेतली नसती हे शक्य आहे. न. चिं केळकरही याच मताचे होते. पण यावरून एवढेच सिद्ध होते की हे दोघे शक्याशक्यतेचा विचार न करता खडकावर डोके आपटून घेणारे नव्हते. विवेक हा शौर्याचा सर्वात महत्त्वाचा भाग आहे, अशी इंग्रजीत म्हण आहे.

**पृष्ठ २०४**

ब्रिटिशांच्या तटबन्दीवर हल्ला करण्यासाठी हिन्दू व मुस्लिम मिळून गेले नव्हते. त्यासाठी दोन ध्वज उभे करण्यात आले होते एक मुस्लिमांसाठी हिरवा व दुसरा हिन्दूंसाठी महावीर ध्वज "पहिल्या ध्वजाखाली दोन हजार मुस्लिम जमा झाले, तर दुसऱ्या ध्वजाखाली फक्त थोडेसे बदमाश लोक जमा झाले."

"नानासाहेबांनी आपल्या मुख्यालयावर हिन्दूंचा एक व मुस्लिमांचा एक असे दोन ध्वज उभे केले. मुस्लिमासाठी अरबी लिपीत व हिन्दूंसाठी नागरी लिपीत राजपत्रे काढू लागले. दिल्लीच्या बादशहाच्या नावाने नाणी पाडण्यात आली. सर्व आदेश बादशहाच्या नावाने निघू लागले. कालगणनेसाठी हिजरी सनच लागू केला."

महावीर ध्वजाखाली गोळा झालेले "बदमाश" होते असे म्हणणे ही शिवीगाळ आहे. इतिहासलेखन नव्हे. शिवाय हा वृत्तान्त खरा मानला तरी त्यात जिहाद कोठे आहे?

छत्रपती व त्यांचे पन्तप्रधान व सरदार देखील स्वराज्य सोडून इतर मुलखावर मुघल बादशहाच्या वतीनेच राज्य करीत होते. यशवन्तराव होळकराने देखील बादशहाच्या नावाने मुद्रा काढली होती व तिच्यावर त्याला चक्रवर्ती म्हटलेले आहे.

नानासाहेब मुघल बादशहाच्या नावाने राज्यकारभार करीत होते असा आक्षेप आहे. आजच्या "सार्वभौम" भारताचे राज्य ब्रिटिश सिंहासनाला आपल्या सार्वभौमत्वाचे प्रतीक मानते, असे आपले संविधान सांगते. हे दाखविण्यासाठी नेहरूंनी लोकसभेवर युनियन जॅक फडकविला होता व त्याच्या समर्थनासाठी नेहमीप्रमाणे लांबलचक भाषण केले होते.

बादशहाच्या नावाने नाणी पाडली याचा अर्थ पेशव्याच्या नावाची नाणी नव्हती असा होत नाही. निझाम इंग्रजाचा माण्डलिक होता पण त्याने स्वतःचे "खडकू" पाडले होते.

हिजरी सनावर आक्षेप घेणाऱ्या मोऱ्यांना स्वराज्यात खिस्ती सन वापरलेला कसा चालतो? आजच्या स्वराज्यात पाळण्यातील मुलांशी इंग्रजी बोलण्याचा व शिशुवर्गापासून इंग्रजी शिकविण्याचा प्रघात जोरात आहे. मग नानांच्या नुसत्या अरबी लिपीवर आक्षेप का?

**पृष्ठ २०५**

"दोन मुस्लिम कसायांनी भर बाजारात गायी कापल्याबद्दल नानांचे न्यायाधीश बाबा भट्ट यांनी त्या कसायांचे हात तोडण्याची शिक्षा दिली होती. यामुळे मुस्लिमांत सन्तापाची लाट उसळली. जाब विचारण्यासाठी ते नानांच्या निवासस्थानाकडे गेले.

नाना बोडक्या डोक्याने व अनवाणी पायाने त्यांना भेटण्यास आले व हात जोडून माफी मागितली."

मोऱ्यांच्या ३८९ पृष्ठांच्या या पुस्तकात त्यांच्या सिद्धान्ताबद्दल विचार करावासा वाटेल असा हा एकच परिच्छेद आहे. त्याचा आधार म्हणून ज्या पुस्तकांची नावे त्यांनी

दिली आहेत ती काही २१ व्यां शतकातली व काही विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील आहेत. या पुस्तकांनी वरील वृत्तान्ताला सत्तावनच्या समकालीन असा कोणता आधार दिला आहे ते मोरे सांगत नाहीत. सत्तावनची सातत्याने निन्दा करणारे रमेशचन्द्र मजुमदार त्याचा उल्लेख करीत नाहीत. प्योत्र शास्तीको या रशियन लेखकाने लिहिलेल्या नानासाहेबांच्या चरित्रात त्याचा उल्लेख नाही.

"नानासाहेबांनी गोवधबंदीबद्दल कडक शासन दिले" एवढेच सावरकर सांगतात पण नानांनी माफी मागितल्याचा उल्लेख करत नाहीत अशी मोरे यांची तक्रार आहे. सावरकरांच्या वेळी या प्रकाराचा उल्लेख करणारा कोणताही आधार उपलब्ध नव्हता हे याचे स्पष्ट कारण आहे. हा आधार पुढे एका शतकानंतर कसा उपलब्ध झाला यावर मोऱ्यांनी प्रकाश टाकावा.

मोरे असे सुचवितात की पेशव्यांना मानणारे तात्या टोपे व राणी लक्ष्मीबाई यांनी केलेल्या सर्व लढाया मुस्लिम जिहाद्यांनी केलेल्या होत्या व पेशव्याचे सेनापती केवळ नामधारी होते. झाशी, कानपूर, काल्पी व ग्वाल्हेर येथे झालेल्या लढायांची प्रत्यक्षदर्शी वर्णने उपलब्ध आहेत. त्यातली काही ब्रिटिश सेनापतींनी केलेली आहेत. यात राणी लक्ष्मीबाई व तात्या टोपे यांचीच नावे झळकतात, कोणत्याही जिहादींची नव्हेत. या पराक्रमांची वर्णने या पुस्तकात योग्य ठिकाणी आहेत.

"न. र. फाटक नानासाहेबांच्या विषयी शिपायांच्या ठिकाणी आपलेपणाची भावना अगदी जुजबी होती. दिल्लीकडे पाठ फिरवून त्यांनी पेशवाईसाठी नव्हे, तर गोऱ्यांना निर्बीज करून ठेवण्याच्या ईर्ष्येने दिल्लीकडे पाठ फिरवून कानपूरला येणे केले."

या वाक्यातील दुसरा भाग हे ऐतिहासिक सत्य आहे. पहिला भाग हा केवळ फाटकांच्या कल्पनेचा विलास आहे. कानपुरला ज्या लढाया झाल्या त्यात नानासाहेब व त्यांनी नेमलेला सेनापती तात्या टोपे यांच्या आज्ञा शिपाई पाळत नव्हते असे दाखविण्याऱ्या एकाही घटनेचा उल्लेख नाही.

आजदेखील कोणताही सेनापती व राजनीतिज्ञ हेच सांगेल की सगळ्या सैनिकांनी फक्त दिल्लीमध्ये गर्दी न करता देशभर विद्रोह पसरविल्यानेच इंग्रजाचा पराभव करणे शक्य होते.

येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की तात्या टोपे हा नुसता कारकून होता. नानासाहेबांच्या हुकमाने तो सेनापती झाला. शिपायांनी नानासाहेबांच्या आज्ञेचा मान ठेवून त्याला सेनापति



मानला. पुढे काल्पीच्या लढाईत तात्या टोपे व राणी लक्ष्मीबाई हेच सेनापती होते व त्या लढाईत ह्यू रोजचा पराभव होण्याची वेळ आली होती. या लढाईत देखील "या दोन काफिराशिवाय की ज्यातला एक कारकून आहे व एक स्त्री आहे आम्हाला एखादा जिहादी सेनापती पाहिजे," अशी शिपायांनी मागणी केल्याचा उल्लेख नाही.

तेव्हा मोऱ्यांनी केलेल्या विधानांना समकालीन आधार नाही.

**पृष्ठ २१०**

नानासाहेब राज्याभिषेक सोहळ्यात बिठूरला दंग होते. नाना बिठूरहून कानपुरला आले नाहीत तेव्हा जिहादींनी जाहीर केले की, "आज जर नाना कानपूरला आले नाहीत तर त्यांच्या जागी नवे नवाब यांना गादीवर बसविण्यात येईल." शत्रू फार जवळ आल्यामुळे नानांना जबरदस्तीने आणण्याचे ठरले. सेनापती टिकासिंग बिठूरला गेला व कानपूरच्या स्फोटक परिस्थितीची माहिती देऊन नानांना कानपूरला घेऊन आला.

मुस्लिमांचा पुढारी नन्हे नबाब याला सुभेदार होण्याची इच्छा होती... तो बण्ड करणार हे पाहून नानांनी त्याला काही दिवस अटक करून ठेवले होते.

वरील उताऱ्यावरून मोरे काय सिद्ध करू चाहतात हेच कळत नाही. शिपायांवर नानांचा वचक चालत नव्हता हे यात त्यांना दिसते म्हणावे तर नानांनी शिपायांच्या सुभेदाराला कैद करून ठेवले हे वचन त्याच्या विरुद्ध जाते. शिपायांना नाना हा सेनापती नको होता म्हणावे तर शत्रू जवळ आला तरी नाना बिठूरहून आले नाहीत तेव्हा त्यांना नानांना डच्चू देऊन स्वतच्या पसन्तीचा सेनापती नेमण्याची आयतीच सन्धी आली होती ती त्यांनी का घालवली? नाना बिठूरहून हलले नाहीत यावरून त्यांना "बण्डात" भाग घ्यायचा नव्हता असे म्हणायचे असेल तर मग त्यांनी स्वतःला राज्यभिषेक करवून इंग्रजांचे स्थान आपण घेणार असे का जाहीर केले? जिहादींना आपला सेनापति पाहिजे होता तर केवळ नानासाहेबच नव्हे, तर त्याचा दुयम टीकासिंग हा देखील काफीर कसा?

**पृष्ठ २११**

नानांनी अयोध्या शहरात प्रवेश करताच ११ तोफोची सलामी देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. नानांनी बेगमेकडे तक्रार केली की माझा दर्जा व मान २१ तोफांचा असताना ११ तोफा का उडविण्यात आल्या? बेगमने स्पष्टणे कळविले की आपण कोणते राजे नसल्यामुळे २१ तोफांची सलामी देता येत नाही.

यावरून काय सिद्ध होते? नाना हे बेगमेच्या लेखी पेशवे होते. छत्रपती नव्हते

एवढेच. मोऱ्यांनी येथे खोलात शिरून अयोध्येच्या नबाबाला २१ तोफांची सलामी दिली जात होती काय याचा खुलासा करायला पाहिजे होता. अयोध्येच्या नबाबाने स्वतःला बादशहा घोषित केले होते काय यावर प्रकाश टाकायला पाहिजे होता. तसेच महादजी शिन्दे हा दिल्लीच्या तख्ताच्या बाबतीत कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम समर्थ असताना त्याला बादशहाइतक्याच तोफांची सलामी दिल्लीत मिळत होती काय?

अयोध्येची बेगम ही जर जिहादी असेल तर सम्पूर्ण पराभव पावून जो केवळ आश्रित झाला होता अशा काफिराला ११ तोफांचा तरी मान कशाला देईल? शिवाय अयोध्येचे शिपाई हे जर केवळ जिहादी होते तर ते एका स्त्रीची हुकमत कशी पाळत होते? आपल्या बहिणीने स्वतःच्या मर्जीने लग्न केले म्हणून तिची हत्या करणारे व त्यांच्या कृत्याचे कौतुक करणारे आजच्या पाकिस्तानातही आहेत. जिहादी वेगवेगळ्या प्रकारचे असतात व सत्तावनचे जिहादी ओसामा बिन लादेन सारखे नव्हते असे मोरे यांना म्हणायचे असेल, तर हा मुद्दा अत्यन्त विस्ताराने मांडणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत नाही काय? जिहादी म्हणून मोऱ्यांनी शहा वली उल्ला व सय्यद अहमदखान याची नावे घेतली आहेत. या दोघांना स्त्रीच्या हुकमतीत राहणे व एका शक्तिहीन काफिराला ११ तोफांची सलामी देणे मान्य होते काय?

यावर असे भाष्य करता येईल की सत्तावनमध्ये ब्रिटिशाविरुद्ध उठलेले मुसलमान मुळात जिहादी असले तरी राजा कुमारसिंग, नानासाहेब पेशवे, राणी लक्ष्मीबाई व तात्या टोपे यांच्या व्यक्तित्वाचा त्यांच्यावर प्रभाव पडून त्यांच्या जिहादाचे रूपान्तर धर्मयुद्धात झाले होते.

**पृष्ठ २१२**

"तुमच्यासारख्या सामर्थ्यवान् राष्ट्राला मी एकच शत्रू आहे हाच मी माझा मोठा सन्मान समजतो" हे नानासाहेबांचे शेवटचे निवेदन कोणत्याही भारतीयाची छाती अभिमानाने वर आणणारे आहे. मला हे वाक्य वाचले की "आपण गान्धी व तो ज्या ध्येयांची पूजा करतो त्या सर्वांचे समूळ निर्मूलन केले पाहिजे" हे चर्चिलचे वाक्य आठवते. तेव्हा त्याने गांधीचा सर्वात मोठा सन्मान केला असे मला वाटले.

यावर मोरे विचारतात"मला सैनिकांनी बण्ड करण्यास प्रवृत्त केले" असे म्हणून नानांनी गयावया का केली? मी यावर विचारतो औरंगजेबाने कैदेत टाकल्यावर शिवाजीने सुटकेसाठी गयावया का केली? शिवाजी तर सोडाच ४२ चा उठाव इंग्रजांनी मूळ धरू न देताच उखडून फेकला तेव्हा गान्धींनी व्हाइसरॉयला पत्र लिहून झालेल्या प्रकाराबद्दल कानावर हात का ठेवले? देशासाठी मरणे हे वीराचे ध्येय नसून देशासाठी जगणे व सन्धी येताच शत्रूला मारणे हे ध्येय आहे.

नानासाहेबांनी मी क्रान्तीचा खरा प्रेरक आहे" असे का म्हटले नाही असे मोरे विचारतात. उत्तर स्पष्ट आहे. पेशवाई खालसा झाल्यापासूनच इंग्रजांविरुद्ध उठाव होत होते. नानासाहेब हा एकटा पुरुष क्रान्तीचा जनक नव्हता. झाशी खालसा झाली नसती व नानासाहेबांचे पेन्शन पुनः चालू झाले असते तरी सत्तावनचा उठाव झालाच असता कारण सारा देश त्यावेळी मुर्दाड झालेला नव्हता. मोऱ्यांचेही म्हणणे हेच आहे. फक्त या उठावाला ओढून ताणून जिहादाचे नाव देऊन ते आपल्या पारतन्त्र्यपूजेला सदसद्विवेकबुद्धीच्या टोवणीपासून वाचवू इच्छितात.

**पृष्ठ २२१**

अयोध्येजवळ फैजाबाद येथे मारुती मन्दिरावरून हिन्दू-मुसलमानांत वाद निर्माण झाला...

औरंगजेबाच्या काळात ते मन्दिर पाडून त्याच्या अवशेषातून प्रार्थनेसाठी मुसलमानांनी एक आवार बान्धले होते. तेथे बैरागी राहत. नंतरच्या काळात तेथे पुनः मन्दिर बान्धले गेले. मशीद म्हणून त्याचा वापर बन्द झाला. या जागेस हनुमान गढी म्हणत. १८५५ मध्ये मुसलमानांनी तेथे मशीद आहे असा दावा सांगून आन्दोलन सुरू केले. ही गोष्ट कळताच बजीद अली शहा याने हा दावा बरोबर आहे काय हे पाहण्यासाठी एक समिति नेमली...

मुस्लिमांनी हिंदूंविरुद्ध जिहादाची घोषणा केली... वजीद अली शहाने धर्मपण्डितांकडे हा जिहाद वैध आहे काय म्हणून विचारणा केली. काझींनी सांगितले की राजाशिवाय कुणाला जिहाद पुकारता येत नाही. या निकालाने देखील मुसलमान ऐकेनात तेव्हा वझीद अली शहाने ब्रिटिश कॅप्टनला हिन्दूंची व हनुमान गढीची सुरक्षा करण्यास पाचारण केले.

या उताऱ्यावरून वझीद अली शहा जिहादी होता असे दिसते काय? त्याने हनुमान गढीत मन्दिर होते काय हे पाहण्यासाठी समिती नेमली. याचाच अर्थ असा की तैथे मन्दिर आहे असे सिद्ध झाले असते तर तो त्याचा जीर्णोद्धार करू देण्यास तयार होता.

यावर अझीद अली शहाचा वजिर नक्कीखान याचे वचन मोरे उद्धृत करतात. (पृष्ठ २४) ते वचन असे "काही डझन मन्दिरे नष्ट करून त्या कलंकित जागा मशिदींनी अलंकृत केल्या तर बिघडले कुठे?"

या विचारांना वझीद अली शहाचा पाठिंबा नव्हता हे स्पष्ट आहे. तसे असते तर त्याने मन्दिर होते की नाही याची चौकशी केलीच नसती.

वझीद अली शहा नेहरू व नेहरू विचाराची सरकारे यांच्या पेक्षा जास्त निःपक्षपाती होता. नेहरूंनी जेथे मन्दिर होते याबद्दल वादच नव्हता तेथेही मूर्ती ठेवण्यास मनाई केली. पुढे नरसिंहराव यांनी १९४८ च्या पूर्वीची मशिदीची स्थिती कायम ठेवावी असा कायदाच पारित केला. म्हणजे मुसलमानांना हिन्दूंची देवळे पाडण्याचा अधिकारच आहे व अशा ठिकाणी मन्दिराचा जीर्णोद्वार करणे हा गुन्हा आहे. सत्तावनचा उठाव फसला म्हणून देशात असा "सेक्युलॅरिझम" आला. याचे कारण इंग्रजी शिक्षण. नेहरुंचे व त्यांच्या कन्येचे शिक्षण कॉन्व्हेण्टमध्ये झाले होते. नेहरूंच्या उदाहरणानेच या देशात कॉन्व्हेण्ट शिक्षणाची साथ आली. आपण हिन्दू असण्याची लाज बाळगणे व ब्रिटिश राज्याने भारत सुधारला नाहीतर तो शेण्डी-जानव्यातला मागासलेला निर्बुद्ध राहिला असता हे मनावर बिम्बविणे हाच या शिक्षणाचा उद्देश आहे.

इंग्रजांच्या सरकारी शाळांचे स्वरूप धर्माच्या बाबतीत असे नव्हते याचे कारण १८५७ ची त्यांनी दहशत घेतली होती. खरे इंग्रज जे उघडपणे करू धजावले नाहीत ते त्यांचे प्रसव जे नेहरू व नेहरुवाद यांनी बिनबोभाट केले. कारण त्यांना लोक आपले समजत होते. सत्तावनचे स्वातन्त्र्ययुद्ध सफल झाले असते तर या देशात नेहरुवाद पसरण्याचा संभव नव्हता.

नेहरुवादी सरकारच्या प्रोत्साहनाने नेमलेल्या बाबरी समितीचे मुसलमान प्रमुख शहाबुदीन म्हणाले की या ठिकाणी मन्दिर होते असे सिद्ध झाले तर मी स्वतः मन्दिरासाठी कारसेवा करायला तयार आहे. हे मोऱ्यांनी जिहादी मानलेल्या वझाद अली शहाचे विचार आहेत. कोणताही नेहरुवादी असे म्हणायला तयार नाही.

इंग्रज लोक देवळे पाडत नसत अशी भाबड्या आंग्लशिक्षितांची समजूत आहे. इंग्रजानी बिठूरमधले पेशव्यांनी बान्धलेले संगमरवरी गणपतीचे मन्दिर जमीनदोस्त केले अशी विष्णुभट गोडसेने माहिती दिली आहे. महाराष्ट्रातील सर्व किल्ल्यावरील सर्व बान्धकामे इंग्रजांनी जमीनदास्त केली त्यात देवळे असणारच. या कृत्याचे वर्णन इंग्रज सरकारने किल्ले "लष्करी दृष्ट्या निकामी केले" असे करण्यात येते. हे किल्ले इंग्रजांच्याच ताब्यात होते तेव्हा त्यांना लष्करी दृष्ट्या निकामी करण्याची काय जरूर? सत्तावन झाले नसते तर पोर्तुगीजांनी जे "पराक्रम" गोव्यात केले तेच इंग्रजांनी साऱ्या भारतात केले असते.



**पृष्ठ २३१**

मौलवी अहमदशहा... "जिहादी विचारांनी प्रभावित झालेला होता. तो विशुद्ध इस्लामचा पुरस्कर्ता होता म्हणूनच त्याने सम्पूर्ण उठावकालात लूटमार व स्त्रिया-मुलांची हत्या यास प्रतिबन्ध केला होता."

हे वाक्य फार बुचकळ्यात टाकणारे आहे. स्त्रिया व मुलांची हत्या न करणे याला मोरे जिहाद म्हणतात काय?

**पृष्ठ २३६**

"विश्वेश्वराच्या मन्दिरावर हिरवा ध्वज उभारण्यासाठी मोठा जमाव चालून आला. हे कळताच हिन्दू एकत्र आले व हा ध्वज रोकण्यासाठी ब्रिटिश सैनिकांना त्यांनी मदत केली. त्यामुळे प्रत्यक्षात इस्लामचा ध्वज मन्दिरावर उभा करण्यात १८५७ च्या बण्डखोरांना यश आले नाही."

या उदाहरणावरून काय दिसते? जेथे जेथे मुसलमानांनी आपले जिहादी स्वरूप प्रकट केले तेथे तेथे सत्तावनच्या क्रान्तीला इतरत्र मिळालेले प्रारंभिक विजयही मिळाले नाहीत. तेव्हा सत्तावनचे जिहादी स्वरूप अपवाद्भुत आहे. क्रान्तिकारकांना मुसलमानांमधील जिहादी प्रवृत्तींना आळा घालण्यात साधारणपणे सफलता मिळाली होती.

**पृष्ठ २३८**

"महम्मद हुसेनने आपल्या नावापुढे पुढील घोषवाक्य जोडले होते." महम्मद हुसेनची कीर्ती ताऱ्याच्या उच्चाङ्कावर झळकत आहे." त्याने शेजारच्या ब्रिटिशनिष्ठ हिन्दू राजाला पत्र पाठवून आपल्या बाजूने होण्याचे आवाहन केले होते. जे गार्यींची व ब्राह्मणांची हत्या सहन करतात त्या फिरंग्याकडून तुम्ही होता काय? असे आश्चर्य व्यक्त करून त्याच्या धर्मभावना चेतविण्याचा प्रयत्न केला होता."

या उताऱ्यात सत्तावनचे जिहादी स्वरूप दाखविणारे काय आहे हे मला समजत नाही.

**पृष्ठ २४२**

"कानपूरनंतर काल्पी हे रावसाहेब पेशव्यांचे मुख्यालय बनले होते. तरी तेथे महम्मद इसाक या बण्डखोराचे राज्य चालू होते. पण तो नानासाहेब पेशव्याच्या नावे आदेश काढीत असे...

तात्या टापे ग्वाल्हेरला गेले होते व बण्डखोर शिपायांपैकी ५००० जणांना चाळीस तोफांसह काल्पीला आणण्यात यश मिळविले होते. महाराजा शिंद्याजवळ असलेले मराठा सैन्य मात्र त्यांना मिळू शकले नाही."

तात्या टोपेने रावसाहेब पेशव्यांना लिहिले "विलायती मुसलमान सैन्य पाठवून द्या."

या उताऱ्यात सत्तावनला जिहाद म्हणता येईल असा कोणता पुरावा आहे? मराठा सैन्य मिळाले नाही कारण ते इंग्रजांना मानणाऱ्या शिन्द्यांचे सैन्य होते. "विलायती" म्हणजे अफगाण, अरब वगैरे मुसलमान जास्त हिरिरीने लढले यावरून ते जिहादी कसे ठरतात? ते जिहादी नसून धन्देवाइक सैनिक होते. लढाई हाच त्यांचा व्यवसाय होता. मालक हिन्दू असो की मुसलमान ते सारख्याच जोमाने लढत. त्यांना मोरे कोणत्या आधारावर जिहादी ठरवितात?

**पृष्ठ २४३**

पेशव्यांचे सैन्य जेव्हा ग्वाल्हेरात पोहोचले तेव्हा तेथील सैन्य महाराजाविरुद्ध बण्ड करून "दीन दीनच्या" घोषणा करीत पेशव्यांच्या सैन्याला येऊन मिळाले तेव्हा पेशव्यांच्या सैन्यानेही दीन दीनच्या घोषणा करीत आपल्या धर्मबन्धूंना प्रतिसाद दिला. या सर्व प्रकारावरून ग्वाल्हेरच्या लढायीचे जिहादी स्वरूप दिसून येते."

मुसलमान - जिहादी असे मोऱ्यांचे समीकरण दिसते. शिवाय ग्वाल्हेरच्या लढाईत राणी लक्ष्मीबाई तोफावर चालून गेली. ग्वाल्हेरच्या विजयात याचा मोठा वाटा होता असे वर्णन सावरकरांनी केले आहे. ते निराधार आहे असे मोऱ्यांनी कुठेही दाखवून दिलेले नाही.

**पृष्ठ २५३**

झाशी व नोगाव येथे मुस्लिम प्राबल्य असलेल्या घोडदळाऐवजी पायदळाने आधी उठाव का केला या सम्बन्धी तेथील स्कॉट याने म्हटले आहे की झाशी व नोगांव येथे घोडदळाने पायदळाला उठाव करायला लावले होते. याचे कारण हेच होते की त्यांना तो मुस्लिम उठाव असल्याचे लपवावयाचे होते.

उठावाचे स्वरूप लपवायचे का होते? त्याना कुणाची भीती होती? राणीची? राणीच्या सैन्यात अरब व अफगाण होते. तिचे स्वतःचे अंगरक्षक अफगाणी मुसलमान होते. तेही राणीपासून आपले जिहादी स्वरूप लपवीत होते काय? जिहादी कधी आपले स्वरूप लपवतात काय?



**पृष्ठ २६१**

"दि. २६ जानेवारीच्या गुप्त हेरखात्याच्या अहवालानुसार राणीने कमिश्नरकडे एक वकील पाठविला होता. त्या अनुसार जर या वकिलाला चांगले वागविले गेले तर राणी ब्रिटिश सैन्याला कसलाही विरोध करणार नाही. शासनाची आज्ञा मानून आपल्या ताब्यातील सर्व जिल्हे ती शासनाला परत करून टाकील. पण जर असे न होता ब्रिटिश अधिकाऱ्यांनी इतराजी प्रकट केली तर ती त्यांच्याशी शेवटपर्यन्त लढा देणार आहे."

इंग्रजांकडून काही उत्तर न आल्यामुळे राणीचे वडील व काही इतर यांनी सांगितले की आता लढाई करणे व मृत्यु पत्करणे या शिवाय पर्याय नाही... सैन्य लढण्याच्या बाजूचे होते. त्यांनी धमकी दिली की आम्ही आपल्या वेतनाची सर्व थकबाकी वसूल करू (व निघून जाऊ)... सैन्याचे नेतृत्व हसनअली कडे होते.

याने काय सिद्ध होते? झाशी खालसा झाली नसती तर राणी इंग्रजांशी लढली नसती. हे सर्वस्वी कबूल केले तरी ती इंग्रजांशी लढली व तिने लोकोत्तर पराक्रम केला व या पराक्रमानेच आझाद हिन्द सारख्या उठावांना पुढे प्रेरणा मिळाली हे खोटे ठरते काय?

राणीच्या सैन्याचे नेतृत्व हसन अली या मुसलमानाकडे होते एवढ्यावरून राणीने केलेला सङ्ग्राम हा जिहाद ठरतो काय? हसनअलीच्या १८५७ मधील वागणुकीत कोणता जिहादीपणा दिसून आला होता?

**पृष्ठ २६२**

"फेब्रुवारी १८५८ मध्ये शहाजादा फिरोजशहा झाशीला येऊन थाम्बले होते. १७ फेब्रुवारी रोजी त्याने आपला ऐतिहासिक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्याच्या तीन दिवसांपूर्वी राणीचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला होता. या दोन्हीचे स्वरूप जिहादी जाहिरनाम्यासारखे आहे."

राणीच्या जाहीरनाम्याचे स्वरूप जिहादी आहे हे दाखविण्यासाठी मोऱ्यांनी त्यातील सम्बद्ध अंश प्रकाशित करायला पाहिजे होता. त्याशिवाय या पुराव्याचे त्यांच्या सिद्धान्ताच्या दृष्टीने काहीही मूल्य नाही. पूर्वीच्या उदाहरणावरून मुसलमानाचा उल्लेख आला की मोरे "जिहाद" म्हणून ओरडतात हे स्पष्ट झालेच आहे.

**पृष्ठ २६४**

राणी आपल्या अफगाण रक्षकांना घेऊन किल्याच्या दाराशी आली व तेथे तिने अद्भुत पराक्रम केला. या अफगाणात एकही हिन्दू नव्हता त्या अर्थी हा पराक्रम हा

जिहादाचा भाग होता, असे मोरे प्रतिपादतात.

यावर अधिक लिहिणे नलगे.

**पृष्ठ ६६**

"शेवटच्या क्षणी शत्रूने राणीच्या डोक्यावर तरवारीचा वार केल्यावर तिच्या जवळचा एकनिष्ठ पठाण सरदार गुल महम्मद हा त्या मारेकऱ्यावर तुटून पडला व त्याने त्याचे तुकडे केले." म्हणजे राष्ट्रवन्द्य राणीसाठी राष्ट्रशत्रूवर तुटून पडलेला गुल महम्मद हाही जिहादीच म्हणायचा काय?

१८५७ सफल झाले असते तर भारतात जिहादी मुसलमानांचे राज्य झाले असते असे मोरे याचे प्रतिपाद्य आहे. मी यावर सहजच विचारतो, जिहादी मुसलमानांच्या राज्यापेक्षा इंग्रजांचे राज्य चांगले होते याला प्रमाण काय? भारताने ब्रिटिशापूर्वी काही जिहादी राज्ये अनुभवली आहेत. औरंगजेबाचे राज्य जिहादी मुसलमानाचे राज्य होते असे म्हणण्यास हरकत नाही. त्याच्या राज्यात हिन्दूंची स्थिती ब्रिटिश राज्यापेक्षा वाईट होती काय? ओरंगजेबाने जिझिया कर देखील सुरू केला होता. तो अकबराच्या पूर्वी शेकडो वर्षे सुरू होताच. साधारणपणे पाच शतके भारतातील राज्य प्रधानतः मुस्लिमांचे होते. या अवधीत वीस टक्के भारत मुस्लिम झाला. ८० टक्के हिन्दू उरलाच.

धर्म सोडला तर इतर बाबतीत ब्रिटिश राज्यापेक्षा खुद्दओरंगजेबाच्या राज्यात हिन्दूंची स्थिती ब्रिटिश भारतापेक्षा जास्त चांगली होती. खुद्द औरंगजेबाच्या राज्यात जयसिंगासारखे हिंदू बादशाही फौजेच्या सेनापतिपदापर्यंत पोहोचू शकत होते. दक्षिणेत आक्कण्णा मादण्णा हे साऱ्या गोवळकोण्डा राज्याचे प्रधान होते. मुसलमान बादशहांच्या हिन्दू दिवाणांची डझनवारी उदाहरणे देता येतील. औरंगजबाच्या राज्यात हिन्दूंना अधिकारपदे मिळण्याचे शतमान अकबराच्या राज्यापेक्षा जास्त होते, असे अलीगड विश्वविद्यालयाच्या एका प्रबन्धामध्ये आकडे दिले आहेत.

उलट ब्रिटिश राज्यात कोणी हिन्दू ब्रिटिश साम्राज्याचा पंतप्रधान होईल अशी अपेक्षा करणे शक्य नव्हते. राजकीय चळवळीनंतर सत्ता नसलेली कायदेमण्डळे व काही मन्त्रिपदे अस्तित्वात आली. हिन्दूंच्या राजकीय महत्त्वाकांक्षेची परिसीमा म्हणजे आय. सी. एस. होणे. सैन्यात हिन्दूला अधिकाऱ्याचे पद मिळणे शक्य नव्हते. दुसऱ्या महायुद्धात ही पदे मिळू लागली. त्याचे श्रेय हिटलरला आहे.

आर्थिक बाबतीत तर ब्रिटिश राज्याला कोणत्याही पूर्वीच्या भारतावरील राज्याची



सर येत नाही. मुघलाइत्त जागतिक व्यापारातील भारताचा वाटा ब्रिटन, अमेरिका व युरोपातील कोणताही देश यापेक्षा जास्त होता. इंग्रजी राज्यात तो ३२ पर्यन्त खाली घसरला. राधाकमल मुकर्जी यांनी मुघल व ब्रिटिशकालीतील मजुरीचे दर व अन्नधान्याच्या किमती यांचा अभ्यास करून सिद्ध केले आहे की ब्रिटिश काळातील मजूर मुघल कालातील मजुरापेक्षा जास्त गरीब होता.

ब्रिटिशपूर्व राज्यातील शिक्षणाची स्थिती या पुस्तकात इतरत्र वर्णिली आहे.

ब्रिटिशांनी धार्मिक अत्याचार केले नाहीत याचे कारण सत्तावनपासून त्यांनी घेतलेला धडा. नाहीतर इंग्रजांनी साऱ्या भारतात गोव्याची पुनरावृत्ती केली असती. याचे प्रमाण म्हणजे ब्रिटिश लोक प्रभूने आपल्याला सम्राट बनविले ते त्याचा धर्म पसरविण्यासाठी असे मानत होते हे ईस्ट इण्डिया कम्पनीच्या डायरेक्टरच्या उद्‌गारावरून स्पष्ट आहे.

**पृष्ठ २७२/७३**

"रोहिलखण्डात गोहत्याबन्दी करण्यासंबंधी खानाने हिन्दूंना आवाहन केले होते. जर या काफिरांना म्हणजे इंग्रजांना देशाबाहेर हाकून देण्यास हिन्दू मदत करायला तयार असतील तर माझ्या संपूर्ण राज्यात गोहत्याबन्दी केली जाईल... तूर्त फक्त हिन्दू वस्तीत गोहत्या केली जाणार नाही."

ज्या राज्यात गोहत्याबन्दी चालू असते ते जिहादींचे राज्य असे म्हटले तर आजचे स्वराज्य हेही जिहादींचेच राज्य आहे. गोहत्याबन्दीचे आश्वासन खुद्द संविधानातच असताना सर्रास गोहत्या सुरू आहे. तेव्हा रोहिलखण्ड या १९ व्या शतकातील मुसलमान राज्यात गोहत्या चालत होती यावरून ते जिहादींचे राज्य कसे म्हणायचे?

पृष्ठ २७६ वर मुस्लिमशासित प्रदेशात झालेल्या एका हिन्दू /मुस्लिम संघर्षाचे वर्णन आहे. ब्रिटिश राज्यात देखील हिन्दू मुस्लिम संघर्ष होत होते ना? मग इंग्रज हे मुस्लिम जिहादी होते काय? नेहरू या भारतीय इंग्रजाच्या राज्यात ब्रिटिश राज्यातल्या पेक्षाही जास्त हिन्दू / मुस्लिम दंग झाले. मग नेहरू राज्य हे मुस्लिम जिहादींचे राज्य होते असे का म्हणू नये? नेहरूंच्या राज्यात तर हिन्दू / मुस्लिम दंग्यांबरोबरच स्पृश्यास्पृश्य दंगेही होऊ लागले. तेव्हा इंग्रजांचे व त्यांच्या दानातून निर्माण झालेल्या स्वराज्याचे जे स्वरूप होते ते पाहता इंग्रजांचा पराभव करून ५७ साली जे स्वराज्य निर्माण होऊ शकले असते ते श्रेष्ठ राहिले असते, यात शंका नाही.

**पृष्ठ २८०**

"कुवरसिंहांनी ब्रिटिशांशी दिलेला संघर्ष कितीही पराक्रमाच्या वर्णनाने अलंकृत झालेला असला तरी त्यांमुळे बिहारमधील १८५७ च्या उठावाचे स्वरूप बदलत नाही. उठाव यशस्वी झाला असता तरी त्यांचे स्थान एक जमीनदार फारतर एक सुभेदार यापलीकडे राहणार नव्हते. आणि त्यांनाही या पेक्षा अधिक आकांक्षा नव्हती."

ही विधाने प्रमाणरहित आहेत. बिहारच्या लढायात समरांगणावर एकच सूर्य तळपत होता व तो म्हणजे कुमारसिंह- एवढा पराक्रम केल्यावर तो नुसता सुभेदार वा जमीनदारच राहिला असता या असम्भाव्य विधानाला मोरे काही पुरावा देत नाहीत. कुमारसिंहाचे सैनिक मुख्यतः मुस्लिम होते असेही ते कोठे सिद्ध करीत नाहीत.

**पृष्ठ २९२**

"नानासाहेबांनी कोल्हापूरच्या चिमासाहबांकडे दूत पाठविले होते व त्यापैकी एक जण दक्षिण व शेवटी म्हैसूरचा दौरा करून आला होता. त्याने सांगितले होते की उठावासाठी ४० पलटर्णीचा त्याने पाठिंबा मिळविला आहे.

आम्ही इतरत्र नानांच्या संदर्भात हे दाखवून दिले आहे की त्यांच्या नावाने अन्य लोक हे उद्योग करीत असत."

नानांनी काही प्रयत्न न करता नुसते त्यांच्या नावाने उठाव होत असत ही गोष्ट नानास लोकोत्तर ठरविते. दक्षिण भारतात जे उठाव झाले त्यांत इंग्रजाशी उत्तरेप्रमाणे लढाया झाल्या नाहीत यावरून हे उठाव उल्लेखनीय नाहीत असे मोरे म्हणतात. कोणत्या दृष्टीने उल्लेखनीय नाहीत? सैनिक इतिहासाच्या दृष्टीने उल्लेखनीय नाहीत कारण लढाया झाल्या नाहीत. पण प्रश्न दक्षिणेतील भारतीयांची सहानुभूती उत्तरेतील उठावाला होती की नाही हा आहे. दिवेकरांनी दाखवून दिले आहे की दक्षिणेत उत्तरेप्रमाणे लढाया झाल्या नसल्या तरी उठावाबद्दल ज्यांना सजा झाल्या त्यांची संख्या उत्तरेपेक्षा जास्त आहे.

**पृष्ठ २९८**

"हैदराबाद संस्थानातील राजे रवी रायानं या जहागीरदाराचा सोनाजीपन्त हा सचिव होता. त्याने उठाव आयोजित करण्यासाठी नासाहेबांना पत्र लिहिले. ते पत्र घेऊन फेब्रुअरी १८५७ मध्ये रंगराव कानपूरला गेले. लखनौपासून पूर्वीच्या ४० मैलावरील बरवाठोडा येथे त्यांनी नानांची भेट घेतली. त्यानंतर नानांनी दिलेली आज्ञापत्रे घेऊन ते फेब्रुअरी १९५९ नंतर हैदराबादकडे आले. तो पर्यंन्त सोनाजीपंत वारला होता. ही आज्ञापत्रे घेऊन



व नानांचा वकील म्हणून मग रंगराव अनेकांना भेटले. या कामात यांना सफर उद्दौल्ला व शेख मदार यांनी बहुमोल मदत केली. सफर उद्दौल्ला च्या नावेही नानांचे आज्ञापत्र होते. शेख मदार हा देशमुख देशपाण्डे इत्यादीकडील या संबधीचे निरोप आणण्या/ नेण्याचे काम करी. सफर उद्दौल्ला याने लढण्यासाठी २५ हजार हवाई रॉकेट तयार केले होते."

यावर मोरे यांचे भाष्य असे :-

वरील पत्रे नानासाहेबांनी लिहिली असण्याची शक्यता पुढील काही कारणावरून वाटत नाही-

१) "सोनाजीपंत कोण होता व त्याचे महत्त्व व स्थान काय याची कोणाला फारशी माहिती नाही. तेव्हा केवळ त्याच्या एक पत्रावरून नानासाहेब असा आदेश काढतील असे वाटत नाही."

सोनाजीपंत कोण होता याची जर मोरे यांना माहितीच नाही तर त्याच्या आदेशावरून नानासाहेब काय करतील व काय नाही याचे अनुमान मोरे कसे काढतात?

२) "फेब्रुअरी १८५७ मध्ये उत्तरेतही उठावाची योजना उघड झाली नव्हती तेव्हा सोनाजीपंताला ती हैदराबादेत सुचणे व त्याने तसा नानांना सल्ला देणे संभाव्य वाटत नाही."

योजना कुणाला उघड झाली नव्हती? इंग्रजांना! ती नानांना व त्यांच्या हस्तकांनाही उघड झाली नव्हती असे म्हणणे हा गहजब आहे.

३) "रंगराव संबंधित पत्र घेऊन हैदराबादहून फेब्रुवरी ५७ ला निघाले. नानांना एप्रिल ५८ ला भेटले व परत हैदराबादला फेब्रुअरी ५९ नंतर आले. यासाठी लागलेला हा दोन वर्षांचा कालावधी संशयास्पद आहे."

उपलब्ध कागदपत्रांत सर्वच माहिती आहे असे मोरे का गृहीत धरतात? आपल्या पक्षाची कागदपत्रे फार थोडी सापडतात कारण पराभव झाल्यावर ज्यांच्याजवळ ती होती ती त्यांनी नष्ट केली. एप्रिल ५८ पासून फेब्रुअरी ५९ पर्यंत रंगराव काय करीत होते याची माहिती उपलब्ध नाही. या वरून जे उपलब्ध आहे तेही अविश्वसनीय आहे असा निष्कर्ष कसा निघतो?

४) "रंगरावांचे म्हणणे की तो नानांचा वारवाठोडा येथे भेटला... या काळात नाना भूमिगत होते त्यामुळे ते नानांना बिठूर येथे भेटणे शक्य नाही."

काय गंमत आहे पहा! रंगराव म्हणतो की मी नानांचा वारवाठोड येथे भेटलो व मोरे म्हणतात तो नानांना बिठूर येथे भेटणे शक्य नाही कारण नाना भूमिगत होते. असे विधान करण्यापूर्वी मोऱ्यांनी वारवाठोड कोठे आहे याचा शोध घ्यायला पाहिजे होता. शिवाय नाना भूमिगत होते ते इंग्रजांपासून आपल्या सहकाऱ्यांपासून नव्हे.

५) या आज्ञापत्रांच्या दिनांकाला उत्तरेतील उठाव ऱ्हास पावत चालला आहे. सगळेच संपलेले आहे अशा काळात अशी आज्ञापत्रे काढणे निष्फळ होते

औरंगजेबाने रायगड काबीज करून येसूबाई व राजाराम यांना कैद केले होते. तेव्हाही सर्व संपलेलेच होते. पण तेव्हाही राजारामाने दिल्ली जिंकण्याच्या गोष्टी केल्याच ना?

(६ व ७) अशी अनेक आज्ञापत्रे असून ती ज्यांना द्यायची त्यांची नावे नानांना तेथे कशी सुचली असतील? त्यात आलेला दीन हा शब्द लक्षणीय आहे.

सर्व नावे नानांनाच कशाला सुचायला पाहिजेत? त्यांचे शेकडो हस्तक होते. फारसी राजभाषा असतानाच्या काळात त्या काळी रूढ असलेला दीन शब्द नानांच्या जाहीरनाम्यात आला तर त्यात आश्चर्य करण्यासारखे काय आहे? रणजितसिंग सार्वभौम झाल्यावर देखील त्याने आपल्या सरकारची भाषा फारसीच ठेवली होती. भारताची भाषा इंग्रजी आहे असा प्रचार व आचार करणाऱ्या नेहरूंच्या काळात मोरे यांनी एका फारसी शब्दाला आक्षेप घ्यावा हे विचित्र आहे.

**पृष्ठ २९९**

''दक्षिणेतील राजप्रमुखांना उठावासाठी कसे प्रवृत्त केले जाई यासाठी गुलबर्गा जिल्ह्यातील सुरपूरचा राजा व्यंकप्पा नाईक याचे उदाहरण उल्लेखनीय ठरेल. त्याने मोठे सैन्य उभारून इंग्रजांविरूद्ध उठाव केला होता. याची हकिकत अशी आहे.

राजाने मग अरब रोहिले, बेरड यांची सात हजारांची फौज उभारली व ७ फेब्रुअरी १८५८ रोजी ब्रिटिश छावणीवर हल्ला चढविला''

हा वृत्तांत सांगून मोरे काय प्रस्थापित करू पाहतात? क्रान्तिकारक खोटा प्रचार करीत होते हे? आजकाल ज्याला मनोवैज्ञानिक युद्ध असे म्हणतात त्याचा खोटा प्रचार हा एक भागच आहे. अमेरिकेत pychological warfar करण्यासाठीच एक खातेच होते. लॉरेन्स ऑलिव्हियर याने पहिल्या महायुद्धात अरब देशात जाऊन त्यांच्यात तुर्कांबद्दल अपप्रचार केला म्हणून अरब त्या आपल्याच धर्मबन्धूंविरुद्ध उठले. इंग्रजांनी नाना फडणीसांविरुद्ध सवाई माधवरावांभोवती आपले हेर पेरून ''तू नाना फडणीसाचा अनौरस



मुलगा आहेस'' असे त्याच्या मनात विष ओतले व त्यामुळे त्याने आत्महत्या केली. अपवित्र काडतुसे पसरून इंग्रजांनी शत्रूविरुद्ध नव्हे तर आपल्याच प्रजाजनांच्या विरुद्ध फसवेगिरी केली ही गोष्ट मोरे खोटी मानत असले तरी सत्तावनची निन्दा करणारे व त्यांच्यापेक्षा इतिहासाच्या क्षेत्रात ज्यांचा अधिकार मोठा आहे ते रमेशचन्द्र मजुमदार ती सिद्ध झाली आहे असे म्हणतात.

मला फसवून क्रान्तिकारकांनी युद्धास प्रवृत्त केले असे या राजाने सांगितले. त्यावर विश्वास ठेवून इंग्रजांनी त्याची फशीची सजा माफ केली असे मोरे पुढे सांगतात. हे अत्यंत अविश्वसनीय आहे. सरकारशी युद्ध करणे हा गुन्हा आहे. दुसऱ्या कोणाच्या प्रोत्साहनामुळे तसे केले तर तो गुन्हा होत नाही हे कोणत्याही न्यायाधीशाला मान्य होणार नाही.

**पृष्ठ ३००**

''रंगो बापूजी स्वतन्त्रपणे साताऱ्याला उठावाची तयारी करीत होते. त्यांचा नानासाहेबांशी काडीचाही संबंध असणे शक्य नाही.''

याने काय सिद्ध होते? पेशवाईच्या पुनरुत्थानाचे स्वप्न पाहणारे अनेक भारतीय होते. ''पेशव्याची राजधानी असलेल्या पुण्याचा सूत्रधार वहाबी होता व साताऱ्याची भिस्त रोहिल्यावर होती'' या वरून हे दिसते की अठराव्या शतकातील मराठे व शीख यांच्या प्रभावशाली उत्थानाने जिहादी मुसलमान देखील छत्रपती व पेशवे यांना आपले मानू लागला होता. सत्तावनचे हे यश सुवर्णक्षरांनी लिहिण्यासारखे आहे.

**पृष्ठ ३०१**

''हिंदू व मुस्लिम यांनी एकत्र यावे हा या जाहीरनाम्यांचा हेतू होता.''

ओसामा बिन लादेनच्या कोणत्या जाहीरनाम्यात हा हेतू दिसून आला आहे?

**पृष्ठ ३०८**

जाहीरनाम्यात ''इंग्रजांनी कर कसा वाढविला आहे. बेकारी कशी वाढविली आहे'' याचा उल्लेख आहे.

या उल्लेखांचा जिहादशी काय संबंध?

**पृष्ठ ३०९ व ३१४**

''मुस्लिम देशांची मदत... या यातील उल्लेखनीय बाबी आहेत.'' नानासाहेबांनी रशियाची मदत मागविली आहे अशा अफवा अझीमुल्लाने पसरविल्या होत्या.

अझीमुल्ला व महमदअली हे नानासाहेबांचे हस्तक रशियाशी संधान बांधण्यास

गेले होते या बद्दल प्रस्तुत पुस्तकात माहिती आहे. ब्रिगेडियर फलॅशॅम याला खुद्द ब्रिटनच्या पंतप्रधानाने झाशीमध्ये झालेल्या रशियन हेरांच्या सुळसुळाटावर लक्ष ठेवण्यासाठी झाशीला पाठविले होते. फ्रेंचांच्या मदतीने ब्रिटिशाचे उच्चाटन करण्याचा नाना फडणीसाचा व्यूह होता हे त्याच्या पत्रव्यवहारावरून स्पष्ट आहे. तेव्हा इंग्रजी राज्यामुळे आम्हाला बाहेरच्या जगाचे ज्ञान झाले ही आंग्लदासांची समजूत मुळातच मूर्खपणाची आहे.

"नानांचा हस्तक अझीमुल्ला याने कानपुरात एक प्रचंड सभा बोलावून दीर्घ भाषण केले होते" भारतातून इंग्रजी राज्य संपलेच आहे. मी इंग्लंड पाहून आलो आहे व तेथील लोकांविषयी मला सर्वांपेक्षा अधिक माहिती आहे. इंग्लंड काय लहानसे बेट आहे. भारताकडे अधिक सैन्य पाठविणे त्यांना अशक्य आहे. आपण किती मूर्ख लोक आहोत की मूठभर परकीयांकडे आपण हा देश देऊन टाकला आहे. ते आपला धर्म व विशेषाधिकार नष्ट करीत आहेत. मी हे आवाहन करतो की सर्वजण एकत्र येऊन आपल्या या शत्रूला समूळ नष्ट केले पाहिजे.

इंग्रजी शिक्षणाने भारतात राष्ट्राभिमान व ऐक्य निर्माण केले असे म्हणणाऱ्यांनी हे भाषण मनन करावे. भारतीय सैनिकाशिवाय इंग्रज भारतावर राज्य करू शकणार नाहीत हे अझीमुल्लाचे भाकित भाकीत सुभाषचन्द्र बोस यांनी पुढे प्रत्यक्षात आणले.

**पृष्ठ ३२१**

रावसाहेब पेशव्यांच्या जाहीरनाम्यात "राष्ट्रीय धर्म म्हणजे कोणता हे स्पष्ट सांगितलेले नाही. त्यांनी एका हिंदू राजाला काफीर म्हटले आहे हे लक्षणीय आहे"

ज्या हिंदू राजाला काफीर म्हटले आहे तो चरखारीचा स्वातन्त्र्ययुद्धाविरुद्ध ब्रिटिशांशी हातमिळवणी करणारा देशद्रोही राजा होता. तेव्हा रावसाहेब पेशवे "बेइमान" या अर्थी काफीर हा शब्द वापरीत आहेत हे स्पष्ट आहे. याने राष्ट्रीय धर्म या शब्दाचा अर्थही स्पष्ट होतो. राष्ट्रीय धर्म म्हणजे देशाशी इमान राखणे

**पृष्ठ ३२१**

अयोध्येचा नबाब बिरजिस कादर याने आपल्या जाहीरनाम्यात म्हटले होते-

"सर्व हिंदू व मुस्लिमांना हे माहीत आहे की प्रत्येक मनुष्याला चार गोष्टी प्रिय असतात १) धर्म २) प्रतिष्ठा ३) जीव व ४) मालमत्ता. या चारही गोष्टी स्वराज्यातच सुरक्षित राहतात. त्यात कोणाच्याही धर्मात हस्तक्षेप होत नाही"

हे वाक्य उद्धृत करून मोरे यांनी आपल्या सर्व प्रतिपाद्यावर तिलांजली दिली



आहे. यातील स्वराज्य शब्द हा मुळातील फारसी शब्दाचा अनुवाद आहे की मुळातलाच आहे हे मोरे यांनी स्पष्ट केले नाही. येथे मोरे नेहमी उद्धृत करतात तो दीन शब्द नाही. त्या ऐवजी धर्म शब्द आहे. तेव्हा स्वराज्य व धर्म हे दोन्ही शब्द मुळातलेच आहेत असे अनुमान निघते. "स्वराज्य हा शब्द प्रथम दयानन्दांनी वापरला" असे रमेशचन्द्र मजुमदारांनी म्हटले आहे. त्यांना शिवभारतातील "स्वराज्यं संविधास्यति" व शिवाजीच्या पत्रातील हिन्दवी स्वराज्य हा उल्लेख माहीत नाही. वरील उताऱ्यात स्वराज्य व स्वधर्म या दोन्ही मानबिन्दूंना आवाहन आहे व हिंदू आणि मुसलमान या दोघांनाही धर्माच्या नावाने आवाहन असल्यामुळे हे जिहादी आवाहन असू शकत नाही. मोरे म्हणतात त्याप्रमाणे सत्तावनच्या क्रान्तियुद्धात सामील झालेले मुसलमान मुळात जिहादी असतील पण नानासाहेब पेशवे राणी लक्ष्मीबाई, राजा कुमारसिंह व तात्या टोपे यांच्या सहवासात आल्यावर आपले जिहादी स्वरूप सोडून ते स्वराज्य व स्वधर्म यांचे पूजक झाले होते, असे अनुमान अटळ आहे.

सत्तावनमधील संभाव्य स्वराज्यापेक्षा ब्रिटिश राज्य स्वीकरणीय होते असे मानणाऱ्या मोरे, मजुमदार, फाटक आणि कंपनीच्या संबंधात वरील जाहीरनाम्यातील प्रतिष्ठा हा शब्द महत्त्वाचा आहे. इंग्रजी राज्यात सर्व आबादीआबाद होते असे मानले तरी ज्या देशातील लोकांच्या हातात कोणतीच सत्ता नाही व माबाप सरकारने कृपया दान न केलेल्या अशा त्यांच्या नावावर मानल्या गेलेल्या कोणत्याही उपलब्धी नाहीत त्यांना जगात काही प्रतिष्ठा असू शकते काय? अशा राष्ट्राचे भले झालेले इतिहासात एक तरी उदाहरण आहे काय?

**पृष्ठ २२२**

मुस्लिमांना उद्देशून काढलेल्या जाहीरनाम्यात लिहिले होते

ज्यू व ख्रिश्चनांना मित्र बनवू नका...

या वाक्यावरूनच हा जिहादी जाहीरनामा नाही हे सिद्ध होते. त्यात हिंदूंना मित्र बनवू नका असे म्हटलेले नाही. जिहादी तत्त्वज्ञानाप्रमाणे ख्रिश्चन व ज्यू हे काफीर असले तरी ते कुराणाला मान्य असलेल्या बायबलच्या अनुयायी आहेत. उलट हिंदू हा कोणत्याच दृष्टीने मुसलमानांच्या जवळचा नाही. जिहादी, काफिराला मित्र बनविण्यासाठी देखील कधीही त्याच्या धर्माबद्दल बरे बोलत नाही.

**पृष्ठ ३२६**

शहाजादा फिरोजशहा याचा जाहीरनामा

"त्यानंतर इंग्रजांनी धर्मांतरासाठी योजलेल्या १५ कलमांची यादी देण्यात आलेली आहे. यात धर्मग्रंथ जाळणे, धर्मोपासनेस प्रतिबंध करणे, मशिदी व मन्दिरे उभारण्यास बंदी करणे, धर्मविधानाप्रमाणे विवाहादी कार्यक्रम करू न देणे, बायबलचा कायदा लागू करणे. मौलवींना व धर्मपण्डितांना शिष्योपदेश व धर्मप्रवचन करण्यास बंदी करणे, येथील लोकांना निःशस्त्र करणे इत्यादी उपायांचा समावेश आहे."

हे सर्व खरे असूच शकत नाही असे गृहीत धरून मोरे यांनी हा उतारा दिला आहे. पण हे सर्व खरे आहे या बद्दल पुरावे देता येतात. याचे प्रत्यंतर म्हणजे ख्रिस्ती देशात धर्माचे प्राबल्य असताना हे सर्व होत होते व गोव्यात पोर्तुगीजांनी हे सर्व केले आहे. इंग्रज हा सर्व बाबतीत इतर युरोपीयापेक्षा साळसूद होता ही समजूत मूर्खपणांची आहे. सत्तावन झाले नसते तर या सर्वांचा प्रत्यय मोऱ्यांना आला असता.

**पृष्ठ ३३४**

"इंग्रजांनी झाशीचे राज्य आपल्या वतीने १० महिने तिच्या हवाली करून तिचा बहुमान केला होता."

मोरे या बद्दल पुरावा देत नाहीत. इंग्रजांनी दहा महिन्यासाठी राणीला झाशीचे राज्य दिले होते असा हुकूमनामा कोठे आहे काय? असा असेल तर इंग्रजांनी राणीविरुद्ध ह्यू रोजला ६०००० सैन्य देऊन का पाठविले? तिला नजराणा म्हणून बेड्या का पाठविल्या?

इंग्रजांनी लुबाडलेले राज्य १० महिन्यासाठी आपल्याला देणे हा बहुमान आहे असे समजण्याइतका भारतीयांचा अधःपात सत्तावन साली झालेला नव्हता.

**पृष्ठ ३३७**

मौलवी अहमदशहा यांचा जिहादनामा "हे बंधूंनो सध्या हे निंद्य ख्रिश्चन उघडपणे अन्याय व अत्याचार करीत आहेत. निष्पाप लोकांना ठार मारीत आहेत. मालमत्तेची लूट करीत आहेत. घरांना आगी लावीत आहेत. त्यांनी सक्तीने गरीब लोकांना सेवेत घेतले आहे व बेयोनेटची भीती घालून त्यांना एकत्र बांधून त्यांची भिंत तयार करून त्याचा ढालीसारखा उपयोग करीत आहेत."

हे सर्व खोटे आहे असे गृहीत धरून मोरे हा उतारा देतात. हे सर्व अक्षरशः खरे आहे असे दाखविणारे काही पुरावे प्रस्तुत पुस्तकात आहेत. मौलवीचे सर्व आरोप अक्षरशः खरे आहेत.



**पृष्ठ ३४२**

मौलवीच्या जाहीरनाम्यातच पुढे

"इंग्रजांनी आपल्या राणीला लिहिले की जर आम्हाला भारतातील प्रत्येक शंभर पैकी १५ मौलवी व प्रत्येक १०० हिन्दू पण्डितांपैकी १५ जण तसेच ५ लाख हिंदू/मुस्लिम शिपाई व जनतेला ठार मारण्याची परवानगी दिली तर आम्ही काही दिवसांतच येथील सर्व लोकांना ख्रिश्चन बनवू"

हे सर्व खोटे आहे असे गृहीत धरून मोरे मौलवीची बदनामी करण्यासाठी हे उतारे देतात. पण प्रस्तुत पुस्तकातच दिलेल्या काही उदाहरणावरून हे खोटे असण्याचा संभव फारसा नाही.

**पृष्ठ ३४६**

सत्तावनच्या काळातील हिंदू/मुस्लिम संघर्षाची उदाहरणे म्हणून खालील उदाहरण दिले आहे.

"बिजनोर जिल्ह्यातील शहरात मुसलमानांचे व खेड्यात हिंदूंचे वर्चस्व होते. तेथे ठाकूर चौधरींचे काही बालेकिल्ले होते. त्यांना खानाची नबाबशाही मान्य नव्हती. त्यातून त्यांच्यात संघर्ष सुरू झाला. त्याचे रूपांतर हिंदू/मुस्लिम सशस्त्र संघर्षात झाले."

ज्याला ब्रिटिश काळात हिंदू/मुस्लिम दंगे म्हणत त्यातला हा प्रकार नाही. हा हिंदू व मुस्लिम राज्यकर्त्यातला संघर्ष आहे. हिंदू/मुस्लिम दंग्यात हिन्दू व मुस्लिम राज्यकर्त्यांचा काही संबंध नसतो. हिंदू व मुस्लिम नागरिकच एकमेकांच्या उरावर बसण्याचा प्रयत्न करतात.

मोऱ्यांनी दिलेल्या इतर उदाहरणांना हाच आक्षेप लागू आहे.

**पृष्ठ ३६०**

विल्यम डालरिंपल याची खालील माहिती उल्लेखनीय ठरेल

"जाफर यांनी स्पष्ट केले की हिंदू व मुसलमान समान आहेत व जिहाद केवळ अशक्य आहे व तसा विचार करणे हा मूर्खपणा आहे. कारण बहुसख्य सैनिक हिंदू आहेत."

एका सेनानीच्या म्हणण्यानुसार ६०००० बंडखोर सैनिकापैकी किमान २५००० जिहादी होते.

मोऱ्यांच्या सर्व पुस्तकातील प्रतिपाद्य एका वाक्यात उद्ध्वस्त करणारा हा उतारा आहे. जेथे चार महिने सतत लढाई झाली त्या दिल्लीच्या वेढ्यातील बहुसंख्य शिपाई हिंदू होते मग हा जिहाद कसचा?

एकूण ज्यांना सत्तावनचा संग्राम हा जिहाद नव्हता याची खातरजमा करून घ्यायची आहे त्यांनी मोऱ्याचे प्रस्तुत पुस्तक वाचावे. मौलवी अहमदशहा, बख्तखान वगैरे सत्तावनचे वीर जिहादी होत असा आरोप करताना या वीरांच्या वर्तनातील एकही जिहादी कृत्य कृत्य त्यांना दाखविता आले नाही.

मुस्लिम राज्यकर्त्यांनी ब्रिटिशाना सत्तावनमध्ये नाकी नऊ आणले होते असे दाखविणारा दुसरा संग्राम अयोध्येचा. तत्कालीन मुस्लिम राज्यकर्त्यांची भूमिका हिंदू मंदिरांच्या बाबतीत आजच्या काँग्रेस सरकारपेक्षा अधिक अनुकूल होती असे उदाहरण ते देतात. अयोध्येतील शिपाई मुख्यतः मुसलमान होते असाही पुरावा ते देत नाहीत व तसे असण्याचा सुतराम संभव नाही. ज्या कानपूरमध्ये तात्या टोपे एका इंग्रजी सेनानीला धूळ चारली तेथल्या लढाईतील तात्या टोपेच्या सैन्याचे वर्णन तत्कालीन इंग्रज. ''पांडे आर्मी'' म्हणून करतात. हे नाव मंगल पांडे वरून त्यांनी दिले आहे. म्हणजे ते शिपाई उत्तर प्रदेशातले ब्राह्मण शिपाई होते. राणी लक्ष्मीबाईच्या १२००० सैन्यात १०००० बुन्देले होते असे त्यानी आकडे दिले आहेत. ग्वाल्हेरच्या लढाईत मुसलमान जास्त चांगले लढले एवढेच त्यांनी दाखवून दिले आहे. हे मुसलमान जिहादी होते याचे काहीच प्रमाण दिले नाही. बहुसंख्य सैन्य मुसलमान होते असे कोठे विधानही नाही. तेव्हा मोऱ्यांना पारतंत्र्य कायम राहिले याबद्दल खरी धन्यता वाटत आहे व आपल्या सदसद्विवेकबुद्धीची टोचणी बोथट करण्यासाठी ते सत्तावनचे अवमूल्यन करू चाहतात.

■■■





प्रकरण नऊ

# जगातील इतर क्रान्तियुद्धाशी तुलना

सत्तावनच्या निंदकांची विचारसरणी किती रोगट आहे याचा प्रत्यय घ्यायचा असेल तर ती सुसंगतपणे साऱ्या इतिहासाला लावून पहावी म्हणजे जगात स्वातंत्र्ययुद्ध असे नाव देता येण्यासारखी घटना कुठे घडलीच नाही, असा निष्कर्ष काढावा लागतो. इलस्ट्रेटेड वीकली ऑफ इंडियामध्ये बेचाळीसच्या उठावाबद्दल एक लेख आला होता. तो या संदर्भात वाचण्यासारखा आहे. या लेखात सत्तावनचा उठाव हे स्वातंत्र्ययुद्ध नव्हते हे ओळखण्याइतकी ''प्रगती'' भारतीय विचारवंतांनी केली आहे. आता तोच न्याय बेचाळीसच्या उठावाला लावण्याचे पुढचे पाऊल त्यांनी उचलले पाहिजे, असे लेखकाचे म्हणणे होते.

## क्षुद्र दंगा

असे पाऊल उचलणे फारच सोपे आहे. बेचाळीस साली ब्रिटिशांना हुसकून लावून टीचभर जमिनीवर पळभराचे राज्य देखील भारतीयांना कुठे स्थापन करता आले नव्हते,

नुसती टपालघरे जाळणे व गाड्यांचे रूळ उखाडणे अशी विध्वंसक कृत्ये केली गेली, लक्षावधी भारतीय इंग्रजांच्या सैनिक व असैनिक नोकऱ्या इमाने-इतबारे करीत राहिले व ब्रिटिश व्यवस्थेत एका दिवसाचाही खंड पडला नाही. तसेच या उठावामागे काहीही योजना नव्हती, तो जनतेचा स्वयंस्फूर्त उठाव होता, असे खुद्द महात्मा गांधी व पंडित नेहरू यांनी म्हटले होते.

या उठावाला जनतेचा पाठिंबा होता हे देखील चर्चिलने मान्य केले नव्हते. त्याला मुसलमान व हरिजन यांची सहानुभूती नव्हती. देशी वृत्तपत्रे उठावाच्या घातपाती स्वरूपाची निंदाच करीत होती. जनतेचे एक पुढारी लोकनायक अणे यांनी उठावाचा जाहीरपणे निषेध केला होता.

सारांश बेचाळीसचा उठाव हा ''एक क्षुद्र दंगा'' होता.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे दुसरे स्वातंत्र्ययुद्ध देखील असेच निकालात काढता येते : ''नेताजींची आझाद हिंद फौज ही जपान्यांची हस्तक फौज होती, जपानी तुरुंगातील छळाची भीती व जपान्यांची प्रलोभने या आझाद हिंद फौजेत शिरणाऱ्यांच्या मूळ प्रेरणा होत्या, त्यात देशभक्तीचा कुठेही संबंध नव्हता. नेताजींना काँग्रेसने हाकलून दिले व देशात पुढारीपणाला काही स्थान उरले नाही म्हणून नशीब काढण्यासाठी नेताजी देशाबाहेर गेले. तेव्हा जर्मन व जपानी यांनी त्यांचा उपयोग करून घेतला व त्यांनीही आपली पुढारीपणाची वैयक्तिक महत्त्वाकांक्षा पुरी करण्याची ही संधी साधली.

आझाद हिंद फौजेमागे योजना असलीच तर ती जपान्यांची होती. भारतीयांची नव्हती. पेशवाईचे वारस म्हणून सत्तावनचे शिपाई जसे नानासाहेबाकडे वळले तसेच भारताचे प्रथितयश पुढारी म्हणून आझाद हिंद फौज आयती नेताजींच्या स्वाधीन करण्यात आली.''

''आझाद हिंद फौजेला जनतेचा पाठिंबा होता असेही म्हणण्याची सोय नाही.'' नेताजींचा मार्ग चुकला आहे, त्यांनी भारतात पाय ठेवला तर मी त्यांच्याशी लढेन असे लोकनेते जवाहरलाल नेहरू बोलत. लढाई सुरू असेपर्यंत भारतातील वर्तमानपत्रांनी आझाद हिंद फौजेच्या बाजूने प्रचार केला नाही. लढाई संपण्याच्या सुमारास आझाद हिंद फौजेचे जे वृत्तांत प्रसिद्ध झाले त्यातील सूर बराचसा प्रतिकूल होता.

## अमेरिकन स्वातंत्र्युद्ध

या मजुमदारछाप निंदेचे उत्तरही स्पष्ट आहे. बेचाळीसचा उठाव करणाऱ्यांनी



केवळ नासधूस केली हे खरे असले तरी, या नासधुशीचे प्रमाण देशव्यापी व दीर्घकालीन झाले तर ब्रिटिशांना राज्य करणे अशक्य होऊन काँग्रेसच्या हातात सत्ता द्यावी लागेल, अशी त्यांना आशा वाटत होती. नासधुशीच्या मागची प्रेरणा स्वातंत्र्याची होती म्हणून हा उठाव स्वातंत्र्याचा ठरतो. तसेच आझाद हिंद फौजेने आझाद हिंद सरकारची स्थापना केली व ''चलो दिल्ली'' अशी रणगर्जना करून सिंगापूरपासून आसामच्या सीमेपर्यंत धडक मारली, म्हणून त्या सेनेचे युद्ध हे स्वातंत्र्ययुद्ध ठरते. योजना होती की नाही, कुणाची महत्त्वाकांक्षा गुंतली होती की नाही, कायदेशून्य वर्तन घडले की नाही हे सारे प्रश्न या दृष्टीने अप्रस्तुत आहेत; तसेच वर्तमानपत्री लिखाण व सरकारी नोकरांची राजनिष्ठा यावरून जनतेचा पाठिंबा या प्रयत्नांना नव्हता असे अनुमान काढणे बरोबर नाही, कारण वर्तमानपत्रावर बंधने होती, पाहिजे ते लिहिण्याचे त्यांना स्वातंत्र्यच नव्हते. त्याचप्रमाणे ब्रिटिश सरकारच्या सामर्थ्याला फारसा धक्का लागला नसल्यामुळे सरकारी नोकऱ्या सोडून स्वातंत्र्याच्या चळवळीत सामील होण्याचे धैर्य फारसे कुणी दाखविले नसले तरी, सरकारी नोकरांची सहानुभूती देखील त्या चळवळीच्या बाजूनेच होती हे सर्वांस माहीत आहे. यावरून अमुक सभेने सत्तावनच्या उठावाविरुद्ध ठराव पास केला व सय्यद अहमदासारख्या सरकीप्राप्त लोकांनी त्या उठावाची निंदा केली यावरून जनतेचा त्या उठावाला विरोध होता या मजुमदारी अनुमानाची किंमत काय हे स्पष्ट आहे.

सत्तावनच्या निंदकांची वादपद्धती वापरली तर भारतात कधीच स्वातंत्र्ययुद्ध वा स्वातंत्र्याची चळवळ झाली नाही असेच केवळ ठरत नसून जगात कुठेही स्वातंत्र्युद्ध हे नाव ज्याला शोभेल असे युद्ध झाले नाही, असे मानावे लागेल. अमेरिकेतील स्वातंत्र्ययुद्धावरून १८५७ च्या उठावाला स्वातंत्र्ययुद्ध हे नाव देण्यात आले. पण १८५७ च्या उठावापेक्षा अमेरिकन उठावाला नावे ठेवणे अधिकच सोपे आहे व लेकीसारख्या इतिहासकारांनी तेच केले आहे. अमेरिकनांनी केलेले तथाकथित स्वातंत्र्ययुद्ध हे स्वतःचा मायदेश जो इंग्लंड त्याविरुद्ध केलेले युद्ध होते म्हणून त्याला स्वातंत्र्युद्ध न म्हणता देशद्रोह म्हणणे अधिक रास्त आहे. या युद्धात स्पेन व परान्स या परराष्ट्रांनी मदत केली व या मदतीशिवाय अमेरिकनांना यश मिळणे अशक्य होते. म्हणजे एका दृष्टीने अमेरिकेचे तथाकथित स्वातंत्र्ययोद्धे हे केवळ देशद्रोहीच नव्हे, तर परकीयांचे हस्तक देखील होते.

सत्तावनच्या युद्धाच्या मागे राजेरजवाड्यांचे स्वार्थ होते असे म्हणणाऱ्यांनी अमेरिकन युद्धाच्या मागे विशिष्ट वर्गाचा स्वार्थ होता हे लक्षात ठेवले पाहिजे. ब्रिटिश सरकारने ईस्ट

इंडिया कंपनीला वसाहतीमध्ये विक्रीस पाठविण्याच्या चहावर एकाधिकार दिला होता. कंपनीने फक्त आपल्याच अडत्यामार्फत व फारच स्वस्त दराने चहा विकण्यास सुरवात केली. त्यामुळे वसाहतीतील व्यापाऱ्यांचे नुकसान होऊ लागले व त्यांनी जहालाशी संधान बांधले. अशा एकाधिकारामुळे आज आमच्या चहाच्या व्यापारावर गदा आली. उद्या दुसऱ्याही व्यापारावर गदा येईल, अशी या व्यापाऱ्यांना भीती वाटत होती. ब्रिटनने एकाधिकाराच्या बाबतीत वेळीच पड खाल्ली असती तर अमेरिकन व्यापाऱ्यांनी बंड केले नसते हे निश्चित. एकाधिकार रद्द केले तर १७६३ च्या पूर्वीप्रमाणे अमेरिका ब्रिटिश राजाच्या अंकित राहील, असे काँग्रेसच्या दोन अधिवेशनांनी जाहीर केले होते. सारांश अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध हे आपला व्यापार बुडेल या भीतीने अमेरिकन व्यापाऱ्यांनी केलेले बंड होते.

## जॉर्ज वॉशिंग्टनचे निराशागीत

आता या युद्धाला जनतेचा पाठिंबा कितपत होता हे पाहू.

१७७५ पर्यंत नॉर्थ कॅरोलिना, पेन्सिलव्हानिया, न्यू जेरसी, न्यू यॉर्क आणि मेरीलॅण्ड येथील विधानसभांनी स्वातंत्र्ययुद्धाच्या विरुद्ध ठराव पारित केले होते. १७७६ पर्यंत वाशिंग्टनच्या सैन्यात राजाच्या आरोग्याप्रीत्यर्थ सुरापान होत असे.

आयात-निर्यातीवर देखरेख करण्यासाठी अमेरिकन काँग्रेसने एक संघ स्थापित केला. या संघाबद्दल सॅम्युअल सीबरी नावाच्या एका राजपक्षीयाने असे उद्‌गार काढले की, ''आम्हाला गुलामच व्हायचे असेल तर आम्ही इंग्लंडच्या राजाचे गुलाम होऊ. या संघाच्या उपटसुंभ व बेकायदा सदस्यांचे आम्ही गुलाम का व्हावे?'' सीबरी सारखे हजारो राजनिष्ठ लोक अमेरिकेत होते.

अमेरिकेतल्या प्रत्येक वसाहतीत व प्रत्येक व्यवसायात स्वातंत्र्यविरोधी व राजनिष्ठ लोक होते. न्यूर्याक, न्यू जेरसी, पेन्सिलव्हानिया आणि कॅरोलिना येथे तर राजनिष्ठांचीच बहुसंख्या होती. सुमारे ७०,००० लोकांनी स्वातंत्र्ययुद्धाला त्रासून देशत्याग केला. १८३० पर्यंत न्यूयॉर्क व पोर्टस्माउथ येथे राजाचा वाढदिवस साजरा करणारे लोक होते.

वरच्या वर्गातले लोक साधारपणे राजनिष्ठ होते. यात राजाचे बरेच अधिकारी व धर्मगुरू यांचा समावेश होतो. व्हर्जिनिया व मेरीलॅण्ड येथले सोडून बाकी सारे जमीनमालक राजनिष्ठ होते. उत्तरेतील व्यापाऱ्यामध्ये देखील दोन तट होते. वकीलवर्ग राजनिष्ठ होता.



जॉन अडॅम्स् नावाचा जहाल देशभक्त काँग्रेसच्या बैठकीहून घरी जात असता एक खेडूत त्याला म्हणाला : ''तुम्ही व तुमच्या सहकाऱ्यांनी हे काय मांडले आहे? आता या प्रांतातून न्यायपीठे नाहीशी झाली आहेत.''

स्वातंत्र्ययुद्धात सामील व्हायला सैनिक मिळेनात. १७७५ मध्ये वाशिंग्टन लिहितो : ''समाजाहिताबद्दल एवढी अनास्था, सदाचारहीनता, स्वार्थासाठी वापरण्यात येणाऱ्या हीन क्लृप्त्या मी कधी पाहिल्या नाहीत. मला याची कल्पना असती तर हे काम मी कधीच पत्करले नसते.''

१७७६ साली वाशिंग्टनचे सैन्य न्यूयॉर्कमध्ये नसते तर न्यू यॉर्क राजनिष्ठ राहिले असते. कारण प्रॉव्हिन्शियल काँग्रेसने ९ जुलै १७७६ पर्यन्त स्वातंत्र्याच्या बाजूने मत दिले नव्हते. एप्रिलपर्यन्त ब्रिटिश सैन्य आले असते तर सारा इतिहास बदलला असता.

युद्धाच्या अखेरीस अमेरिकनांशी लढण्यासाठी इंग्रज व जर्मन शिपाई वापरण्याऐवजी अमेरिकन शिपाईच वापरणे श्रेयस्कर असे इंग्रजांना दिसून आले. न्यूयॉर्क मध्ये जार्ज वॉशिंग्टन पेक्षा, जॉर्ज ३ ला अधिक शिपाई मिळाले. न्यूयॉर्क शहरात जे अमेरिकन राजभक्त सैनिक होते ते लॉग आयलंडच्या किनाऱ्यावर जाऊन लूटमार व इतर दुष्कृत्ये करीत. नॉर्थर्न पेन्सिल्व्हानियातील भयंकर ''वायमिंग कत्तल'' अमेरिकन सैनिकांनीच केली होती. दक्षिणेमध्ये स्वजनाशी लढणाऱ्या अमेरिकनांनी युद्धास फारच हिडिस स्वरूप आणले व वैयक्तिक हेवेदावे उगवून घेतले. कॅमडनची लढाई ही मुख्यतः अमेरिकनांनीच इंग्लंडसाठी जिंकून दिली. नॉर्थ कॅरालिनातील स्कॉच लोक अखेरपर्यंत राजनिष्ठ राहिले. पेन्सिल्व्हानिया व जॉर्जिया येथील हजारो वनचर युद्धकर द्यावे लागू नयेत व युद्धात भाग घ्यावा लागू नये म्हणून पर्वतापलीकडे पळून गेले. लोकांच्या कर देण्याच्या नाखुषीमुळे वॉशिंग्टनच्या सैन्याची उपासमार झाली. १७८२ च्या सुमारास फ्रान्सने पैशाची भक्कम मदत केली म्हणून बाजू सावरली.

सत्तावनच्या उठावात भारतीय एकात्मतेची भावना नव्हती असा आरोप करण्यात येतो. अमेरिकेतील स्वातंत्र्युद्धात जेव्हा न्यू इंग्लंड मुक्त करण्यात आले तेव्हा मिड्ल स्टेट्स व दक्षिणेच्या मदतीस जाण्यास कोणी तयार होईनात. १७७५ च्या प्रारंभीच्या उत्साहानंतर उत्तरेस लढण्यासाठी दक्षिणेतले लोक मिळणे दुर्घट झाले. वॉशिंग्टनच्या सैन्यात जास्तीत जास्त अठरा हजार लोक होते. १७७६ सालच्या अखेरीस ही संख्या रोडावत पाच हजारावर आली.

अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध यशस्वी झाले व भारताचे मात्र फसले याचे कारण अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धाला जनतेचा पाठिंबा अधिक होता हे नाही. स्वातंत्र्ययुद्धाच्या पूर्वी देखील ९९ टक्के देश अमेरिकनांच्याच हातात होता. इंग्रजांच्या ठायी भारतीयाबद्दल जशी प्रखर द्वेषबुद्धी होती तशी स्वतःचेच बांधव जे अमेरिकन त्याच्याबद्दल नव्हती. अमेकिनांशी लढायला पुरेसे इंग्रज मिळाले नाहीत म्हणून विदेशी शिपाई भाड्याने आणले गेले.

१७७५ मध्ये क्वेबेकपासून फ्लोरिडाच्या सीमेपर्यन्त कोठेही ब्रिटिश सैनिक नव्हते. फक्त बॉस्टनमध्ये काही हजार होते. इंग्लंडहून सैनिक येण्यास शिडाच्या बोटीने पाच ते बारा आठवडे लागत.

प-रांस उघडपणे अमेरिकेच्या बाजूने युद्धात शिरले, तेव्हा १७७९ मध्ये प-रांसचे मित्रराष्ट्र म्हणून स्पेनही अमेरिकेच्या बाजूने युद्धात पडले. स्पेनमुळे न्यु ऑर्लीन्स हा अमेरिकन प्रायव्हेटिअर्सना आपला तळ बनविता आला. स्पेनने वेस्ट फ्लोरिडातील ब्रिटिश ठाणी देखील काबीज केली याची स्वातंत्र्युद्धात सफलता मिळवण्याच्या दृष्टीने बरीच मदत झाली.

## रशियन शिपायांचे[७] बण्ड

इतके होऊनही अमेरिकेला निर्णायक जय मिळाला नाही. पॅरिसचा तह झाला तेव्हा ब्रिटिशांच्या हातात न्यूयार्क, चार्लस्टन, सॅव्हाना व उत्तर पश्चिमेतील सात ठाणी होती. वॉशिंग्टनचे सैन्य अधिक काही करण्यास असमर्थ होते व ब्रिटिशांची समुद्रावरील सत्ता अनिर्बंध होती. असे असून पॅरिसचा तह अमेरिकेला अनुकूल झाला. कारण आपल्याच बांधवांशी अटीतटीने लढण्याची ब्रिटिशांची इच्छा नव्हती. उलट भारतीयांकडून पराभव पत्करण्यास इंग्रज स्वप्नातही तयार नव्हते. म्हणून त्यांनी १८५७ साली भारतीयांविरुद्ध आपले सर्व सामर्थ्य पणास लावले.

सत्तावन साली बंड करून उठलेले शिपाई बंडासाठी साधनसामग्री गोळा करण्यासाठी स्वजनांवर कसे अत्याचार करीत याचे मजुमदार प्रभृतींनी बरेच तिखटमीठ लावून वर्णन केले आहे. त्याच्या जोडीला अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धातील 'देशभक्त समित्यांच्या' कारवायांचा वृत्तांत वाचण्यासारखा आहे. या समित्या जे नव्या राष्ट्राशी इमानदार नाहीत असे त्यांना वाटत होते; त्यांचे धन लुटीत व त्यांना अटकेत ठेवत.



इंग्लंडशी राजनिष्ठ असलेले ७०,००० लोक या बंडखोरांच्या भीतीने इंग्लंडात पळून गेले व अमेरिकन बंडखोरांनी आपला कसा छळ केला याची रसभरित वर्णने करून लोकांस भडकविण्याचा प्रयत्न करू लागले. मॉरिसन व कॉमेजर या इतिहासकारांच्या मते छळाच्या या कहाण्या खऱ्या होत्या.

स्वातंत्र्ययुद्धाला मदत करणारे प्रायव्हेटियर हे चाच्यांच्या जातीचे होते. प्रायव्हेटियर्सची जहाजे व माणसे यांचा खर्च अमेरिकन सरकार करीत नसे. गलबते लुटून ते आपला खर्च भागवीत.

सारांश, मूठभर लोकांचा स्वार्थ, जनतेचा पाठिंबा नसणे, लूटमार वगैरे आक्षेप सत्तावनच्या युद्धापेक्षाही अमेरिकन युद्धाला अधिक लागू होतात.

१८५७ च्या उठावाची रशियन राज्यक्रांतीशी तुलना करणे उद्बोधक होईल. ऑक्टोबर १९१७ च्या बोल्शेविक क्रांतीला स्वातंत्र्ययुद्ध हे अभिधान दिले जात नाही, कारण त्या क्रांतीने अस्तित्वात आणलेले राज्य झारशाही या स्वकीय सत्तेच्या नाशावर उभारलेले होते. तरीपण १८५७ चा उठाव ही शिपायांच्या बंडाच्या स्वरूपाची एक क्षुद्र घटना होती असे म्हणणारे देखील रशियन क्रांती ही जगाच्या इतिहासाला कलाटणी देणारी घटना होती हे कबूल करतात. म्हणून अशा महत्त्वाच्या क्रांतीत व १८५७ च्या उठावात किती साम्य होते हे दाखवून दिले म्हणजे सत्तावनच्या निंदकांची दृष्टी किती पंगू आहे, हे स्पष्ट होईल.

मजुमदाराचा जाडा मुद्दा योजनाबद्धतेबद्दल आहे. या बाबतीत रशियन क्रांतीचा नंबर सत्तावनच्या खालीच लागतो. रशियन क्रांतीत जे विजेते ठरले त्या बोल्शेविकांनी १९१७ ची क्रांती आम्ही संयोजन घडवून आणली असा दावा सांगणारे बरेच लिखाण केले असले तरी, हे सर्व कल्पनाजाल आहे असे बहुतेक अबोल्शेविक इतिहासकारांचे मत आहे. लेनिनने रशियाच्या बाहेरील परिषदांमध्ये सर्व जगातील कामगारांना क्रांतीचे आवाहन केले होते. पण हे आवाहन रशियात कुणाच्याही कानी पडले नाही. मार्च १९१७ मध्ये झालेले संप ही क्रांतीची पूर्वसूचना होती हे इतरांप्रमाणेच बोल्शेविकांना देखील स्वप्नातही वाटले नाही व या संपांना सुरुवातीला त्यांनी विरोधच केला.

## सिगारेटचे थोटुक

ऑक्टोबरमध्ये बोल्शेविक क्रांती यशस्वी होण्याच्या आधी जुलैमध्ये एकदा लेनिनने उठाव करविला होता. तो अंगाशी आला व चारशे लोक नाहक प्राणास मुकले. तेव्हा

आपला या उठावाशी संबंध नाही म्हणून लेनिनने कानावर हात ठेवले. "आपला बंडाशी संबंध नाही" असे म्हणणारी राणी लक्ष्मीबाईची पत्रे दाखवून 'बंडा' च्या पूर्वयोजनेशी तिचा काही संबंध नव्हता असे मजुमदार सिद्ध करू पाहतात. लेनिन हरला असता तर वरील घटनेच्या आधारे त्याचाही क्रांतीत हात नव्हता, असे मजुमदारांनी प्रतिपादले असते.

सत्तावनप्रमाणे रशियन क्रांतीचे कर्तृत्व देखील मुख्यतः रशियन सैनिकाकडेच जाते. कामगारांचे संप मोडण्यासाठी झारने पाठविलेली सैन्ये कामगारांनाच मिळाली. १८५७ साली काही शिपाई बंड करून उठले तरी बहुतेक सैन्य ब्रिटिशनिष्ठच राहिले. त्याच्या भरीस सुमारे १ लक्ष ब्रिटिश सैन्य सुसज्ज होते. उलट झारचे सारेच सैन्य राजद्रोही झाले होते. झार पदच्युत झाला तो लढाई वाचूनच.

सोव्हिएट सरकारने लेनिन हा जर्मनांचा भाडोत्री हेर आहे असे सिद्ध करणारे कागदपत्र प्रकाशित केले. त्याने लोक भडकले व बोल्शेविकांचे मुखपत्र जे प्रवदा त्याच्या छापखान्याची त्यांनी नासधूस केली. लेनिन फसला असता तर अशासारख्या घटनांच्या आधारे रशियन क्रान्तीला लोकमताचा पाठिंबा नव्हता, असा प्रचार सहज करता आला असता.

रशियन क्रान्तीच्या एका अवस्थेत ज्या निरनिराळ्या उपराष्ट्रांचे मिळून रशिया हे बहुराष्ट्रीय राज्य झाले आहे, त्यांनी आपली वेगळी सरकारे व सैन्य स्थापन करून सवते सुभे उभारले. यामुळे फार गोंधळ माजला. शहराशहरातून ब्रेडसाठी दंगे होऊ लागले. खेड्यातून जबरदस्तीने जमिनी बळकावण्याचे सत्र सुरू झाले. सशस्त्र सैनिक देशभर फिरून लूटमार व रक्तपात करू लागले. दळणवळणाची सारी साधने त्यांनी नष्ट केली.

सारांश पूर्वयोजना, जनतेचा पाठिंबा, राष्ट्रीय एकात्मता, लूटमारीचा अभाव वगैरे कोणत्याच निकषावर रशियन क्रान्तीला सत्तावनच्या क्रान्तीच्या वर स्थान देता येत नाही.

फ्रेंच राज्यक्रान्ती ही एक महान् घटना समजली जाते. या क्रान्तीमुळे लोकशाहीला चालना मिळाली व समता, बंधुता आणि स्वातंत्र्य या मूल्यांचे महत्त्व स्थापित झाले असे समजतात. पण सत्तावनच्या निंदकांचा चष्मा वापरला तर ही घटना देखील लुटालूट व खुनाखुनी म्हणून निकालात काढता येते. एकतर फ्रेंच राज्यक्रान्तीचे स्वरूप राष्ट्रव्यापी नव्हते. फक्त पॅरिसपुरते मर्यादित होते. बव्हंश सैन्य बादशहाशी एकनिष्ठ होते. पण बादशहाच मेषपात्र असल्यामुळे त्याने वेळेवर बलप्रयोग केला नाही म्हणून सिगरेटच्या



ठिणगीने शहर पेटावे तशी फ्रेंच क्रांती पेटली. जमावाने बादशहाच्या महालावर मोर्चा नेला तेव्हा शाही रक्षकांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्याबरोबर जमावाची पांगापांग होऊन तो पळू लागला. पण बादशाहाने पुढे होऊन प्रजेवर बलप्रयोग करण्यास मनाई केली. रक्षकांनी शस्त्रे खाली ठेवली पण याबद्दल जमावाला बादशहाबद्दल काही कृतज्ञता वाटली नाही. उलट त्याने पुनः हल्ला केला.

## पिवळे पत्रकर्म

या क्रान्तीच्या मागे कोणतीही दूरगामी योजना नव्हती. यशस्वी झाल्यावर क्रान्तिकारकानी गिलोटिनच्या खाली नाहक हजारो नागरिकांच्या माना कापल्या, नेपोलियनच्या मते ही लोकशाही नसून गुंडशाही होती. नेपोलियन हा फ्रेंच, क्रान्तीतून जन्माला आला, म्हणून त्याने फ्रेंच क्रान्तीची अधिक बदनामी केली नाही. पण नेपोलियन ऐवजी, ज्या बरबाँन वंशाचा क्रांतिकारकांनी निःपात केला त्यांना क्रान्ती दडपण्यात यश आले असते तर एक गुण्डागर्दी म्हणून फ्रेंच राजक्रान्ती इतिहासात नमूद झाली असती.

सर्वसाधारणपणे एखाद्याच्या मतावर टीका करताना त्याच्या हेतूची चर्चा करणे शिष्टाचाराला सोडून असल्याचे समजले जाते. पण सत्तावनच्या निन्दकांनी आपल्या निन्देची इमारत नानासाहेब पेशवे, राणी लक्ष्मीबाई व राजा कुमारसिंग यांच्या हेतूंच्या चर्चेवर उभारली आहे. तेव्हा सत्तावनची निन्दा करण्यामागे त्यांचे हेतू काय आहेत याची मी चर्चा केली तर त्यांना तक्रार करण्यास जागा नाही. दुसरे असे की निव्वळ ऐतिहासिक सत्यान्वेषणाच्या दृष्टीने देखील निन्दकांच्या हेतूंची चर्चा आवश्यक आहे. कारण कोणत्या बौद्धिक वातावरणातून या निन्देचा जन्म झाला आहे हे त्यावरून स्पष्ट होईल.

सत्तावनची निन्दा करण्याची प्रवृत्ती बंगाली इतिहासकारात विशेष आहे. याची कारणे या इतिहासकारांच्याच लिखाणात स्पष्टपणे सापडतात. मजुमदार व सरकार हे इतिहासकार राणी लक्ष्मीबाई व शिवाजी महाराज वगैरेंच्या ठायी राष्ट्रीय भावना होती की नाही असा प्रश्न उपस्थित करतात. पण राष्ट्रीय भावनेचा त्यांना स्वतःला काडीचाही अनुभव नव्हता हे त्यांच्या लिखाणावरून स्पष्ट आहे. बंगाली प्रान्तीयतेपलीकडे या लेखकांना कोणत्याही सामाजिक भावनेचा अनुभव असल्याचे दिसत नाही. जदुनाथ सरकारांच्या मते बंगालच्या इतिहासातील ब्रिटिश युग हे ग्रीसच्या इतिहासातील पेरिक्लीसच्या युगासारखे वैभवशाली होते. अशा या "वैभवशाली" बंगालने ब्रिटिशांकडून ज्या राष्ट्रीयतेचे धडे घेतले तिचेच पाठ साऱ्या भारताला दिले. अर्थात्

बंगालचे "पुनरुज्जीवन" होण्याच्या आधी भारतात राष्ट्रीयतेसारख्या सुधारलेल्या चिजा असण्याचा संभव नाही. तेव्हा १८५७ च्या "बण्डखोरांची" कृत्ये तर दूरच राहू द्या, शिवाजी, राणाप्रताप वगैरे पुरुषांच्या कृत्यात देखील राष्ट्रीयता, देशभक्ती वगैरे प्रेरणा शोधू जाणे त्यांच्या मोटारीचा रंग शोधू जाण्यासारखेच हास्यास्पद आहे.

मजुमदारांनी हा बंगाली प्रांतीयवाद इतक्या थराला नेला आहे की शशांक या बंगाली राजाचे शत्रुत्व केल्याच्या महान् अपराधाबद्दल सम्राट हर्षवर्धनासारख्या राजर्षीची त्यांना निन्दा करावीशी वाटली व ही निन्दा करताना बाणभट्ट व ह्यूएनत्संग या समकालीन लेखकांच्या अस्सल साक्षी त्यांनी अस्वीकारार्ह ठरविल्या आहेत. दीड हजार वर्षांपूर्वीच्या घटनांचा विचार करताना देखील ज्या माणसाच्या मनावर बंगाली प्रान्तीयतेचा पगडा कायम राहतो तो, ज्या सत्तावनच्या स्वातंत्र्ययुद्धात इंग्रजी शिकलेल्या बंगाली बाबूंना फिरंग्याची कुलंगी कुत्री म्हणून लोक सतावीत, त्याची निंदा करण्यास प्रवृत्त होईल हे अपेक्षितच आहे. The Bengali as writing English were attacked या वाक्यावरून मजुमदारांच्या पोटात का दुखते हे स्पष्ट आहे.

जनता बंगाली बाबूंच्या विरुद्ध होती ती ते बंगाली म्हणून नव्हे, तर परसत्तेचे हस्तक म्हणून. इंग्रजी न शिकलेल्या बंगाल्यांना क्रांतिकारकांनी त्रास दिला नाही, या घटनेचा अन्वयार्थ समजण्याइतकी राष्ट्रीयता या इतिहासकारात नाही.

दूसरा खाक्या न. र. फाटकांचा आहे. न. र. फाटकांचे लिखाण हे पिवळ्या पत्रकाराचे लिखाण आहे, सत्यनिष्ठ संशोधकाचे लिखाण नाही. फाटकांच्या प्रतिपादनाच्या मागे पुढील धोरणे असता : (१) आपल्या प्रतिपादनाने वादाची धुळवड उडाली पाहिजे. (२) ब्राह्मणद्वेष्ट्या वर्गाला गुदगुल्या होतील असे त्याचे स्वरूप असले पाहिजे. सत्तावनची निंदा करण्यात फाटकांचे हे हेतू सूर्यप्रकाशाइतके उघड आहेत. सत्तावनच्या शताब्दीच्या वेळी त्यांनी आपली कुत्सित निंदा ओकली नसती तर त्यांच्या या विषयावरील लिखाणाची कोणी दखल घेतली नसती. केवळ संशोधनमूल्यांसाठी कोणी फाटकांच्या लिखाणाकडे ढुंकून पाहील इतकी कुवत फाटकात नाही. नानासाहेब, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई वगैरे सत्तावनचे पुढारी ब्राह्मण होते म्हणून त्यांना शिव्या दिल्यास ब्राह्मणद्वेष्ट्या वर्गास बरे वाटेल अशी फाटकांची अटकळ आहे. याच अटकळीनुसार रामदासांचा राजकारणाशी काहीच संबंध नव्हता, राजकारण हा शब्द चातुर्य या अर्थी त्यांनी वापरला, असे त्यांनी तारे तोडले आहेत!

■ ■ ■





# प्रकरण दहा | दूध वाघिणीचे की पूतनेचे?

इंग्रजी लष्करी ताबा व इंग्रजी शिक्षण यांच्यामुळे भारतात बौद्धिक पुनरुज्जीवन झाले असे मत सार्वत्रिक आहे. हे मत लोकहितवादीसारख्या पारतंत्र्यपूजकातच फक्त प्रिय होते असे नसून स्वतःला मराठी भाषेचे शिवाजी म्हणविणाऱ्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी देखील इंग्रजी शिक्षणाला वाघिणीचे दूध म्हणून गौरविले होते. "पुरोगामी" लोक ज्यांना पुनर्जागृतिवादी (revivalist) म्हणत त्या भारतीय विद्याभवन स्थापणाऱ्या कन्हैयालाल मुनशींचे देखील इंग्रजी शिक्षणाबद्दल असेच मत होते व राष्ट्रीय दृष्टीने भारताचा इतिहास लिहिण्याची प्रतिज्ञा करून त्यांनी जो इतिहास लिहविला त्याचा मथितार्थ हाच आहे की इंग्रजी राज्य व इंग्रजी शिक्षण हे या देशाच्या हजारो वर्षांच्या इतिहासातील यशःसिद्धीचे परमोच्च शिखर आहे.

## तक्षशिला व नालंदा

पुनरुज्जीवन हा शब्द वापरताना इंग्रजी शिक्षणाने बौद्धिक उज्जीवन घडवून आणण्यापूर्वी केव्हा तरी भारतात बौद्धिक उज्जीवन होते, त्याला मध्यंतरी ग्लानी आली व ती

इंग्रजी शिक्षणाने दूर केली असा काही लोकांचा अभिप्राय असतो. लोकहितवादींच्या मते प्राचीन भारतात हे उज्जीवन 'ऋषींच्या कारकीर्दीत' होते. विष्णुशास्त्री चिपळूणकर, कन्हैयालाल मुनशी वगैरेंच्या मते साधारणपणे तुर्क-अफगाण-मुघल आक्रमणांच्या पूर्वीपर्यंत हे उज्जीवन कायम होते. या मताप्रमाणे इंग्रजी शिक्षणाने पुनरुज्जीवन घडवून आणले याचा अर्थ प्राचीन भारतातील बौद्धिक उज्जीवनाच्या काली ज्या स्तराचे बौद्धिक जीवन भारतात दिसत होते त्या स्तरावर ते इंग्रजी शिक्षणाने पुनः आणून सोडले.

अर्थात इंग्रजी शिक्षणाने बौद्धिक पुनरुज्जीवन घडवून आणले की नाही या प्रश्नाची चर्चा करताना भारतीय आंग्ल शिक्षितांच्या बौद्धिक जीवनाचा स्तर तुर्क, अफगाण, मुघल आक्रमणांच्या पूर्वीच्या भारतातील बौद्धिक जीवनाशी तुल्य आहे काय याचा विचार केला पाहिजे.

असा विचार केल्याबरोबर इंग्रजी शिक्षणाने पुनरुज्जीवन घडवून आणले हा दावा किती पोकळ आहे हे एकदम उघड होते. तुर्क, अफगाण, मुघल आक्रमणांच्या पूर्वीच्या भारतात ज्योतिष, अंकगणित, बीजगणित, तर्क व्याकरण शिल्प, धातुकर्म, आयुर्वेद, शल्योपचार वगैरे अनेक विद्या निर्माण झाल्या. ही नुसती परकीय ग्रंथाची पोपटपंची नसून नवनिर्मिती होती. बाहेरचे जग या विद्यात भारताला गुरुस्थानी मानीत होते. अरबांनी भारतीय अंकगणित व बीजगणित युरोपात नेले म्हणून युरोपची वैज्ञानिक जागृति शक्य झाली. इंग्रजी शिक्षणामुळे भारतात या तोडीची कोणतीच वैज्ञानिक जागृति शक्य झाली नाही. या तोडीचे कोणतेच बौद्धिक नवनिर्माण झाले नाही. रामन्, रामनुजन् वगैरे एक दोन प्रतिभाशाली पुरुषांनी काही शोध लावले पण त्यातही रामनुजन्सारख्यांचे संशोधन परदेशात जाऊन वास्तव्य केल्यावरच शक्य झाले. रामन् सारख्यांचे तुरळक शोध देखील केवळ वैयक्तिक विक्रम होते. त्यामुळे नवनिर्माणाची परंपरा निर्माण झाली नाही. जगाने जिचे आचार्यपद आम्हाला द्यावे अशी एकही ज्ञानशाखा आंग्लशिक्षित भारतीयांनी प्रसृत केली नाही. नदीला पूर आला म्हणजे शेजारची आटलेली विहीर देखील त्या पाण्याने भरते. पण यावरून तिचे आटलेले झरे पुनः सुरू झाले असे अनुमान निघत नाही. त्याचप्रमाणे विसाव्या शतकातील ज्ञानाचा पूर काही अंशी भारतातही पसरला; पण त्या उसन्या पाण्याने भारतीय प्रतिभेचे आटलेले झरे पुनः जिवन्त झाले नाहीत. भारतात प्रतिभाशाली व्यक्ती जन्माला आल्या तरी त्यांच्या प्रतिभेला अंकुर फुटण्यास आंग्लशिक्षित भारतातले वातावरण पोषक नव्हते हे रामानुजन्, खुराना, नारळीकर, श्रीखण्डे वगैरेंच्या उदाहरणावरून स्पष्ट आहे.



## युरोपीय पुनरुज्जीवन

काही "पुरोगामी" लोकांचा वरील विवेचनावर असा आक्षेप येईल की इंग्रजी शिक्षणाने पुनरुज्जीवन घडवून आणले. याचा अर्थ प्राचीन भारतातील बौद्धिक वातावरण पुनः निर्माण केले असा नसून, मध्ययुगीन युरोपात जे renaissance पुनरुज्जीवन झाले त्याच्यासारखे बौद्धिक पुनरुज्जीवन भारतात घडवून आणले असा आहे. मध्युगीन युरोपात प्राचीन ग्रीक व रोमन विद्या-कला यांना जी ऊर्जितावस्था आली तिलाच पुढे बहर येऊन गॅलीलियो, न्यूटन वगैरे पुरुषांनी आधुनिक युरोपचे विज्ञानयुग निर्माण केले. इंग्रजी शिक्षणाने प्राचीन भारतातील एखादी परिस्थिती पुनः निर्माण केली असे म्हणणे हा शुद्ध revivalism पुनर्जागृतिवाद आहे. ज्याच्या पुनःस्थापनेची इच्छा करावी असे प्राचीन भारतात काही नव्हतेच. म्हणून revivalist पुनर्जागृतिवादी लोकांच्या अर्थी इंग्रजी शिक्षणाने पुनरुज्जीवन घडवून आणले, असे म्हणणे ही इंग्रजी शिक्षणाची निन्दा होईल.

भारताच्याच काय, कोणत्याही देशाच्या इतिहासात ज्याच्या पुनःस्थापनेची इच्छा करावी असे काहीच घडले नाही म्हणून revivalism पुनर्जागृतिवाद हा सर्वथा निन्दनीय आहे हे मत इतके वेडगळपणाचे आहे की त्याची चर्चा करण्यात अर्थ नाही. पण इंग्रजी शिक्षणाने जे काय घडवून आणले ते युरोपातील renaissance शी तुल्य होते काय या प्रश्नाची चर्चा करणे आवश्यक आहे.

युरोपातील renaissnce ने खालील गोष्टी घडवून आणल्या :-

१) आपण ग्रीक व रोमन संस्कृतीचे वारसदार आहोत याची युरोपला जाणीव करून देऊन ग्रीक व रोमन विद्या-कलांना ऊर्जितावस्था आणली.

२) नवीन शोध लावण्याची प्रवृत्ती निर्माण केली. ही प्रवृत्ती पुढे वाढीस लागून युरोपात वैज्ञानिक क्रांती घडून आली. या क्रांतीमुळेच युरोप जगात सर्व क्षेत्रात अग्रेसर झाला.

## सूर्य व काच

इंग्रजी शिक्षणाने यापैकी कोणती गोष्ट भारतात घडवून आणली? Renaissance ने युरोपला आपल्या वारशाची ओळख पटविली, उलट इंग्रजी शिक्षणाने भारतीय ज्ञानाची जी परंपरा तग धरून होती ती देखील नष्ट केली. एवढेच नव्हे, तर ती नष्ट करणे हाच या शिक्षणाचा उद्देश आहे असे त्याचा प्रणेता मेकॉले याने सूचित केले होते. आंग्लशिक्षित,

भारतीय ज्ञानाच्या परंपरेपासून इतके दुरावले आहेत की अंकगणित, बीजगणित, शल्योपचार वगैरे शास्त्रे भारतात उद्भवली असे त्यांना सांगितले तर वेदात आगगाड्या व विमाने तयार करण्याची प्रक्रिया दिली आहे असे सांगण्यासारखेच हे हास्यास्पद आहे असे त्यास वाटते. ग्रीक व लॅटिन यांच्या अध्ययनाला युरोपीय विद्यापीठात मानाचे स्थान आहे. उलट संस्कृत विद्या हा आंग्लशिक्षितांच्या कुचेष्टेचा विषय आहे. तेव्हा आपल्या प्राचीन वारशाची ओळख व त्यांचे संवर्धन हा युरोपीय Renaissance चा विशेष इंग्रजी शिक्षणाच्या परिणामाला मुळीच लागू होत नाही.

युरोपीय Renaissanceचा जो दुसरा विशेष म्हणजे त्याला पुढे बहर येऊन युरोपात वैज्ञानिक क्रान्ती झाली तो तर इंग्रजी शिक्षणाच्या परिणामाला लागू करू जाणे सुतराम हास्यास्पद आहे. वैज्ञानिक क्रान्तीनंतर अवघ्या चार शतकात युरोपने सर्व क्षेत्रात जी प्रगती केली ती साऱ्या मानवजातीने त्यापूर्वीच्या चार हजार वर्षांत देखील केली नव्हती. गॅलीलियो, कोपर्निकस, न्यूटन, डार्विन, वगैरे दिग्गज वैज्ञानिकांची मालिका युरोपात निर्माण झाली. त्यांच्याशी भारतातील आंग्लशिक्षित वैज्ञानिकांची तुलना करणे सूर्यप्रकाशाने चमकणाऱ्या काचेची सूर्याशी तुलना करण्यासारखे आहे.

## शंभर वर्षांनी बोला

यावर इंग्रजीभक्त म्हणतील की युरोपीय पुनरुज्जीवनाला बहर येऊन युरोपात वैज्ञानिक क्रान्ती व्हायला दोन तीन शतके लोटावी लागली. भारतातील इंग्रजी शिक्षणाचे अस्तित्व शे-दीडशे वर्षांपेक्षा जास्त नाही. तेव्हा इंग्रजी शिक्षणाने घडवून आणलेल्या पुनरुज्जीवनाला युरोपीय वैज्ञानिक क्रांतीसारखा बहर आला नाही अशी टीका करणे अन्यायाचे आहे. आणखी शंभर वर्षांनी भारतात देखील युरोपच्या तोडीची वैज्ञानिक क्रान्ती होईल.

याचे उत्तर स्पष्ट आहे, शंभर वर्षांनंतर भारताची वैज्ञानिक प्रगती युरोपशी तुल्य झाली, तर इंग्रजी शिक्षणाने भारतात पुनरुज्जीवन घडवून आणले असा शंभर वर्षांनी दावा सांगण्यात इंग्रजीभक्त मोकळे आहेत. तोपर्यन्त त्यांनी आपल्या इंग्रजीप्रेमाचे उमाळे दाबून ठेवावे. पण हे उमाळे आणखी शंभर वर्षे दाबून ठेवणे तर सोडाच, इंग्रजी शिक्षणास सुरुवात होऊन अर्ध शतकही लोटले नव्हते तेव्हाच लोकहितवादी प्रभृतींनी त्याच्या नावाने ढोल बडविण्यास सुरुवात केली होती.



## बौद्धिक जागृतीची लक्षणे

इंग्रजी शिक्षणामुळे युरोपीय वैज्ञानिक क्रान्तीचा उदय भारतात झाला नसला तरी त्या दिशेने वाटचाल सुरू झाली हे लोकहितवादी प्रभृती 'द्रष्ट्यांनी' ओळखले होते असे या ढोलबडवीचे समर्थन करण्यात येईल. या समर्थनाची समर्थनीयता पारखण्यासही बौद्धिक क्रांतीस आवश्यक असणारे गुण इंग्रजी शिक्षणाने संवर्धित केले काय याचा विचार केला पाहिजे. हे गुण म्हणजे प्रामुख्याने (१) स्वयंप्रज्ञा म्हणजे स्वतः विचार करून निर्णय घेण्याची प्रवृत्ती व स्वतःच्या अभिप्रायाबद्दल विश्वास, (२) बौद्धिक प्रामाणिकपणा, (३) सत्यान्वेषण या एकमात्र उद्देशाने विचार करण्याचा निर्धार, (४) तर्कशक्ती म्हणजे उपलब्ध पुराव्यावरून योग्य अनुमान काढण्याची शक्ती, (५) मौलिक व मूल्यशाली विचार प्रसृत करणारी प्रतिभा व (६) सम्यक् मूल्यभावना म्हणजे अभिमानास्पद काय व लाजिरवाणे काय याचा विवेक करण्याची क्षमता. या गुणांपैकी जी स्वयंप्रज्ञा ती आंग्लशिक्षितांनी पुढीलप्रमाणे प्रकट केली.

अव्वल इंग्रजीत आपले राज्य दृढमूल करून भारताचे ख्रिस्तीकरण करणे हे इंग्रजांचे ध्येय होते. या ध्येयाच्या सिद्धीसाठी इंग्रजपूर्व भारतीय इतिहासाचे पारतंत्र्यपूजेस पोषक असे चित्रण व हिंदू धर्माची निंदा करणारा प्रचार आवश्यक होता. शाळा-कॉलेजापासून तो बाजारपेठेपर्यंत हा प्रचार मिशनरी करीत. राम प्रेमयाचना करीत आपल्याकडे येणाऱ्या स्त्रीचे नाक कापणारा असंस्कृत माणूस होता, मूर्तिपूजा म्हणजे दगडाची पूजा करणे होय, असे मुद्दे या प्रचारात असत. मिशनरी प्रचाराला मसाला पुरविण्यासाठी लाखो पौण्ड खर्चून ऑक्स्फर्ड विद्यापीठात संस्कृतची खुर्ची स्थापन करण्यात आली. या खुर्चीला संस्थापक कर्नल बोडन याने आपल्या मृत्युपत्रात व पुढे ती भूषविणारा मॉनियर विल्समस् याने आपल्या कोशाच्या प्रास्तावनेत असे स्पष्टच म्हटले होते. मॅक्समूलर या ऑक्स्फर्ड मधील संस्कृतच्या प्राध्यापकाने हिंदू ग्रंथाचा अभ्यास करण्यात हिंदू धर्माच्या मुळावर घाव घालणे हा आपला उद्देश असल्याचे स्पष्टच म्हटले होते. पुढे हिंदू ग्रंथाचा अधिक अभ्यास केल्यावर त्यांचा त्याच्या मनावर प्रभाव पडू लागला व वेदान्त हे भारताचे जगाला एक देणे आहे असे म्हणण्यापर्यंत त्याची मजल गेली. तेव्हा ख्रिस्ती भटजींनी त्याच्या विरुद्ध गिल्ला केला व बोडन प्रोफेसरची खुर्ची त्याला मिळू दिली नाही.

ख्रिस्ती मिशनरी प्रथम दक्षिण भारतात आले. दक्षिण भारतात ख्रिस्ती धर्माचा प्रचार करण्यासाठी दक्षिण भारतीयांना उत्तर भारतीयांविरुद्ध चिथावणे आवश्यक होते.

म्हणून काल्डवेल नावाच्या मिशनऱ्याने दक्षिणेतील भाषा उत्तरेतील भाषांपेक्षा वेगळ्या कुलातील व पर्यायाने दक्षिण भारतीय हे उत्तर भारतीयाहून वंशाने व संस्कृतीने पृथक् आहेत असा प्रचार सुरू केला. याच्याच जोडीला मॅक्समूलर प्रभृतींनी आर्यांच्या द्रविडावरील स्वारीची कथा रचली. ''तुम्ही जो तुमचा धर्म म्हणून म्हणता तो परकीय आर्यांनी तुमच्यावर जबरदस्तीने लादला आहे, हा लादलेला धर्म सोडून ख्रिस्ती होण्यास तुम्हाला काहीच हरकत नाही'' असे दक्षिण भारतीयांस पटविणे हा या कथेचा प्रमुख उद्देश होता.

## मोगल मराठे व ऐहिकवाद

प्राचीन इतिहासाबद्दल मिशनऱ्यांनी सर्वथैव कल्पित कथा रचल्या तसे मध्ययुगीन इतिहासाबद्दल करणे शक्य नव्हते. कारण या इतिहासाच्या अभ्यासाला तत्कालीन कागदपत्रे, अवशेष वगैरे सामग्री उपलब्ध आहे. म्हणून त्याला इंग्रज इतिहासकारांनी एक घातक कलाटणी दिली. भारताचा मध्ययुगीन इतिहास हा वस्तुतः तुर्क-अफगाण-मोगल या परकीय आक्रमकांच्या स्वाऱ्यांचा इतिहास आहे. इंग्रज इतिहासकारांनी या इतिहासाला मुस्लिम काल असे नाव दिले व असे भासवले की भारतीय मुसलमान या परकीय आक्रमकांचे वंशज असून त्यांचा हिंदूंशी काही नातेसंबंध नाही.

आधुनिक इतिहास म्हणजे मराठ्यांचा इतिहास. तो तर जाणूनबुजून सुरवातीला मोगल व नंतर इंग्रज या परकीय आक्रमकांशी मराठ्यांनी दिलेल्या लढ्याचा इतिहास आहे. त्याचे यथार्थ दर्शन भारतीयांना घडू देणे इंग्रजी राज्याच्या स्थैर्यास मुळीच मानवणारे नव्हते. म्हणून इंग्रजांच्या प्रचाराची साधने या इतिहासाच्या विकृतीकरणार्थ वापरण्यात आली. ग्रँड डफने मराठ्यांच्या इतिहासाची काही अस्सल साधने चक्क जाळली, असा आरोप मराठी इतिहासकारांनी केला आहे. पेशवे दप्तर एतद्देशीय अभ्यासकांच्या हाती लागू देणे इष्ट नाही, असे भारताच्या एका व्हाइसरॉयने म्हटले होते. स्वराज्यापूर्वी पेशवे दप्तराचे संशोधन होऊ शकले नाही.

मराठेशाहीच्या इतिहासाबद्दल दुसरी लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की मराठेकालीन वास्तू आज नावालाही उपलब्ध नाहीत. शनिवारवाड्याला आग लागली व त्या आगीतून वाचलेला आरसेमहाल देखील पुढे शंकास्पद रीतीने नष्ट झाला. महाराष्ट्रातील किल्ल्यावरील इमारतींचे पायाचे दगड देखील सापडणे आज मुष्किल झाले आहे. या किल्ल्यावर, ''किल्ला इंग्रज सरकारने लष्करी दृष्ट्या निकामी केला'' अशी माहिती



देणाऱ्या पाट्या लावलेल्या असतात. या वास्तू बुद्धिपुरःसर नष्ट करण्यात आल्या हाच या सर्व प्रकाराचा अर्थ आहे.

अस्सल साधने दडवून ठेवणे व नष्ट करणे यापेक्षाही एक सोपा उपाय इंग्रजांनी मराठी इतिहासाच्या विकृतीकरणार्थ वापरला. तो म्हणजे अनुल्लेख. मोगल कालानंतर इंग्रज काल आला. मध्यंतरी मराठा काल असे ज्याला म्हणता येईल असे काहीच नव्हते. मोगल साम्राज्य मोडकळीस आल्यानंतर बंडाळ्या माजल्या. त्या ''ब्रिटिश शांतता'' प्रस्थापित होईपर्यंत चालल्या. या बंडाळ्या करणारे पुंड म्हणजे मराठे. बंडाळ्या सुमारे दोनशे वर्षे टिकल्या असल्या तरी त्यांना इतिहासात वेगळा कालखंड देण्याची जरूर नाही. ब्रिटिश व मोगल कालातच चार-दोन पृष्ठात त्याचा परामर्श घेतलेला पुरे आहे, असा पायंडा ब्रिटिश इतिहसकारांनी पाडला.

## शाळिग्राम, क्रूस व राष्ट्रध्वज

इंग्रजी सत्ता व ख्रिस्ती धर्म भारतात दृढमूल करण्याच्या मार्गात भारतीय राज्यकर्ते व ब्राह्मण या दोन वर्गांचा बराच प्रभावी विरोध होण्याचा संभव होता, म्हणून त्या वर्गाविरुद्ध इंग्रजांनी हिरिरीने प्रचार केला. एतद्देशीय राज्यकर्ते नादानच केवळ नव्हे तर दुष्ट आहेत, ब्राह्मणांनी शिक्षण व सत्ता आपल्या हातात ठेवून साऱ्या समाजाला हजारो वर्षे लुबाडले वगैरे आरोपपत्र सारखे जपले जाऊ लागले.

वरील सर्व मते एवढी वेडगळ आहेत की भारतीय बुद्धिमन्तांची स्वयंप्रज्ञा जागृत असती तर त्यांनी ती हसण्यावारी घालविली असती. पण तसे काहीच घडले नाही. उलट न्यायमूर्ती रानड्यांसाख्या अग्रगण्य विद्वानाला देखील ती शिरोधार्य वाटली. त्यांना मूर्तिपूजेबद्दल बरेच वैषम्य वाटत होते व मूर्तिपूजेला विरोध करणाऱ्या चळवळी या धर्मसुधारणा आहेत असे ते मानीत. ''मूर्तिपूजा करणे म्हणजे दगडाला देव मानणे, तर राष्ट्रध्वजाला वन्दन करणे म्हणजे एखाद्या चिन्धीला राष्ट्र मानणे असा आरोप करता येणार नाही काय?'' हे त्यांच्या मनात आले नाही. शूर्पणखेने प्रेमयाचना केली म्हणून तिच्यावर बलप्रयोग करण्यात आला हा आरोप ऐकल्यावर रामायणात यासंबंधी काय लिहिले आहे हे तपासून पाहण्याची कुणास बुद्धी झाली नाही. शूर्पणखेने सीतेला मारण्यासाठी तिच्यावर हल्ला केला म्हणून तिच्यावर बलप्रयोग करण्यात आला, प्रेमयाचना केली म्हणून नव्हे हे रामायणातल्या प्रसंगात अगदी स्पष्ट आहे. इतके असून भारतीय नभोवाणी व चित्रवाणीवर

शूर्पणखाविरूपणाबद्दल रामाची निन्दा अजूनदेखील सुरूच आहे. रासक्रीडेच्या प्रसंगावरून श्रीकृष्णावर व्यभिचाराचा आरोप करणाऱ्या मिशनऱ्यांना "ख्रिस्ती भिक्षुणी आपले ईश्वराशी लग्न झाले आहे या समजुतीने बोटात विवाहमुद्रा घालतात यावरून तुमचा देव देखील व्यभिचारी ठरत नाही काय?" असे विचारण्याचे आंग्लशिक्षितास सुचले नाही. संस्कृत व युरोपीय भाषा यात शेकडो धातू समान आहेत यावरून आर्यांनी भारतावर स्वारी केली असली पाहिजे या तर्कटांची पोपटपंची करताना, "संस्कृत जर युरोपीय भाषाहून अति प्राचीन आहे तर संस्कृतभाषी भारतातूनच युरोपावर स्वारी झाली असे का म्हणू नये?" ही शंका "वाघिणीचे दूध" पिणाऱ्या कोणत्याही विद्वानाच्या डोक्यात शिरली नाही. तामिळ भाषा इतर भारतीय भाषाहून वेगळी अशी "द्राविड" भाषा आहे हे सिद्ध करण्यासाठी कॉडवेलने जे बावीस मुद्दे माण्डले ते संस्कृत हिंदी वगैरे भाषांना लागू केले तर त्यादेखील द्राविड भाषा ठरतात आणि द्राविड भाषा व आर्य भाषा हा भेदच कपोलकल्पित ठरतो ही उघड गोष्ट "बौद्धिक पुनरुज्जीवना" च्या झऱ्यात न्हालेल्या कोणत्याही विद्वानाला सुचली नाही. "भारतावर आक्रमण करणारे तुर्क, अफगाण, मोगल हे मुसलमान होते म्हणूनच केवळ भारतीय मुसलमानांना त्यांचे वंशज ठरविले तर त्याच न्यायाने इंग्रज ख्रिस्ती होते म्हणून भारतीय ख्रिस्त्यांना इंग्रज का मानू नये?" असा विकल्प कोणत्याही आंग्लशिक्षित ऐहिकतावाद्याच्या डोक्यात डोकावला नाही. भारताच्या इतिहासात मराठा काल असा नव्हताच या पोपटपंची करताना मराठ्यांनी किती काल, किती प्रदेशांवर व कसे राज्य केले याचा मागोवा घेण्याची बुद्धी फारशी कुणाला झाली नाही. भारतीय राज्यकर्ते नादान, बदफैली व 'सरंजमशाही' होते असे घोकताना दरडोई उत्पन्न, आयुर्मान, साक्षरता, वगैरे सर्वमान्य निकषावर तपासून पाहता संस्थानांची स्थिति इंग्रजी भारतापेक्षा अधिक शोचनीय होती काय हे कुणीच तपासून पाहिले नाही. ब्राह्मणांनी शिक्षण व सत्ता यांची मक्तेदारी करून समाजास लुबाडले हे धृपद गाताना फक्त वेदाध्ययनासारख्या भिक्षांदेही विद्येची शूद्रास बंदी होती, बाकी सर्व विद्या सर्वांस मोकळ्या होत्या याची दखल कुणी घेतली नाही. भारताच्या हजारो वर्षांचा इतिहासात चंद्रगुप्तापासून ग्वाल्हेरच्या शिंद्यांपर्यंत अनेक शूद्र मानल्या गेलेल्या जातीतले राजे झाले, या सर्व राजांच्या कारकीर्दीत ब्राह्मणांच्या हातात कितपत सत्ता होती याचा तपशील कुणी सांगितला नाही, ब्राह्मणांनी जनतेस लुबाडले असे म्हणताना कोणत्या काळी पुरोहितांचे महाल वसले होते व इतर जातींच्या मानाने ब्राह्मणांचे दरडोई उत्पन्न काय होते, याची आकडेवारी कुणी दिली नाही.



**मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः**

सारांश, एखाद्या धूर्तानें एखाद्या मूर्खाला "बनवावे" तसे इंग्रज, आंग्लशिक्षितास सारखे बनवीत होते. ज्याला सहज बनविता येते तो बुद्धिभ्रष्ट असतो. कितीही वेडगळपणाचे विधान असो ते जर प्रतिष्ठासंपन्न लोकांनी केले असेल तर त्यावर त्याचा विश्वास बसतो. आंग्लशिक्षिताकडून कोणत्याही वेडगळ विधानास मान्यता मिळविणे शक्य आहे याची उदाहरणे म्हणून वेळोवेळी त्यांच्यात मान्यता पावलेली पुढील मते पाहण्यासारखी आहेत. (१) रोमन लिपी न वापरल्यामुळे अमेरिकेने जपानचा पराभव केला (हुमायून कबीर). (२) साडी व धोतर नेसण्याच्या चालीमुळे भारताचे औद्योगीकरण झाले नाही. (किर्लोस्कर मासिकातील एक लेख). (३) गोमांस न खाल्ल्यामुळे बेचाळीस साली दुष्काळात लोक मेले. (काँग्रेस फार कल्चरल फ्रीडम् मधील एक व्याख्यान). (४) ६५ च्या युद्धात लाहोरच्या लोकांना खाऊ घालण्याची जबाबदारी अंगावर येईल व मार्ग्ययुद्धात आपल्याला प्रिय असलेल्या लाहोरमधील इमारतींना इजा पोहोचेल म्हणून भारताने लाहोर सर केले नाही. (गिरिलाल जैन यांचा टाइम्स ऑफ इंडियामधील एक लेख) वरील सारखी हास्यास्पद मते ज्या वर्गात हसण्यावारी न जाता प्रतिष्ठित होतात, त्या वर्गाची विचारशक्ती कायम आहे असे समजणे कठीण आहे.

कोणतेही वेडगळ मत आंग्लशिक्षितांच्या गळी उतरावणे इंग्रजास शक्य होते त्याचप्रमाणे स्वतःच्याच परंपरेतील व्यक्तींचे वा ग्रंथाचे पाश्चात्त्य जे करतील ते मूल्यमापन आंग्लशिक्षितास चटकन मान्य होत असे. नोबेल पारितोषिक मिळण्याच्या आधी रवीन्द्रनाथ टागोर बंगाली साहित्यातले देखील सर्वश्रेष्ठ कवि मानले जात नव्हते. नोबेल पारितोषिक मिळाल्यावर अखिल भारताचे ते कविसम्राट ठरले. अमेरिकेत दिग्विजय करण्याच्या आधी भारतात विवेकानंदांचे व्याख्यान ऐकण्यास फारच थोडे श्रोते जमत. या दिग्विजयानंतर त्याला अलोट गर्दी होऊ लागली. कालिदास शेकडो वर्षांपासून भारतात सर्वश्रेष्ठ कवी मानला जात असला तरी भारतीय परम्परेत रघुवंशाचा कर्ता-रघुकार म्हणून त्याची विशेष प्रसिद्धी होती. पण जर्मन महाकवी गटे शाकुन्तलाला डोक्यावर घेऊन नाचला तेव्हापासून कालिदास शाकुन्तलकार म्हणून गाजू लागला. बऱ्याच आंग्लशिक्षितास रघुवंशाचे नावही माहीत नसते. एका मराठी कवीने स्वतःच्याच कविता खलिल गिब्रानच्या म्हणून प्रकाशित केल्या तेव्हा "हाय रे मेरा कलिजा! आमच्या मराठी कवींना असे केव्हा लिहिता येईल!!" म्हणून बऱ्याच "दर्दी" टीकाकारांनी गळा काढला. मर्ढेकरांचा बोलबाला होण्याचे एक

कारण त्यांचा इंग्रजी ग्रंथ एका पाश्चात्त्य प्रकाशकाने प्रकाशित केला हे होते. सारांश आमच्या बुद्धिमंतांना कोणत्याही बाबतीत स्वतःचे मत नसते, स्वतःच्या तोंडातील पदार्थांची चव कशी आहे हे पाहाण्यासाठी दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याइतके ते परप्रत्ययनेय झाले आहेत.

बौद्धिक जागृतीचे लक्षण बौद्धिक प्रामाणिकपणा. परप्रत्ययनेयता प्रामाणिक असू शकते. जादूगाराने मोहिनी घातली की डोळ्यासमोर नसलेल्या गोष्टींचाही खरोखरच भास होऊ लागतो व ती गोष्ट आपल्यास दिसते असे म्हणण्यात जाणीवपूर्वक खोटेपणा केला जात नाही. भारतीय आंग्लशिक्षित इंग्रज म्हणेल ते प्रमाण मानत होता, कारण इंग्रजाने सर्वच क्षेत्रात आपली श्रेष्ठता सिद्ध केली होती. या श्रेष्ठतेने तो वर्ग भारून गेलेला होता. भारून जाण्यात दुबळेपणा असला तरी अप्रामाणिकपणा नव्हता. पण ज्या असत्यांची स्वतःलाच जाणीव आहे तीदेखील सत्य म्हणून सांगण्याची जी प्रवृत्ती आंग्लशिक्षितात उत्पन्न झाली तिला अप्रामाणिकपणाशिवाय दुसरे नाव देता येत नाही. लोकहितवादींचे लिखाण हे एक विचारधन आहे असे मत प्रचलित आहे. पण हे लिखाण वाचताना चटकन् जर कोणती गोष्ट नजरेत भरत असेल तर ती ही की ज्या विषयांचे आपल्याला काडीचेही ज्ञान नाही त्यावर भरमसाट मते ठोकून देण्याची लेखकाची प्रवृत्ती अदम्य आहे. नैयायिक हा शब्द शुद्ध लिहिण्याचे देखील ज्ञान नसतानां सारी संस्कृत विद्या कुचकामाची आहे, एवढेच नव्हे तर हानिप्रद आहे असा त्यांनी शेरा मारला. स्वतः संस्कृत विद्येचा परिचय करून घेणे तर सोडाच, पाश्चात्त्य संस्कृतज्ञांनी संस्कृत साहित्याबद्दल काय लिहिले आहे याची देखील ओळख लोकहितवादींना होती, असे त्यांच्या लिखाणावरून दिसत नाही. निंदागीताप्रमाणेच लोकहितवादींची स्तोत्रे देखील अज्ञानमूलक आहेत. "हिंदू लोक काव्ये करू लागले" हा त्यांचा हिंदू संस्कृतीवर एक मोठा आक्षेप आहे. इंग्रजी भाषेत देखील "गवतासारखी उदंड" कविता आहे, ही वार्ता त्यांच्या कानी आली होती असे दिसत नाही.

पी. कोदण्डराव हे इंग्रजी भाषेचे अनन्य भक्त आहेत. भारतामध्ये पाळण्यापासून अन्त्येष्टीपर्यंतचे सर्व व्यवहार इंग्रजीतून व रोमन लिपीतून व्हावे, भारतीय भाषा या कामासाठी अपात्र आहेत, असे त्यांचे दृढ मत आहे. "तुम्ही कोणत्या भारतीय भाषेचा व लिपीचा अभ्यास केला आहे?" असे मी त्यांना विचारले तेव्हा "अशा अभ्यासात व्यर्थ घालवायला मला वेळ नाही" असे त्यांनी गर्वपूर्वक उत्तर दिले.



## 'सरंजमशाही' कल्ले व 'पुरोगामी' कल्ले

बौद्धिक प्रामाणिकपणाचाच दुसरा पैलू सत्यान्वेषण या एकमात्र उद्देशाने विचार करणे हा आहे. समाजाचे वैचारिक मार्गदर्शन करणे हे ज्यांचे कर्तव्य आहे अशा भारतीय बुद्धिमन्तात हा पैलू अभावाने तळपताना दिसून येईल. १९३९ साली मी एक लेखकाशी सावरकरांबद्दल चर्चा करीत होतो. तेव्हा तो म्हणाला "सावरकरांचे विचार शुद्ध सरंजामशाही आहेत. काय ते त्यांचे लांब कल्ले!" तब्बल तीन दशकांनंतर हाच लेखक परवा भेटला तेव्हा मला त्याची ओळखच पटेना! कल्ले व खांद्यापर्यंत रुळणारे केस यांनी त्याच्या चेहऱ्याला वेगळीच कळा आली होती. मी त्याला म्हणालो, "३९ साली सरंजामशाही असणारे कल्ले ७४ साली पुरोगामी झालेले दिसतात!" लेखक महाशयांना ३९ सालचा उल्लेख काही कळला नाही. ते प्रश्नांकित नजरेने माझ्याकडे पाहत राहिले!

या लेखकमहाशयांची केशभूषेबद्दल जी वृत्ती आहे तीच अगदी अग्रगण्य भारतीय विचारवंतांची विचाराबद्दल असते. १९४६ साली बेळगावच्या मराठी साहित्य संमेलनामध्ये विद्यापीठीय शिक्षण मराठीतून दिले जावे असा ठराव आला असता त्याला फक्त एका व्यक्तीने विरोध केला. या विरोधकाचे मत हे शिक्षण हिंदी राष्ट्रभाषा असल्यामुळे हिंदीतून दिले जावे असे होते. इंग्रजीतून शिक्षण देण्याची प्रथा चालू ठेवावी ही कामना कोणाच्या स्वप्नातही आली नाही. आज जर असा ठराव पुनः आला तर इंग्रजीच्या बाजूने बहुमत होणार हे नक्की.

तीक्ष्ण बुद्धीचे विचारवंत म्हणून प्रख्यात असलेले राजगोपालाचारी स्वराज्यापूर्वी हिंदी विरोधकांना तुरुंगात पाठवीत असत. स्वराज्यानंतर हिंदी समर्थकांना तुरुंगात पाठवायला ते तयार झाले असते.

"पंचवीस वर्षांत या विषयावरील तुमच्या मताचा लंबक उत्तर ध्रुवावरून दक्षिण ध्रुवावर जाण्याचे कारण काय? २५ वर्षांपूर्वी इंग्रजीच्या वतीने उपलबध नसलेला कोणता पुरावा आज उपलब्ध झाला आहे?" असे या बुद्धिमंतांना विचारले तर त्यांना असा एकही पुरावा उल्लेखिता येणार नाही. विचारवंतांचे मत दक्षिणोत्तर बदलू शकते, पण पुराव्याचे स्वरूप दक्षिणोत्तर बदलले तरच. पुरावा बदलला नसताना ज्यांची मते बदलतात त्यांना विचारवंत म्हणणे कठीण आहे.

वस्तुतः भाषेच्या प्रश्नासंबंधी जे मतपरिवर्तन झाले त्यात विचार वा पुरावा याचा काही संबंधच नाही. १९३९ साली सरंजामशाही असलेले कल्ले १९७४ साली पुरोगामी

झाले त्याचप्रमाणे १९४६ साली प्रतिगामी असणारा इंग्रजीचा पुरस्कार १९७४ साली पुरोगामी झाला. आज केसांचे जंगल न वाढविणारा कालबाह्य ठरतो त्याचप्रमाणे स्वभाषेचे समर्थन करणारा कालबाह्य ठरू लागला आहे. वेशभूषेचा स्वीकार करताना सोय व सौंदर्य यांचा विचार करून कोणी आपली वेषभूषा ठरवीत नाही. ज्या समाजात आपण वावरतो त्यात जी वेषभूषा प्रचलित नाही ती कितीही सोईस्कर व रुबाबदार असली तरी तिचा आपण स्वीकार करीत नाही. याच न्यायाने भारतीय विचारवंत विचारांच्या क्षेत्रात आपली भूमिका ठरवितात. कोणत्याही विषयावर आपली मते ठरविताना त्या मतांची सत्यता हा एकमेव निकष वापरला पाहिजे हे त्यांच्या ध्यानी मनीही नसते. त्यांचा एकमेव निकष फॅशन हा असतो. ज्या मतांची फॅशन नाही ती मते भारतीय विचावंत स्वीकारणार नाही. तो सत्याच्या शोधात नसून फॅशनच्या शोधात असतो. या उलट पाश्चात्यातील अग्रगण्य विचारवंतांचे लिखाण वाचले तर, ते आपल्याला पटो वा न पटो, लेखक सत्यशोधनाचा प्रयत्न करीत आहे असा प्रत्यय आल्यावाचून राहत नाही.

## मार्क्स व राणी लक्ष्मीबाई

फॅशनचा प्रभाव फक्त भाषेच्या प्रश्नावरच आहे असे नाही. त्याची दुसरी अनेक उदाहरणे देता येतील. एकेकाळी कम्युनिझम् हा जगदुद्धाराचा मन्त्र आहे असे म्हणणारे ती जगावरील सर्वात मोठी आपत्ती आहे असे आज म्हणून लागले आहेत. स्टॅलिनच्या अत्याचारांची माहिती झाल्यामुळे आपले मत बदलले असे हे लोक आत्मसमर्थन करतील, पण कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचे योग्य मूल्यमापन करण्यासाठी स्टॅलिनच्या अत्याचारांचे ज्ञान होण्याची जरूर नव्हती. मार्क्सचे ग्रंथ व मार्क्सने ज्या शास्त्रांचा हवाला दिला त्या तत्त्वज्ञान, इतिहास, अर्थशास्त्र वगैरे शास्त्रावरील ग्रंथ पूर्वीच उपलब्ध होते. या क्षेत्रातील ज्ञात गोष्टीशी मार्क्सच्या कल्पनांचा मेळ बसत नसेल तर २५ वर्षांपूर्वीच मार्क्सचे ढोल बडवताना या पण्डितांच्या ते लक्षात यायला पाहिजे होते. त्यासाठी स्टॅलिन अत्याचारी आहे की नाही याचा पुरावा पुढे येण्याची वाट पहात बसण्याचे कारण नव्हते.

स्वराज्यापूर्वी सत्तावनचा संग्राम हे स्वातंत्र्ययुद्ध होते या बद्दल फारशी कुणाला शंका नव्हती. ''शिपायांचे बण्ड'' लिहिणारे विनायक कोण्डदेव ओकांसारखे लोक अल्पमती व प्रचलित सत्तेचे लांगूलचालक समजले जात होते. पण स्वराज्यानंतर एकदम मनु पालटला व ''शिपाईगर्दी'' लिहिणारे लोक ''पुरोगामी'' ''निःपक्षपाती'' वगैरे समजले



जाऊ लागले. प्रथितयश विवेचक श्री माडखोलकर यांनी स्वराज्यापूर्वी आपल्या चिपळूणकरावरील निबंधात सत्तावनच्या संग्रामाबद्दल फारच गौरवपूर्ण उद्‌गार काढले आहेत. स्वराज्यानंतर तो निबंध त्यांनी ''सुधारून'' प्रसिद्ध केला. त्यात सरंजामशाहीची पुनःस्थापना करण्याचा प्रयत्न म्हणून या संग्रामाची संभावना केली आहे. स्वातंत्र्यापूर्वीचा प्रबंध लिहिताना माडखोलकरांसमोर नसलेला कोणताही पुरावा स्वराज्यानंतर उपलब्ध झाला नाही. उलट स्वराज्यापूर्वीपेक्षा स्वराज्यानंतर ''सरंजामशाही'' नामक भाकडकथा गाणाऱ्या मार्क्सवादापासून माडखोलकर दूरच गेले आहेत. असे असता स्वराज्यापूर्वी स्वातंत्र्यसंग्राम वाटणारे सत्तावनचे पर्व स्वराज्यानंतर त्यांना ''सरंजामशाही'' वाटू लागले. कारण विचारवंतांची फॅशन बदलली होती. सरंजामशाही कल्ले समाजवादी झाले होते. 'पुरावा' ''तर्कशास्त्र'' वगैरे गोष्टी अगदीच अप्रस्तुत होत्या.

## वाळवंटात बीजारोपण

सत्यान्वेषणाच्या एकमात्र उद्देशाबरोबरच मौलिक व मूल्यशाली विचार करण्याची क्षमता हा गुण विचारवंतास आवश्यक आहे. प्रतिभा ही जन्मसिद्ध असते, त्यामुळे विशिष्ट प्रकारच्या शिक्षणाने ती उत्पन्न किंवा नष्ट होणार नाही. निरनिराळ्या देशातील रहिवाशांच्या बुद्धिमत्तेत म्हणण्यासारखा फरक नसल्यामुळे प्रतिभाशाली पुरुष सगळ्याच देशात जन्मास येऊ शकतात. असे असून देखील आजच्या ग्रीसमध्ये प्लेटो व अरिस्टॉटल निर्माण होत नाहीत. उलट आठशे वर्षांपूर्वीच्या इंग्लंडमध्ये न्यूटन व रसेल निर्माण होत नव्हते. यावरून असे दिसते की प्रतिभावंताच्या प्रतिभेचा विलास शक्य होण्यासाठी विशिष्ट सांस्कृतिक परिस्थितीची आवश्यकता असते. बी खडकात रुजत नाही, फक्त सुपीक जमिनीतच रुजते. त्याचप्रमाणे सभोवतालचा समाज विचारशक्तीने खुरटलेला असेल, तर प्रतिभावंताचे प्रतिभाशाली विचार कुणी ऐकूनच घेणार नाही; त्याचे काम उपेक्षित राहून कालांतराने लुप्त होईल वा प्रतिभावंतच स्वतः हताश होऊन आपले काम सोडून देईल. आंग्लशिक्षित भारतात कोणत्याच नव्या विद्या व मौलिक व मूल्यशाली विचारांची कोणतीच परंपरा उद्‌भवली नाही, फक्त ज्यांचे पाश्चात्त्यांनी कौतुक केले अशा एकदोन व्यक्तींनी काही वैयक्तिक विक्रम केले. याचे कारण हेच की आंग्लशिक्षित समाजातले बौद्धिक वातावरण स्वयंप्रज्ञेच्या वाढीस पोषक नव्हते.

वरील विधानाला एकच अपवाद आहे व तो म्हणजे साहित्य. विचारांच्या क्षेत्रात

कोणतीच मौलिक व मूल्यशाली परंपरा उद्भवली नसली तरी बहुतेक भारतीय भाषात जागतिक वाङ्मयाच्या तोडीचे थोडेफार वाङ्मय निर्माण झालेले आहे. पण याचे कारणही स्पष्ट आहे. काही नगण्य अपवाद सोडल्यास साहित्यिकांनी इंग्रजीचा वापर न करता स्वाभाषेचा आश्रय केला व त्यामुळे साहित्याच्या क्षेत्रात स्वकीय परंपरा निर्माण होऊ शकली. ज्यांनी इंग्रजीचा आश्रय केला त्यांचे साहित्य अपेक्षेप्रमाणे क्षीणरक्त राहिले. स्वभाषेचा वापर करणाऱ्या साहित्यिकात देखील जे अग्रगण्य होते त्यांना इंग्रजी माध्यमाच्या विद्यापीठांचा संपर्क इतर आंग्लशिक्षितांच्या मानाने कमी झाला होता ही गोष्ट सूचक आहे. आपटे, गडकरी, खाण्डेकर, माडखोलकर, वरेरकर हे मराठी साहित्याचे मानकरी पदवीधर नव्हते वा नाहीत.

## सत्याग्रह व अणुस्फोट

आंग्लशिक्षितात मौलिकतेचा अभाव आहे या आरोपाविरुद्ध दोन उदाहरणे देता येण्यासारखी आहेत. एक म्हणजे म. गांधीचे निःशस्त्र प्रतिकाराचे तंत्र. हे तंत्र जगाच्या इतिहासात अपूर्व असून प्रभावी ठरले. दुसरे म्हणजे भारतीय वैज्ञानिकांनी केलेला अणुस्फोट या पैकी पहिले उदाहरण म. गांधी आंग्लशिक्षित होते म्हणून संबद्ध मानले तरी म. गांधींना निःशस्त्र प्रतिकाराचे तंत्र इंग्रजी शिक्षणामुळे सुचले असे समजण्यास काडीचाही आधार नाही. तसेच कोणत्याही ऐतिहासिक नियमाला अपवाद सापडू शकतात या अनुसार इंग्रजी शिक्षणामुळे देखील ज्यांची प्रतिभा खुरटली नाही अशा बोस, रामन् वगैरे पुरुषांच्या मालिकेतलेच म. गांधी हे होते असे म्हणता येईल.

दुसरे अणुस्फोटाचे उदाहरण फारसे लागू नाही. जी गोष्ट पाश्चात्त्य वैज्ञानिकांनी तीस वर्षांपूर्वी केली ती आज करणे हे मौलिकतेचे प्रमाण होऊ शकत नाही. या विषयावरचे प्रकाशित साहित्य वाचून व थोडेसे आणविक इन्धन चोरून एखाद्या हुशार विद्यार्थ्याला घरच्या घरी अणुगोल बनविता येईल, असे अमेरिकन वैज्ञानिक म्हणतात. तेव्हा अणुस्फोट हा कितपत मोठा विक्रम आहे हे सांगणे कठीण आहे.

दुसरे असे की चीनने ज्याप्रमाणे दुसऱ्या कुणाचीही मदत न घेता, एवढेच नव्हे तर बड्या राष्ट्रांच्या तीव्र विरोधाला न जुमानता, अणुगोल व उदजनगोल केले तसे आम्ही केल्याचे प्रमाण नाही. आम्हाला या कामात प्रगत राष्ट्रांची बरीच मदत झाली आहे व ती उद्या बंद पडली तर आमचा अणुकार्यक्रम किती चालेल हे शंकनीय आहे.



## चौ एन् लायला काय वाटले?

मौलिक व स्वतंत्र विचारशक्तीचा अभाव हा दोष शोचनीय असला तरी तो एखाद्या समाजाच्या अधःपातास कारण होईलच असे नाही. पण आंग्लशिक्षितात आढळणारा मूल्यविकृती हा दोष असा आहे की त्यामुळे ते ज्या राष्ट्राचे मार्गदर्शक आहेत त्या भारताचे भवितव्यच संशयग्रस्त झाले आहे.

या मूल्यविकृतीचे न्यूनगण्ड हे एक कारण आहे. आमच्या प्रतिभाशाली पुरुषात देखील आपली भाषा व जातकुळी याबद्दल मनस्वी न्यूनगण्ड निर्माण झाला आहे. वरेरकरासारख्या प्रतिभाशाली लेखकाला आपले इंग्रजी कच्चे आहे याबद्दल एवढे वैषम्य वाटत होते की आपण अव्वल दर्जाचे मौलिक लेखन करतो या बद्दल अभिमान बाळगण्याऐवजी इतर कोणी मराठी लेखकाच्या आधी आपण इंग्रजीतून गोगोल वाचला याचीच ते बढाई मारीत. बर्नार्ड शॉ मुंबईला आला तेव्हा माझ्याशी बोलला हा वरेरकरांचा दुसरा आत्मप्रौढीचा विषय होता. वरेरकरांसारख्या पुरुषात असे गण्ड निर्माण होण्याचे कारण भोवतालच्या आंग्लशिक्षित समाजाच्या मूल्यकल्पना विकृत होत्या. गोगोल कोणीही मूर्ख वाचू शकतो, वरेरकरांच्या तोडीचे लिखाण करणे हे मात्र येरागबाळ्याचे काम नव्हे. बर्नार्ड शॉला भेटण्याचा विक्रम त्याचा न्हावी देखील करीत असेल, धावता धोटा लिहिण्याचा विक्रम मात्र वरेरकरच करू शकले, हा विवेक या समाजाला नव्हता.

या मूल्यविकृतीची वरीलपेक्षाही शोचनीय उदाहरणे देता येतील. आपली मुले आपल्याला डॅडी- मम्मी म्हणतात व आपण मुलांशी पाळण्यापासून इंग्रजी बोलतो असे एक भारतीय यजमान आपल्या अमेरिकन पाहुणीला म्हणाला, आपण फार "प्रगत" "आधुनिक" वगैरे आहोत अशी तिची समजूत होईल अशी त्याने अपेक्षा केली होती. पण ती म्हणाली 'साहजिक आहे, याबद्दल तुम्हाला वैषम्य वाटण्याचे कारण नाही. इंग्रजांचेच येथे राज्य होते. हे सर्व जायला वेळ लागेल हे आम्ही जाणून आहो.' अफगाणिस्तानाचे पंतप्रधान येथे आले होते तेव्हा, "भारतीय सुशिक्षित आपल्या बायकाशी देखील इंग्रजीत बोलतात हे पाहून मला शिसारी आली" असे त्यांनी उद्गार काढले. चीनचे पंतप्रधान चौ एन् लाय भारतात आले होते तेव्हा भारतातील पारतंत्र्याच्या अवशेषाबद्दलचे प्रेम पाहून भारतीयांबद्दल त्यांना अधिक तुच्छता वाटू लागली असे मॅक्सवेल या पत्रकाराने लिहिले आहे.

## महात्मा औरंगजेब

जदुनाथ सरकार हे भारतातील एक जाडे इतिहासकार समजले जात असत. या गृहस्थांनी औरंगजेबाचे चरित्र लिहिले आहे. औरंगजेबाने पितृद्रोह, भ्रातृद्रोह, पुत्रद्रोह या पैकी कोणतेच पाप करायचे बाकी ठेवले नव्हते. विश्वासघात हा त्याच्या हातचा मळ होता. मानवी जीवित त्याला तृणवत् वाटत होते. खून आणि कत्तली हा त्याच्या कर्तृत्वाचा प्रमुख भाग होता. असे असता जदुनाथ सरकार म्हणतात की औरंगजेबाच्या चारित्र्यात दोष काढण्यासारखे काहीच नव्हते! औरंगजेबाने शिवाजी महाराजांना आग्र्याला बोलावून दगलबाजीने कैद केले. याचाही दोष त्यांच्या मते शिवाजीवरच येतो. कारण शिवाजीने दरबारात क्रोधयुक्त भाषण करून दरबारी रीतिरिवाजांचा भंग केला. औरंगजेबाने एका स्वतंत्र राजाला भेटीस बोलावून नीच दर्जाच्या उमरावांच्या मागे उभे केले हा जदुनाथांच्या मते दरबारी रीतिरिवाजांचा भंग नव्हता. गुरू गोविंद, छत्रसाल, संताजी घोरपडे, वगैरे ज्या वीरांनी औरंगजेबाच्या अफाट पाशवी सामर्थ्याशी टक्कर दिली त्या सर्वांची संभावना सरकारांनी ''चोर'', ''लुटारू'' म्हणून केली आहे. औरंगजेबाने केलेल्या लुटी व कत्तली यांचे स्वतःच शेकडो पृष्ठे वर्णन करून देखील औरंगजेबाला हा शब्द त्यांना लावावासा वाटला नाही. औरंगजेबाचा प्रतिस्पर्धी दारा शुको हा विद्वान्, औरंगजेबाच्या मानाने कनवाळू व सहिष्णू होता. तो बापाचा लाडका होता व आपल्या पश्चात् तोच बादशहा व्हावा अशी बापाची इच्छा होती. पण बापाचे प्रेम संपादन करणे हा जणू त्याचा गुन्हा होता अशा सुरात सरकारांनी त्याच्याविरुद्ध औरंगजेबाचीच बाजू उचलून धरली आहे. एकूण जो बलवान् व विजयी असेल तोच न्यायी अशी सरकारांची मनोवृत्ती आहे. या वृत्तीला धरून त्यांनी इंग्रजी पारतंत्र्याची स्तोत्रे गायिली आहेत. जदुनाथ सरकार हा आंग्लशिक्षितांच्या नैतिक मनोविकृतीचा एक मासला आहे.

जदुनाथ सरकार हा मासला नसून अपवाद होता असे काही लोकांना वाटेल. पण ते खरे नाही. तो अपवाद असता तर त्याला प्रतिष्ठा प्राप्त होण्याचे कारण नव्हते. ''औरंगजेबाबद्दल माझं मत फार चांगलं आहे!'' असे दत्तो वामन पोतदार देखील सांगतात. एकूण आंग्लशिक्षितांच्या मूल्यकल्पनाच विकृत झाल्या आहेत याचेच हे द्योतक मानले पाहिजे.

मूल्यविकृती हा एक मानसिक रोग मानला गेला आहे. या विकृतीने पछाडलेला माणूस ''तू परीक्षेत नापास झाला आहेस'' असे सांगितले तर आनंदाने टाळ्या पिटेल व



''क्ष किरणांच्या कसोटीत तुला क्षयरोग नाही असे दिसून आले'' असे सांगितले तर धाय मोकलून रडू लागले. आंग्ल शिक्षणाने ही विकृती साऱ्या बुद्धिजीवी वर्गालाच जडली आहे. क्रूसाची पूजा न करता मूर्तिपूजा करणारे नरकात जातात असे शिकविणाऱ्या मिशनऱ्यांची पोपटपंची करणारे ''बुद्धिवादी'' व ''पुरोगामी'' आणि मिशनऱ्यांच्या धर्मप्रसारी फसवाफसवीला आळा घालू पाहणारे ''प्रतिगामी'', ''सनातनी'' बहुसंख्यांची भाषा अल्पसंख्यांनी अखिल भारतीय व्यवहारासाठी वापरावी ही ''साम्राज्यशाही'' व एक परकीय भाषा शासनसत्तेच्या बळावर साठ कोटींवर लादावी ही लोकशाही. पारतंत्र्याचे अवशेष दैनिक व्यवहाराच्या स्थानावरून हलविणे हा ''इतिहासद्रोह'' व मुघल व इंग्रज कालातील उघडे नागडे आक्रमण व अत्याचार यांची वर्णन करणे ही ''जातीयता'' ''संकुचितता'' ''कूपमण्डूकता'', शिवाजीचे पुतळे उभारणे हा ''पुररुज्जीवनवाद'' व ''प्रान्तवाद'' व तुर्की आक्रमकांचे स्तुतिगान करणे हा ''राष्ट्रवाद'' व ''ऐहिकवाद.''

## पेशवेकालीन साक्षरता व गुप्तकालीन समृद्धी

उपलब्ध पुराव्यावरून योग्य अनुमान काढण्याची शक्ती हा चौथा गुण विचारवंताला आवश्यक आहे. हा गुण आंग्लशिक्षितात अभावाने तळपत असल्याचे दिसून येईल. याविषयी अनेक उदाहरणे देता येण्यासारखी आहेत. भारतातील आधुनिक शिक्षणाच्या इतिहासावर नेरुला व नाईक यांनी एक मान्य ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात पेशवाईच्या अंती इंग्रजी अमलाच्या सुरुवातीला भारतात साक्षरतेचा प्रसार किती होता यासंबंधी झालेल्या चौकशांची अनेक प्रतिवृत्ते दिलेली आहेत. या सर्व प्रतिवृत्तावरून इंग्रजी अमलाच्या पहिल्या शंभर वर्षांत साक्षरतेचे प्रमाण कमी झाले हे स्पष्ट होते. पण इंग्रजी राज्याने निरक्षर भारताला साक्षर केले हा ग्रह आंग्लशिक्षितात एवढा प्रबल आहे की एवढा निर्णायक पुरावा समोर असूनही वस्तुस्थिती या ग्रहाच्या उलट आहे असे सरळ अनुमान काढण्याचे धैर्य ग्रंथकारास झाले नाही.

दुसरे उदाहरण डॉ. प्राणनाथ यांच्या ''प्राचीन भारतातील आर्थिक परिस्थिती'' या ग्रन्थाचे देता येईल. आम्ही केलेली लूटमार हे भारताच्या दारिद्र्याचे कारण नव्हे, भारत सदा दरिद्रीच होता, या इंग्रजी प्रचाराची या ग्रंथात री ओढलेली आहे. असे करताना आपण स्वतःच मांडलेल्या पुराव्याची दखल घेण्याचे भान डॉ. प्राणनाथांना राहिले नाही. या पुराव्यानुसार प्राचीन भारतात सर्वात कमी मजुरी रोजास एक पण, सहा महिन्याने एक

वस्त्र व महिन्याला १०२४ मुठी धान्य अशी होती, त्यावेळच्या किमतीप्रमाणे गरिबातल्या गरीब माणसाला पाचशे दिवसाच्या मजुरीत हत्ती व आठ दिवसाच्या मजुरीत झोपडी विकत घेता येत असे. हे आकडे दरिद्री अर्थव्यवस्थेचे द्योतक नाहीत. पण डोळ्यासमोर असलेल्या वस्तू पाहण्याचे सामर्थ्य देखील इंग्रजी शिक्षणाने नाहीसे केल्यामुळे डॉ. प्राणनाथांना या आकड्यांचा अर्थ कळला नाही.

स्वतःच्या डोळ्यासमोर पुरावा असून देखील त्याचा अर्थ कळण्याची ज्यांना शक्ती नाही त्यांना पुरावा शोधण्याची बुद्धी होईल हे फारच असंभवनीय आहे. त्यामुळे पुष्कळशा विधानांना पुरावा काय याचा मुळीच विचार न करता अविवाद्य सत्ये म्हणून आंग्लशिक्षित त्यांचा स्वीकार करीत असतात. सेमिनार नावाच्या एका प्रसिद्ध इंग्रजी कालिकाने एक रोमन लिपी खास अंक काढला होता. या साऱ्या अंकात रोमन लिपी नागरीपेक्षा श्रेष्ठ आहे असे समजण्यास आधार काय याची कुठेच चर्चा नाही. ही मूलभूत गोष्ट धरूनच सारे विवेचन केले आहे. जणू रोमन लिपीची श्रेष्ठता स्वतः प्रमाण आहे. याच स्वतः प्रामाणच्या आधारावर नागरी टंककात रोमन टंकापेक्षा अधिक चाव्या असतात, संस्कृतिनिष्ठ भारतीय भाषांपेक्षा इंग्रजीची शब्दसंपत्ती अधिक आहे, इंग्रजीत भारतीय भाषापेक्षा लाघव अधिक आहे वगैरे निराधार समजुती आंग्लशिक्षितात दृढ आहेत व कितीही पुरावा दाखवला तरी त्या दूर होत नाहीत.

याच न्यायाला अनुसरून अव्वल इंग्रजीतील सुधारक बालविवाह अनिष्ट आहे, असे प्रतिपादन करीत. या प्रतिपादनास पोषक असे कोणतेच जीवशास्त्रीय, मनोवैज्ञानिक वा समाजशास्त्रीय प्रमाण त्यांनी दिले नाही. इतकेच नव्हे, तर अशी प्रमाणे देणे आवश्यक आहे याची त्यांना जाणीवही नव्हती.

## मूर्खतेच्या जोडीला स्वयंमन्यता

आतापर्यंतच्या विवेचनावर असा आक्षेप येईल की मौलिकतेचा व चिकित्सकतेचा अभाव, हास्यास्पद मते, इत्यादी दोष कोणत्याही देशातील विचारवंतांत दाखवता येतील. तेव्हा त्याच दोषांचा प्रपंच करून भारतीय आंग्लशिक्षितांना नादान ठरविणे अन्यायाचे आहे. यावर उत्तर असे की, जिवंत राष्ट्रात अशी उदाहरणे सापडली तरी त्या देशातील एकूण विचारवंतांच्या दर्जाचे स्वरूपच ते आहे असे म्हणता येत नाही. या प्रवृत्ती तेथे गौणत्वाने वावरतात, ते त्यांचे प्रधान लक्षण नसते. उलट भारतातील आंग्लशिक्षितात



मौलिकता व चिकित्सकता हेच गुण अपवादभूत आहेत. इतर देशातही हास्यास्पद मतांचा प्रादुर्भाव होत असला तरी, ती मते काही विशिष्ट गटापुरती मर्यादित राहतात, विचारवंतांची सार्वत्रिक मान्यता त्यांना मिळत नाही. तसेच एखाद्या धूर्ताने स्वतःच्या फायद्यासाठी आत्मविघातक व निराधार मते विचारवंतांच्या गळी उतरवून त्यांना बनविले असे उदाहरण जिवंत राष्ट्रात एकही सापडणार नाही. उलट भारतातील आंग्लशिक्षितांच्या पुष्कळशा श्रद्धा अशाच स्वरूपाच्या आहेत.

इंग्रजी शिक्षणाने आपली बुद्धी पंगू झाली ही जाणीव आंग्लशिक्षितांत असती तर त्यांच्या वैचारिक रोगावर सहज उपाययोजना करता आली असती. पण इंग्रजी शिक्षणाने आपल्याला काही दिव्य दृष्टी प्राप्त झाली आहे व आपल्या पूर्वजांपेक्षा आपण सर्वतोपरी शहाणे झालेलो आहेत हा एक मूर्खपणाचा ग्रह आंग्लशिक्षितांच्या मनात ठाण मांडून बसल्यामुळे त्यांच्या वैचारिक रोगावर उपाय करणे दूरापास्त होऊन बसले आहे. ''रामशास्त्र्यांना तोंडी पुराव्यापेक्षा लेखी पुरावा श्रेष्ठ आहे याची जाणीव होती की नाही? (एक निवृत्त न्यायाधीश), नाना फडणीसाला इंग्रज हे माशासारखे जलोद्‌भव प्राणी आहेत असे वाटत होते काय?'' (लोकहितवादी) वगैरे शंका आंग्लशिक्षित काढतात. ''इंग्रजी शिक्षणाने डोळ्यात अंजन घातल्यामुळे आपल्याला या गोष्टी कळतात, आपल्या अडाणी पूर्वजांना त्या कळणे कसे शक्य होते?'' असे त्यांना प्रामाणिकपणे वाटते. पूर्वजांचे शहाणपण बाहेर काढताना आंग्लशिक्षित आपले जे प्रकट करतात ते वरीलप्रमाणे हास्यास्पद असते.

## लोकशाहीचे आधारस्तम्भ

रामशास्त्री व नाना फडणीस यासारख्यांच्या बौद्धिक पातळीबद्दल ज्या आंग्लशिक्षितांना एवढी शंका आहे ते आपल्या समकालीन पण बोलून घालून अशिक्षित बांधवांच्या बौद्धिक पातळीबद्दल किती तुच्छताबुद्धी बाळगत असतील हे सांगायलाच नको. भारतात बहुसंख्य लोक अशिक्षित असल्यामुळे येथे लोकशाहीची व्यवस्था स्वीकारणे योग्य नाही, असे अनेक सुशिक्षित बोलत असतात. हे सुशिक्षित आपला मतदानाचा हक्क अशिक्षितांच्या मानाने कितपत सुबुद्धपणे बजावतात हे या सन्दर्भात पहाण्यासारखे आहे. सांख्यिकीच्या दृष्टीने मतदानाचा अभ्यास करता मतदारांच्या वागणुकीत सुशिक्षित व अशिक्षित असे दोन प्रकार मुळीच दिसून येत नाहीत. बव्हंश भारतातील मतदार, मग ते सुशिक्षित असोत वा अशिक्षित असोत, बहुसंख्येने काँग्रेसला मते देतात, दिल्लीतील

दोनही प्रकारचे मतदार जनसंघाकडे झुकाव दाखवितात व तामिळनाडूतील निरक्षराप्रमाणेच साक्षरही द्रमुकला मते देतात. सुबुद्धपणे मतदान करण्यास जे ज्ञान पाहिजे ते सुशिक्षितात अशिक्षितापेक्षा अधिक प्रमाणात आढळते असेही दिसत नाही. एका संशोधकाने डॉक्टरेटपर्यंत पदव्या घेतलेल्या एका गटाला एक प्रश्नावली दिली. त्यात "तुमच्या मते सर्वोत्तम नेता कोणता? सर्वोत्तम पक्ष कोणता? व भारताचा पंतप्रधान होण्यास सर्वात लायक कोण?" अशासारखे प्रश्न विचारले होते. या प्रश्नांची खालील उत्तरे मिळाली. सर्वोत्तम नेताः मुरारजी देसाई, सर्वोत्तम पक्ष : जनसंघ व पंतप्रधान होण्यास सर्वात योग्यः श्रीमती इंदिरा गांधी. एकूण या सुशिक्षितांच्या मते सर्वोत्तम नेता, सर्वोत्तम पक्ष व पंतप्रधानाचे पद यांचा एकमेकाशी काहीच संबंध नाही. अशी निर्बुद्ध उत्तरे देणाऱ्या सुशिक्षितांनी, अशिक्षित लोक मतदानाच्या अधिकारास अपात्र आहेत व त्यांना हा अधिकार दिल्यामुळे भारतातली लोकशाही धोक्यात आहे, अशी ओरड करावी हा एक दैवदुर्विलास आहे.

■ ■ ■





# प्रकरण अकरा | पुनरुज्जीवन की[५५] बुद्धिभ्रंश?

ब्रिटिश लष्करी ताबा स्थापन झाल्यामुळे भारतात शिक्षणाचा प्रादुर्भाव झाला, बाहेरच्या जगाशी संबंध स्थापित झाला व एकप्रकारचे बौद्धिक पुनरुज्जीवन झाले असे मत स्वराज्यापूर्वीदेखील मांडण्यात येत होते, पण त्याची साधारणपणे उपेक्षा होत होती. स्वराज्यानंतर मात्र या मताची बरीच चलती झाली; इतकी की भारतीय विद्याभवनाने "राष्ट्रीय" दृष्टिकोनातून भारताचा जो इतिहास लिहिण्याचा संकल्प सोडला त्यात हाच सिद्धात मांडला आहे. यामुळे या सिद्धांताचा काटेकोरपणे विचार करणे आवश्यक होऊन बसले आहे.

इंग्रजांनी भारताला सुशिक्षित केले या दाव्यांची परीक्षा करण्यासाठी इंग्रजांचा लष्करी ताबा स्थापित होण्यापूर्वी या देशात शिक्षणाची काय परिस्थिती होती याचा आढावा घेणे आवश्यक आहे. अव्वल इंग्रजीमध्ये मनरो, एलफिन्स्टन, ॲडॅम वगैरे साहेबांनी एतद्देशीय शिक्षणाची पाहणी करून त्यावर प्रतिवृत्ते लिहिली. त्यात नमूद असलेली आश्चर्यकारक माहिती या संबंधात उद्धृत करण्यासारखी

आहे. मनरो लिहितो : ''मद्रासेत १२८५०९४१ लोकसंख्येसाठी १२४९८ शाळा आहेत. हे प्रमाण दर हजार लोकसंख्येला एक शाळा एवढे मोठे पडते. या शिवाय घरी शिक्षण देण्याची सर्रास पद्धत होती व शाळेत जितके विद्यार्थी शिकत त्याच्या पाचपट विद्यार्थी घरी शिकत.'' १८२९ च्या सुमारास मुंबई प्रांतात ३१५४ पेक्षा अधिक शाळा आसाव्या व त्यात ७८२०५ पेक्षा अधिक विद्यार्थी शिकत असावे असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. या अंदाजाप्रमाणे दर ११८४ लोकांमागे एक शाळा असे प्रमाण पडते. मुंबईच्या गव्हर्नरच्या कौन्सिलातील एका सदस्याने १८२१ साली खालील उद्‌गार काढले होते : ''जिथे एकही शाळा नाही असे एकही खेडे नाही, ज्याला आपले हिशेब चोख ठेवता येत नाहीत असा एकही शेतकरी नाही. येथील मोठमोठ्या व्यापाऱ्यांचे हिशेब तर इतके संक्षिप्त व अचूक असतात की पाश्चात्त्य देशातील मोठ्या व्यापाऱ्याजवळ या पेक्षा प्रगत असे कोणतेच हिशेबाचे तंत्र नाही.'' ॲडमच्या प्रतिवृत्ताप्रमाणे बंगाल्यात यावेळी एक लक्ष शाळा होत्या. तदनुसार लोकसंख्येच्या दृष्टीने दर चारशे लोकांमागे एक शाळा असे प्रमाण पडते.

## पेशवाईतील साक्षरता

वरील माहितीवरून एकंदर भारतात शिक्षित लोकांचे शतमान किती होते याचा निश्चित-अंदाज करता येत नाही. तरीपण ब्रिटिशपूर्व काळांतील लाखो शाळा व सर्रास प्रचलित असलेली घरगुती शिक्षणाची पद्धती यावरून १८२१ सालचा भारत, जेव्हा प्रौढ साक्षरतेचे प्रमाण अवघे ५.३ टक्के होते त्या १९२१ सालच्या भारतापेक्षा अधिक प्रमाणात साक्षर होता हे महात्मा गांधींचे मत सयुक्तिक व साधार होते, असे म्हणण्यास हरकत नाही.

ॲडमच्या पुढील उद्‌गारावरून याची साक्ष पटेल. ''मी सहा खेड्यांत जाऊन चौकशी केली, तेव्हा असे कळले की या सर्व खेड्यात पूर्वी शाळा होत्या. पण आता तेथील शिक्षकांचे पोट भरत नाही म्हणून त्या बन्द करण्यात आल्या आहेत. हुगळी जिल्ह्यात असे कळले की पूर्वीचे जमीनमालक शेजारच्या लोकांना शिक्षण देण्यासाठी पदरी शिक्षक बाळगत. हा वर्ग आता नाहीसा झाला आहे.'' बेलरीचा कलेक्टर कॅम्पबेल लिहितो ''पूर्वी जेथे लाखोंनी मुले शाळेत जात तेथे आता हजार देखील दिसत नाहीत. पूर्वी जेथे अनेक शाळा होत्या तेथे आता औषधालाही शाळा नाही. आता श्रीमंतांचीच मुले फक्त शिकू शकतात. गरिबांना आता सरस्वती देखील पारखी झाली आहे.''



केवळ साक्षरतेच्या बाबतीतच असे घडले असे नाही. उच्च शिक्षण व विज्ञान यांच्या बाबतीत देखील इंग्रजी अमलात भारताची प्रगती झाली नसून अधोगतीच झाली असे सहज दाखवून देता येईल. हे विधान बव्हंश वाचकांना आश्चर्यकारक वाटेल म्हणून त्याची सत्यता पटविण्यासाठी वैज्ञानिक प्रगतीचा मानदण्ड काय हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. एखाद्या शर्यतीत एखादा घोडा मागे पडला की पुढे गेला हे त्याच्या बरोबर धावणाऱ्या इतर घोड्यांच्या तो मागे आहे की पुढे यावरून ठरवितात. अर्थात् अठराव्या शतकातल्या भारतात विज्ञान विद्यालये किती होती, त्यात किती विद्यार्थी शिकत होते व जे विज्ञान ते शिकत होते ते कितपत प्रगत होते याचा आढावा घेऊन त्यावर आजच्या परिस्थितीशी तुलना करणे रास्त होणार नाही; त्यासाठी अठराव्या शतकातच इतर देशात जी परिस्थिती होती तिच्याशी भारतातील परिस्थितीची तुलना केली पाहिजे. अठराव्या शतकातला भारत वैज्ञानिक प्रगतीत युरोपच्या मागे होता याबद्दल कोणताही सुबुद्ध माणूस शंका घेत नाही. प्रश्न हा आहे की अठराव्या शतकात भारत व युरोप यांच्या प्रगतीत जी तफावत होती ती एकोणिसाव्या व विसाव्या शतकात कमी झाली की वाढली? ब्रिटिश अमलात भारताची वैज्ञानिक अधोगती झाली याचा अर्थ ही तफावत वाढली असा आहे. विसाव्या शतकातल्या भारतात विज्ञानाच्या विद्यार्थ्यांची व विद्यालयांची संख्या व ते शिकत असलेल्या विज्ञानाचा स्तर अठराव्या शतकातल्यापेक्षा कमी होता असा नाही.

म्हणून भारतात इतर देशात तत्पूर्वीच न उद्‌भवलेले नवीन वैज्ञानिक विचार व परंपरा कोणत्या निर्माण झाल्या याचा मागोवा घेतला पाहिजे. असे करू गेल्यास ज्याला विज्ञानाची परंपरा म्हणता येईल असा पदार्थ ब्रिटिशकालीन भारतात औषधालाही नव्हता असाच निर्वाळा द्यावा लागतो. जगदीश बोस, रामन् वगैरे प्रतिभावंतांनी काही वैयक्तिक विक्रम केले, पण ते देखील पाश्चात्त्य जगाने मान्यता दिल्यानेच शक्य झाले. ब्रिटिशकालीन भारत जगाला धडे देऊ शकेल असे विज्ञानाचे वा तंत्रविद्येचे एकही क्षेत्र नव्हते. स्वचालित वाहने बनविण्याच्या प्राथमिक स्वरूपाच्या तंत्रात भारत पाश्चात्यावर अवलंबून होता, एवढेच नव्हे तर संस्कृत विद्येचे धडे घ्यायला देखील त्याला गौरकाय गुरूंची गरज भासत होती.

या उलट अठराव्या शतकातल्या भारतात वैज्ञानिक परंपरा कशाबशा का होईना पण तग धरून होत्या व काही बाबतीत त्याचे पाऊल पाश्चात्त्य जगाच्या पुढे होते. ही क्षेत्रे म्हणजे तर्कशास्त्र, ज्योतिष, औषधी, वस्त्रकर्म, धातुकर्म व नौकर्म ही होत.

या कालात भारतात प्रचलित असलेले तर्कशास्त्र नव्यन्याय या नावाने प्रसिद्ध आहे. केवळ अठराव्या शतकातच नव्हे, तर आजच्या विसाव्या शतकात देखील नव्यन्यायाच्या अभ्यासाने तर्कशास्त्राच्या विकासास चालना मिळण्यासारखी आहे. नव्यन्यायाचा अमेरिकन अभ्यासक इंगल्स म्हणतो की, नव्यन्यायाने आजच्या गणितीय तर्कशास्त्राचा कित्येक शतके आधीच वेध घेतला होता. It anticipates Mathematical Logic by several centuries. या उलट इंग्रजी अमलातील भारतीय तर्कशास्त्रज्ञांनी पाश्चात्त्यांना माहीत नसलेले कोणतेच तर्कशास्त्रीय विचार प्रसृत केले नाहीत. नवीन विचार प्रसृत करणे तर सोडाच, पाश्चात्त्य तर्कशास्त्राचे अद्ययावत् अध्ययन केलेला एखादा तरी विद्वान या काली अस्तित्वात होता की नाही या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी संशोधन करावे लागेल.

## ज्योतिष व वैद्यक

तर्कशास्त्रापेक्षाही विज्ञानाच्या क्षेत्रात गणित अधिक महत्त्वाचे आहे. संस्कृत विद्येत गणिताचा अंतर्भाव ज्योतिषात होता. अठराव्या शतकात भारतीय ज्योतिष युरोपीय ज्योतिषाच्या मागे होते, पण याचा अर्थ पाश्चात्त्यांना नसलेले कोणतेच ज्योतिषज्ञान भारतीयांना नव्हते असे नाही. अजमेरचा राजा जयसिंह याने नवीन वेधशाळा व नवीन यंत्रे बनवून त्यांच्या आधारे ज्योतिषाचे संशोधन चालू ठेवले होते. धातूंची यंत्रे लहान असतात व घासून खराब होतात म्हणून त्याने दगड व चुन्याची मोठमोठी सुदृढ वेधोपयोगी यंत्रे बनविली. जयप्रकाश, यंत्रसम्राट, भित्तियंत्र, वृत्तषष्ठांश वगैरे नवीन यंत्रांची नावे ज्योतिर्वेत्त्यात प्रसिद्ध आहेत. जयसिंहाने सात-आठ वर्षे वेध करून लिहविलेला सिद्धांतसम्राट हा संस्कृत ग्रंथ मोलाचा आहे. जयसिंहाची ग्रहस्थिती त्यावेळच्या युरोपीय ग्रहस्थितीपेक्षा काही बाबतीत अधिक सूक्ष्म असे, असे प्रसिद्ध ज्योतिर्विद् शं. बा. दीक्षित यांचे म्हणणे आहे.

ज्योतिषापेक्षाही रोगोपचाराच्या क्षेत्रात भारताचे पाऊल अनेक बाबतीत युरोपच्या पुढे होते. या सम्बधात विशेषतः उल्लेखनीय असलेली विद्या म्हणजे शस्त्रोपचार होय. मनूची नावाच्या इटालियन प्रवाशाने या क्षेत्रातील भारताच्या प्रगतीबद्दल उल्लेख केले आहेत. कापलेले नाक ठीक करण्यासाठी भिवईवरील माथ्याचे मास कापून ते नाकावर लावीत. युरोपला ही विद्या १९ व्या शतकापर्यंत अवगत नव्हती. टिपू सुलतानाने कावसजी नावाच्या एका माणसाचे नाक कापले. एका महाराष्ट्रीय शस्त्रोपचारकाने पुढे ते विधायक शस्त्रक्रियेच्या साहाय्याने ठीक केले. थॉमस क्रूसो व जेम्स फिण्डले या नावाचे दोन



ब्रिटिश डॉक्टर ही शस्त्रक्रिया पाहण्यास हजर होते. या शस्त्रक्रियेचा वृत्तान्त मद्रास गॅझेट व लण्डन मॅगझीन यात आढळतो. आयुर्वेदाचे अनेक उपचार अजूनदेखील संशोधनार्ह आहेत. सर्पगन्धा, पुनर्नवा, धातूंची भस्मे वगैरे आयुर्वेदीय उपचार आधुनिक संशोधनामे मान्य होत आहेत.

१७३१ साली कौल्टने बंगालमधून एक पत्र लिहिले. त्यात देवीचा आजार येऊ नये म्हणून निवारक लस टोचून घेण्याची प्रथा बंगालमध्ये निदान १५० वर्षांपूर्वीपासून पडली आहे असा उल्लेख आहे. त्रिकोणपेशी (Deltoid) खाली लसलिप्त सुईने छिद्रे करून लस भरीत. लस भरलेले स्थान चिघळून फुगून आले की लस लागू झाली व देवीचा रोग होण्याचा संभव कमी झाला असे समजत.

जे. झेड्. हावेल F. R. S. याने चिकित्सक विद्यालय सदस्यांच्या अध्वर्यूला लिहिलेल्या पत्रात खालील माहिती दिली आहे- "लस टोचण्याचे हे काम वृंदावन, वाराणसी, वगैरे निरनिराळ्या ठिकाणच्या विद्यालयातले ब्राह्मण देशभर फिरून करतात. साथ पसरण्याचा संभव दिसताच ते गावात येऊन आपले काम सुरू करतात. लस टोचण्याचे त्यांचे उपकरण न्हाव्याच्या नखकापणीसारखे असते. ही लस टोचून घेतल्यावर देवीचा रोग क्वचित्च होतो. लस टोचल्यावर मोकळी हवा व थंड पाण्याने आंघोळ हा या वैद्यांचा उपचारविधी मला पूर्वी अशास्त्रीय वाटे; पण अधिक अनुभवानंतर तोच बरोबर आहे हे पटले."

तात्पर्य औषधिशास्त्रात F. R. S. झालेल्या एका इंग्रजी डॉक्टराला धडे देण्यासारखे काही ज्ञान भारताजवळ होते.

## दवबिंदू[13] व[55] समुद्रसंचार

भारताची आचार्यता ज्या क्षेत्रात साऱ्या जगाला मानावी लागत होती, असे दुसरे क्षेत्र वस्त्रकर्म हे होते. या काळात तयार होणारी ढाक्याची मलमल जगप्रसिद्ध आहे. अर्धा शेर कापसापासून २५० मैल लांबीचा धागा विणण्यात येत असे. या धाग्याने निर्मिलेली मलमल जमिनीवर पसरली तर दवबिंदूचा सडा घातल्यासारखी वाटे. म्हणून या मलमलीला शबनम् म्हणत. वीस चौरस वारांची ही मलमल अंगठीतून आरपार ओढून घेता येई. चौरस वार मलमलीचे वजन १/१५० पौण्ड असे. भारतीय कारागिरांनी तयार केलेल्या या शबनमचे युरोप अमेरिकेतील लोकांना इतके वेड होते की तेथे त्यांची हजारो रुपयांची विक्री होई.

या विक्रीमुळे तद्देशीय कामगारांचा धंदा बुडू लागला म्हणून तेथील सरकारांनी भारतीय कापडाविरुद्ध कायद्याचे शस्त्र उगारले. इंग्लंडमध्ये १७०१ साली भारतीय रेशीम व मलमल वापरणे व विकणे हा गुन्हा ठरविण्यात आला. तेवढ्याने भागले नाही म्हणून १७२१ साली पुनः या कायद्याची पकड अधिक आवळणारे निर्बंध जारी करण्यात आले. या कायद्यांना तोंड देऊनही भारतीय कापड परदेशी बाजारपेठात टिकून राहिले, तेव्हा १७२८ मध्ये इंग्लंडप्रमाणेच इतर देशांनीही त्याविरुद्ध कायदे केले.

जगाच्या आचार्यतेवर हक्क सांगण्याइतपत नसली तरी जागतिक स्पर्धेत आघाडीवर असलेल्या राष्ट्रापुढे देखील बरोबरीने टिकून राहण्यास समर्थ असलेली या काळातली एक भारतीय विद्या म्हणजे नौकर्म. या काळी भारतात मोठमोठी जहाजे बांधली जात. त्यांचा दर्जा इतका उच्च असे की पाश्चात्त्य देशात देखील ती जहाजे निर्यात केली जात. कान्होजी आंगरे व आनंदराव धुळप हे मराठी दर्यासारंग, इंग्लंडसारख्या नौकायुद्धात अग्रगण्य असलेल्या राष्ट्रांच्या नौसेनेशी दोन हात करीत ते या विद्येच्या बळावर, एखाद्या राष्ट्रापासून जहाजे उसनी घेऊन नव्हे.

## लोहमूलानि यंत्राणि

वज्र-चूर्णासारखा (सीमेंटसारखा) पक्का व गुळगुळीत चुन्याचा गारा काढण्याची एक अभिनव पद्धती मद्रासेत पाहिली असे १७४७ मध्ये आयझॅक पाइक नावाच्या इंग्रजाने लिहून ठेवले आहे. रॉबर्ट बार्कर याने अलाहाबादमध्ये बर्फ बनविण्याचे तंत्र पाहिले. खोल खड्ड्यातील पाण्याचा फार मोठा पृष्ठभाग थंड हवेच्या संपर्कात आणून पाणी गोठवणे असे या तंत्राचे स्वरूप होते. हिवाळ्यात तयार केलेले हे बर्फ उन्हाळ्यात उपयोगात आणण्यासाठी गोठलेल्या स्थितीतच साठवून ठेवण्याचे तंत्र भारतीयांना अवगत होते. याच बर्फाच्या साहाय्याने सरबते दूध वगैरे देखील गोठवीत.

अठराव्या शतकातील भारतात अंदाधुंदी होती व त्यामुळे कालवे पाटबंधरे, वगैरेंच्या योजना चालू असणे शक्य नव्हते अशी एक समजूत आंग्लशिक्षितात आहे. पण मेजर जनरल वॉकरच्या लिहिण्यावरून वेगळेच चित्र दिसते. या काळातील भारतातील जलयोजना इतर देशापेक्षा पुढारलेल्या होत्या. जागजागी तळी, सरोवरे व प्रचंड धरणे होती. खानदेशातील ही मराठेशाही व्यवस्था ब्रिटिश राज्याच्या प्रारंभीच्या अंदाधुंदीमुळे मोडकळीस आली, असेही त्याच्या विधानावरून दिसते.



लोहनिर्मिती हा यान्त्रिकीकरणाचा पाया समजला जातो. या बाबतीत अठराव्या शतकातला भारत बराच प्रगत होता. डॉ. बेंजामिन याने १७२५ मध्ये रमणकपेठ येथील लोखंडाच्या कारखान्याचे वर्णन केले आहे. ब्रिटिशांच्या आगमनामुळे या क्षेत्रात प्रगती होण्याऐवजी परागतीच झाली. ब्रिटिश लोक असल्या कारखान्यातील कामगारांना वेठीस धरीत व त्यामुळे लोखंड बनविण्याच्या कामात सारखा खंड पडे.

लोखंड तयार करण्याची भट्टी विज्ञानपूत तत्त्वांच्या आधारे बनवलेली व तत्कालीन युरोपातल्या भट्ट्यांसारखीच असे, असे मेजर जनरल फ्रँकलिन याने १७२९ मध्ये लिहिले आहे. भट्टीच्या समान्तर व उदग्र बाजू सारख्या असून तोंड ३, मध्य ६ व तळ ४.५ असे प्रमाण असे. या संख्याचा वर्ग करून त्याला अक्षाने गुणिले की भट्टीचे घनफळ मिळे. प्रध्वानाचा कोण व भट्टीची वक्रता, प्रगत विज्ञानाचे लक्षण होती. भारतीय लोखंड कुट्यता, तन्यता व दृढता या बाबतीत स्वीडिश लोखंडाच्या तोडीचे असे. पिळे दिल्याने इंग्लिश लोखंडाइतके भारतीय लोखंड लवकर तुटत नसे. कॅप्टन जे. कॅम्पबेलच्या मते सर्वात निकृष्ट भारतीय लोखंड सर्वात उत्कृष्ट इंग्रजी लोखंडाच्या तोडीचे असे.

## विचार जागृती

अठराव्या शतकात, युरोपीयांना न येणाऱ्या काही विद्या भारतात अस्तित्वात होत्या. पण त्या अठराव्या शतकात निर्माण झालेल्या नव्हत्या, नवीन ज्ञानाची निर्मिती शेकडो वर्षांपासून खुंटलेली होती. पण जुने भांडवलच इतके मोठे होते की शेकडो वर्षांच्या गळतीनंतर अठराव्या शतकात देखील त्यातले काही शिल्लक होते व ते काही बाबतीत युरोपीय विद्यांपेक्षा अधिक प्रगत होते, एवढाच निष्कर्ष वरील विवेचनावरून निघतो. अठराव्या शतकात भारताची विचारशक्ती जागृत होती असे त्यावरून सिद्ध होत नाही असा एक आक्षेप येण्यासारखा आहे व तो वव्हंशी खरा असावा; पण अठराव्या शतकात भारतात प्रचलित असलेल्या विद्या केव्हा निर्माण झाल्या याबद्दल निश्चित माहिती मिळत नसल्यामुळे त्यापैकी कोणत्याच अठराव्या शतकात निर्माण झालेल्या नव्हत्या असे म्हणणेही न्याय्य होणार नाही. जुने ज्योतिष दृक्प्रत्यय देत नाही म्हणून महाराजा जयसिंगाने नवीन ज्योतिष निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यावरून अठराव्या शतकातील भारतात नवीन ज्ञानाची निर्मिती प्राचीन भारताच्या व तत्कालीन युरोपच्या तोडीची नसली, तरी नष्ट झालेली व ब्रिटिश भारतापेक्षा कमी प्रमाणात नव्हती असे म्हणण्यास हरकत नाही.

ब्रिटिशपूर्व भारताजवळ जगाला शिकविण्यासारखे काहीतरी होते; त्याचप्रमाणे प्रतिपक्षाची विद्या आत्मसात् करून त्यावर मात करण्याची खुमखुमी देखील होती. पेशवे, शिंदे व टिपू सुलतान यांनी नवीन शस्त्रे तयार करविण्याचे उपक्रम केले. टिपूच्या नोकरीत असलेला शिवाजी महादेव लिहितो : ''नव्या बंदुका करावयास कारखाने लावले आहेत. तेथे नव्या बंदुका तयार करवीत आहे. इंग्रजाकडील बंदुका घेत नाही'' मराठे व टिपू सुलतान अग्निबाणांचा उपयोग करीत. हे अग्निबाण युद्धविज्ञानातले एक प्रगत शस्त्र होते, असे भारतीय रक्षाविज्ञान खात्याचे भूतपूर्व प्रमुख डॉ. भगवंतम् व प्रसिद्ध इतिहासकार डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी लिहून ठेवले आहे. शोधकता व दुसऱ्यापासून शिकण्याची प्रवृत्ती शस्त्रास्त्रांपुरतीच मर्यादित होती असेही नाही. गुजराथेत एका शेतकऱ्याने कलव्हर नावाच्या गवताचे बी बसऱ्याहून आणविले व त्याचे पीक आपल्या जमिनीतून काढून घोड्यांच्या खाण्याची उत्तम व स्वस्त व्यवस्था केली, असे मेजर जनरल सर अलेक्झांडर वॉकरने नमूद केले आहे.

## 'नाना फडणीसाचे शहाणपण'

"अठराव्या शतकातील भारतीयांना बाहेरच्या जगाचे ज्ञान नव्हते, आम्हा इंग्रजी शिकलेल्या भारतीयांची दृष्टी बाहेरच्या जगाच्या ज्ञानाने विशाल झाली आहे" असा एक स्वयंमन्य ग्रह इंग्रजी शिक्षितात आहे. 'नाना फडणीसाचे शहाणपण' उघडकीस आणताना लोकहितवादींनी नानांना इंग्रज कोठून येतात हेच माहीत नव्हते, तो त्यांना कलकत्तेकर म्हणजे कलकत्त्यात जन्मलेले व जलचर म्हणजे जलात जन्मलेले मानीत असे असा गर्भित आरोप केला आहे. नाना फडणीसाचा पत्रव्यवहार पहिला असता हा आरोप लोकहितवादींच्या इतर सर्व लिखाणांप्रमाणेच अज्ञानग्रस्त आहे हे उघड होते. उदाहरणार्थ खालील उतारा पहा :

''अलीकडे तीन - चार वर्षे झाली असतील तेव्हापासून फ्रान्स देशातील हलक्या प्रतीच्या रहिवाशांनी आपला जुलमी हात बादशहाच्या मदतगार मंडळाच्या पदरापावेतो घातला व त्याचा अपमान केला. अखेर त्यांनी आपल्या जुलमाचे निशाण येथपावेतो उभारले की त्या दुर्दैवी जमावाने निर्भयपणे तरवारीच्या घावाने सदर बादशहास ठार केले. त्यांनी कायदेकानूनचे बंधन तोडले आहे व बुद्धिमान चतुर मंत्री आणि अधिकारी यासही नाहीसे केले.''



यावरून नाना फडणीसाला फ्रेंच राज्यक्रांतीची माहिती होती हे उघड आहे.

नाना फडणीसाला युरोपच्या राजकारणाची माहिती होती एवढेच नव्हे, तर इंग्रजांना शह देण्यास आपल्याला मदत करू शकणारे फ्रान्स हेच राष्ट्र आहे हे ओळखून त्याने फ्रेंच बादशहाशी संधान देखील बांधले होते. फ्रेंच सेनापती बुसी याचे नानास जे पत्र आले होते त्यावरून हे स्पष्ट आहे. बुसी लिहितो :

''तुमचे उत्तर वाचून खुशाल झालो. आम्हास आमचे खावंदानी बहुत फौज व मजबूत सरंजाम देऊन या प्रांती पाठविले. इंग्रजास तंबी करून मारून काढावा, हिंदुस्थानातील सरदारांचे मुलुख त्यांनी घेतले असतील ते ज्यांचे त्यास द्यावे असा आमचे खाविंदाचा आम्हास हुकूम आहे. मोसम येताच आम्ही मजबुतीने तिकडे येतो. तुम्ही आम्ही मिळून इंग्रजास खस्त करून टाकू. तुम्हापाशी मुसामुतीन आहे. ते पातशहाचे इतबारी तसेच वजिराचे व आपलेही इतबारी आहेत. ते तुम्हास सर्व सांगतील.''

अर्थात नाना फडणीसास आपल्या राजकारणास आवश्यक ते बाहेरच्या जगाचे ज्ञान होते व त्याचा जो उपयोग करणे शक्य होता तोही त्याने केला. १९६२ साली आंग्लशिक्षित भारतीयांना चीन व रशियामधील राजकारणाचे जितपत ज्ञान होते त्यापेक्षा नानाला युरोपीय राजकारणाचे ज्ञान अधिक होते असे म्हणणे गैरवाजवी होणार नाही.

नानासारखा अग्रगण्य मुत्सद्दी सोडला तरी दरवर्षी शेकडो मराठी व्यापारी जहाजाने मस्कत व चीनपर्यन्त सफरी करीत. ही जहाजे भारतात बांधलेली व भारतीयांच्या मालकीचीच असत. तेव्हा बाहेरच्या जगाबद्दलचे ज्ञान ही मराठेशाहीत आंग्लशिक्षितांच्या भाबड्या समजुतीप्रमाणे एक दुर्लभ चीज नव्हती. पृथ्वीपर्यटनात मराठे इंग्रजांच्या तोडीचे नव्हते, हे खरे असले तरी तेवढ्यावरून भारताच्या बाहेर त्याचे भूगोलाचे ज्ञान गेले नव्हते असे ठरत नाही.

## आव बृहस्पतीचा अन् आवाका पोपटाचा

इंग्रजी शिक्षणाबद्दल आंग्लशिक्षितांच्या डोक्यात ज्या स्वप्नरम्य कल्पना आहेत त्या इंग्रजी शिक्षणाने घडवून आणलेल्या बुद्धिभ्रंशाचे निर्णायक प्रमाण म्हणून पुढे करता येण्यासारख्या आहेत. वस्तुतः भारतात विज्ञानाचा प्रसार वा पुनरुज्जीवन करणे हा आपला हेतू असल्याचा दावा इंग्रज राज्यकर्त्यांनी कधी मांडलाच नव्हता. ब्रिटिश सरकारच्या उच्चारित व आचारित धोरणावरून हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. १८५७ साली पहिले

विद्यापीठ स्थापन झाले पण पहिला B. Sc. मात्र १९०२ साली म्हणजे तब्बल ४५ वर्षांनी बाहेर पडला. वैज्ञानिक व तांत्रिक शिक्षणाच्या संस्था इंग्रजांनी स्वयंस्फूर्तीने काढल्या नाहीत. भारतीयांना त्यांची बरीच मनधरणी करावी लागली. या संबंधी पाकिस्तानचे वैज्ञानिक सल्लागार अब्दुल सलाम यांचे टाइम्स ऑफ इंडियातील विवेचन महत्त्वाचे आहे. १९०२ पर्यंत तंत्रविद्या शिकविणाऱ्या संस्थाच भारतात नव्हत्या.

वैज्ञानिक पुनरुज्जीवन हा इंग्रजी शिक्षणाचा उद्देश नव्हता हे जसे स्पष्ट आहे, त्याचप्रमाणे या शिक्षणाचा खरा उद्देश काय या बद्दलही मेकॉले व इतर ब्रिटिश शिक्षाविद् यांनी निःसंदिग्ध घोषणा केल्या होत्या. संस्कृत विद्या व आधुनिक भारतीय भाषा यांचे काडीचेही ज्ञान नसता त्याने पेनाच्या एका फटकाऱ्यासारख्या त्या निकालात काढल्या. विज्ञानाची जोपासना करण्याचा प्रयत्न केला असता तर त्याने भारताची वैज्ञानिक परंपरा जागृत करण्याचा प्रयत्न केला असता. पण भारतीयांचे भारतीयत्व नाहीसे करणे हा त्याचा खरा उद्देश होता. भारतीयांच्या शिक्षणाबाबत आस्था दाखविणारा दुसरा वर्ग मिशनऱ्यांचा होता. त्याचा स्पष्टपणे घोषित उद्देश भारताचे ख्रिस्तीकरण करण्याचा होता. ग्राण्ट व विल्बरफोर्स यांची वक्तव्ये या संबंधात वाचण्यासारखी आहेत. ख्रिस्तीकरणाचा हा उद्देश सत्तावनच्या स्वातंत्र्ययुद्धाने हाणून पाडला. भारतीयत्व नाहीसे करण्याचा उद्देश मात्र बऱ्याच अंशी सफल झाला. विज्ञानाचे पुनरुज्जीवन करण्याचा हेतू नव्हताच तेव्हा तो सफल झाला नाही यात आश्चर्य काय?

■■■





प्रकरण बारा

# कार्ल मार्क्स आणि सत्तावनचे स्वातंत्र्ययुद्ध

प्रथितयश कादम्बरीकार ग. त्र्यं. माडखोलकर यांनी सत्तावनचा संग्राम हा सरंजामशाहीचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न होता व म्हणून स्वातंत्र्ययुद्ध या नावाने त्याचे पोवाडे गाणे इष्ट नाही असे प्रतिपादले आहे. माडखोलकर हे पूर्ववयात उत्साही मार्क्सवादी होते म्हणून "सरंजामशाही", "भाण्डवलशाही" इत्यादी मार्क्सच्या परिभाषेतले शब्द वापरून त्यांनी सत्तावनच्या संग्रामाची सम्भावना केली हे अपेक्षित होते. पण सारा जन्म अध्यात्म व सन्तवाङ्मय यांच्या संगतीत ज्यांनी घालविला त्या प्रा. बनहट्टींनी देखील स्वराज्यानंतर सर्वत्र उसळलेल्या पारतन्त्र्यपूजेच्या झपाट्यात येऊन "राजेरजवाड्यांचे व शिपायांचे बण्ड" या शब्दांनी त्या संग्रामाचे वर्णन केले व राजेरजवाडे हे मरू घातलेल्या सरंजामशाहीचे प्रतिनिधी होते, कोल्हापूरचे महाराज हे शिवाजी महाराजांचे वंशज म्हणून त्यांचा अभिमान बाळगून टिळक /आगरकरांनी त्यांची बाजू घेतली. कारण,

मार्क्सवादाच्या प्रगत समाजशास्त्राचे त्यांना ज्ञान नव्हते, असे प्रतिपादले आहे.

ज्या मार्क्सवादाच्या प्रभावाने बनहट्टीसारखे भक्तिमार्गी देखील सत्तावनच्या संग्रामाची निन्दा करतात त्याच्या जनकाचे सत्तावनच्या संग्रामाबद्दल काय विचार होते याबद्दल माझ्या मनात कुतूहल होते. त्यामुळे स्वतः मार्क्सने सत्तावनच्या संग्रामाबद्दल विस्तृत लिखाण केले आहे असे मला कळले तेव्हा मी मोठ्या उत्सुकतेने ते वाचले. सत्तावनच्या संग्रामाच्या इतिहासाच्या दृष्टीने हे लिखाण अत्यन्त महत्त्वाचे आहे. कारण मार्क्स हा सत्तावनचा समकालीन होता व त्याने ज्या अभिलेखांच्या आधारे आपले लिखाण केले ते भारतातील ब्रिटिश अधिकाऱ्यांनी ब्रिटिश सरकारला भारतातील घटनांची माहिती देण्यासाठी लिहिलेले होते. मार्क्सचे सत्तावनवरील लिखाण न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून या पत्रात प्रसिद्ध झाले होते. तसेच आपला सहकारी एन्जेल्स याला लिहिलेल्या काही पत्रात देखील त्याने या विषयी विचार व्यक्त केले आहेत. या लिखाणाच्या आधारे सत्तावनच्या युद्धाचे स्वरूप कसे प्रतीत होते हे पाहणे उद्बोधक ठरेल.

## मार्क्सची दोन मुखे

मार्क्सने वर उल्लेखिलेल्या पत्रात १८५३ साली भारताविषयी काही लेख लिहिले. पुढे १८५७ चा उद्रेक झाल्यावर त्याने या उद्रेकाविषयी विचार व्यक्त केले. १८५३ व १८५७ या दोन भिन्न काळी लिहिलेल्या या दोन लिखाणात व्यक्त झालेली मते अत्यन्त भिन्न आहेत. माडखोलकर व बनहट्टी यांच्या उद्गारात व्यक्त झालेला मार्क्स हा १८५३ सालचा मार्क्स आहे. १८५७ सालचा मार्क्स हा विनायक कोण्डदेव ओक व फाटक यांच्या माळेतला मार्क्स नसून सावरकरांच्या जातीतला आहे. १८५३ सालच्या लिखाणात ब्रिटिशांनी भारत जिंकला हे एकूण चांगलेच झाले, ब्रिटनच्या या विजयामुळे स्थाणू अवस्थेत असलेल्या भारतातील समाजाला गती मिळेल असे मार्क्सने म्हटले आहे. १८५७ साली केलेल्या लिखाणात मात्र याच्या अगदी उलट सूर आहे. भारतीयांनी जेव्हा परसत्तेविरुद्ध अत्यन्त प्रभावी असा उठाव केला तेव्हा मार्क्स आपले सारे तत्त्वज्ञान विसरला व एका परतंत्र देशाने आपल्या स्वातंत्र्यासाठी दण्ड थोपटले हे पाहून त्याने त्याचे उत्साहाने स्वागत केले. कोणत्याही देशाबद्दल परकीयांच्या मनात असलेली प्रतिमा त्या देशाने प्रकट केलेल्या वीरवृत्तीवर कशी अवलंबून असते हे मार्क्सच्या वरील दोन प्रकारच्या लिखाणावरून स्पष्ट होते. प्रस्तुत लेखात मार्क्सच्या दुसऱ्या लिखाणात सत्तावनच्या संग्रामाचे स्वरूप



कसे दिसते हे पाहावयाचे आहे.

या लिखाणात मार्क्सने निःसन्दिग्ध शब्दात सांगितले आहे की "जॉन बुलला" जे शिपायांचे बण्ड वाटते तो वस्तुतः राष्ट्रीय उठाव आहे. ब्रिटनचा दोन वेळा पंतप्रधान असलेला डिझरायली देखील असाच निर्वाळा देतो हे सांगून मार्क्सने त्याच्या भाषणाचा सारांश दिला आहे. डिझरायली म्हणतो, "ब्रिटिश हे भारतात लुटारूसारखे वागले. तद्देशीयांची राज्ये व मालमत्ता हडप करताना कायदे व तह इत्यादी बाबींची त्यांनी काहीच तमा बाळगली नाही. इतकेच नव्हे तर भारतीयांच्या धर्मावर देखील घाले घालण्यास त्यांनी सुरवात केली." "केवळ शिपायांनीच हा उठाव केला आहे, इतरांचा त्यात संबन्ध नाही," हे म्हणणे सर्वथैव चुकीचे आहे. साऱ्या भारतीय जनतेचा हा राष्ट्रीय उठाव आहे."

१८५७ साली सत्तावनच्या युद्धाचा शतसांवत्सरिक उत्सव झाला तेव्हा मार्क्सवाद्यांनी मार्क्सच्या या विषयावरील मताला प्रसिद्धी दिली नाही. तसेच ब्रिटिश कागदपत्रांच्या आधारे इतिहास लिहिणाऱ्या सेन, मजुमदार प्रभृती लेखकांनी डिझरायलीसारख्या अत्युच्च पद भूषविणाऱ्या व्यक्तीने या विषयावरील समकालीन पुराव्याच्या आधारे काय मत बनविले होते, याची वास्तपुस्त देखील केली नाही.

## उठावाचे व्यापक स्वरूप

दिल्लीपासून तो बिहारच्या पूर्वसीमेपर्यन्त या युद्धाचे क्षेत्र होते हे सुप्रसिद्ध आहे. पण मार्क्सने ते या पेक्षा अधिक विस्तृत होते असे दाखविणारी माहिती दिली आहे. ती अशी :-

खुद्द कलकत्ता या ब्रिटिशांच्या राजधानीत, तेथील ब्रिटिशांची सत्ता उखडून फेकून देण्याचा एक व्यापक कट उघडकीस आला. दक्षिण बंगालमध्ये मिर्झापूर, दीनापूर व अतना येथे क्रान्तिकारक सक्रिय होते. आसामच्या सीमेवर आसामचा पूर्वीचा राजा प्राणधरसिंग याची पुनः स्थापना करण्यासाठी पुरभय्यांच्या दोन पलटणींनी उत्थान केले. पंजाबात सियालकोट, झेलम व हिसार येथील उठाव दडपण्यात आले असे वृत्त आहे. लाहोर व मुलतान येथील सम्पर्क व्यवस्था क्रान्तिकारकांनी तोडली. सीमाप्रान्तात डेराइस्माइलखान व पेशावर येथे क्रान्तिकारकांनी आपली चुणूक दाखविली. कराची व शिकानपूर येथे क्रान्तिकारकांची काही स्थाने उघडकीस आली. जबलपूरमध्ये ५२ व्या

बंगाल पलटणीने बण्ड केले आणि आपल्या ब्रिटिश अधिकाऱ्याला ओलिस ठेवले. जोधपूरच्या सैन्याने अर्व्याच्या क्रन्तिकारी राजाची नोकरी पत्करली. त्यांनी एका मोठ्या ब्रिटिशपक्षीय फौजेचा पराभव केला. पुढे जनरल लॅरेन्सने त्यांच्यावर चाल केली. पण क्रान्तिकारकांनी त्याच्या आक्रमणाला पायबन्द घातला. "कोल्हापुरातल्या सत्ताविसाव्या पायदळाने बण्ड केले हे सत्य आहे. पण ब्रिटिशांनी त्याचा बीमोड केला ही मात्र एक बाजारगप्प आहे." गुजराथ, पण्ढरपूर, सातार, सागर, नागपूर, हैदराबाद व दूर दक्षिणेतील म्हैसूर येथे देखील उठाव झाले.

एकूण हे युद्ध पेशावर ते म्हैसूर व आसाम ते कराची इतक्या विस्तृत प्रदेशावर लढले गेले. इतक्या विस्तृत प्रदेशावर परकीय सत्तेविरुद्ध उठाव झाल्याचे इतिहासात दुसरे उदाहरण नाही.

साधारणपणे असे समजले जाते की शिखांचा या युद्धाला एकजात विरोध होता. पण मार्क्सने दिलेल्या उदाहरणावारून हे सर्वस्वी खरे नाही असे दिसून येते. डेरा इस्माहलखानमध्ये ब्रिटिश अधिकाऱ्यांना मारून स्वातंत्र्याची द्वाही फिरविण्याचा जो कट झाला तो शिखांनी शिजविलेला होता. वाराणसीमध्ये एका देशी पलटणीला निःशस्त्र करण्याच्या प्रयत्नाचा शिखांनी विरोध केला. वाराणसीमध्ये "मुसलमानांप्रमाणेच शीखदेखील ब्राह्मणांच्या ब्रिटिशविरोधी षडयंत्रात सामील झाले होते." "युद्धाच्या उत्तररंगामध्ये शिखांमध्ये जी भावना पसरू लागली आहे ती ब्रिटिशांना जड जाणार आहे." "आम्ही ब्रिटिशांना साथ न देता आपल्या देशबांधवांना साथ दिली असती तर ब्रिटिश राज्य सहजगत्या उलथून पडले असते. आम्ही नेहमी ब्रिटिशांनाच साथ द्यावी असे त्यांचे आमचे काही नाते नाही," असे शीख बोलू लागले आहेत.

सारांश सत्तावन साली सारे भारतीय एकत्वाच्या भावनेने प्रेरित होऊन जगातील सगळ्यात मोठ्या सैनिक शक्तीशी दोन वर्षे लढले. या युद्धाचा कालावधी, विस्तार व खऱ्या अर्थाने अखिल भारतीयता पाहता ते मुळातून अपयशाचा लेख माथी घेऊन जन्माला आले होते हे मजुमदारांचे करण्टे विधान अनैतिहासिक ठरते. मार्क्सचे लिखाण वाचणाऱ्या कोणत्याही वाचकाला सत्तावनच्या संग्रामाने ब्रिटिशांचे प्राण कण्ठाशी आणले होते याबद्दल खात्री पटेल. दिल्ली १३४ दिवस लढली. दिल्लीच्या राजकीय महत्त्वामुळे ती शक्य तितक्या लवकर घेतलीच पाहिजे अशी ब्रिटिशांनी बाजी लावली होती. तरी पण दिल्ली घेण्यासाठी ठाण माण्डून बसलेल्या प्रबल ब्रिटिश सैन्यावर दिल्लीतल्या क्रान्तिकारी फौजांनी



अनेक वेळा हल्ले केले. बाहेरच्या क्रान्तिकारकांनी दिल्लीशी असलेला इतर ब्रिटिशांचा संपर्क अनेक वेळा तोडला. असैनिक नागरिकांनी दिल्लीकडे ब्रिटिशांसाठी जाणाऱ्या कुमकेच्या मार्गात अडथळे आणले व व्यापाऱ्यांनी कर्जे देणे बन्द केले.

सत्तावन साली डझन दोन डझन इंग्रज हजारो "काला आदमींना" पुरून उरत असत अशा आशयाच्या अनेक गप्पा मजुमदार प्रभृती इतिहासकारांनी खऱ्या मानून प्रसृत केल्या आहेत. मार्क्सने प्रकाशित केलेल्या सत्यांनी या गप्पांचा फुगा फोडला आहे. भारतामध्ये ब्रिटिशांचे दोन लाख खडे सैन्य होते. या पैकी फक्त तीस हजारांनी बण्ड केले. ब्रिटिशांच्या जवळ १७०००० देशी सैन्य, त्यावरचे दहा हजार ब्रिटिश अधिकारी व चाळीस हजार निव्वळ ब्रिटिश फौज कायम होती. शिवाय मुम्बई, मद्रास व बंगाल या प्रान्तातील त्यांच्या तळांना धक्का लागला नव्हता. याच्या जोडीला चीनकडे जाऊ घातलेली ब्रिटिश फौज भारताकडे वळविण्यात आली आणि शिवाय जादा फौज पाठविण्यासाठी ब्रिटिश सरकारकडे काकुळतीचे अर्ज सुरू होते.

## मजुमदारी गप्पा

मार्क्सने केलेले ब्रिटिशांच्या लखनौवरील स्वारीचे वर्णन वाचले की ब्रिटिशांनी सत्तावनच्या क्रान्तिकारकांविरुद्ध वापरलेल्या सैनिक सामर्थ्याची कल्पना येईल. जनरल कॅम्पबेलने लखनौ काबीज करण्यासाठी जे सैन्य नेले ते अफगाणिस्थानवर स्वारी करणाऱ्या ब्रिटिश सैन्याच्या दसपट होते. या सैन्यातील ब्रिटिश अधिकाऱ्यांची संख्याच अफगाणिस्थानावर गेलेल्या साऱ्या सैन्यापेक्षा अधिक होती. कॅम्बेलचे सैन्य ८०,००० च्या घरात होते.

मार्क्सने लखनौवर गेलेल्या ब्रिटिश सैन्याची जी संख्या दिली आहे त्यावरून विष्णुभटाने दिलेली ह्यू रोजच्या सैन्याची संख्या ६०,००० ही निराधार नसावी असे म्हणण्यास जागा आहे.

झाशी व लखनौ येथील क्रान्तिकारकांचे सैन्य किती मोठे होते याचा नक्की आकडा मिळणे दूरापास्त आहे. पण ते त्यांच्यावर चालून येणाऱ्या ब्रिटिश सैन्याच्या एवढे मोठे असण्याचा सम्भव नाही. स्वातंत्र्ययुद्धाच्या साऱ्या दोन वर्षात त्याच्या तर्फेने लढणाऱ्या साऱ्या लोकांची संख्या दोन लक्ष होती असा एक अंदाज प्रसिद्ध झाला आहे. यापैकी एक लक्ष व्यावसायिक सैनिक होते व एक लक्ष, ज्यांचा पेशा लढण्याचा नव्हता असे देशाच्या स्वातंत्र्यासाठीच फक्त ज्यांनी शस्त्र हातात घेतले होते, असे नागरिक होते.

## फसले कसे?

सत्तावनच्या उठाव जर एवढा मातब्बर होता तर तो विफल का झाला?

याची कारणे तीन आहेत १) क्रान्तिकारकांच्या जवळ असलेली शस्त्रास्त्रे ब्रिटिशांजवळ असलेल्या शस्त्रास्त्रांच्या मानाने निकृष्ट दर्जाची होती. मार्क्स म्हणतो की सर्व क्रान्तिकारकांजवळ अग्निशस्त्रे देखील नव्हती. पुष्कळांच्या जवळ तर फक्त हातघाईच्या लढाईत उपयोगी पडणारी शस्त्रे होती. क्रान्तिकारकांनी जी शस्त्रे ब्रिटिश शस्त्रागारातून हस्तगत केली होती ती त्यांच्या एकन्दर शस्त्रसंभाराच्या मानाने फारच थोडी होती. बाकीची शस्त्रे एतद्देशीय राजेरजवाडे जी पुरवू शकले तीच होती. कोणत्याही प्रगत देशाने प्रगत शस्त्रास्त्रे क्रान्तिकारकांना पुरविली नाहीत. झाशी व लखनौच्या तटावर ब्रिटिश तोफखान्याचा भडिमार कसा सुरू होता याची पुष्कळ वर्णने उपलब्ध आहेत. पण या भडिमाराला क्रान्तिकारकांच्या तोफांनी प्रत्युत्तर दिले असे दाखविणारी वर्णने मुद्दाम शोधावीच लागतील. याचे उघड कारण असे दिसते की ब्रिटिश तोफखाने, क्रान्तिकारकांच्या तोफांच्या पल्ल्याच्या पलीकडे होते. ब्रिटिश तोफांच्या मानाने आमच्या देशात बनविलेल्या तोफांचे पल्ले कमी पडत असे अनेक उल्लेख सापडतात.

दुसरे कारण असे की साऱ्या भारतभर चाललेल्या स्वातंत्र्ययुद्धाचे संचालन करणारा कोणी मध्यवर्ती अधिकारी नव्हता. युद्धाचा कमाल विस्तार पेशावरपासून म्हैसूर व कराचीपासून आसामपर्यन्त पोहोचला असला तरी मुख्य धुमश्चक्री दिल्ली आणि कानपूर व आसपासचा प्रदेश व बिहार येथे सुरू होती. या तीन क्षेत्रांतले युद्ध स्वतन्त्रपणे होत होते, एकमेकाशी विचारविनिमय करून अखलेल्या संयुक्त योजनेने होत नव्हते.

असे असले तरी कानपूर व बिहार येथील क्रान्तिकारक समर्थ नेतृत्वाखाली काम करीत होत. कानपुरात नानासाहेब पेशवे व त्यांचा सुप्रसिद्ध सेनापती तात्या टोपे युद्धसंचालनाचे काम करीत होते. बिहारमध्ये कुमारसिंग हा समरचतुर रजपूत क्रान्तीची धुरा वाहत होता. मार्क्स लिहितो : ''गंगेच्या वरच्या भागातील इंग्रजांची स्थिती चिन्ताजनक आहे. लखनौपासून बिहार मार्गे धावा घालणारे क्रान्तिकारक जनरल लॉरेन्सच्या माघारीच्या वाटा बन्द करीत आहेत. याच वेळी ग्वाल्हेरी फौजा काल्पीहून कानपूरवर झडप घालण्यास येत आहेत. हे एककेन्द्रीय सैन्यसंचालन बहुधा नानासाहेब करीत असावा. कारण लखनौमध्ये तोच सर्वोच्च सूत्रधार आहे. क्रान्तिकारक युद्धाच्या डावपेचात अनभिज्ञ नाहीत हे दाखविणारी जी थोडी उदाहरणे आहेत त्यातले हे एक आहे.''



कुमारसिंगाचे अपूर्व सैनापत्य सुप्रसिद्ध आहे. त्याने आपल्या गनिमी काव्याने इंग्रजांना जेरीस आणले होते. असे असले तरी कानपूर व बिहार येथील क्रान्तिकारकांना दिल्ली येथील क्रान्तिकारकांप्रमाणेच हार खावी लागली. भालातलवारींनी लढणारे सैनिक लाम्ब पल्ल्याच्या तोफा व बन्दुका वापरणाऱ्या सैनिकांपुढे किती काळ टिकाव धरू शकणार.

## पराभवाची आणखी कारणे

दिल्लीमध्ये सर्वोच्च सेनापती असा कोणी नव्हता. बहादूरशहा हा मुघल बादशाहीचा वारस म्हणून पुढारी मानण्यात आला होता. त्याला केवळ प्रतीकात्मक महत्त्व होते. तो स्वतः सैन्यसंचालन करीत नव्हता. दिल्लीचे युद्ध शिपायांनीच सामायिक रीतीने चालविले. या शिपायांना प्लॅटूनची कवायत, तोफांची रचना व बन्दुकांच्या फैरी झाडण्यासाठी भिंतींना भोके पाडणे वगैरे काही प्राथमिक गोष्टी अवगत होत्या. कम्पनी व बटालियनच्या स्तरावर सैन्यसंचालन कसे करावे हे देखील त्यांना कुठून माहीत असणार? कानपूर व बिहार येथील क्रान्तिकारकांप्रमाणे दिल्लीतल्या क्रान्तिकारकांना तोलाचे पुढारी देखील लाभले नव्हते. त्यामुळे त्यांच्यात सतत भाण्डणे होत. या भाण्डणात हिन्दू-मुसलमानांची भाण्डणे देखील अन्तर्भूत होतीच. आधीच शस्त्रास्त्रांच्या हीणकसपणामुळे क्रान्तिकारकांची बाजू लंगडी होती. त्यात आणखी या भाण्डणांची भर पडल्यावर इंग्रजांच्या प्रतिदिनी वाढणाऱ्या बळासमोर त्यांचा टिकाव कसा लागणार?

महत्त्वाची शहरे व तळ क्रान्तिकारकांच्या हातून गेल्यावर त्यांना पाठीवर बिऱ्हाड घेऊन गनिमी काव्याने लढण्याखेरीज गत्यन्तर उरले नाही. गनिमी काव्याच्या या धावत्या लढाईत पल्लेदार तोफांचा अभाव हे वैगुण्य क्रान्तिकारकरांच्या आड येण्यासारखे नव्हते. पण पल्लेदार हातबन्दूका धावत्या लढाईत देखील आवश्यक होत्याच. या बाबतीत असलेला दुबळेपणा क्रान्तिकारकांना भोवतच होता.

या दुबळेपणाची फिकीर न करता क्रान्तिकारकांनी एक वर्ष आपला प्रतिकार चालूच ठेवला होता. युद्धाच्या याच पर्वात तात्या टोपे ''एरियल'' म्हणजे गगनविहारी म्हणून प्रसिद्धीस आला. त्याने विद्युद् वेगाने हालचाली केल्या व ब्रिटिश फौजांना हैराण करून सोडले. जावरा, अलीपूर, राजगड, जसगड, चन्देरी व मंगरौली इत्यादी अनेक ठिकाणच्या लढाया त्याने जिंकल्या. ''औंधच्या दक्षिणेत जनरल होप ग्राण्ट क्रान्तिकारकांच्या शोधात आपल्या फौजा पुढेमागे हलवीत आहे. पण क्रान्तिकारकांचे

आघात सर्वत्र होत असून देखील तो जेथे त्यांच्यावर हल्ला करायला जातो तेथे मात्र त्याचा मागमूस दिसत नाही. तो आपल्या पुढे आहे असे समजून त्याने चाल करावी तो तो त्याच्या मागून आपलाच पाठलाग करीत असल्याचा अनुभव त्याला येतो." ब्रिटिश फौजा दिवसाला वीस मैलाच्या मजला मारू शकत, उलट तात्या टोपे पन्नास ते साठ मैलांच्या मजला मारी.

एवढे सर्व करूनही सैन्याला रसद पुरविणारा सुरक्षित तळ कुठेही नाही, सर्व सैनिकांजवळ अग्निशस्त्रे देखील नाहीत व जी आहेत ती इंग्रजांजवळ असलेल्या एन्फील्ड रायफलच्या तुलनेने फटाक्यासारखीच आहेत. या वैगुण्यामुळे क्रान्तिकारकांना आपल्या तात्कालिक गनिमी विजयाचे रूपान्तर अन्तिम विजयात करता आले नाही.

पराभवाचे तिसरे कारण कोणत्याही परकीय सत्तेने मदत केली नाही, हे होते. मदतीसाठी रशियाचा कानोसा घेण्यात आला होता. महमद अली हा नानासाहेबांचा हस्तक रशियन क्रीमियन युद्धाच्या रणक्षेत्राला भेट देऊन आला होता. त्याला काही रशियनांनी मदतीची आश्वासने दिली होती. हे रशियन कोण होते, त्यांची आश्वासने खरी मानण्याइतपत त्यांना दर्जा होता की नाही याबद्दल माहिती मिळत नाही. पण रशियाने काडीचीही मदत केली नाही हे अविचाल्य सत्य आहे. महमद अली हा वास्तुविद् होता. त्याने सिव्हँस्टोपूलच्या तटबन्द्यांचा अभ्यास केला असावा असे दिसते. कारण दिल्लीची तटबन्दी सिव्हँस्टोपूलच्या धर्तीवर उभारण्यात आली होती, असे मार्क्सने लिहिले आहे.

## सत्तावनची फलश्रुती

१८ एप्रिल १९५९ रोजीच्या तात्या टोपेच्या हौतात्म्याने दोन वर्षे चाललेल्या या अभूतपूर्व संग्रामावर शेवटचा पडदा पडला. हा अन्तिम विजय मिळविण्याच्या आधीच इंग्रजांनी साऱ्या देशाचा खाटीकखाना करूनसोडला होता. प्रत्येक विजयानन्तर तैमूरलंग व नादिरशहा यांना लाजविणाऱ्या कत्तली करण्यात आल्या. स्त्रिया व मुले देखील त्या नरराक्षसांच्या तावडीतून सुटली नाहीत. जिंकलेला प्रदेश लुटणे व त्याला आगी लावणे हा इंग्रजी प्रलय दोन वर्षे सुरू होता. मार्क्सने लिहिलेल्या वृत्तान्ताच्या आधारे सत्तावनच्या संग्रामाचे स्वरूप हे असे दिसते.

सत्तावनचा संग्राम फसला असला तरी त्याने अत्यन्त महत्त्वाच्या गोष्टी साध्य केल्या. भारतात आपल्या विरुद्ध केव्हाही स्फोट होऊ शकतो याचा प्रत्यय आल्यामुळे इंग्रजांनी येथे वसती करून राहण्याचा प्रयत्न सोडून दिला. ते केवळ नोकरी-व्यापारासाठी



येत व निवृत्त होऊन आपल्या देशी परत जात. इंग्रज येथे आफ्रिका व आस्ट्रेलिया या देशाप्रमाणे वसती करून राहिले असते तर भारत सोडून ते कधीच गेले नसते. कितीही चळवळ केली तरी आफ्रिका व आस्ट्रेलिया येथून ते जाण्याचे लक्षण नाही. सत्तावनच्या संग्राम झाला नसता तर आफ्रिका व आस्ट्रेलियाप्रमाणेच भारत ही एक कायमची ब्रिटिश वसाहत झाली असती.

मार्क्स व डिझरायली यांना सत्तावनचा संग्राम हा स्वातंत्र्याचा संग्राम होता याबद्दल मुळीच शंका नव्हती. असे असून आंग्लशिक्षितांना त्याबद्दल शंका आहे हे त्यांच्या हतप्रज्ञतेचे लक्षण आहे.

■ ■ ■

# प्रकरण तेरा | आंग्लाई हैदोस[१]

इंग्रज इतिहासकारांनी व त्यांची पोपटपंची करणाऱ्या भारतीय लेखकांनी मराठेशाहीबद्दल असे ग्रह पसरविले आहेत की भारतीय इतिहासात मराठे राज्य असे नव्हतेच. सतराव्या व अठराव्या शतकात अनेक उपटसुंभांनी धुताकूळ घातला, त्यातले सगळ्यात मोठे पुण्ड म्हणजे मराठे. त्यांचे राज्य असे नव्हतेच. हा धुमाकूळ शे दीडशे वर्षे चालल्यावर ब्रिटिशांनी या देशात राज्य स्थापन केले व शान्ततेचे नन्दनवन फुलविले. मराठेशाही ज्याला म्हणतात तो केवळ अन्दाधुन्दीचा काळ होता.

हा ग्रह कितपत साधार आहे व मराठेशाहीच्या तुलनेने आंग्लशाहीला राज्य हा शब्द कितपत अधिक यथार्थतेने लागू आहे, याचे येथे विवेचन करण्याचे योजले आहे.

"मराठेशाहीच्या जागी आंग्लशाही आल्यामुळे अंदाधुंदीच्या जागी सुराज्य आले काय?" असा सरळच प्रश्न सर जॉन माल्कम याला १८३२ साली ब्रिटिश लोकसभेने विचारला असता, त्याने जे उत्तर दिले ते या विषयी निर्णायक समजण्यास हरकत नाही. तो म्हणतो-



## दोन चित्रे

"पूर्वीच्या राजवटीच्या जागी आंग्लाई आल्यामुळे राज्यव्यवस्था सुधारली असे विधान निदान मराठ्यांच्या ताब्यात असलेल्या मुलखाबद्दल करता येत नाही. व्यापारी व शेतकरी या दोघांच्याही दृष्टीने मराठेशाही हीच सुव्यवस्था होती. १८०३ साली मी ड्यूक ऑफ वेलिंग्टन बरोबर महाराष्ट्रात प्रवास केला. या प्रांतापेक्षा अधिक चांगली शेतीची परिस्थिती दुसऱ्या देशात मी कुठेच पाहिली नाही. भूमीतून निघणारे सोने व व्यापार यांनी हा प्रदेश समृद्ध होता. कृष्णेच्या काठची समृद्धी अवर्णनीय होती. एवढ्या नापीक जमिनीतून एवढे पीक काढणे ही करामत कौतुक करण्यासारखी आहे. पेशव्यांची राजधानी जे पुणे शहर तेथील समृद्धी दीपविण्यासारखी होती. मराठ्यांच्या ताब्यात असलेला दुसरा मुलूख माळवा. हा प्रदेश ताब्यात घेतला तेव्हा सरकारी कागदपत्रे व प्रत्यक्ष अवलोकन यांच्या आधारे मला परिस्थितीचे ज्ञान करून घेण्याची संधी मिळाली. हे ज्ञान करून घेण्याच्या आधी व्यापार व अधिकोषण या सुधारलेल्या संस्था या देशात अगदी बाल्यावस्थेतच असतील अशी माझी दृढ कल्पना होती. पण हे ज्ञान झाल्यावर मला कळून चुकले की लाखो रुपयांचा व्यापार, धनाढ्य सावकार व अधिकोष, एवढेच नव्हे, तर विम्याचे व्यवहार देखील मोठ्या प्रमाणावर या प्रान्तात चालत. या व्यवहारात कधीही खण्ड पडला नाही. धामधुमीच्या काळी विम्याचे दर वाढत एवढेच.

ही भरभराट हिन्दूंच्या आपल्यापेक्षा सरस राज्यपद्धतीने व नागरिकांची समृद्धी वाढविण्याच्या नीतीने झालेली आहे. भाण्डवल पुरविणे, धनाढ्य वर्गाला धान्योत्पादनाच्या कामांत मदत करणे, ग्रामसंस्थांना उत्तेजन देणे व समाजातील सर्व वर्गाचे सहकार्य संपादणे अशा अनेकविध प्रकारांनी हिंदू राज्यकर्त्यांनी आपल्या मुलखात समृद्धी आणली आहे. मराठ्यांची राजवट पितृतुल्य आहे.

१८४३ साली जॉर्ज थॉमसन् नावाचा एक इंग्रज हिंदुस्थानात आला. त्याने इंग्रजी राजवटीबद्दल खालील उद्गार काढले आहेत-

"भारताची परिस्थिती काय वर्णावी? शेतमालक विनाशाच्या मार्गावर, मध्यमवर्ग दरिद्री वर्गात ढकलला गेलेला, मोठमोठी शहरे उजाड झालेली. भिकारी व दरवडेखोर दिवसें दिवस वाढत चाललेले, सुपीक शेते ओसाड होऊन जंगली श्वापदांच्या हवाली करण्यात आलेली आहेत. उद्योगधंदे नष्ट झालेले आहेत. भूमीतून जीवनाचा स्रोत वाहण्याऐवजी अन्नान्नदशा होऊन तडफडून मेलेल्या लोकांना पुरण्यासाठी मात्र तिचा

उपयोग होत आहे. उत्तर बंगाल प्रान्त, की जो जगाचे धान्यागार म्हणून समजला जातो, तेथे काही महिन्याच्या आतच पाच हजार लोक अन्न अन्न करीत मेले. प्रेतांची विल्हेवाट करण्यास कोणी नसल्यामुळे त्यांची दुर्गन्धी मैलोगणती पसरलेली असे. प्रेतांच्या ढिगामुळे नद्या बुजल्या, अन्नावाचून तडफडणाऱ्या मुलांच्या वेदना पाहवेनात म्हणून आयांनी आपण होऊनच आपली मुले नद्यांत फेकली. जिवन्त पण अन्नावाचून शक्तिहीन झालेल्या माणसांच्या शरीरास भिडून कोल्हे राहिल्यासाहिल्या मासाचे लचके तोडीत. या घटना अपवादभूत असत असे नाही. १८३५-३६ साली उत्तरेत दुष्काळ पडला, १८३३ साली पूर्वेस पडला, १८२२-२३ साली दक्षिणेत पडला. इंग्रजी राज्य झाल्यापासून हे दुष्काळ सतत वाढत आहेत. क्लाइव्हच्या अमलाखाली बंगाल्यात तीस लक्ष लोक दुष्काळात मेले. याचवेळी ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या पेढ्या धान्याने भरलेल्या होत्या. याचवेळी बंगाल्यातून इतके धान्य निर्यात झाले की जेवढे लोक मेले तितक्या सगळ्यांचे त्याने एक वर्ष पोट भरू शकले असते.''

मराठेशाहीला अराजक ठरविणाऱ्यांचा एक मुद्दा असा असतो की मराठ्यांनी इतर भारतीय सत्तांशी लढायाच केल्या नाहीत तर त्यांच्या मुलखात सतत लुटालूट केली. म्हणून मराठेशाहीला अराजक म्हणणे योग्य आहे. याबद्दल वस्तुस्थिती अशी आहे की मराठे इतर भारतीय सत्तांवर चौथ व सरदेशमुखी नावाची खण्डणी आकारीत व ती दिली गेली नाही म्हणजे तिच्या वसुलीसाठी पोलिसी कारवाई करीत. या कारवाईला मराठ्यांच्या हितशत्रूंनी लुटालूट असे नाव दिले आहे. बलाढ्य सत्तेने दुबळ्या सत्तेवर खण्डणी लादणे व तिच्या वसुलीसाठी बलप्रयोग करणे हा प्रकार जगाच्या इतिहासात सर्वत्रच घडलेला आहे. त्यासाठी मराठ्यांना दोष देण्याचे कारण नाही. मराठे ज्या सत्तांवर खण्डणी लादत त्यांच्या रक्षणाचा भार स्वीकारीत नसत असाही त्यांच्यावर एक आरोप आहे. तो बरोबर नाही. स्वराज्य, चौथ आणि सरदेशमुखांच्या मतानुसार मराठ्यांनी मुघल बादशहाच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारली होती. पानिपतचे युद्ध त्यासाठीच झाले होते.

## कर की लूट?

शत्रूच्या मुलखावर चौथ आणि सरदेशमुखी लादणाऱ्या मराठ्यांना लुटारू ठरविणारे इंग्रज स्वतःच्याच प्रजेवर जे कर लादीत त्यांना कर म्हणणे ही त्या शब्दाची क्रूर चेष्टा करण्यासारखे आहे. महाराष्ट्रावर ब्रिटिशांचे राज्य सुरू झाल्यावर त्यांनी जुन्या काळापासून



चालू असलेली करव्यवस्था मोडली व उत्पन्नाच्या पंचावन्न टक्के कर लादला. एवढा जबरदस्त कर लादल्यानेच बिचाऱ्या शेतकऱ्यांचे नष्टचर्य संपले नाही शेतकऱ्याला एक आणा उत्पन्न झाले तर चार आणे झाले, असे सरकारी अधिकाऱ्यांनी बेगुमानपणे ठरवावे व शेतकऱ्याला लुटावे. याचा परिणाम असा झाला की पुष्कळ शेतकरी ब्रिटिश मुलूख सोडून शेजारच्या ''सरंजामशाही'' देशी राजवटीत पळून गेले. पूर्वीच्या केवळ तृतीयांश जमीन लागवडीखाली राहिली.

जॉन थॉमसन् म्हणतो, ''शेतकऱ्याने स्वतःच्या श्रमाने पिकविलेले धान्य सरकार लुटून नेते. एखाद्या वर्षीही पीक झाले नाही तर गुजराण करण्यास मागचे साठवलेले पीक घरी नसते. ब्रिटिशांचा सारा म्हणजे लूट, अधिकाऱ्यांना फसवून शेतकरी जेवढे गाठीशी बांधू शकेल तेवढेच धन त्याच्याजवळ उरते. या लुटीस कंटाळून मलबारच्या शेतकऱ्यांनी सांगितले की ''आमच्या जमिनी तुम्हीच घ्या व आम्हाला फक्त जगण्यापुरता भात खाऊ घाला.''

''भरमसाट सारा उकळण्यासाठी शेजाऱ्यावर पाळत ठेवून त्याचे उत्पन्न किती आहे याची बातमी सरकारला कळविण्यास लोकांना उत्तेजन देण्यात येत असे. गावातील एकदोघांचा सारा कमी आला तर साऱ्या गावालाच त्याच्याबद्दल जास्तीचा सारा द्यावा लागत असे, सारा वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यांना कोणालाही दण्ड करण्याचा, तुरुंगात घालण्याचा व फटके मारण्याचा अधिकार असे.''

सागर आणि नर्मदा विभागाबद्दल क. मॅक्लसीन म्हणतो.

''हा परगणा ब्रिटिशांच्या जीवघेण्या करामुळे इतका ओसाड झाला आहे की कोठेही जीवनाचे चिन्ह दिसत नाही.''

असे वारेमाप शेतसारे म्हणजे लूट वसूलकरण्यासाठी शेतकऱ्यावर पेण्ढाऱ्याला लाजविणारे अत्याचार करण्यात येत. त्याला दिवसभर उन्हात उभे ठेवून मलमूत्र विसर्जनास जाण्याची बन्दी करण्यात येत असे, तेवढ्याने भागले नाही तर त्याच्या अंगाची घडी करून त्याला बांधून ठेवण्यात येत असे, त्याची बोटे एकमेकांना आटे देऊन बांधण्यात येत, दोन शेतकऱ्यांची डोकी एकमेकावर रक्तबंबाळ होईपर्यन्त आपटण्यात येत, त्यांच्या गळ्यांत हाडकांचे सापळे बांधून केस म्हशीच्या शेपटीला बांधण्यात येत, म्हणजे म्हैस ओढील तिकडे त्याला फरफटत जावे लागे.

अशा लुटीने शेतकरी इतका पिळून निघाला की सगळ्यात श्रीमन्त समजले जाणारे

जे मूठभर शेतकरी होते त्यांचे उत्पन्न महिन्यात चाळीस पन्नास रुपयाहून अधिक नव्हते.

इंग्रजांच्या लुटारू करामुळे वारंवार दुष्काळ पडू लागले, गुन्तुरमध्ये पडलेल्या अशाच एका दुष्काळात एक गाढव अन्नाच्या शोधात भटकत असता त्याला अन्न मिळणे तर दूरच, भुकेल्या अस्थिपंजर माणसांचा तांडा त्याच्या मागे लागला व हिंस्र लांडग्याप्रमाणे त्या गाढवाच्या हाडकावर नावाचाच थर करून राहिलेले मास त्याने चघळून चघळून खाल्ले.

ब्रिटिश राज्याच्या पहिल्या पन्नास वर्षांत सात दुष्काळ पडले. त्याने त्यात पंधरा लक्ष लोक मेले. पुढच्या पन्नास वर्षात २५ दुष्काळ पडले. त्यात दोन कोटी लोक मेले. ब्रिटिश राज्याच्या दुसऱ्या पन्नाशीत म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अठराव्या शतकाच्या उत्तरार्धाशी म्हणजे मराठेशाहीचे अस्तित्व असतानाच्या काळाशी, तुलना करता दुष्काळांचे स्वरूप चौपट अधिक उग्र, चौपट अधिक बहुवार व चौपट अधिक प्रदेशावर पसरलेले होते, खालील तालिकांमध्ये दुष्काळाची ही कथा थोडक्यात मांडलेली आहे.

| वर्ष | दुष्काळी मृत्यू |
|---|---|
| १८००-१८२५ | १०,००,०० |
| १८२५-१८५० | ४०,००,०० |
| १८५०-१८७५ | ५०,००,०० |
| १८७५-१९०० | १५००,००० |

एकूण ब्रिटिशांच्या शंभर वर्षांच्या कारकीर्दीत दुष्काळांचे शतमान पंधरापट वाढले. १८५७ नन्तर इंग्रजांना आव्हान देऊ शकणारी दुसरी कोणतीच सत्ता देशात न उरल्यामुळे भारताच्या भूमीवर युद्धे झाली नाहीत, युद्धामुळे होणारा प्रत्यक्ष विध्वंस व अप्रत्यक्षपणे होणारे आर्थिक नुकसान ही कारणे नसताही व आगगाड्यांसारखी साधने हाताशी असताही इतके दुष्काळ पडले यावरून ब्रिटिश सत्तेचे लुटारू स्वरूप स्पष्ट होते.

## पोलिसी कहर

देशी 'सरंजामशाही' राजवटीच्या जागी इंग्रजांची 'पुरोगामी' राजवट सुरू झाल्यावर सगळीकडे चोऱ्या व दरोडे वाढू लागले. केव्हा खून होईल याचा नेम नसे. लोकांना शान्ततेने झोप येईनाशी झाली. एखाद्याची भिंत फोडून चोराने त्याची माया लांबविली तर तो पोलिसाकडे कधीच तक्रार करीत नसे. कारण चोरापेक्षा पोलिसांचीच त्याला अधिक



भीती वाटे, आपल्या भिंतीचे भोक तो गुप्तपणे बुजवून टाकण्याचा प्रयत्न करी. एखाद्याच्या नजरेस ते पडलेच तर चोरी झाली हे त्याने पोलिसात कळवू नये म्हणून तो त्याला लाच देई! कारण काय? तर चोराचा तपास करणे तर दूरच "ज्याअर्थी चोराचे लक्ष तुझ्या घरावर गेले त्याअर्थी तुझ्याजवळ पुष्कळ पैसा असला पाहिजे" म्हणून पोलिसच त्याला लुबाडत.

तत्कालीन "चन्द्रिका" नावाच्या बंगाली पत्रात लिहिले आहे की, "नवा दरोगा आला म्हणजे गावातल्या साऱ्या मण्डळीकडून तो आपल्या 'राज्यारोहणा' निमित्त सक्तीचे नजराणे घेतो. गावात नवीन दरोगा आला म्हणजे काळच आला असे समजून लोक भयभीत होतात."

कोठेही चोरी वा अन्य गुन्हा घडल्याची बातमी कळली की पोलिस अधिकारी आपल्या लवाजम्यानिशी तेथे हजर होत व गावच्या लोकाकडून आपली सरबराई करून घेत, मग गावातल्या बऱ्यापैकी लोकांच्या घरी जाऊन या चोरीत तुमचे अंग आहे असा धाक दाखवून यथेच्छ पैसा उकळीत. ज्याच्यापासून असे पैसे मिळाले नाहीत तोच चोर म्हणून त्याच्यावर खटले भरीत, कुठेही गुन्हा झाला की पोलिसांना आपले उखळ पांढरे करण्याची ती संधीच वाटे.

एका आठवड्याच्या आत गुन्हेगार पकडला नाही तर नोकरी वरून बडतर्फ करण्यात येईल अशी पोलिस अधिकाऱ्यांना ताकीद असे. आठवड्याच्या आत गुन्हेगार सापडणे सहसा शक्य नसल्यामुळे पोलिस कुणालाही पकडीत व मारहाण करून गुन्हा कबूल करायला लावीत. आणखी लोकांना मारहाण करून त्यांना खोट्या साक्षी देण्यास भाग पाडावे व एखाद्या खुनाबद्दल कोणाला तरी फाशी टांगावे. पोलिसांना या कामात मदत करणारे काही दादा प्रत्येक खेड्यात असत. निरपराध लोकांना पोलिसांचे भय दाखवून आपली तुंबडी भरणे हा त्यांचा धंदा. एखादा प्रामाणिक पोलिस अधिकारी या दादांचे कपट ओळखून त्यांच्या विरुद्ध कारवाई करतो म्हणेल तर वरिष्ठांची त्याच्यावर लगेच गैरमर्जी व्हायची.

अशा पोलिस कारभारांची अनेक उदाहरणे कागदोपत्री नमूद आहेत. पोलिसांच्या अत्याचारांना भिऊन दोन निरपराध गरिबांनी आपण खून केला असल्याची खोटी कबुली दिली. पुढे ज्यावेळी खून झाला त्यावेळी ते एका तुरुंगात होते असा पुरावा पुढे आल्यामुळे ते फासापासून वाचले, पण खोटे खटले भरल्याबद्दल पोलिसावर काही कारवाई केली गेल्याचे ऐकिवात नाही. नशीब बलवत्तर म्हणून जे वाचले त्यांची नावे उपलब्ध आहेत,

पण नाहक फासावर लटकलेले किती अभागी ब्रिटिश "शान्ततेच्या" भक्ष्यस्थानी पडले याची काही गणती नाही.

ब्रिटिशांनी ठग व पेंढारी यांचा बंदोबस्त केला असे सर्वत्र शिकविले जाते. पण ठग व पेंढारी हे ब्रिटिश राज्यातच निर्माण झाले. मराठेशाहीत ते नव्हते याकडे कोणी लक्ष देत नाही. पेंढारी हे ब्रिटिश राज्यात निर्माण झाले एवढेच नव्हे तर ब्रिटिशांच्या नीतीमुळे निर्माण झाले. एतद्देशीय राजांची सैन्ये भराभर बरखास्त करून त्या सैनिकांच्या उपजीविकेची काहीही व्यवस्था न केल्यामुळे ते पेंढारी बनले. पेण्ढारी ब्रिटिश मुलखातच मुख्यत लुटालूट करीत ही गोष्ट महत्त्वाची आहे.

## ब्रिटिश न्याय

ब्रिटिशांनी या देशात उत्कृष्ट न्यायदानाची पद्धति सुरू केली असे नेहमी सांगण्यात येते. स्मृतीच्या कायद्यात ब्राह्मणात प्राणदण्ड देऊ नयें असे म्हटले आहे. म्हणून भारतातला कायदा पक्षपाती होता. ब्रिटिशांनीच प्रथम सर्व नागरिकांना समानतेने वागविणारा कायदा प्रस्थापित केला म्हणून त्यांचे पोवाडे गाण्यात येतात. वस्तुतः भारताच्या इतिहासात स्मृतीचा कायदा रूढ असताना ब्राह्मणाला देहान्त प्रायश्चित्त दिल्याची अनेक उदाहरणे आहेत. मृच्छकटिकात ब्राह्मण चारुदत्ताला देहान्ताचा दण्ड सुनावल्याचा प्रसंग आहे. ब्राह्मणाला प्राणदण्ड देण्याची चाल असल्याशिवाय शूद्रकासारखा नाटककार असा प्रसंग घालण्याची घोडचूक करणार नाही, संभाजीने अण्णाजी दत्तो या ब्राह्मणाला देहान्ताचा दण्ड दिला. रामशास्त्री या धर्मशास्त्रपारंगत न्यायाधीशाने रघुनाथराव ब्राह्मण असूनही त्याला देहान्त शासन फर्माविले हे प्रसिद्ध आहे.

ब्रिटिश राज्यात मात्र गोऱ्या माणसावर काळ्या न्यायाधीशासमोर खटला चालू नये असा कायदाच होता. बरे गोऱ्या न्यायाधीशासमोर गाऱ्हाणे नेऊन तरी काही उपयोग होता काय? मेकॉलेसारख्या इंग्रजी अमलाच्या पुरस्कर्त्यांनीच असे लिहून ठेवले आहे की न्यायालयात जाणे म्हणजे सर्वस्वाचे दिवाळे वाजविणेच होते. त्यापेक्षा दरवडेखोराने लुटलेले परवडते. न्यायालयातले अधिकारी चार-दोन वर्षातच फिर्यादींना लुटून इतके गबर होत की इतरांना तीस वर्षे मोठ्या पदावर नोकरी करूनही तेवढी माया कधी गोळा करता येत नसे.

याचा परिणाम असा झाला की एखाद्या इंग्रजाने खुशाल कर्ज म्हणून एखाद्या काळ्या



माणसाचे धन घ्यावे व कधीच परत करू नये. मन मानेल तेव्हा त्याला बडवून काढावे, त्याचे पीक कापून घ्यावे. त्याची भरपाई मिळणे तर दूरच, न्यायालयात गेल्याने उरलेली मायाही लुबाडली जाईल या भीतीने त्याने मुळुमुळु रडत स्वस्थ बसावे.

न्यायदानाच्या बाबतीतच गोरे काळे असा भेद होता असे नाही. गरिबातल्या गरीब काळ्याला कर द्यावे लागत. भाजी विकणारी म्हातारी फेरीवाली देखील ब्रिटिशांच्या लोभी नजरेतून सुटत नसे. तिला जबर कर द्यावा लागे. पण लक्षावधी रुपयांचा व्यापार करणाऱ्या गोऱ्यांना मात्र कोणताही कर द्यावा लागत नसे.

न्यायालयात साक्षीदारांच्या साक्षी लिहून घेणारा मोहरीर हा ब्रिटिश न्यायपद्धतीचा एक प्रसव मोठा वर्णनीय आहे. साक्षीदाराने काय सांगितले यावर त्याने काय लिहिले हे अवलंबून नसे. साक्षीदाराने पुरेसे पैसे दिले नसले तर त्याने 'नाही' सांगितले तरी याने 'हो' लिहावे, मध्येच आपल्या आसनावरून उठून पक्षकाराशी लाचेच्या रकमेबद्दल वाटाघाट करावी व हे सर्व सुरू असताना न्यायाधीश महाराजांनी समोरच्या खटल्याकडे लक्ष द्यायचे सोडून दुसऱ्याच कामात मग्न असावे.

## ब्रिटिश राज्यातील गुलामगिरी

इंग्रजांनी गुलागगिरी नष्ट केली म्हणून त्याचे स्तुतिपाठ गाणाऱ्यांनी बंगालमधील नीळ मजुरांच्या छळाचे वृत्तान्त वाचावे. हे मळेवाले गरीब शेतकऱ्यांना काही रक्कम कर्जाऊ देत. त्यांना न समजणाऱ्या इंग्रजी भाषेत खोटेनाटे कर्जरोखे त्यांच्याकडून लिहून घेत. एकदा दिलेल्या चारदोन रुपड्यांच्या कर्जाच्या निमित्ताने हे मजूर पिढ्यान् पिढ्या या मळेवाल्यांचे गुलाम होत. त्यांनी आपल्या शेतात नीळच पेरली पाहिजे व ती आपल्याला फुकट दिली पाहिजे अशी हे मळेवाले सक्ती करीत. नीळ पेरणे शेतकऱ्यांना फाशदेशीर नसे. कारण निळेचा सर्व व्यापार गोऱ्यांच्या हातात होता. निळेसारखे नुकसानीचे पीक पेरून शेतकरी बरबाद होत. त्याचे उरलेसुरलेले चार पैसे लुटण्यासारखी मळेवाले भाडोत्री लठियाल बाळगीत. हे लठियाल गोऱ्या मालकाचा हुकूम झाला की त्या गरिबांना लाठीने झोडपून काढीत. गरिबांचे केवळ धन लुटूनच त्या गोऱ्यांचे समाधान होत नसे. त्यांच्या बायका देखील स्वतःच्याच भोगदासी समजून ते त्यांच्यावर अत्याचार करीत. ब्रिटिश न्यायखात्यात गोऱ्याविरुद्ध काळ्यांना न्याय मिळणे अशक्य. एखाद्या तक्रारीची चौकशी करायला आलेले न्यायपाल देखील या गोऱ्यांच्याच घरी उतरत व त्यांचा पाहुणचार घेत

चौकशी करीत. अशा चौकशीचा निकाल काय होणार हे सांगण्याची काय जरूर? गरीब बिचाऱ्या काळ्या मजुराला खोटी तक्रार केल्याबद्दल दण्ड दिला जाई. नीळ मालकाच्या या धुडगुसाबद्दल बंगालीमध्ये "नील दर्पण" नावाचे एक नाटक आहे. मळेवाल्यांच्या अत्याचारावर बंगालमध्ये अनेक गाणी प्रचलित असत. त्यापैकी एका गाण्याचा सारांश असा-

"नीळवाले टोळधाडीसाराखे साऱ्या बंगाल प्रान्तात धुडगूस घालीत आहेत. रात्री डोळे मिटून झोपणेही शक्य राहिले नाही, मिटल्या डोळ्यांनाही गोऱ्या राक्षसांचा भयानक चेहरा दिसतो. झोप कशी येणार?"

मराठी राज्यकर्त्यांनी चौथ व सरदेशमुखीच्या वसुलीसाठी स्वतःचे प्रजाजन नसलेल्या बंगालमध्ये जी कारवाई केली त्यासंबंधीच्या "महाराष्ट्र पुराणाला" अवास्तव प्रसिद्धी देऊन "मराठे लुटारू" म्हणून सतत उद्घोष करणाऱ्या लेखकांनी इंग्रजी "राज्यकर्ते" स्वतःच्याच प्रजेवर हा जो गहजब करीत त्यासंबंधी बंगाली वाङ्मयात असलेला हा पुरावा डोळ्याखालून घालावा व त्याला प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न करावा.

या नीळ मजुरापेक्षाही एका दृष्टीने चहाच्या मळ्यात काम करणाऱ्या मजुरांची अवस्था जास्त शोचनीय होती. चहाचे मळे गोऱ्यांच्या मालकीचे असत. या मळ्यावर कवडी किमतीत काम करावयाला त्यांना मजूर हवे असत, त्यांना पाहिजे त्या अटीवर काम करायला कोणताच हाडामासाचा माणूस तयार होणे शक्य नव्हते. त्यामुळे बऱ्या बोलाने नाही तर जबरदस्तीने मजूर पकडून आणण्यासाठी हे मळेवाले देशभर टोळ्या पाठवीत. हे टोळीवाले एकट दुकट फिरणाऱ्या मुला-मुलींना प्रलोभने दाखवून फूस लावून नेत. असे अनेक तरुण लोक एका ठिकाणी जमवून त्यांना गुराढोराप्रमाणे हाकीत नेत. मळ्यावर त्यांच्याकडून खोटेनाटे करार लिहून घेत, असे करार एकदा केले की ते बिचारे कायमचे गुलाम होत. जेमतेम जिवन्त राहण्याइतके अन्न व आसरा यासाठी त्यांना जन्मभर राबावे लागे. थोडी कामात ढिलाई झाली की वेताने झोडपण्यात येई. याला स्त्रियाही अपवाद नव्हत्या. अशाच एका अभागिनीचे मूत्रपिण्ड वेताच्या माराने जाया होऊन ती मरण पावली. पण गोऱ्या न्यायाधीशाने चार दोन रुपये दण्ड करून आपल्या जातभाईला सोडून दिले. थोड्या बऱ्यापैकी दिसणाऱ्या व ऐन तारुण्यातल्या स्त्रिया असल्या तर त्यांना मजुरीव्यतिरिक्त साहेबाची वासना तृप्त करण्याचे कामही मुकाट्याने करावे लागे. नाहीतर वेताने कातडी पिंजली गेलीच म्हणून समजा. वेताच्या माराने भागले नाही तर जिथे सूर्याचे



दर्शनही होऊ शकत नाही व बाहेरचा खुला वारा शिरू शकत नाही अशा तळघरात कोंडण्याचा प्रयोग होई. चहाच्या मळ्यावर काम करणाऱ्या तरुण मजुरात १८८३ साली हजारातून ४१ व १८८४ साली हजारातून ४३ मजूर मेले. जिवन्त राहिलेल्या अनेकांना घरची आप्तेष्टांची आठवण व भोवतालच्या नरकयातना यामुळे वेड लागले.

मळ्यावर राबणारे मजूर शहरी वसतीपासून दूर असत व त्यांच्यावर झालेल्या अत्याचारांना वाचा फोडणे कठीण असे. म्हणूनच केवळ त्यांची परिस्थिती अशी होऊ शकली असे समजण्याचे कारण नाही. भर वसतीत साहेबाच्या घरी काम करणाऱ्या एतद्देशीय नोकरांना देखील गुलामापेक्षा चांगली वागणूक मिळत नसे. त्यांना फटके मारण्यासाठी मारघरे असत. या मारघरात साहेबाची चिठ्ठी त्या नोकरालाच न्यावी लागे. ही चिठ्ठी मिळाल्यावर एका फटक्यास दोन आणे या दराने त्या मारघरातले भाडोत्री त्या नोकराला साहेबाच्या चिठ्ठीबरहुकूम फटके मारीत. काही बिचारे हा मार सहन न होऊन खांबाला बांधलेल्या स्थितीतच मरण पावत. साहेबाच्या माराने मेलेल्या नातेवाईकांनी न्यायाधीशाकडे तक्रार नेली तर बहुधा एक ठरावीक मन्त्र उच्चारला जाई "अहो आम्ही काही त्यास मारले नाही, नुसते प्रेमाने कुरवाळले. उगीच कोठे एखादी चापटी मारली असेल पण त्याची उदरग्रन्थी सुजली असल्यामुळे तो तेवढ्यानेच मेला" न्यायाधीश आपल्या जातभाईची ही कैफियत मंजूर करून त्याला दोषमुक्त करीत. माडाच्या झाडावर चढलेल्या काळ्या माणसाला गोळी घालावी व मला वाटले ते माकडच होते म्हणून ब्रिटिश न्यायदेवतेकडून निर्दोषतेचा शिक्का मारून घ्यावा, असेही प्रकार घडत.

या प्रकारापैकी माझ्याच कॉलेजात घडलेला एक प्रकार सांगण्यासारखा आहे. कॉलेजच्या एका गोऱ्या प्रमुखाने एका गरीब भंग्याला गोळी घातली. कारण काय? तर त्याने हुजूरची प्रार्थना करण्यासाठी त्यांचे पाय धरले तेव्हा आपले पाय धरून हा आपल्याला खाली पाडणार असे हुजूरला वाटले. म्हणून त्यांनी "आत्मरक्षणार्थ" त्या निःशस्त्र दीनाला गोळी घातली. या धडधडीत खुनाबद्दल हुजूरला दण्ड काय झाला म्हणाल तर त्यांचा हुद्दा, पगार नव्हे, तात्पुरता कमी करण्यात आला-

## सवाई तैमूरलंग

नादिरशहा, तैमूरलंग वगैरेंनी भयंकर कत्तली केल्या, याची वर्णने आपण इतिहासात वाचतो. इंग्रज सुधारलेले होते, ते अशा कत्तली करीत नसत अशी अनेक भाबड्या

सुशिक्षितांची समजूत आहे. मराठीच्या एका नाणावलेल्या प्राध्यापकाने नादिरशहा व तैमूरलंग व फ्रेंच यांच्याऐवजी भारताला इंग्रज राज्यकर्ते लाभले हे भारताचे मोठे भाग्य होते असे म्हटले आहे! वस्तुस्थिती अशी आहे की इंग्रज हे नादिरशहा व तैमूर यांच्यापेक्षा शतपटीने अधिक क्रूर होते. लढाईत जय मिळाल्यावर ते आपल्या फौजेला लुटीची ''परवानगी'' देत असत असे दाखले उपलब्ध आहेत. शीखयुद्धाच्या वेळच्या अशा ''परवानगी'' बद्दल कागदपत्रातच उल्लेख आहे. पण तैमूर व नादिर यांच्या तुलनेने ब्रिटिश लुटीचे एक स्वरूप अधिक भयंकर आहे. ते म्हणजे तैमूर व नादीर यांनी स्वतःच्या प्रजाजनांच्या लुटी केल्या नाहीत. ज्या प्रदेशावर ते राज्य करीत नव्हते अशा प्रदेशात राजरोस युद्ध करताना त्यांनी लुटी व कत्तली केल्या. पण इंग्रजांनी १८५७ साली ज्या कत्तली केल्या त्या सत्तावनच्या स्वातंत्र्य युद्धाशी ज्यांचा काहीएक संबंध नव्हता अशा स्वतःच्याच प्रजेतील बिनलढाऊ नागरिकांच्या कत्तली केल्या. विष्णुभट गोडसे या भिक्षुकाने व इतरांनी देखील या कत्तलींचा ''आंखो देखा हाल'' लिहून ठेवला आहे त्यातले हे मासले पहा-

झाशी पडल्यावर गोरे लोक बीजन म्हणजे कत्तल करीत चालले, साऱ्या शहराला आग लावली. आगीतून जे बाहेर पडले त्यांना गोळ्या घालीत. घराघरात शिरून म्हातारा असो, स्त्री असो, बाल असो, तत्काल संगिनीचे वा गोळीचे भक्ष्य झालेच म्हणून समजा. नवऱ्याला वाचविण्यासाठी बायको त्याच्या देहाला विळखा घालून बसली की एकाच गोळीने दोघांचाही मुडदा पाडीत. घरात जे काही नेण्यासारखे असेल ते धुऊन नेत. विष्णुभट हा भिक्षूक, त्याच्याजवळ असे किती धन असणार? पण त्याच्या पुरचुंडीतले देखील रुपये हिसकून घेतले. लोक घर सोडून गवताच्या गंजीत जाऊन लपत. हे जाणून गोरे शिपाई सरळ गवताच्या गंजांना आग लावून देत व आतून मरणाऱ्यांच्या किंकाळ्या ऐकू आल्या की आनन्दातिशयाने वेडे होत.

ही बीजन तीन दिवस चालली. झाशी शहरात जे काही नेण्यासारखे होते ते धुऊन नेले. झाशीचे नामांकित पुस्तकालय देखील त्या नरपशूंच्या तावडीतून सुटले नाही. सारी पुस्तके फाडून रस्तोरस्ती भिरकावून दिली. देवळांचे गाभारे, विहिरी वगैरे प्रेतांनी खचून भरली व साऱ्या झाशीत दुर्गन्धी येऊ लागली.

बीजनाच्या चौथ्या दिवशी मद्रासी शिपाई आले ते सांगू लागले की तीन दिवस गोऱ्या शिपायांच्या लुटीसाठी होते. त्यांनी सोने वगैरे नेले. आता तीन चार दिवस आम्हा



काळ्या लोकास लूट करण्यासाठी मेहरबान इंग्रजाने दिले आहेत. आम्ही उरलेले पितळ ताम्बे नेणार पुढे हैद्राबादवाले शिपाई येऊन त्यांनी वस्त्रांची लूट आरंभिली. थोडे चांगले वस्त्र दिसले की सावडावे. हा वस्त्रांचा भारा नेण्यासाठी हत्ती आणले होते. त्यावर सावकाश ही लूट लादीत. घराघरातले धान्य लुटून नेले. विहिरीवरील रहाटाचे दोर देखील उरले नाहीत.

कत्तल संपल्यावर लोकांनी दारे खिडक्या वगैरे मोडून चिता तयार केली व तीवर खण्डोगणती पडलेली प्रेते रचून त्या ढिगाला आग लावून दिली, भिंताडे पडलेली, दारे खिडक्या जाऊन तेथे नुसती भयाण भोके झालेली, चहूकडे आगीचे डोम्ब उसळून एखाद्या अवाढव्य स्मशानसारखी वाटणारी ती झाशी ही इंग्रजाच्या दरोडेखोरी नृशंसतेची इतिहासातील एक नेत्रदीपक पताकाच होती.

झाशीच्या लुटीच्या बाबतीत झाशीची राणी इंग्रजांशी युद्ध करीत होती हे तरी कारण सांगण्यासारखे होते. पण चित्रकूटचे नारायणराव पेशवे हे इंग्रजांच्या विरुद्ध कोणत्याही प्रकारचा द्रोह न करता स्वस्थ बसले होते. असे असून त्यांच्या चित्रकूटच्या वाड्यावर इंग्रजांनी धाड घातली. सारा वाडा धुऊन नेला. पेशवांच्या बायकोच्या अंगावरचे दागिने ओरबाडून काढले. देवघरातले देवदेखील उचलून नेले- ते सोन्याचे होते की काय देव जाणे. नारायणराव पेशवे स्वातंत्र्ययुद्धात सामील झाले नाहीत म्हणून इंग्रजांची वक्रदृष्टी त्यांच्यावर वळणार नाही या आशेने आसपासच्या मोठमोठ्या सावकारांनी आपले कोटयावधी रुपये सुरक्षित राहतील म्हणून त्यांच्या स्वाधीन केले होते. सावकारांबरोबरच पोहे कुटणाऱ्या अनेक विधवा स्त्रियांनी सर्व जन्मभर कष्ट करून मिळविलेले शेदोनशे रुपये पुरचुंडीत बांधून निर्भय पहारेबन्दीचा वाडा समजून ठेवले होते. त्या बिचाऱ्यांना काय माहीत की भारताच्या इतिहासात पूर्वी कधीही दिसले नाहीत असे भयंकर लूटारू चित्रकुटावर धाड घालणार आहेत. त्यांचे सर्व धन लुटले गेले. पेशव्यांचे मोठमोठे वाडे जमीनदोस्त करण्यात आले.

ब्रह्मवर्त क्षेत्रात इंग्रजांनी अशीच कडक बीजन केली. काही लोक कमरेस अर्थ बान्धून रस्त्याने ध्रुवघाटाकडे पळून जाऊ लागले. त्यास गोरे भेटले म्हणजे त्यांनी लुटावे. गोऱ्यांनी श्रीमन्तांचा अनेक वर्षांच्या संपत्तीने भरलेला वाडा लुटून त्यास अग्नी लावून दिला. शहराचे तट व दरवाजे पाडून टाकले. राम मन्दिर सुरेख होते, ते पाडून मूर्तीसुद्धा ठेवल्या नाहीत. बागांच्या भिंती पाडून उद्ध्वस्त करून टाकल्या. श्रीमन्त बाजीरावसाहेबांनी

सरस्वतेश्वर सांबाचे देवालय लाखो रुपये खर्च करून संगमरवरी दगडाचे गंगातीरी बान्धले होते. ते देऊळ पाडून शिवलिंग काढून संगमरवरी दगड खणून नेले. तेथे देवळाचा मागमूस देखील ठेवला नाही.

इंग्रजी शिक्षितांनी इंग्रजी राज्याला जे अनेक काल्पनिक सद्गुण चिकटविले आहेत त्यात इंग्रज लोक देवळे पाडीत नसत हा एक आहे. जदुनाथ सरकारसारख्या इंग्रज भक्ताने मराठ्यांनी मोगलाप्रमाणे वैभवशाली इमारती बांधल्या नाहीत असे एक मराठेशाहीला दूषण दिले आहे. मोगलाप्रमाणे जिवन्त प्रजेस लुटून मेलेल्या राणीसाठी संगमरवरी कबर बांधण्यात मराठ्यांनी राष्ट्रीय धनाचा व्यय केला नाही हे खरेच आहे. पण स्वतः राहण्यासाठी राजवाडे व देवळे त्यांनी नक्कीच बांधली. त्यातली इंग्रज लुटारूंच्या भक्ष्यस्थानी किती पडली याची नोंद उपलब्ध नाही. पण विष्णुभटाने लिहिल्यासारखे वृत्तांत अनेक भारतीयांनी लिहिले असते, तर मराठ्यांच्या याविषयीच्या कार्याचे स्वरूप अधिक स्पष्ट झाले असते.

▮ ▮ ▮





# प्रकरण चौदा | ब्रिटिश लष्करी ताबा व भारतीय राष्ट्रीयत्व

भारतीय राष्ट्रीयत्वाविषयी एक असा सिद्धान्त मांडण्यात येतो की ब्रिटिशांनी साऱ्या भारतावर लष्करी ताबा स्थापित करण्यापूर्वी भारत हा अनेक जाती व संस्कृती यांनी गजबजलेला एक खंड होता. त्यात कोणतीही एकात्मता नव्हती. ब्रिटिशांच्या पूर्वी या खंडप्राय भूभागावर एकछत्री अमल कधीच स्थापला गेला नाही. ब्रिटिशांनीच या देशाला एका छत्राखाली आणले व यामुळेच भारतात राष्ट्रीयत्वाची भावना उदित झाली. इंग्रजी राज्यापूर्वी भारतात निरनिराळ्या प्रान्तात निरनिराळी राज्ये होती. या राज्यांच्या आपापसात लढाया होत. इंग्रजांशी हातमिळवणी करून मराठ्यांनी टिपूशी युद्ध केले. टिपू मुसलमान म्हणून त्यांना परका वाटला म्हणावे तर हिंदू राजपुतांनी अहमदशहा अब्दाली, मोंगल वगैरे परकीय मुसलमानांशी युती करून मराठ्यांशी युद्ध केले. बरे मराठ्यांचे तरी आपसात उजू होते म्हणावे तर तसेही नाही. रघुनाथरावाने इंग्रजांच्या मदतीने बारभाईशी युद्ध केले.

भारतीय विद्याभवनाने प्रकाशिलेल्या भारताच्या इतिहासाचे संपादक मजुमदार यांनी ब्रिटिशपूर्व भारतात राष्ट्रभावना नव्हती हे सिद्ध करण्यासाठी, इंग्रजांनी भारत जिंकण्यासाठी आपल्या देशातून शिपाई आणले नाहीत, भारतीय शिपायांनीच इंग्रजांसाठी भारत जिंकला हे तथ्य प्रमाण म्हणून पुढे केले आहे.

स्वराज्यापूर्वी वरीलसारखी मते ब्रिटिश लेखकांनी मांडली, पण ती त्यावेळी कुणाला फारशी मान्य होत नसत. स्वराज्यानंतर मात्र या मतांना बरीच प्रतिष्ठा येऊ लागली. हे मत एक पुरोगामीपणाचे लक्षण समजण्यात येऊ लागले. आजकाल राष्ट्रीय एकात्मतेच्या नावाने बराच टाहो फोडण्यात येत आहे. त्यामुळे या मताचे कसोशीने परीक्षण करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे.

## फुग्याचा स्फोट

या मतांचा भोंगळपणा उघड होण्यास त्यामागची विचारसरणी सुसंगतपणे पुढे चालवावी म्हणजे ब्रिटिशपूर्व भारतातच केवळ नव्हे तर ब्रिटिशोत्तर भारतात देखील राष्ट्रीयत्वाची भावना अस्तित्वात नव्हती असा वरील विचारसरणीच्या अंगलट येणारा निष्कर्ष निघतो. ब्रिटिश काळात निरनिराळ्या प्रान्तात निरनिराळी सार्वभौम राज्ये नसल्यामुळे त्यांच्यात लढाया होणे शक्य राहिले नाही. पण यावरून निरनिराळ्या प्रान्तात ऐक्यभावना स्थापित झाली होती असे सिद्ध होत नाही. प्रान्त पुनर्रचनेच्या वेळी आसाम्यांची बंगाल्यांवर केलेले हल्ले, मुंबईत दक्षिण भारतीयांबद्दल असणारी कटुता, शिखांची शिखिस्तानची व द्राविड मुन्नेत्र कडगमची द्राविडिस्तानची घोषणा, आम्हाला इंग्रजी व हिंदी या दोन्ही सारख्याच परकीय आहेत असे पदोपदी ऐकू येणारे ''सुभाषित'' यावरून आज निरनिराळ्या प्रान्तात युद्धे होत नाहीत याचे कारण केवळ युद्धास आवश्यक असणारी सैन्ये प्रान्ताजवळ नाहीत हे आहे, परस्पर सलोखा हे नव्हे याबद्दल शंका वाटायला नको. सैन्ये नसताना देखील नागालँण्ड पोलिसांच्या आसामी पोलिसांशी चकमकी होतात. तेव्हा आज भारतातल्या प्रान्तामध्ये ब्रिटिशपूर्व भारतापेक्षा अधिक सलोख्याची भावना आहे असे समजण्यास काही आधार नाही.

एतद्देशीयांची सैन्ये उभारून इंग्रजांनी आम्हाला जिंकले या वरून ब्रिटिशपूर्व भारतात राष्ट्रीयत्वाची भावना अस्तित्वात नव्हती हा मजुमदारांचा युक्तिवाद त्यांच्यावरच उलटतो. ज्या ब्रिटिश भारतात राष्ट्रीयत्वाची भावना उदित झाली असा दावा ते सांगण्यात त्यात



स्वराज्याची चळवळ करणाऱ्या स्वयंसेवकावर लाठीहल्ले करणारे शिपाई गोरे होते काय? स्वराज्याच्या चळवळीत किती काळ्या सरकारी नोकरांनी ''स्वतःच्या बांधवांविरुद्ध लढणार नाही,'' असे परकीय सरकारला बजावले? परकीय सरकारची ताबेदारी सोडून स्वराज्यासाठी लढणाऱ्या बांधवांच्या खांद्याला खांदा भिडवून लढणे तर दूरच, सुभाष बोसांच्या आझाद हिंद सैन्यात शिरणारे सैनिक ''निमकहराम'' होते; ''फॅशिस्ट'' होते; देशभक्त नव्हते, असे म्हणणारे अनेक भारतीय ''निमकहलाल'' व ''पुरोगामी'' सापडतील. तेव्हा स्वदेश जिंकण्यासाठी परकीयांची चाकरी करण्याबद्दल ब्रिटिशपूर्व भारतीयांना, ब्रिअिशकालातील भारतीयांनी राष्ट्रीयताशून्य ठरविणे नकटीने फेंगडीला हसण्यासारखे आहे.

ब्रिटिश अमलात देशाभिमानी वाङ्मयाला पूर आला होता. मध्ययुगीन वाङ्मयात भक्तीचे प्राधान्य जितके अविवाद्य आहे तितकेच ब्रिटिश अमलातील भारतीय वाङ्मयात देशभक्तीचे प्राधान्य वादातीत आहे, यावरून राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा उदय ब्रिटिश अंमलातच झाला असा एक युक्तिवाद करता येण्यासारखा आहे. पण हा युक्तिवाद खरा मानायचा तर विसाव्या शतकातील इंग्लण्डमध्ये विसाव्या शतकातील भारतापेक्षा देशाभिमान बराच कमी आहे असे म्हणावे लागेल. विसाव्या शतकातील इंग्रजी वाङ्मयात देशाभिमानाचा ऊत दिसून येतो असे म्हणता येणार नाही. रोगी आपल्या आरोग्यासंबंधी जितका विचार करतो तितका निरोगी माणूस करीत नाही. त्याचप्रमाणे परतंत्र राष्ट्राला देशाभिमानाचा जेवढा ध्यास असतो तेवढा स्वतंत्र राष्ट्राला असत नाही. पण इंग्लण्ड सारख्या स्वतंत्र व वैभवशाली राष्ट्राने देशाभिमानाचे उठल्या बसल्या पोवाडे गायिले नाहीत तरी कसोटीच्या प्रसंगी त्याच्या देशाभिमानाचा प्रत्यय आल्याखेरीज राहात नाही.

## नवा पाकिस्तानवाद

ब्रिटिशपूर्व भारतीय आपसात भांडत असत, वेळप्रसंगी परकीयांशी हातमिळवणी करून आपल्या बांधवांशी लढत असत हे सर्व खरे आहे. पण त्यावरून इंग्रज व मोगल हे परके आहेत, इंग्रज या देशातून गेले तर बरे, या भावना अस्तित्वातच नव्हत्या असे सिद्ध होत नाही. पुष्कळ वेळा या भावनापेक्षा तात्कालिक स्वार्थाच्या भावना अधिक प्रबल होत एवढेच त्यावरून सिद्ध होते. फारतर तात्कालिक स्वार्थाच्या भावना देशाभिमानाच्या भावनापेक्षा सर्वसाधारणपणे अधिक प्रबल राहिल्या असे देखील म्हणता येईल.

पण ब्रिटिशोत्तर भारतात तरी यापेक्षा काय वेगळी परिस्थिती होती? क्रांतिकारकांची रहस्ये ब्रिटिशांपासून फार काळ लपून राहत नसत. कोणीतरी माफीचा साक्षीदार मिळे. सरकारने लावलेल्या काही हजारांच्या बक्षिसासाठी क्रांतिकारकांना पकडून देणारे लोक शेकड्यावरी निघत. फडके, चाफेकर, राजगुरू यांना फितुरांनीच पकडून दिले. एकूण ब्रिटिशांचे राज्ययंत्र एतद्देशीयांच्या मदतीवरच चालू राहिले. यावरून ब्रिटिशपूर्व भारतापेक्षा ब्रिटिशोत्तर भारतात तात्कालिक स्वार्थाची भावना देशाभिमानाच्या भावनेपुढे निप्रभ ठरली असे म्हणणे बरोबर होणार नाही.

इंग्रजी राज्य असताना त्याच्या समर्थनप्रीत्यर्थ इंग्रज लोक असा युक्तिवाद वापरत की "भारत हा अनेक जमातींचा बनलेला आहे, त्यात काही जमाती बहुसंख्य व प्रबल आहेत, ब्रिटिश राज्य गेले तर या बहुसंख्य व प्रबल जमाती, अल्पसंख्य व दुबळ्या जमातींना खाऊन टाकतील" या युक्तिवादाचा प्रतिवाद करताना "भारत हे एक राष्ट्र आहे, त्यात अल्पसंख्य व बहुसंख्य असे भेद करणे बरोबर नाही. इंग्लंडमध्ये लंडननिवासी बाकीच्या इंग्रजांच्या मानाने अल्पसंख्य आहे, पण तरीही बाकीचे इंग्रज आपल्याला खाऊन टाकतील अशी त्यांना भीती वाटत नाही, कारण लंडन निवासी व अलंडननिवासी असे दोन तट इंग्रजात नाहीत. त्याचप्रमाणे भारत हे एक राष्ट्र असल्यामुळे त्यात अल्पसंख्य व बहुसंख्य असे तट मानणे युक्त नाही" असे उत्तर दिले जात होते. पण इंग्रजी राज्य गेल्यावर जो युक्तिवाद इंग्रजी राज्याच्या समर्थनार्थ इंग्रज करीत असत तोच इंग्रजी भाषेच्या समर्थनार्थ स्वतः भारतीयच करू लागले. "भारतातीलच एखादी भाषा राज्यभाषा केली तर ज्यांची ती मातृभाषा नाही त्यांचे नुकसान होईल, उलट इंग्रजी ही कुणाचीच मातृभाषा नसल्यामुळे तिचा स्वीकार केल्यास सर्वांची सारखीच गैरसोय होईल, सर्वांची सारखी गैरसोय होणे हे बहुसंख्येची सोय होण्यापेक्षा अधिक हितावह आहे." असे भारतीय "एकत्वाच्या वतीने" सांगण्यात येऊ लागेल. असे आजच्या भारतात सांगण्यात येते व ऐकून घेण्यात येते. यावरून राष्ट्रीयत्वाची भावना आजच्या भारतात अस्तित्वात नाही असे सरळ अनुमान निघते. बहुसंख्य लोकांची भाषा वापरल्याने जर अल्पसंख्य लोकांचे नुकसान होते, बहुसंख्याची भाषा ही जर अल्पसंख्यांच्या लेखी परभाषाच आहे, तर बहुसंख्य लोकांचे राज्य झाल्याने अल्पसंख्यांचे नुकसान होईल, बहुसंख्यांचे राज्य हे अल्पसंख्यांच्या लेखी परराज्य आहे असे ब्रिटिशपूर्व पाकिस्तानवाद्याप्रमाणे का म्हणू नये? लोकशाहीमध्ये बहुसंख्यांच्या हातात सत्ता राहणार हे अपरिहार्य आहे. हिंदीभाषी



लोक बहुसंख्य असल्यामुळे भारतीय सरकार हे मुख्यतः त्यांचेच सरकार असणार, तेव्हा हिंदी भाषा ही जर हिंदीतर भारतीयांनी परभाषा मानायची असेलतर हिंदीभाषी बहुसंख्य असलेल्या भारतातले बहुसंख्येचे राज्य हे देखील त्यांनी परराज्य का मानू नये?

## राष्ट्रभावनेची अक्षुण्ण परंपरा

तात्पर्य राष्ट्रीयत्वाच्या विरुद्ध असलेल्या शक्तींचे अस्तित्व सिद्ध केल्याने राष्ट्रीयत्वाचा अभाव सिद्ध होत नाही. त्यासाठी भारत हा एक देश आहे, तो अभारतीय देशाहून वेगळा आहे, त्यात काहीतरी एकत्व आहे, ही भावना अस्तित्वातच नव्हती असे दाखवून दिले पाहिजे. पण असे दाखवून देणे अशक्य आहे. भारताच्या ब्रिटिशपूर्व एकत्वाचे पुरावे इतके भक्कम आहेत की ज्याला ते दिसत नाहीत तो बुद्धीने आंधळा आहे असे म्हटले पाहिजे. सम्राट अशोकाचे शिलालेख साऱ्या भारतभर सापडले आहेत. ते सारे एकाच भाषेत व एकाच लिपीत आहेत. "आसेतुहिमाचल" या शब्दप्रयोगावरून तसेच केरल, तामिलनाडू येथील लोक दाक्षिणात्य, काश्मीर, उत्तरप्रदेश वगैरे मधले उदीच्य, कोकणातले प्रतीच्या व बंगाल आसाममधील प्राच्य या अभिधानावरून भारत हा एक देश मानला जात होता हे स्पष्ट आहे. नाहीतर चीनचे लोक काश्मीरच्याही उत्तरेला राहतात, मग त्यांना उदीच्य का म्हणण्यात आले नाही? शिवभारतात शहाजीचा उल्लेख दाक्षिणात्य म्हणून केला आहे. शिवभारताचा कर्ता परमानंद नेवासकर हा महाराष्ट्रीय होता. भारत हा एक देश आहे ही कल्पना नसती तर परमानन्दासारखा महाराष्ट्रीय शहाजीसारख्या महाराष्ट्रीय राजाचा उल्लेख दाक्षिणात्य म्हणून करताना. महाराष्ट्रीय लोक काही स्वतःच्याच दक्षिणेला राहत नाहीत. "हिमालयाच्या दक्षिणेस व हिंदी महासागराच्या उत्तरेस असलेला हा भारतवर्ष आहे, येथे राहणारी संतती ही भारती संतती आहे" ("उत्तरं यत्समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणम्। तद्वर्षं भारतं नाम भारती यत्र संततिः") असे विष्णुपुराण सांगते. "तिन्ही बाजूला समुद्र व त्याला धनुष्याच्या दोरीप्रमाणे सांधणारा हिमालय या भारताच्या सीमा होत" ("दक्षिणापरतो यस्य पूर्वेण च महोदधिः । हिमवानुत्तरेणास्य कार्मुकस्य यथा गुणः॥") असे मार्कण्डेय पुराण सांगते. भारत हा भौगोलिकदृष्ट्या एक देश आहे, इतकेच नव्हे तर येथे नांदणारी संस्कृती-एकात्म आहे ही भावना प्राचीन भारतीय साहित्यात ओतप्रोत भरून राहिली आहे. संस्कृत वाङ्मयातील कालिदास, माघ, भारवि, वगैरे अतिरथी महारथींचे वाङ्मय वाचले तर कसोशीने प्रयत्न करून देखील ते अमुक एका

प्रान्ताचे रहिवासी होते असे सांगता येत नाही. त्यांच्या वाङ्मयाचे जगातल्या कोणत्याही भाषेत भाषान्तर केले तरी ते लिखाण एका भारतीयाचे आहे याबद्दल कोणालाच संदेह वाटणार नाही. संस्कृत वाङ्मय हा भारताच्या एकात्मतेचा एक जिवंत व जाज्वल्य पुरावा आहे.

## मराठ्यांची राष्ट्रभावना

भारताच्या एकत्वाची ही भावना केवळ प्राचीन काळीच अस्तित्वात होती अशातला भाग नाही. पेशवाईच्या अंतापर्यंत ती सतत चालत आलेली दिसते. शिवाजीच्या पराक्रमाने आनंद गगनात मावेनासा होऊन रामदासांनी ''हिंदुस्थान बळावले'' असे उद्‌गार काढले. वस्तुतः शिवाजी महाराजांना अखिल भारताच्या सिंहासनपदाचा अभिषेक झाला नव्हता, महाराष्ट्राच्या केवळ एका भागात त्यांनी स्वराज्य स्थापित केले होते. पण स्वराज्य महाराष्ट्रात स्थापित झाले असले तरी अखिल भारताच्या स्वराज्याची ती मुहूर्तमेढ आहे, ते केवळ महाराष्ट्राचे राज्य नाही ही जाणीव जागृत होती याचे रामदासांचे उद्‌गार हे निर्णायक प्रमाण आहे. शिवाजी महाराजांच्या एका स्वदस्तुरच्या पत्रात आपले ध्येय हिंदवी स्वराज्य हे असल्याबद्दल त्यांनी स्पष्ट उल्लेख केला आहे. पुढे रघुनाथराव, पेशव्यांना लिहिलेल्या एका पत्रात म्हणतो ''काबूल व कंधार हे अटकेपारचे सुभे हिंदुस्थानकडे अकबरापासून आलमगीरापावेतो होते, ते आम्ही विलायतेस का द्यावे?'' रघुनाथरावाने लाहोर घेतले तेव्हा अंताजी माणकेश्वर लिहितो.

सारे हिंदुस्थानचा सूड अब्दालीपासून एका स्वामींनी घेतला. पेशव्यांचा विजय हा भारताचा विजय आहे, एखाद्या वीराचा वैयक्तिक विजय नव्हे ही भावना या वाक्यात स्पष्टपणे प्रतीत होते. पेशव्यांचा वकील गोविंदराव काळे नाना फडवीसास लिहितो ''अटक नदीचे अलीकडे दक्षिण समुद्रापावेतो हिंदूचे स्थान, तुर्कस्थान नव्हे'' तेव्हा दक्षिण सागरापासून गान्धारपर्यन्त राज्य कुणाचेही असो हा सर्व भूभाग भारताचाच ही भावना कायम होती.

या उलट ब्रिटिश काळात अफगाणिस्तानला भारताचा भाग म्हणून कोणी संबोधले असते तर आश्चर्याचा धक्का बसला असता.

गोविंदराव काळ्यांच्या पत्रात ''विक्रमादित्य वगैरे राजांच्या पुढील राज्यकर्ते नादान निघून चकत्याच्या वंशजांनी हस्तिनापूरचे राज्य घेतले'' म्हणून हळहळ व्यक्त केली आहे.



चकत्याचे वंशज म्हणजे मोगल. तेव्हा भारतीयांना मोगल हे परके वाटेनासे झाले होते हे जे ''पुरोगामी'' मत आज काल ऐकू येते ते खरे नसून आक्रमण कितीही वर्षापूर्वी झालेले असो ते आक्रमणच आहे, हस्तिनापूर पाण्डवांचे होते तेव्हा ते आमच्या सत्तेखाली होते, ते मोगलाचे झाले तेव्हा त्यावर आमची सत्ता राहिली नाही ही राष्ट्रीयत्वाची जाज्वल्य भावना या पत्रात व्यक्त झाली आहे.

मराठ्यांच्या या भावना तत्कालीन इंग्रजांच्या नजरेतून सुटल्या नव्हत्या. वारन हेस्टिंगने मराठ्यांच्या ठायी राष्ट्रभावना जिवंत आहे असे उद्‌गार काढले होते. एल्फिन्स्टनने देखील ''मराठी लोकात राष्ट्रीय भावना पक्की रुजलेली आहे. त्यामुळे संकटकाळी ते एक होतात'' असे आपल्या देशबंधूंना बजावले होते.

भारत हा केवळ भौगोलिक दृष्ट्या एक भूभाग आहे एवढीच भावना नसून येथील संस्कृतीचे व येथे वाढलेले ते आपले व बाकीचे परके ही भावना कायम होती. राणाप्रतापविरुद्ध स्वार्थसाधनासाठी राजपुतेतरांनीच केवळ नव्हे तर राजपुतांनी देखील अकबराला मदत केली. पण अखिल भारतात राणाप्रताप व अकबर या संघर्षाविषयी अकबराचा पोवाडा कुठल्याच भागातल्या जनतेने गायिला नाही. आसेतुहिमाचल पोवाडा गायिला जातो तो राणाप्रतापाचाच. नानासाहेब पेशव्यापासून मराठ्यांचे व राजपुतांचे संबंध बिघडले व त्यांच्यात अनेक लढाया झाल्या. पण ब्रिटिशपूर्व महाराष्ट्रात देखील खर्ड्याच्या लढाईचा व पानिपतचा पोवाडा गायिला जात असे. रजपुतांशी झालेल्या लढायांचे व त्यांच्यावर मिळविलेल्या विजयांचे रसभरीत वर्णन ऐकण्यात कोणाला आनंद होत होता असा पुरावा नाही. राजस्थानमध्ये देखील पृथ्वीराजाने महमंद घोरी विरुद्ध केलेल्या संग्रामाची गाथा गाणारा पृथ्वीराजा रासो हे साऱ्या जनतेचे वाङ्मय आहे, मराठ्यांबरोबर झालेल्या युद्धावर अशा तऱ्हेचे सर्व जनतेत गहिवरून वाचले जाणारे वाङ्मय नाही

## नवे राष्ट्रीयत्व की नवी वैमनस्ये ?

ब्रिटिश भारतात, पूर्वी न आढळणारे असे राष्ट्रीयत्वाचे कोणतेही लक्षण दिसू लागले नाही, एवढेच'' नव्हे तर भारतीय जनतेत पूर्वी कधीही न दिसणारी वैमनस्ये ब्रिटिश काळात उत्पन्न झाली. ब्रिटिशपूर्व भारतात दक्षिण भारतीय लोक उत्तरभारतीय लोकांना ''आम्ही द्रविड लोक संस्कृतीने व वंशाने तुमच्यापेक्षा वेगळे आहोत. तुमच्या पूर्वजांनी आमच्या पूर्वजांना जिंकले, तुमचे पूर्वज भारताच्या बाहेरून आले व म्हणून आमच्या दृष्टीने महंमद

गझनवी, महमद घोरी व इंग्रज यांच्यासारखेच परकीय होते, तुमची हिंदी भाषा तर आम्हाला इंग्रजीपेक्षाही परकी वाटते, वैदिक संस्कृति व वाङ्मय हे आम्हाला इंग्रजी संस्कृती व वाङ्मयापेक्षा अधिक परकीय आहे'' असे म्हणत असल्याचा पुरावा नाही. अर्थात् दक्षिणी व उत्तरी हे भांडण ब्रिटिश काळात नवे निर्माण झाले.

असेच ब्रिटिश काळात नवे निर्माण झालेले भांडण ब्राह्मण-ब्राह्मणेतरांचे आहे. ब्रिटिशपूर्व काळात ब्राह्मण इतर जातींना कमी लेखत व इतर जातींना हे सहन होत नसे असे दाखविणारी उदाहरणे दाखविता येतील. पण राजकीय संघर्षाचे स्वरूप घेऊ शकेल इतक्या प्रमाणात ब्राह्मण-ब्राह्मणेतरात कधीच तेढ नव्हती. समाजात साधारणतः ब्राह्मणांबद्दल आदरभाव वसत होता.

ब्रिटिश काळात निर्माण झालेल्या फुटीचे तिसरे उदाहरण म्हणजे शीख ''आम्ही हिंदू नाही'' असे म्हणू लागले हे होय. पूर्वी शीख लोक स्वतःला हिंदू समजत. हिंदू धर्माच्या रक्षणासाठीच गुरू गोविंदसिंहाने बलिदान केले. ''सकल दुनिया मे खालसा पन्थ गाजे । जागे धर्म हिंदू सकल भंड भाजे।'' हे गुरू गोविंदसिंहाचे वाक्य प्रसिद्ध आहे. रणजितसिंगाने अफगाणिस्तानाच्या तक्तावर बसण्यासाठी मदतीची याचना करणाऱ्या शहासुजाला अफगाणिस्तानात गोवध बंद करावा व महंमद गझनवीने लुटून नेलेली सोमनाथाच्या मंदिराची दारे परत करावी अशा अटी घातल्या होत्या. काशीच्या विश्वनाथ मंदिराला शिखांच्या या मूर्धाभिषिक्त राजाने सोन्याचे दार बसवून दिले होते. शिखांची ही हिंदुत्वासंबंधीची आत्मीयता हळूहळू लुप्त होऊ लागली व ते वेगळ्या शिखिस्तानची मागणी करू लागले.

भारतात पूर्वी नसलेली वैमनस्ये निर्माण झाली ती केवळ यदृच्छेने झाली नसून इंग्रजी राज्यकर्ते व इंग्रजी शिक्षण यांचा तो हेतुपूर्वक घडवून आणलेला परिणाम होता. मेकॉलेने इंग्रजी शिक्षणासंबंधी लिहिलेल्या प्रसिद्ध प्रतिवृत्तात असे स्पष्टच म्हटले आहे की आमच्या नवीन शिक्षणपद्धतीतून बाहेर पडलेली पिढी शरीराने भारतीय तरी मनाने पूर्णपणे अभारतीय असलेली निपजेल. ''इंग्रजी संस्कृतीप्रमाणेच वैदिक संस्कृती देखील भारतात बाहेरून आली, भारतात त्याच्या आधी द्रविड संस्कृती होती, आज तिचे वारसदार दक्षिण भारतीय लोक आहेत, वगैरे निराधार गप्पा इंग्रजी शिक्षणाच्या द्वाराच पसरविण्यात आल्या. या गप्पांमुळे हिंदू समाजाने हजारो वर्षांपासून जी एकात्मता साधली होती तिला तडा गेला.''



दाक्षिणात्यांप्रमाणेच शिखांनाही आपल्या राष्ट्रीयत्वापासून फोडण्याचे यशस्वी कार्य मॅक्कालिफ् नावाच्या एका इंग्रजाने केले. त्याने शीख धर्माची दीक्षा घेतली व शीख धर्मावर ग्रंथ लिहून शीख हे हिंदू नाहीत असा प्रचार सुरू केला. व्हाइसराय लॅन्सडाऊन व पंजाबचा गव्हर्नर एडमर्टन यांनी शिखांना वेगळे करू इच्छिणाऱ्या सिंग सभेच्या प्रचाराला खतपाणी पुरविले. या प्रचाराचा परिणाम होऊन शिखांच्या सुवर्ण मंदिरातील हिंदू देवांच्या मूर्ती काढण्यात आल्या व शीख लोक पूर्वी हिंदूंच्या धार्मिक यात्रात हजारोंनी भाग घेत होते ते तिकडे फिरकेनासे झाले. ''जागे धर्म हिंदू सकल भंड भाजे'' असे म्हणणाऱ्या गुरू गोविंदसिंहाचे मानसपुत्र आम्ही हिंदूच नाही असे म्हणू लागले.

## मुस्लिम प्रश्न

द्राविडिस्तान व शिखिस्तानची मागणी ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद, या प्रमाणेच हिंदू-मुसलमानांचा प्रश्न सर्वस्वी ब्रिटिशनिर्मित नाही, अरबांनी सिंध प्रान्तावर स्वारी केली त्या दिवसापासून या प्रश्नाच्या इतिहासाला सुरवात होते हे खरे आहे. पण ब्रिटिशपूर्व भारताने हा प्रश्न सोडविण्यात बरीच प्रगती केली होती. सत्तावनच्या स्वातंत्र्य-संग्रामात हा प्रश्न सुटण्यास फारसा अवधी उरला नव्हता याचे प्रत्यंतर मिळाले होते. औरंगजेबाचा वंशज बहादूरशहा याने हिंदू मुसलमानांच्या संयुक्त स्वातंत्र्यसंग्रामाचे नेतृत्व स्वीकारले होते व आपल्या राज्यात गोवधबंदी जारी केली होती. मोगल राजवटीबद्दलच्या द्वेषामुळे शीख स्वातंत्र्ययुद्धात सामील होत नाहीत हे पाहून ''सर्व भारतीयांनी अधिक एकोप्याने स्वातंत्र्ययुद्ध लढावे म्हणून आपण दूर होण्यास तयार आहोत, भारतीय राजेरजवाड्यांनी आपल्या ऐवजी एखादा अधिक लोकमान्य पुढारी निवडावा'' असा फतवा काढला होता.

बहादूरशहाच केवळ नव्हे तर इतर सामान्य मुसलमानातही आपण मूळचे भारतीयच, भारताला जिंकणाऱ्या परकीय विजेत्यापैकी आपण नव्हे, ही भावना हळूहळू वाढीस लागली होती. सर सय्यद अहमदखान यांच्यासारख्या मुसलमानांच्या प्रसिद्ध पुढाऱ्याने १८८४ साली काढलेले पुढील उद्‌गार मननीय आहेत

''मी धर्माने तुमचेपेक्षा वेगळा असलो तरी धर्म सोडून इतर बाबतीत माझ्यात व तुमच्यात काही भेद नाही. मीही हिंदूच आहे. तुम्ही मला हिंदू समजत नाही याबद्दल मला खेद होतो. या देशात राहणारे सर्वच, मग ते मुसलमान व ख्रिश्चन का असेनात, हिंदूच आहेत.[१]''

१८८४ साली स्वतःला हिंदू म्हणवून घेण्यास उत्सुक असलेले सर सय्यद अहमद लवकरच विभाजनवादी झाले. सोन्याची माती करण्याची ही उलटी किमया ब्रिटिश राजनीतीने केली. सर सय्यद अहमदांचे हे स्थित्यंतर त्यांच्या इंग्लड यात्रेनंतर घडून आले. इंग्लंडमध्ये त्यांनी अनेक मुत्सद्यांशी वाटाघाटी केल्या. तेथून परत आल्यावर त्यांनी अलीगड कॉलेजची स्थापना केली. या कॉलेजचा प्रमुख बेक नावाचा एक इंग्रज होता. बेकने कॉलेजचे नियतकालिक आपल्या हातात घेतले व त्यातून "मुसलमान हे एक वेगळे राष्ट्र आहे, औरंगजेबाचे भजक जे मुसलमान त्यांचे शिवाजी व गुरू गोविंद यांचे भजक जे हिंदू त्यांच्याशी कधीही ऐक्य साधणे शक्य नाही, लोकशाहीची राज्यव्यवस्था भारतात कधीच रुजू शकणार नाही," असा सतत प्रचार सुरू केला. याच प्रचाराचा परिणाम होऊन अलीगड हे मुस्लिम विभक्तीकरणाच्या चळवळीचे एक केंद्र बनले. ब्रिटिशांची फोडा व झोडा ही राजनीती इतक्या उजळ माथ्याने धुडगूस घालीत होती की इंग्रजी शिक्षणाने ज्यांची दृष्टी अंध झालेली नाही अशा कुणालाही भारताची शकले पाडण्यात मुख्यतः ही नीती कारणीभूत झाली बद्दल संशय वाटणार नाही. एका इंग्रजाने कर्नाटिकस या नावाखाली एशियाटिक जर्नलमध्ये लेख लिहून "भारतीयात शक्य तितकी भांडणे लावणे हे आपल्या राजनीतीचे स्वरूप असले पाहिजे" असे स्पष्टच म्हटले होते. मुंबईचा गव्हर्नर एलफिन्स्टन १९५९ मध्ये स्पष्ट म्हणाला की "दुही माजवा व राज्य करा हा रोमन साम्राज्यावाद्यांचा मूलमंत्र आपण विसरता कामा नये." सेक्रेटरी ऑफ स्टेट हमिल्टन ब्रिटिश राजनीतीचे स्वरूप सांगताना कोणतीच लाज न बाळगता म्हणाले "हिंदू-मुसलमानांच्या दंग्याच्या बातम्या येतात तेव्हा आनंद मानावा की दुःख मानावे असा प्रश्न पडतो. दंगे राज्यकर्त्यांना नेहमीच तापदायक असतात. म्हणून पुष्कळ इंग्रजांना दंगे होऊ नयेत असे वाटणे साहजिक आहे. पण हिंदू मुसलमानात कधीच दंगे न होता निर्भेळ एकी नांदली तर ते आपल्याला अधिक भयावह आहे." दंगे मुळातच दडपून न टाकता भडकू द्यावे अशी ब्रिटिशांची नीती होती. पारशी समाजावर जातीय हल्ला झाला तेव्हा काही पारशी दाद मागण्यास मुंबईच्या गव्हर्नराकडे गेले. त्यावेळी गव्हर्नराने त्यांना सांगितले "तुम्ही स्वतःच दंगेखोरांशी मिळते घेतले पाहिजे. संरक्षणासाठी सरकारच्या तोंडाकडे पाहण्याची वृत्ती चांगली नाही."पाकिस्तानचे बीजारोपण ज्या विभक्त मतदारसंघाने केले तो मुसलमानांनी मागितलेला नव्हता. व्हाइसराय मिंटोचा निजी सचिव स्मिथ याने प्रमुख मुसलमानांच्या भेटी घेऊन व्हाइसरॉयकडे एक मुस्लिम शिष्टमंडळ पाठविण्याचा व्यूह रचला. या



शिष्टमंडळाने विभक्त मतदारसंघाची मागणी करावी अशी प्रेरणाही त्यानेच दिली. मिंटोने ही स्वतःच फूस लावून उभी केलेली मागणी तिऱ्हाइतपणाचा आव आणून मंजूर केली. या प्रसंगाला उद्देशून श्रीमती मिंटो आपल्या दैनंदिनीत लिहितातः "मुत्सद्देगिरीच्या या एका कृत्याने सहा कोटी मुलसमानांना राजद्रोहाच्या मार्गापासून परावृत्त करण्यात आले." परतंत्र देशाला देशभक्तीला राजद्रोह म्हणतात. तेव्हा मुसलमानांना राजद्रोहापासून परावृत्त करण्याचा अर्थ देशभक्तीपासून परावृत्त करणे असा होतो. ब्रिटनचे एकेकाळचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनल्ड यांनी आपल्या "भारतातील जागृती" या पुस्तकात हिंदू मुसलमानांचे भांडण ब्रिटिश अधिकाऱ्यांनी निर्माण केले असा स्पष्टच आरोप केला आहे.[१]

## एकछत्र व एक राष्ट्र

ब्रिटिशांनी या देशात दुही माजविण्याचा प्रयत्न केला असेल. पण साऱ्या देशभर एकछत्री अंमल स्थापून त्यांनी या देशात पूर्वी कधीही नसलेले ऐक्य निर्माण केले असे नेहमी म्हणण्यात येते. हा युक्तिवाद अनेक दृष्टींनी चूक आहे. एकतर ब्रिटिशांनी या देशात प्रथमच एकछत्री अंमल स्थापला, त्यांच्या पूर्वी या देशावर एक सत्ता अशी कधीच नव्हती हे विधान इतिहासाच्या कसोटीला उतरणारे नाही. सम्राट् अशोकाची सत्ता भारतभर होती. त्याच्या ताब्यात भारताच्या अति दक्षिणेकडील इंग्रजांच्या ताब्यात असलेला मुलूख नव्हता. पण त्याच्या भरीस भारताच्या अति उत्तरेकडील इंग्रजांच्या ताब्यात नसलेला गान्धार म्हणजे अफगाणिस्थान त्याच्या राज्यात होते. गुप्त सम्राटांचे स्वतःचे राज्य साऱ्या उत्तर हिंदुस्थानात होते व दक्षिण हिंदुस्थान ज्यांच्या ताब्यात होता ते वाकाटक नृपती गुप्तांची प्रभुसत्ता मानीत होते. याचे निदर्शन म्हणून त्यांनी आपल्या पदवीतील राजाधिराज हा शब्द काढून टाकला होता. ब्रिटिशांची देखील साक्षात् सत्ता साऱ्या भारतभर नव्हती, तीन चतुर्थांश भारतात त्यांचे मांडलिक राज्य करीत होते हे लक्षात ठेवले पाहिजे. मौर्य सम्राटांची सत्ता १३७ वर्षे व गुप्त सम्राटांची सुमारे दोनशे वर्षे टिकली. ब्रिटिश सत्ता यापेक्षा जास्त काळ भारतात टिकली असे म्हणता येत नाही. तेव्हा ब्रिटिशपूर्व भारतात एकछत्री अंमल कधीच नव्हता हे विधान निराधार आहे.

दुसरे असे की ज्या काळी भारतात एकछत्री अंमल नव्हता तेव्हादेखील साऱ्या भारतीय समाजाचे नियमन एकाच स्मृतिप्रणीत कायद्याने होत होते. भारतीय परंपरेप्रमाणे राजाला नवीन कायदे करण्याचा अधिकार नाही. श्रुतिस्मृतिपुराणोक्त कायदे व लोकाचार

यांच्या आधारावर राज्य चालविणे हे त्याचे कर्तव्य समजले जात होते. एकाच कायद्याचा अंमल ज्याअर्थी या देशात सर्वकाळ होता त्याअर्थी सारतः या देशात एकशासन नेहमीच अस्तित्वात होते असे म्हटले पाहिजे. एकाच व्यक्तीचे व व्यक्तिसमूहाचे शासन हे एकछत्री शासन आहे तसेच एका कायद्याचे शासन हे देखील एकछत्री शासनच आहे.

शिवाय एकछत्री शासन नेहमी एकराष्ट्रीयत्वाला पोषकच असेल असे नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. एकछत्री अंमल हा राष्ट्राच्या शत्रूचा असेल तर त्याने एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेची जोपासना होण्याऐवजी तिचे समूळ उच्चाटन होण्याचा मार्ग सुलभ होईल. ब्रिटिशांनी आपल्या एकछत्री सत्तेचा वापर भारताची एकात्मता नष्ट करण्यासाठी केला हे वर दाखवून दिले आहे. त्यांचा अंमल भारताच्या सर्व भागावर नसता तर जेथे त्यांचा अंमल नसता त्या भागात भारतीय एकात्मतेची भावना टिकून रहिली असती. पण साऱ्या देशावर त्यांचा अंमल असल्यामुळे त्यांना सगळ्याच देशातून एकात्मतेच्या भावनेचे उच्चाटन करणे सोपे गेले. तुर्क/मोगल आक्रमकांचा अंमल साऱ्या भारतावर नसल्यामुळे, विजयनगर, महाराष्ट्र वगैरे त्यांच्या सत्ताकेंद्रापासून दूर असलेल्या प्रदेशात स्वातंत्र्याचे अंकुर वाढू शकले. तसा प्रकार ब्रिटिशांविरुद्ध होऊ शकला नाही.

## इंग्रजी शिक्षण व राष्ट्रभावना

इंग्रजांच्या एकछत्री शासनापेक्षाही इंग्रजी भाषेच्या एकछत्री शिक्षणाची महती आजकाल जास्त गाण्यात येते. "स्वराज्याच्या चळवळीचे सारे नेते इंग्रजी शिकलेले होते, संस्कृत पाठशाळात जाऊन परंपरागत शिक्षण घेणाऱ्यात नाव घेण्यासारखा एकही राजकीय पुढारी निघाला नाही यावरून राष्ट्रीयत्वाची भावना इंग्रजी शिक्षणाने निर्माण केली असे सिद्ध होते" असा एक युक्तिवाद करण्यात येतो. या युक्तिवादात पुढील गोष्टी गृहीत धरल्या आहेत : (१) इंग्रजी शिक्षणाबरोबरच इंग्रजीचा गंधही लागू ने देता परंपरागत भारतीय शिक्षण घेणारा बराच मोठा वर्ग इंग्रजी अंमलात अस्तित्वात होता. (२) संस्कृत विद्येकडे वळणारा विद्यार्थी बुद्धी, नेतृत्व, सामाजिक प्रतिष्ठा इत्यादी सर्व गुणात इंग्रजी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांशी तुल्य असे. ही दोन्ही गृहीतकृत्ये निराधार आहेत. बहुतेक विद्यार्थी प्रथम इंग्रजी शिक्षण घेण्याचाच प्रयत्न करीत. ते घरची आर्थिक परिस्थिती, आर्थिक महत्त्वाकांक्षेचा अभाव, वगैरे कारणांनी नाही जमले तरच ते संस्कृत विद्येकडे अधिक लक्ष देत. त्यातून बुद्धिमान् विद्यार्थी इंग्रजी सोडून सर्वस्वी संस्कृत विद्येकडे वळला असे क्वचितच



होई. बुद्धिमान् विद्यार्थी संस्कृत विद्येकडे येईनासा झाल्यामुळे त्या विद्येचा दर्जा विद्यार्थ्यांच्या बुद्धीच्या तोलानुसार साहजिकच घसरला. इंग्रजीचा गंधही लागू न देता निव्वळ संस्कृत विद्याध्ययनात जन्म घालविणारे साऱ्या भारतात शेदोनशे तरी असत की नाही, शंका आहे. जे असत त्यांच्या बुद्धिमत्तेचा सरासरी स्तर कमी, इंग्रजी शिकणाऱ्याला शंभर रुपये मिळाले तर संस्कृत विद्वानाला शंभर कवड्या मिळणार, त्यातून मिशनरी व नवे आंग्लशूद्र भारतीय, यांनी संस्कृत विद्येची सतत केलेली नालस्ती यामुळे संस्कृत विद्वत्ता हा हेटाळणीचा विषय होऊन राहिला होता. संस्कृत विद्वानांचा वर्ग हा मुळी दलितांचा वर्ग होऊन बसला होता. असा वर्ग समाजाचे पुढारीपणा करू शकला नाही हा संस्कृत विद्येचा दोष नसून परकीय विजेत्यांनी आमच्यावर लादलेल्या सांस्कृतिक दास्याचा प्रभाव होता. शत्रूच्या आघातामुळे आमच्या स्वयंप्रज्ञेचे संस्कृत विद्यारूपी पाय मोडले म्हणून आम्हाला इंग्रजीच्या उसन्या कुबडीवर चालावे लागले. आमचे पाय या कुबडीपेक्षा कमी कार्यक्षम होते असे अनुमान त्यावरून निघू शकत नाही. वाईच्या प्राज्ञपाठशाळेत तयार झालेले कित्येक पण्डित स्वातन्त्र्याच्या आन्दोलनात सामील झालेले होते हे या सन्दर्भात लक्षात ठेवण्यासारखे आहे.

इंग्रजीचे बंड माजण्यापूर्वी राजेरजवाडे हे जनतेचे राजकीय पुढारी समजले जात होते. या वर्गानेच सत्तावनचा स्वातंत्र्यसंग्राम घडवून आणला होता. या स्वातंत्र्ययुद्धाच्या तोलाचा स्वातंत्र्यसंग्राम भारतात पुढे कधीच आला नाही. एवढेच नव्हे, तर तो स्वातंत्र्याचा संग्राम होता हे ओळखण्याची शक्ती देखील इंग्रजी शिक्षणाने नाहीशी केली.

राष्ट्रीयतेच्या जोपासनेच्या बाबतीत इंग्रजी शिक्षणाचा खरोखर कार्यभाग हा असा होता.

■ ■ ■

# संदर्भ


| | | |
|---|---|---|
| १. | हिस्ट्री अॅन्ड कल्चर ऑफ द इण्डियन पीपल | भारतीय विद्याभवन प्रकाशित व रमेशचंद्रमजुमदारसंपादित |
| २. | १८५७ | डॉ. सुरेनद्रनाथ सेन |
| ३. | सत्तावनचे स्वातंत्र्यसमर | वि. दा. सावरकर |
| ४. | अठराशे सत्तावनी शिपाईगर्दी | न. र. फाटक |
| ५. | माझा प्रवास | विष्णूभट गोडसे |
| ६. | नानासाहेब पेशवा अॅण्ड द फाइट फार फ्रीडम | आनन्दस्वरूप मिश्र |
| ७. | एन्सायक्लोपीडीया ब्रिटानिका | |
| ८. | मेरी अॅण्टायनेट | स्टीफन ग्झ्वाइग |
| ९. | डिस्पॅचेस | कार्लमार्क्स |
| १०. | हिस्ट्री ऑफ औरंगजेब | जदुनाथ सरकार |
| ११. | इकॉनॉमिक कण्डिशन्स इन एन्शन्ट इण्डिया | डॉ. प्राणनाथ |
| १२. | निबंधसंग्रह | दत्तात्रेय आपटे |
| १३. | इण्डियन कॉटन टेक्सटाइल टेक्नॉलॉजी | एम. पी. गांधी |
| १४. | निबंध संग्रह | गोडे |
| १५. | सायन्स अॅण्ड टेकनॉलॉजी इन एटीन्थ सेंचरी इण्डिया | धर्मपाल |
| १६ | भारतीय ज्योतिःशास्त्राचा इतिहास | शं. वा दीक्षित |
| १७. | स्टूडण्टस् हिस्ट्री ऑफ एडयुकेशन इन इण्डिया | नेरुला अॅण्ड नाइक |
| १८ | मराठा अॅडमिनिस्ट्रेशन | सुरेन्द्रनाथ सेन |
| १९. | साउथ इण्डिया इन १८५७ | व्ही. डी. दिवेकर |
| २०. | इण्डियन म्यूटिनी | कये |
| २१. | हिस्ट्री ऑफ द सीपॉय वार | व्हाइट |
| २२. | ऑफिशियल नॅरेटिव्ह | जे. सी. विल्वन |
| २३. | कॉन्फिडेन्शियल रेकॉर्डस ऑफ द ईस्ट इण्डिया कंपनी | जॉन कये |
| २४. | रेमिनिसन्सेस ऑफ द ग्रेट म्यूटिनी | फोर्बस मिचेल |
| २५. | हिस्ट्री ऑफ द इण्डियन म्यूटिनी | चार्लस बॉल |
| २६. | सेन्ट्रल इण्डिया डयूरिंग द रिबेलियन ऑफ १८५७ | थॉमस लो |
| २७. | रेड पॅम्प्लेट | जी. बी. मलेसन |
| २८. | माय डायरी इन इण्डिया इन द इअर १८५८-५९ | विल्यम होवर्ड रसेल |
| २९. | अमेरिकेचा इतिहास | ना. ग. गोरे |
| ३०. | शतपत्रे | लोकहितवादी |
| ३१. | निबन्धमाला | विष्णुशास्त्री चिपळूणकर |
| ३२. | संस्कृतडिक्शनरी | मॉनियर विल्यमस् |
| ३३. | वेस्टर्न इण्डोलॉजिस्टस् ए स्टडी इन मोटिव्हस | भगवद् दत्त |
| ३४. | नवभारत मासिक अंकसंग्रह | प्राज्ञपाठशाला वाई |
| ३५. | टाइम्स ऑफ इण्डिया | |
| ३६. | इण्डियाज चायना वॉर | मॅक्स्वेल |
| ३७. | रोमिनार रोमनलिपि विशेषांक | |
| ३८. | नव्यन्याय लॉजिक | इंगल्स |
| ३९. | डिस्कव्हरी ऑफ इण्डिया | पं. जवाहरलाल नेहरू |


■ ■ ■




# मी आणि माझं

मा. गो. वैद्य

**मूल्य २७० रुपये**

"माझे आई, मला तू कधी तरी भेटशील काय ग?
म्हणजे माझ्या मृत्यूनंतर! तू कुठे असशील तू?
तू कुठल्या तरी पुण्यलोकातच असणार.
मी तेथे येण्याला पात्र असेन? कुणास ठावूक?
पण तुझ्या पायाची शपथ घेऊन सांगतो,
आजवर मी कुणाचाही द्वेष केला नाही.
जे दुसऱ्याचे आहे असे पाच पैसेही
प्राप्त करण्याची इच्छा बाळगली नाही.
परधनाप्रमाणे परस्त्रीची आस कधी धरली नाही.
जे काम वाट्याला आले, ते करताना यत्किंचितही
कुचराई केली नाही. काही मिळावे म्हणून
कुणाची खुशामत केली नाही. स्वतः पुढे
सरकण्यासाठी कुणाचे पाय कधी मागे खेचले नाहीत.
एवढ्या तुटपुंज्या भांडवलावर तू जेथे आहेस,
तेथे मी येऊ शकेन? कुणास ठावूक?
पण तुझ्याजवळ यावे असे खूप खूप वाटते ग!"

**- 'आमची आई'- या लेखातून**